# श्री वासुदेव निवास

## (पंथराज सह)



ब्रह्मश्री

## दत्तमहाराज कवीश्वर

# विशेषांक

सहस्त्रचंद्रदर्शन शांति महोत्सव

मे १९९०



प. श्रीनृसिंहसरस्वती (दीक्षित) स्वामी महाराज, अमरापूर



शक्तिपातयोग पीठाधीश्वर

## प. पू. श्रीस्वामी शिवोमूतीर्थ महाराज

यांचा अमेरिकेतून आलेला

# शुभाशीर्वाद

सॅन्फ्रॉन्सिस्को १०-४-९०

॥ ॐनमो नारायणाय ॥

श्रीदत्तात्रेयशास्त्री कवीश्वर महाराज ! श्रीनारायण स्मरणपूर्वक शुभाशीर्वाद ! देवाससे पुनः प्रेषित होकर आपके सहस्त्रचंद्रदर्शन शान्ति समारोहका निमंत्रण पत्र प्राप्त हुआ। इस अवसर में भारतसेबहुत दूर होनेके कारण समारोमें सशरीर उपस्थित होने में असमर्थ हूँ। किन्तु मानसिकरूपमें मैं वहाँ उपस्थित रहूँगा। भगवानसे प्रार्थना है कि आपको दीर्घ आयु एवं सुस्वास्थ्यप्रदान करने की कृपा करे-ताकि आश्रमके अध्यात्मिक कार्य में आपका मार्गदर्शन उपलब्ध होता रहे। नारायण।

शुभचिन्तक
शिवोमतीर्थ

# स्तुति कुसुमांजलि

**कवी - ब्रह्मश्री, विद्वद्रत्न श्रीपाद दीक्षित तापस, मुळगुंद**
**शास्त्ररत्नाकरः पूज्य कवीश्वर महाराजाणां शिष्यः ॥**

बिद्यावाचस्पत्यादि बिरुदावली बिभ्राजमानानां
सकल विद्यास्थान निष्णाताणां प्रतिष्ठित ज्ञाननिष्ठा
नामपि भागवत भक्तिमय जीवितानां अखिल
भारत प्रसिद्धानामपि सर्वथा प्रसिद्धि पराङ्मुखानां
परम पूज्य कवीश्वर दत्तात्रेय शास्त्रि गुरुचरणानां
सहस्रचंद्रदर्शन शांति महोत्सवसरे अनंततदन्ते
वासिभिरति प्रहृतया पावन तच्चरण नलिनयोः ॥

# समर्प्यमाणः स्तुति कुसुमाञ्जलिः

कामानावृतमानसाः सुमनसः सीमातिगज्ञप्तयः
सामाद्यागमसर्वसारनिधयः सोमवतंसप्रियाः ।
रामावक्त्रमाधववाष्टवपुषां धामावतारायिताः
हे श्रीदत्तकवीश्वरा गुरुवरा विश्वावने जागृथ ।। १ ।।

काञ्चीश्रीचरणैः शिवावरणैः सङ्केश्वर श्रीपदैः
कूड्लीशृङ्गमहीध्रवीध्रगुरुभिः शृङ्गाद्रिपीठाधिपैः ।
अन्यैर्विष्टपदेशिकश्च विविधाशीराशिभिर्वर्धिता
धन्या दत्तकवीश्वरा गुरुवरा ! विश्वावने जागृथ ।। २ ।।

येषां क्षान्तिगुणे क्षणं हृदि कृते भाति क्षमा साऽक्षमा
विष्वद्रीचिच वाक्पतिःस वचने वाचंयमत्वव्रतः ।
शिष्या अभ्युपपत्तिलेशवशतो मंदार मन्दादराः
ते श्रीदत्तकवीश्वरा गुरुवरा विश्वावने जागृथ ।। ३ ।।

छात्राश्छत्रपती भवन्ति नचिरात् यद्व्याकृतौ व्याकृतौ
मीमांसाजलधिश्च केलिसरसी यत्पादपांस्वर्चने ।
प्राज्ञाप्राज्ञ समस बोधजननं यद्ब्रह्ममीमांसनं
ते श्रीदत्तकवीश्वरा गुरुवरा विश्वावने जागृथ ।। ४ ।।

'किं पश्यन्ति पदा, सदा सदसि, किं कीर्णान् कणान् भुञ्जते,
नेत्राणां किमु पात्रयन्ति निनदान्, व्यस्यन्ति वेदान् किमु? ।
किं नाकोः प्रभवन्ति ' यानिति बुधस्तोमः समुत्प्रेक्षते
तेश्रीदत्तकवीश्वरा गुरुवरा विश्वावने जागृथ ।। ५ ।।

धर्मोत्कर्षयुतेऽपि हन्त ! सुमनो हर्षेऽपि यौगान्तरे
ऽद्रुह्यद् वामन वर्णिने स समये पूर्वः कवीड् दैत्यपाः ।
दिष्टे वामन वर्णिनं गुरुवरं दुष्टेप्यु दर्चन्ति ये
ते श्रीदत्तकवीश्वरा गुरुवरा विश्वावने जागृथ ।। ६ ।।

राधेयाहितलज्जमुज्वलतमं वादान्यकं नान्यगं
वात्सल्यं च समुच्छलत् सकलसच्छात्रेषु पुत्राधिकम् ।
इत्यादीनगणेयसद्गुणमणीन् सम्मण्डयन्तःस्वयं
वित्ता दत्तकवीश्वरा गुरूवराः ! विश्वावने जागृथ ।। ७ ।।

श्रीनाथादि परम्परा युगयुगप्राप्ताऽत्र या गौरवी
तत्स्रङ्नायक लब्ध शक्तिपतनोद्दीक्षां सदीक्षा प्रदाम् ।
अर्हान्तेवसदन्तरेषु कृपया सञ्चारयन्तस्तरां
भोः श्रीदत्तकवीश्वर गुरुवरा विश्वावने जागृथ ।। ८ ।।

वात्सल्यं तनुते स्म यत्र भगवान् श्रीढुण्ढिराजः स्वयं
यत्पादाब्जसपर्यया भगवती लक्ष्मीः कृतार्थत्वभाक् ।
यत्पुत्रत्वमवाप्य मोदमतुलं प्राप्नोति नारायणः
ते श्रीदत्तकवीश्वरा गुरुवरा विश्वानने जागृथ ॥ ९ ॥
एवं लोकहितैकरक्षणचणाः । भाग्यान्न एतत्क्षणे
ग्लौसाहस्र समीक्षणक्षणवरः प्राप्तोऽत्र नाथामहे ।
"आयुर्ब्राह्ममवाप्य कर्म–भजन–ज्ञानैर्नउद्धारका
दत्तात्रेय कवीश्वरा ! गुरुवरा ! लोकेऽत्र सञ्जीवत'॥१०॥
॥ इति शिवम् ॥

## "स्तुति कुसुमांजलिः" चा मराठीत अर्थ

विद्यावाचस्पति–शास्त्ररत्नाकर इत्यादी बिरुदावली संशोभित सकल विद्या पारंगत–योग्य ज्ञानाधिकारी आपण असला तरी, भागवतातील भक्तीमध्ये जगणारे आपण असलात तरी, अखिल भारतामध्ये प्रसिद्ध असलात तरी प्रसिद्धीमध्ये निरपेक्ष भाव असणारे परम पूजनीय कवीश्वर दत्तात्रेयशास्त्री गुरुमहाराजांच्या सहस्रचंद्रदर्शन शांति महोत्सवामध्ये अनंत विनम्र शिष्य–प्रशिष्यांकडून–गुरुदेवांचे पवित्र चरण कमलावर श्रद्धाभक्तिपूर्वक ही स्तुती पुष्पांजली समर्पित–

**१. परमपूज्य कवीश्वर दत्तगुरुमहाराज !**

आपले मन बालपणापासूनच विषयात गुंतले नाही असे ऐकतो. आपण फुलाप्रमाणे कोवळ्या मनाचे आहात. फार मोठे विद्वान आहात. देवतुल्य आहात. आपली बुद्धिशक्ती अफाट अशी आहे. वंशपरंपरेने आपला स्वाध्याय माध्यंदिन शाखात्मक असला तरी यजुर्वेद–सामवेद इत्यादी सर्व वैदिक ज्ञानाचा आपण जणू ठेवाच आहात. आपल्या कुलपरंपरा प्राप्त श्रीगजाननाच्या आराधनेचे हे फळ आहे असे वाटते. ज्ञान प्रसाराचे आपले अखंड कार्य पाहता ज्ञानशक्तिप्रधान श्रीदत्तप्रभूंचे आपण लीलावतारच आहात असे आम्हास वाटते. असे कृतकृत्य असूनही आपण जगाच्या कल्याणाकरिता झटत आहात हे आमचे भाग्य होय.

**२. महात्म्यांचे कृपाशीर्वाद लाभलेल्या हे गुरुमहाराजा !**

जगद्गुरु, शिवावतार, श्रीकांचीकामकोटि पीठाधीश्वर श्री शंकराचार्य, श्रीसंकेश्वर पीठाधीश्वर, पू. कुडली श्रीशृंगेरीप्रधान मठाधीश्वर, इ. जगद्गुरूंच्याकडून सन्मानपूर्वक विशिष्ट कृपाशीर्वादाने समृद्ध झालेल्या महाराजा ! आपण धन्य धन्य झाले आहात !

**३. अनंत कल्याण गुणनिलय !**

आपल्या क्षमा गुणापुढे 'सर्वंसहा' (अत्यंत सहनशील) म्हणून प्रसिद्ध असलेली पृथ्वीही फिक्की पडते. आपला वाक्प्रवाह गंगेप्रमाणे वाहू लागला की वाटते, सुरगुरु ब्रहस्पत्याचार्यही बोलण्यास धजणार नाही. सर्वाभिष्ट संपादक, मंगलकारक असा आपला थोडासा जरी अनुग्रह झाला तरी आपले शिष्य कल्पवृक्षांना देखील जुमानत नाहीत. आपल्या या माहात्म्याचे कारण आपली भगवन्निष्ठाच आहे.

**४. प्रकांड पांडित्यपूर्ण पंडितराज !**

आपल्या श्रीमुखाने व्याकरण विषयक विवरण ऐकले म्हणजे ते आपले शिष्य एक छत्राधिपती होतात. सर्व शास्त्रांत मीमांसाशास्त्र हा अति विस्तृत असलेला महासागर, आपला अनुग्रह झाल्यावर क्रीडा-पुष्करिणी बनतो. शास्त्रातील वनराज वेदांतशास्त्र, मोठमोठ्या विद्वानांना देखील अतिशय दुरूह, पण आपण निरूपण करू लागलात की पंडित काय, पामर काय, सगळेच सच्चिदानंद सागरात निमग्न होऊन डोलू लागतात !

**५. महर्षितुल्य महागुरो !**

विद्वत्सभेमध्ये त्या त्या शास्त्रात आपण बोलू लागलात की मोठ-मोठे विद्वानही आश्चर्याने थक्क होतात. काही म्हणतात हे जणू न्याय-शास्त्र प्रवर्तक गौतमच आहेत. काहींचे म्हणणे की हे कणाद् महर्षीच असावेत. वाणीची विशुद्धता पाहून काहींना वाटते की हे पतंजलीच असतील. वेदप्रामाण्य–ब्रह्मसूत्र विवरण इत्यादी चालले की अनेक अभिज्ञ हे वेद्व्यास असावेत असे मानतात. कोणत्याही विषयाचे प्रतिपादन असो, वाणी रसाने ओतप्रोत असल्याने सर्वांना आपण आदिकवि वाल्मिकीच भासता. ऋषी सर्वस्व असा आपला जयजयकार असो !

**६. गुरुसार्वभौम कवीश्वर महाराज !**

कृतयुग म्हणजे धर्माच्या भरभराटीचा काळ ! मानव काय, देव काय, सर्वांनाच जिकडे तिकडे आनंदच आनंद होता. अशा मंगलप्रसंगी भगवान् ब्रह्मचारी रूपाने अवतरले. या पवित्र समयी त्यावेळचे कवीश्वर म्हणजे शुक्राचार्य यांनी दैत्यांची बाजू घेऊन त्या ब्रह्मचारी वामनाचा, बलीराजाकडून तिटकारा करण्याचा प्रयत्न केला. आणि सर्व दोषांनी भरलेल्या हल्लीच्या दुष्ट काळातही प्रख्यात असे आपण कवीश्वर त्याच ब्रह्मचारी वामनाची (म्हणजे नैष्ठिक ब्रह्मचारी योगि-राज गुळवणी वामनरावजी यांची) गुरु म्हणून पूजा करता. ही आपली सात्त्विकता वाखाणावी तेवढी थोडीच आहे !

### ७. दातृत्त्वाग्रणी हे दत्तप्रभो !

आपले जीवन सर्वस्व आपण जनताजर्दनाला समर्पित केले आहे. आपले हे अगाध नि अलौकिक दातृत्त्व, लोकोत्तर दानशूर कर्णाच्याही दातृत्वाला लज्जित करणारे आहे. आपली शिष्य वत्सलता ही पुत्र-वात्सल्याहून शतपटीने मोठी आहे. अनंत सद्गुणांनी आपला आश्रय घेतला आहे. असे गुणनिधी आपण सतत जगत रक्षणामध्येही जागृत आहात. अशा 'गुणाः पूजा स्थानम्' ला कोटि कोटि प्रणाम !

### ८. अनाथांच्या नाथा, हे श्रीगुरुनाथा !

आदिनाथापासून (परमशिवापासून) उद्गम पावलेली श्रीमत्स्येन्द्रादि नवनाथाच्या महाप्रभावाने बळकट होत चाललेली, भारतीय योगी परंपरा आहे. याच परंपरेतील श्रीलोकनाथस्वामी महाराजांच्या शक्तिपात दीक्षेचा लाभ श्रीगुळवणी महाराजांच्याद्वारे आपणास झाला. ती दीक्षा म्हणजे ब्रह्मसाक्षात्काराचा पायाच होय. 'स्वीयं साम्यं विधत्ते' या प्रमाणे आपला अधिकार पाहून आपणास परिस बनविले. त्यावेळे-पासून आपण जीवाच्या उद्धाराचे कार्य करीत आहात. या आपल्या निर्व्याज करुणेचा जयजयकार असो !

### ९. प्रेमळ परिवार प्राप्त भाग्यवान् गुरुवरा !

श्रीगजाननाचे आणि पूज्य पितृचरणाचे पूज्य ढुंढिराज महाराजांचे निरतिशय वात्सल्य आपणावर होते. सौभाग्यवती–सहधर्मचारिणी लक्ष्मी देवता देखील आपली पादसेवा लाभल्याने स्वतःला कृतार्थ समजते. श्रीमान् भगवान् नारायण हे आपले आत्मज आनंदी होत आहेत. असा पुण्यशील दुर्मिळ परिवार लाभून जगद्रक्षक परमेश्वराकडेच आकृष्टचित्त असणारे आपण धन्य आहात !

### १०. चंद्रसहस्राधिक शीतल, चंदन सुगंधयुक्त गुरुदेव !

'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति । देह कष्टविती उपकारे' या संतोक्तीप्रमाणे, स्वतः एषणात्रयरहित असूनही, लोककल्याण साधनेतच आपली ही ऐंशी वर्षे खर्ची पडली आहेत. आणि या निमित्ताने हा शांति सोहळा साजरा होत आहे, हे संपूर्ण भारताचेच भाग्य आहे. या मंगल प्रसंगी आपणास शतवर्षाधिक चिरजीवित प्राप्त व्हावे आणि अधिकारानुरूप–कर्म–उपासना–आणि ज्ञान यांच्या उपदेशाद्वारे आपणा-कडून आम्हा सर्वांचा उद्धार व्हावा अशी मार्कंडेयोपास्य श्रीमृत्युंजय परशिवाच्या पदकमळी आम्ही विनम्र प्रार्थना करीत आहोत. ॐतत्सत् !

# प. पू. समर्थ श्री नाना महाराज तराणेकर यांचा शुभाशीर्वाद

श्री. कृष्णाजीशास्त्री आर्वीकर,

कार्यवाह, श्रीदत्तमहाराज गौरव समिती यांस, स. आ. वि. वि.

" अंतर क्षाळिले गुरुप्रतिती । बाह्य क्षाळिले शास्त्रयुक्ति
ऐसें शुचित्व निजनिश्चिती । अद्वैत स्थिति नांदे तेथें । "

" देही असून विदेही, प्रपंचांत राहून उत्कृष्ट शांतीचा अनुभव, निष्काम कर्तव्याचरण " असे ज्यांचे व्यक्तिदर्शन करता येईल अशा प. पू. दत्तमहाराज कवीश्वर यांच्या सहस्रचंद्रदर्शन शांति समारंभाचे आमंत्रण मिळाले.

प. पू. कवीश्वरांसारखे तपस्वी विरळाच! संस्कृतचे गाढे विद्वान. श्रीमद्‌भागवतावरील प्रवचने ही त्यांच्या विद्वत्तेची साक्ष देतात. वाचस्पति अशा भाग्यवान व्यक्तीचा हा सहस्रदर्शन शांति सोहळा साजरा होत आहे हा अपूर्व योग आहे. ज्यांच्या केंद्रस्थानी बृहस्पती आहे अशी व्यक्ती दैव व पुरुषार्थ या दोन्ही गोष्टीनी समृद्ध असते.

" जोवोऽपि केन्द्री बहुधर्मशीलो
विद्यार्थभोगी गुरुदेवभक्तः ।
धर्मार्थमोक्षेषु सदाभिलाषी
तपस्या निरतः सु–देवमूर्तिः । "

असे सार्थ वर्णन अशा व्यक्तीचे केलेले आहे. दैवाला दिलेली पुरुषार्थाची जोड आयु नियत (पूर्ण) करते. अशा व्यक्ती दीर्घायुषी असतात.

(भूतानामयुर्षुक्तिमपेक्षते)
दैवं पुरुषकारं च स्थित ह्यस्य बलाबलम् ।
दैवमात्मकृतं विद्यात् कर्म यत् पूर्वदैहिकम्
स्मृतः पुरुषकारस्तु क्रियते यदिहापरम् ॥ "

अनन्य गुरुभक्ति ही अनेक जन्मांची फलप्राप्ती आहे.

" येन जन्म शतैः पूर्वं वासुदेवः समर्चितः ।
तन्मुखे हरि नामानि सदा तिष्ठन्ति भारत ॥ "



श्री वासुदेव निवास (पंथराज सह)



# तस्मै श्री गुरवे नमः







" ब्रह्म विद्येचा सुकाळू करी" हाच मंगल आशीर्वाद. पू. श्री. नाना महाराज तराणेकर



प. पू. श्रीवक्रतुंड महाराज – 'स्वीयं साम्यं विधत्ते'



प. पू. श्रीधुंडिराज महाराज
पितृदेवोभव



पू. ती. सौ. सरस्वती भगवती
मातृदेवोभव

प. पू. कवीश्वर महाराजही 'वासुदेव' समर्पितच आहेत. 'शाब्दे परेचि निष्णातम्' असे प. पू. दत्तमहाराज व सहस्र चंद्र दर्शन सोहोळा समारंभाचे प्रमुख पंडित धुंडिराजशास्त्री दातेमहाराज असा 'मणिकांचन योग' जमून आल्यावर समारंभ उत्कृष्ट होईल यात शंका नाही. पंडित दातेमहाराज यांचे सुयोग्य मार्गदर्शन असल्यावर समारंभात काही त्रुटी रहातील असे संभवतच नाही. हा समारंभ निर्विघ्नपणे व अपूर्व असा होईल असा आमचा आशीर्वाद आहे. आपल्या समितीतील अन्यभक्त मंडळींनाही आमचा आशीर्वाद कळवावा. आपण सर्व उत्साहाने व उत्स्फूर्तपणे समारंभ पार पाडाल हा शुभाशीर्वाद. प्रकृती अस्वास्थ्या-मुळे आणि वयोमानाप्रमाणे आम्ही या समारंभास प्रत्यक्ष उपस्थित राहू शकत नाही, म्हणून पत्ररूपाने आशीर्वाद पाठवले आहेत. आम्ही येथून हा सर्व सोहोळा पाहूच.

पुन्हा एकवार प. पू. कवीश्वर महाराजांना 'दीर्घआयुरारोग्य' लाभो. त्यांच्या प्रवचनांचा लाभ दीर्घकाळ जनतेला लाभो.

'धर्मोद येशौ नवमोदयस्थौ
धर्मोदरे शौ धनधर्मगौ वा ।
सुरेन्द्र वन्द्य क्षितसंयुतौ चेत्
समेति जातश्चिर कालभाग्यम् ॥'

पंडित धुंडिराजशास्त्री यांनाही आमचा आशीर्वाद कळवावा.

कळावे.

नानामहाराज तराणेकर

तपोनिधी-ज्ञाननिधी
प. पू. श्रीदत्तमहाराह कवीश्वर यांना
निरामय दीर्घायुरारोग्य लाभो ही
श्रीचरणी प्रार्थना -
सकलभक्तवृंद.

॥ श्रीगुरुः शरणम् ॥

# संपादकीय–

ध्यानमूलं गुरोर्मूर्तिः
पूजामूलं गुरोः पदम् ।
मन्त्रमूलं गुरोर्वाक्यं
मुक्तिमूलं गुरोः कृपा ॥



नित्य वंदनीय, श्रीसद्गुरु,
ब्रह्मश्री दत्तमहाराज
यांचे परमपावन पादपद्मी
साष्टांग प्रणिपात.
विज्ञापना–

आपल्या सहस्रचंद्रदर्शन शांति महोत्सव प्रसंगी प्रकाशित होणाऱ्या 'श्रीवासुदेवनिवास आणि पंथराज' या त्रैमासिकाचा हा विशेषांक सादर करताना आम्हा सर्वांचे अंतःकरण कृतज्ञतेने भारावून गेले आहे. आम्ही सर्व भक्तांनी श्रद्धा भक्तीने–आमच्या अल्पस्वल्प मती आणि कुवती-प्रमाणे केलेली ही वाङ्मयपूजा आहे. या अंकाचे 'संपादकीय' सर्वांचा प्रतिनिधी म्हणून आपल्याशीच पत्र–रूपाने हृद्गत व्यक्त करीत आहे.

आपल्या विराट जीवनाची कल्पना, आमच्या दुर्बल उपासनादी सामर्थ्यामुळे आम्ही मंदधी, आमच्या जाणीवेच्या कक्षेत आणू शकत नाही. महारुद्राभिषेकाने आपली पूजा व्हावी असा आपला अधिकार आणि आमची उत्कट इच्छा असूनही अपात्रतेमुळे शिवमहिम्न स्तोत्रानेच पूजा बांधावी लागते. या अपराधाची क्षमा असावी. आमचे सहस्रावधी अपराध नित्यशः होत आहेत याची जाणीव असूनही, आपल्या अहेतुक उदार–कृपा सामर्थ्याने आमचे मल–विक्षेप आवरणादी दोषांचा नाश होणार असल्याने आम्ही आपणासच शरण आलेले आहोत.

सहस्र रश्मी आदित्याची तेजस्विता दुरून विलोभनीय असली तरी त्याच्या सामिप्याची इच्छा करणाऱ्याला क्रमाक्रमाने दाहकता सहन करावी लागते. आणि तद्रूप होण्याचे लक्ष्य ज्याचे असेल त्याला आत्मार्पणानेच आपली तेजोमयता प्राप्त होणार आहे. ही जाणीव आपल्या जीवनातील अणू–रेणू मधून गवसत आहे. आम्ही आपल्यापासून अति दूर अंतरावर उभे आहोत. तेथूनच आपणास प्रार्थना करीत आहोत–

प्राणाय नमो यस्य सर्वमिदं वशे ।
यो भूतः सर्वस्येश्वरो यस्मिन्सर्वं प्रतिष्ठितम् ।। १ ।।
यस्ते प्राणेदं वेद यस्मिश्चासि प्रतिष्ठितः ।
सर्वे तस्मै बलिं हरानमुष्मिल्लोक उत्तमे ।। २ ।।

आपण आम्हास जो साधनमार्ग दिला आहे त्याचे रहस्य या विश्वव्यापक प्राणशक्तीमध्ये आहे. या महाशक्तीचे ज्ञान आम्हाला व्हावे. आमचेमध्ये या शक्तीचा विकास व्हावा ही प्रार्थना आहे.

महाराज ! आपले चरणी आणखी अशी प्रार्थना आहे की या प्राणशक्तीच्या विकासाबरोबर आमची मनाची शक्तिही आपल्या कृपेने तितकीच विकसित व्हावी. सूर्य आणि चंद्र हे प्राणच आहेत. विश्वाच्या कार्याला दोन्हीची गरज आहे. तसेच मनुष्याच्या पूर्ण विकासासाठी प्राण आणि मन या दोन्ही शक्तींच्या विकासाची गरज आहे.

महाराज ! आपण स्वतःबद्दल उल्लेख करताना अनेकवेळा 'आम्ही अकिंचन' आहोत असे म्हणता. आम्हा सामान्यांची केवढी फसगत होते या शब्दांनी. आपण हा शब्द इतका अपूर्व योजिला आहे की याचा अर्थ ज्याला त्याला आपल्या कुवतीप्रमाणे कळणार ! श्रीगुरुमहाराजांना लिहिलेल्या पत्रातही आपण स्वतःला अकिंचन म्हटले आहे. पण त्यांचा कधीही गैरसमज झाला नाही. आम्ही आपल्यामानाने अक्षरशः पामर म्हणून आम्ही अकिंचन शब्दाचा लौकिक अर्थ लावीत बसलो.

पण आज मात्र निःशंक तर झालोच पण आपले अकिंचनत्व एवढे मोठे आहे की आपल्या चरणी याचना करतो की आपले अकिंचनत्व आम्हालाही यावे. या 'अकिंचन' शब्दाचा अर्थ एकनाथी भागवतात पुढील प्रमाणे दिला आहे. तो माझ्या सर्व गुरुबंधूंना समजावा व आपल्या सद्गुरूंची थोरवी जाणून घ्यावी.

चिन्मात्री जडले मन । विश्व जाहले चैतन्य घन ।
बुडाले परिग्रहाचे भान । अकिंचनपण या नाव ।। ११।९०८ ।।
मी वांचूनि ज्याचे गाठी । नाही फुटकी कांचवटी ।
मजवांचोनि सगळे सृष्टी । आणिकाते दृष्टी न देखती ।।१४।१९२।।
ऐसे करिता माझे भजन । जातिकुळ देहाभिमान ।
सहजे जाय निरसोन । अकिंचन या नाव ।। १४।१९३।।

श्रीनाथमहाराजांनी 'अकिंचनत्व' गुणाचे वर्णनही अलौकिक पुरुषाचे वर्णन केले आहे. ते ही आमच्या चिंतनासाठी येथे लिहितो.

ऐक अकिंचनाची गोठी । नाही मठ मठिका पर्णकुटी ।
पांचा पालवी मोकळ्या गाठी । त्यांसी ये भेटी निज सुख माझे ॥१०३॥
जो दमनशील जगजेठी । अकरांचीही नळी निमटी ।
तो निजसुखाचे साम्राज्यपटी । बैसे उठाउठी तत्काळ ॥ १०४ ॥
देखता नानाभूत विषमता । ज्यासी साचार दिसे समता ।
तो माझिया निजसुखाचे माथा । क्रीडे सर्वार्थता समसाम्ये ॥ १०५ ॥
सर्पत्वाचा जेवी पांपरी । माथा हालविल्या फडा न करी ।
तेवी धनदारागृह पुत्री । छळिता ज्या भीतरी क्रोध नुमसे ॥ १०६ ॥
कामक्रोध मावळले देही । साचार शांति ज्याच्या ठायी ।
माझे निजसुख ज्याच्या पायी । लोळत राही सर्वदा ॥ १०७ ॥
तो जरी ते सुख नेघे । तरी ते सुख तया मागेपुढे ।
जडोनि ठेले जी सर्वांगे । सांडिता वेगे सांडेना ॥१०८॥
तो जेउती वास पाहे । ते दिग्मंडळ सुखाचे होये ।
तो जेथ का उभा राहे । तेथ मुसावले राहे महासुख ॥१०९॥
त्याचे पाऊल जेथे पडे । तेथे निजसुखाची खाणी उघडे ।
तो प्रसंगे पाहे जयाकडे । तेथे स्वानंदे वाढे परमानंदू ॥११०॥
तो ज्यासी भेटे अदृष्टे । त्यास सुखाची पहाट फुटे ।
त्याचा पावो लागलिया अवचटे । सुखाचे गोमटे निजसुख लाभे ॥१११॥

नाथमहाराजांनी केलेला खुलासा श्रीकृपेने वाचण्यात आला तेव्हा नवी दृष्टी आली म्हणून लिहिले.

सर्वच विशेषांक विशेषत्वाने भरला आहे. आम्हालाच बोध व्हावा, मार्गदर्शन व्हावे. आपल्या आदर्शात आमचे प्रतिबिंब न्याहाळावे आणि स्वतःला स्वच्छ करून घ्यावे म्हणूत महोत्सवाचे निमित्त शोधले आणि परमार्थाच्या गाभाऱ्यात प्रवेश केला. आपले भक्त अशा भावनेने धडपडत आहेत एवढी एकमेव गोष्ट आपल्याला समाधान होणारी आहे. बाकी सर्व आमच्यासाठीच आहे.

हे गुरुमाऊली या भक्तमेळाव्यावर वात्सल्याच्या स्तन्यधारांनी वर्षाव कर ! आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी, मुमुक्षूंवर कृपेच्या मेघांचे अमृत सिंचन करून तृप्त कर ! भक्तवत्सल, भक्ताभिमानी, गुरुदेवदत्तात्रेया, सर्वांचे मंगल व्हावे अशी कृपा करा !

हे विश्वात्मक परमेश्वरा दत्तस्वरूपात वावरणाऱ्या तुझ्या रूपाला आम्हा भक्तांसाठी निरामय, आरोग्यसंपन्न, उदंड आयुष्य द्यावेस ही आमची तुझे चरणी प्रार्थना आहे.

**अ. सि. पोटभरे**
**—संपादक**

# अभीष्ट चिंतन

वि. अ. दप्तरदार
एरंडवणे, २० केशर अपार्टमेंट पुणे ३८

## वन्दे दत्तं कवीश्वरम्

विद्यावाचस्पतीरत्नं प्रज्ञाभास्वर भास्करम् ।
तपःपूतं परं पूज्यं वन्दे दत्तं कवीश्वरम् ॥ १ ॥
ज्ञानशक्ति महामेरुं शांतिसागरगंभीरम् ।
वैराग्यं मूर्तिमंतं यो वन्दे दत्तं कवीश्वरम् ॥ २ ॥
शङ्कराचार्य सन्मानं प्राप्तारं स्वर्णकङ्कणम् ।
राष्ट्रीय पण्डिततां कीर्ती वन्दे दत्तं कवीश्वरम् ॥ ३ ॥
ऋषितुल्यमनासक्तं पारायण परायणम् ।
विनम्रतापराकाष्ठां वन्दे दत्तं कवीश्वरम् ॥ ४ ॥
निजानन्दास्थितं गूढं सात्त्विकं तत्त्वचिंतकम् ।
निरहङ्कारालङ्कारं वन्दे दत्तं कवीश्वरम् ॥ ५ ॥
ब्रह्मनिष्ठं स्थितप्रज्ञमादर्शाचारधार्मिकम् ।
वेदवेदाङ्ग पारगं वन्दे दत्तं कवीश्वरम् ॥ ६ ॥
यदृच्छालाभसंतुष्टं नित्यतृप्तं पराङ्मुखम् ।
साक्षात्कार कृपापात्रं वन्दे दत्तं कवीश्वरम् ॥ ७ ॥
लोकसङ्ग्राहकं श्रेष्ठं श्रीमद्भागवत्प्रसारकम् ।
सर्व सङ्कल्प-संन्यासिनं वन्दे दत्तं कवीश्वरम् ॥ ८ ॥
जीवन्मुक्तं-विदेहीं वै विभूतीं विगतस्पृहम् ।
दीक्षागुरुं मुमुक्षोः वन्दे दत्तं कवीश्वरम् ॥ ९ ॥
वासुदेव-निवासस्य विश्वस्त प्रमुखं गुरुम् ।
योगपीठाष्ठिते राज्ञं वन्दे दत्तं कवीश्वरम् ॥१०॥
भक्तानां योगक्षेमार्थं जीवेत् शरदः शतम् ।
वन्दे वन्दे पुनर्वन्दे वन्दे दत्तं जगद् गुरुम् ॥११॥

नमोऽस्तु श्रीदत्त प्रशान्त चित्त ।
असंख्य भक्तार्चित पाद पद्म ।।
श्रीवासुदेस्व परस्य धाम ।
प्रकाशितम् अक्षर सिद्ध स्थानम् ।।७।।

भारती यस्य जिव्हाग्रे करयोर्दानश्रीर्स्थिता ।
श्रीदत्तं सादरं वन्दे वाग्मिनं योगिसद्गुरुम् ।। ८ ।।

कुलं पवित्रं जननी कृतार्था ।
भद्रास्पदा पुण्यमयीच भूमिः ।।
विराजते भारत मातृशक्तिः ।
श्रीदत्त प्रज्ञान प्रभा मयुखैः ।। ९ ।।

बोधनार्थं न धर्मस्य रक्षणार्थं च संस्कृतेः ।
संवर्धनाय गैर्वाण्याः श्रीदत्तो यततो सदा ।।१०।।

पंडितोऽयं परं ज्ञानी दाताऽयं सकलार्थदः ।
वक्ताऽयं सर्वशास्त्राणां श्रीदत्त कविशार्दुलः ।।११।।

भगवान् वासुदेवोऽयं दीप्यते यत्र स्वात्मविद् ।
वासुदेवाश्रमस्थानं भाति श्रीदत्तकीर्तितम् ।।१२।।

लोकनाथो विभुर्यत्र वर्तते परमो गुरुः ।
वासुदेवाश्रमपदं दिव्यं श्रीदत्तसंस्थितम् ।।१३।।

योगिराट् वामनो यत्र वसति करुणालयः ।
वासुदेवाश्रमस्थानं भ्राजते दत्तसंयुतम् ।।१४।।

यस्यस्मरणमात्रेण मनः शांतिः प्रजायते ।
वन्दे सादरं नित्यं श्रीदत्तं भक्ततारकम् ।।१५।।

नमः श्रीदत्तरूपाय कवीश्वर परात्मने ।
नमः सद्गुरुदेवाय नमः शांताय तेजसे ।।१६।।

इत्येषा वाङ्मयी पूजा श्रीमद्दत्तपदाम्बुजे ।
अर्पिता तेन श्रीदत्तः प्रीयतां मे कवीश्वरः ।।१७।।

* * *



# माझे गुरुजी

## श्रीविघ्नहरींच्या दृष्टीला दिसलेले दत्तदर्शन

लेखक – विघ्नहरि भालचंद्र देव, चिंचवड

संदर्भ :– पू. श्रीविघ्नहरि महाराज हे चिंचवडच्या श्री मोरया गोसावी संस्थानच्या गादीचे वर्तमान उत्तराधिकारी आहेत. यांना लहानपणापासून श्रीजगद्‌गुरु शंकराचार्य प. प. श्री शिरोळकर स्वामी महाराजांचा अपूर्व सहवास लाभला. यांना श्रीस्वामींचा अनुग्रहही लाभला आहे. पुढे टिळक महाराष्ट्र विद्यापीठात संस्कृत अध्ययन पू. श्रीदत्तमहाराजांकडे झाले. श्रीविघ्नहरींचा आणि पू. श्रीदत्तमहाराजांचा प्रगाढ आत्मीय संबंध आहे. पू. श्रीदत्तमहाराज यांनी अनुवादित केलेल्या 'वेदांत पारिजात सौरभ' ग्रंथाचे वेळी श्री. विघ्नहरींनी मोलाचे सहाय्य केल्याचा उल्लेख महाराजांनी ग्रंथातील 'भूमिका' प्रकरणांत आवर्जून केला आहे.

इ. स. १९५४ मध्ये श्री. विघ्नहरींना जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिप मिळाली आहे. त्यांनी एम. ए. ची पदवी एकदा वेदांत विषय घेऊन आणि एकदा न्याय विषय घेऊन उत्तम गुणांनी–संस्कृतमधून मिळविली आहे. सोलापूरच्या हरिभाई देवकरण हायस्कूलमध्ये काही वर्षे, पुण्याच्या रेणुका हायस्कूलमध्ये काही वर्षे शिक्षकाची नोकरी केली. नंतर सर परशुरामभाऊ विद्यालयात काही काल लेक्चरर म्हणून आणि डेक्कन कॉलेजमध्ये उपसंशोधक म्हणून आणि पुणे विद्यापीठातही संशोधन खात्यात कार्य केले आहे. सध्या ते चिंचवडला श्रीमोरया गोसावी संस्थानमध्ये प्रधान विश्वस्त आणि पीठाधीश्वर म्हणून आहेत. श्रीमोरया गोसावींचे वंशपरंपरेतील वर्तमान अधिकारी आहेत. पू. श्रीदत्तमहाराजांचे मार्गदर्शन ते नेहमी घेत असतात. त्यांनी या छोट्या लेखात पू. श्रीदत्तमहाराजांसंबंधी काही अविस्मरणीय आठवणी व कृतज्ञता व्यक्त केली आहे.

– संपादक

सुमारे चाळीस वर्षांपूर्वीची गोष्ट. मी अगदी लहान होतो. पुण्याला मुंजोबाच्या बोळात शंकराचार्यांचा मठ आहे. तेथे शिरोळकर स्वामी तेव्हा जगद्गुरु होते. मठात त्यांनी शांकर विद्यापीठ सुरू केले. अनेक विद्यार्थी संस्कृताचा पाठ घ्यायला मठात येत. नाणावलेले शास्त्री शास्त्र शिकवत. असेच एक गोरटेले शास्त्रीबुवा मठात येत. धोतर-उपरणे एवढाच त्यांचा वेष. प्रकृति सुदृढ वाणी खणखणीत. विद्यार्थी तर आदर करतच पण स्वत: शंकराचार्य महाराजही त्यांना फार मान देत. त्यांचे नाव-गाव मला माहीत नव्हते, पण ते फार मोठे असले पाहिजेत असा माझा पक्का ग्रह झाला होता.

एका नवरात्रात मठात शारदोत्सव झाला. वेगवेगळे कार्यक्रम झाले. एक कीर्तनही झाले. पेटी-तबल्याच्या साथीत, पगडी उपरणे घालून आणि बाराबंदी परिधान करून शास्त्रीबुवांनी कथा केली. चांगली दोन तास कथा झाली. कथा समग्र संस्कृत होती. एक शब्दसुद्धा मराठी न वापरता दोन-दोन तास संस्कृतातून कथा होऊ शकते, हा मला पहिलाच साक्षात्कार होत होता.



कथा संपल्यावर शंकराचार्य महाराजांनी अगदी मुक्त कंठाने बुवांची स्तुति केली. महाराजांचा गळा दाटून आला. अश्रुधारा वाहू लागल्या. जड आवाजात ते म्हणाले, "आज आम्ही या जगद्गुरूंच्या पीठावर आरूढ झालो आहो, त्यामुळे आम्हाला काहीच करता येत नाही. नाही तर आजच्या बुवांना आम्ही साष्टांग नमस्कार घातला असता आणि त्यांचा आशीर्वाद मागितला असता !"

कालांतराने मला कळले की हे कथेकरी दुसरे-तिसरे कोणी नव्हते.

तर प्रत्यक्ष दत्तमहाराज कवीश्वरच होते !

१९६५ साली वाराणसीला संस्कृत-वक्तृत्व-स्पर्धा होत्या. पुण्याच्या टिळक महाराष्ट्र विद्यापीठातून पं. भागवत गुरुजी मला आणि कु. सरोजा चितारी (आजच्या डॉ. सरोजा भाटे, पुणे विद्यापीठातील संस्कृत विभाग–प्रमुख) यांना घेऊन वाराणसीला गेले. काशीत त्यावेळी दोन विश्वेश्वर होते : एक मणिकर्णिका घाटावर ज्ञानवापीजवळ आणि दुसरे सांग वेदविद्यालयात. त्यांचे नाव पं. राजराजेश्वरशास्त्री द्रविड ! जगातले सगळे संस्कृत विद्वान त्यांच्यापुढे नतमस्तक होत. त्यांना नमस्कार करण्यासाठी आम्ही गेलो. मोठ्या आस्थेने त्यांनी विचारपूस केली. ‘कवीश्वर शास्त्रींचा मी विद्यार्थी, त्यांच्याकडे भाष्य वाचतो’ एवढे ऐकल्याबरोबर त्या विश्वेश्वराने सांगवेद विद्यालयातून हात जोडून नमस्कार केला ! आपले गुरुजी किती विद्वान आहेत, हे कळून घेण्यासाठी मला काशीला जावे लागले !

माझे शिक्षण उशिरा झाले आणि थांबत थांबत झाले. पं. दत्त-महाराजांच्याकडे मी टिळक विद्यापीठात वेदान्त वाचत होतो. एक दिवस अचानक महाराज माझ्या घरी आले. मी घरात नव्हतो. आईची दत्तमहाराजांवर फार भक्ती होती. तिला फार धन्य वाटले. महाराजांनी निरोप ठेवला, ‘आज आम्हाला जरा काम आहे, पाठ घेता येणार नाही, देवांना हेलपाटा पडू नये, म्हणून सांगायला आलो.’ शिष्याची इतकी काळजी घेणारे गुरुजी दुर्मिळच !

महाराज इतके विद्वान्, पण अतिशय नम्र. अहंकाराचा वारा नाही. व्याख्यान–प्रवचनात पाण्डित्य दाखविण्याची थोडीसुद्धा हौस नाही. प्रतिपादनात विषयांतर नाही. शास्त्रवचन उद्धृत करण्याची वेळ आली, तर अगदी आवश्यक तेवढेच उद्धृत करतील. भाष्यातल्या एखाद्या अधिकरणाप्रमाणे निरूपण करतील. व्यवहारातही तितकेच साधे, सरळ, स्थितप्रज्ञ. कधी रागाचा शब्द नाही, त्राग्याची भाषा नाही. उपदेशकाची प्रौढी नाही. कोणाची निंदा कधी त्यांच्या मुखातून येणार नाही. एखादा अगदी अडाणी असला, तर महाराज फक्त इतकेच म्हणतील की ‘चांगला आहे, शास्त्रसंस्कार झाल्यावर आणखी चांगला होईल !’ महाराजांच्याकडे शिकताना माझे मलाच वाटू लागले की,

आपण नित्य संध्या करायला पाहिजे. त्यांच्या समोर पाठाला बसायचे, तर कांदा लसूण खाता कामा नये. हळू हळू मी हे सगळे पाळू लागलो. महाराजांच्याकडे गेल्याने माझ्या अनेक शंका दूर होऊ लागल्या. चिंचवडला जावे का जाऊ नये, काशीयात्रेला मंगलमूर्ती स्वारी न्यावी किंवा नाही, नेल्यास काय पथ्य पाळावे, यासारख्या अनेक शंका घेऊन महाराजांच्याकडे जातो, अधिकारवाणीने ते माझे समाधान करतात.

महाराजांकडे मी काही विद्या शिकलो, त्यांचा विद्यार्थी म्हणून वावरलो, मिरवलो, मान-सन्मानही मिळवला, पण त्यांच्या परतत्त्वाचा स्पर्श अजून मला झाला नाही, परमार्थात मला त्यांच्याकडून काही मिळवता आले नाही, याची मला फार खंत आहे. माझ्यासारख्या अनेक मुमुक्षूंच्या मनात असे आर्त असेल की महाराजांनी आपले जीवन कृतार्थ करावे. ते करण्यासाठी महाराजांना उदंड आयुष्य, आरोग्य आणि ऐश्वर्य द्यावे एवढीच या प्रसंगी मंगलमूर्तीजवळ प्रार्थना !

* * *


## दि परभणी जिल्हा मध्यवर्ति सहकारी बँक लि. परभणी

**पं. जवाहरलाल नेहरू मार्ग – परभणी ४३१ ४०१**

* जिल्ह्यात १०६ शाखा, * जिल्ह्याच्या उन्नतीसाठी व हितासाठी विविध आकर्षक व लाभदायी ठेव योजना, * राष्ट्रीय विकासासाठी विविध व्यवसाय व दुर्बल घटकांना आर्थिक मदतीची तत्परता * मौल्यवान वस्तूंच्या सुरक्षिततेसाठी परभणी-जिंतुर-कळमनुरी-हिंगोली-गिरगाव-सेलू-बसमत येथे सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय * आकर्षक व्याजाचा दर

आपल्या नजिकच्या आमच्या बँकेत आपल्या ठेवी ठेवून राष्ट्रीय विकासास सहाय्य करा.

**बँकेची सांपत्तिक परिस्थिती - डिसेंबर १९८९ अखेर**

| | | | |
|---|---|---|---|
| १ खेळते भांडवल – | १२२१८·६९ लाख | ४ ठेवी | ४३५५·३३ लाख |
| २ वसूल भाग भांडवल | ७०१·७५ ,, | ५ नफा | २९·२६ ,, |
| ३ निधी.... | ३३८·५२ ,, | ६ कर्ज | ८५९१·२९ ,, |

# प. प. यति महाराज व ब्रह्मर्षि प. पू. श्रीदत्तमहाराज

लेखक – दि. वा. उपाख्य पंडितकाका धनागरे
भटगल्ली, वाशीम ४४४५०५

**संदर्भ** – श्री. पंडितकाका धनागरे हे वे. शा. संपन्न तर आहेतच परंतु अनुष्ठान संपन्नही आहेत. श्रीनर्मदामातेच्या प्रदक्षिणा त्यांनी यथाशास्त्र केलेल्या आहेत. अनेक संत–सत्पुरुष–यति–संन्यासी महात्म्यांचा सत्संग लाभलेले हे पुण्यपुरुष आहेत. प. प. श्रीनारायणानंद सरस्वती यति महाराजांचा ( उगार स्वामींचा ) आणि श्री. पंडितकाकांचा घनिष्ठ आत्मीय पारमार्थिक संबंध आहे. या यति महाराजांचा आणि पू. श्रीदत्तमहाराजांचा ऋणानुबंध पूर्वाश्रमीपासूनचा आहे. पूर्वाश्रमात श्रीयतिमहाराजांचे वेदान्ताचे अध्ययन पू. श्रीदत्तमहाराजांकडे झालेले आहे. या संबंधामुळे यतिमहाराजांचे हृदयी पू. श्रीदत्तमहाराजांसंबंधी प्रगाढ श्रद्धा आहे. त्याचबरोबर श्रीयतिमहाराजांचे अंतर्बाह्य संन्यस्त जीवन, शास्त्रशुद्ध आश्रम पालन, या गुणांमुळे श्रीदत्तमहाराजांचीही यतिमहाराजांचे ठिकाणी अनन्य श्रद्धा आहे. गुणी गुणं वेत्ति या सूत्राचे अत्युच्च पातळीवरील हे उदाहरण म्हणता येईल. अशा महापुरुषांचा सहवास–कृपा लाभलेले श्री. पंडितकाका या लेखात संक्षिप्त भावदर्शन घडवीत आहेत.

—संपादक

प्रस्तुत घटना बारा वर्षांपूर्वीची आहे. श्रीनर्मदा तटाकी प. प. नारायणानंद सरस्वती यति महाराज (उगार स्वामी) यांचा चातुर्मास श्री क्षेत्र महेश्वर येथे संपन्न होत होता. सुदैवाने मीही त्यावेळी मातेश्वरी नर्मदेच्या उत्तर तीरावरच 'कर्दम क्षेत्र' चिखलदा (जि. धार) येथे चातुर्मास्य मुक्कामार्थ होतो. हे अग्नितीर्थ असून अत्यंत महत्त्वपूर्ण स्थान आहे. महासती अनसूयेचे वडील कर्दममुनि यांची तपस्थली, सप्तर्षींचे तपस्या स्थान, नर्मदेच्या उत्तर तीरावरील श्रीशूलपाणेश्वराच्या अत्यंत रम्य व अद्‌भुत रहस्यमय झाडीचे त्यावेळचे प्रवेशद्वार असल्यामुळेच, नर्मदा तीरावरील ५ चातुर्मास्यांपैकी दोन चातुर्मास याच

ठिकाणी प. प. वासुदेवानंद सरस्वती टेंबेस्वामीमहाराज यांनीही संपन्न केले होते. त्यांच्याच कृपेमुळे या देहास एक तपापूर्वी उपर्युक्त स्थानात चातुर्मास्याचे भाग्य लाभले.

श्रीक्षेत्र चिखलदा ते श्रीक्षेत्र महेश्वर हे पायी ये–जा करणाऱ्यांना फार अंतर असले तरी आम्हा खरी परिक्रमा करणाऱ्या साधकांना ते अंतर विशेष नाही. चातुर्मास्य बंधनामुळे स्थानाची ग्रामसीमा चातुर्मास्य समाप्तीशिवाय ओलांडता येत नाही. यमनियमांचे बंधन न पाळता आपल्या इच्छेनुसार नर्मदाकिनारी भ्रमण करणारे काही साधक (म्हणजेच सैलानी मूर्ती) अधूनमधून चिखलद्यास येत. त्यांच्या माध्यमातून महेश्वरचे व प. प. यतिमहाराजांचे वृत्त समजायचे. चिखलद्याचा चातुर्मास हा 'नर्मदा–परिक्रमा' पूर्ण झाल्यानंतरचा चातुर्मास होता. प. प. यतिमहाराजांचे पवित्र दर्शन चातुर्मास्य पूर्ण करून त्वरित घ्यावे अशी तळमळ निर्माण झाली. व समाप्तीनंतर मी तडक महेश्वर गाठले. परंतु यतिमहाराज इन्दोरला निघून गेल्याचे समजले. मी इन्दोरला गेलो तर ते उज्जैनला गेले होते. उज्जैनला पोचलो तर त्यांचे प्रस्थान श्रीक्षेत्र ओंकारेश्वरला झालेले होते. मी ओंकारेश्वर गाठले तर महाराज श्रीक्षेत्र काशी येथे गेल्याचे समजले. त्या समयी श्रीक्षेत्र काशीस जाणे माझ्या आवाक्याबाहेरचे होते. कालांतराने उगार (कर्नाटक) येथे मला जाण्याचा योग आला. तर तेथे समजले की यतिमहाराज आदल्या दिवशीच तेथून गेले. अकस्मात तपोवनी पोहोचलो, तर १० मिनिटे आधीच यतिराजांचे तेथून प्रस्थान घडले होते. खरोखरीज यति महाराजांचे दर्शन किती दुर्मिळ आहे, आपली ते परीक्षा तर बघत नसतील ना? असे विचार मनात आले. 'योगायोग' असेल तेव्हाच दर्शन घडेल– असे मी मनास समजाविले.

अनेक वेळा ठरवून देखील काही घडत नाही–त्यासही 'योगच' म्हणावे. तर न ठरवता देखील काही गोष्टी चटकन आपोआप ध्यानीमनी नसताना घडतात त्यासही 'योगच' म्हणावे.

समर्थ सद्गुरु माउली प. पू. नाना महाराज तराणेकर (इंदोर) यांचेकडील वास्तव्य संपवून मी उज्जैन येथे जगत्कीर्ती पुरातत्त्ववेत्ते व माझे ज्येष्ठ स्नेही डॉ. हरीभाऊ वाकणकर यांच्याकडे काही कामा-

निमित्ताने गेलो. कार्यभाग उरकून श्री महांकालेश्वर बडा गणपती व श्रीहरसिद्धीचे दर्शन करून तळचाच्या पाळीवरील श्रीदत्तमंदिरास गेलो. याच ठिकाणी ब्र. प. प. वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराज यांनी चातुर्मास केला होता.

स्थान अगदी साधे. परंतु अतिशय रम्य व जागृत! औदुंबराखाली छोटेसे दत्तमंदिर, बाजूला गाईच्या शेणाने सारवलेली पडवी व वर टिनाचे छत्र. फार पवित्र वाटते. मी दर्शनादि उरकून पडवीत बसलो. काही काळ कसा निघून गेला, काही कळलेच नाही. एका अनोळखी सात्विक व्यक्तीने आवाज दिल्यामुळे भानावर आलो व उठून उभा राहिलो 'तुमचे सर्व आटोपले काय?' त्यांनी विचारले. मी , होय ' म्हणालो. 'बाजूला एक मोठे राममंदिर आहे. त्याच्या अलीकडे एका जुन्या स्थानात माडीवर अन्न ग्रहण न करणारे, द्रव्य-स्पर्श न करणारे अधिकारी महापुरुष यतिराज स्वामी आहेत, त्यांचे दर्शन अवश्य घ्या.' असे त्यांनी सांगितले. अतिशय आनंद जाहला.

तडक सांगितल्याबरहुकूम तेथे पोहोचलो. प प. यतिराज महाराज एकटेच होते. दिव्य कांती, शांत दृष्टी व निरुपाधिक वृत्ती, एकांतप्रिय, आपल्या आनंदात निमग्न, अशा त्यांच्या विलोभनीय व सहवास करावेसे मनातून वाटणाऱ्या पवित्र मूर्तीच्या दर्शनाने मी आनंदविभोर झालो. आनंदाश्रूंना नेत्रांनी वाट करून दिली नसती तरच नवल! 'ॐ नमो नारायणाय' म्हणून साष्टांग दंडवत घातला व काही वेळाने स्वतःस सावरीत या क्षणापर्यंत दर्शनासाठी केलेल्या फाठलागाचा इतिहास थोडक्यात सांगितला. ७ ठिकाणी दर्शनाचा योग नव्हता. व येथे, ध्यानी-मनी नसताना अकस्मात व एकांतात दर्शन घडले. श्रीदत्तप्रभूंची इच्छा! यतिराजांनी मंदस्मित केले. आज आम्ही दोघेच होतो. ३॥ तास पोटभर बोलून घेतले. अनेक मुद्द्यांवर व प्रामुख्याने नर्मदेच्या विशाल नकाशावर चर्चा झाली. पुन्हा दर्शनाची इच्छा प्रगट करून, आशीर्वाद घेऊन निरोप घेतला. त्यानंतर उगार (कर्नाटक) येथे तीन दिवस सान्निध्य व वास्तव्याचा योग आला. पुढे इंदोर येथे उन्हाळ्यात वासुदेव बागेत अकस्मात एकांतात दर्शनाचा लाभ घडला. सन १९८९ चा चातुर्मास प. प. यति महाराजांनी नर्मदा किनारी

चांदोद (चंडादित्यनगर) या ठिकाणी केला. त्या निमित्ताने गणेशोत्सवात दोन दिवस व चातुर्मास्य समाप्ती निमित्ताने ३ दिवस मलाही वास्तव्याचा योग आला.

समाप्तीचे वेळी महाराजांचे भक्त श्री. शिरटीकर तेथे आले. त्यांच्यासोबत ब्रह्मर्षी पू. दत्तमहाराज कवीश्वर पुणे यांच्या हस्ताक्षरातले एक सविस्तर पत्र यतिराजांना आले. माझ्या सद्भाग्याने ते पत्र मला वाचावयास मिळाले. त्यातील भाव बघून माझे डोळे अश्रूंनी डबडबले. खऱ्या अधिकारी महापुरुषांचा एकमेकांबद्दल किती विलक्षण भाव असतो ते ध्यानात आले.

प. पू. दत्तमहाराज सहस्रचंद्रदर्शन शांतिमहोत्सव समितीचे कार्यवाह, माझे स्नेही, वेदमूर्ती आत्मीय चि. कृष्णदेव गोविंदराव आर्वीकर यांचे दरम्यान मला एक पत्र आले. वरील महोत्सवानिमित्त निघणाऱ्या विशेषांकात मी एक लेख लिहावा व त्याचा विषय प. प. यतिराज नारायणानंद सरस्वती स्वामी महाराजांशी प. पू. दत्तमहाराजांचा आलेला संबंध हा असावा व नुकत्याच यतिमहाराजांना आलेल्या पत्रावरून व प्रत्यक्ष बोलून माहिती मिळवावी अशी अपेक्षा होती. एखादी गोष्ट व्हायची असली म्हणजे सगळे योग कसे पटापट जुळून येतात बघा ! श्रीक्षेत्र माणगाव या ब्र. प. प. वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी महाराजांच्या जन्मस्थानी यावर्षी ‘ ऋग्वेद–संहिता–स्वाहाकार ’ प्रस्तुत लेखकाच्या हस्ते माघ शु. ७ ते माघ शु. १४ ला संपन्न जाहला. चांदोद येथील चातुर्मास्य समाप्तीच्या वेळीच वरील यागास प्रत्यक्ष उपस्थित रहावे म्हणून यतिराजांचे चरणी प्रार्थना केली होती. त्याप्रमाणे त्यांच्या कृपाछत्राखाली सर्व काही अप्रतिम घडले.

एक महिना आधी यागाच्या पूर्वतयारीस जात असता अचानक यतिराजांच्या दर्शनाचा योग आनंदाश्रम पुणे येथे आला. २ तास मिळाले. वे. आर्वीकरांचे पत्र त्यांच्यासमोर ठेवले. लेख लिहिण्याची परवानगी त्यांनी दिली व सोबत त्यांना आलेले पू. दत्तमहाराजांचे पत्रही प्रत्यक्ष दिले. त्या पत्राची सत्य प्रत महाराजांचे अक्षरातच सोबत देण्याचा योग त्यामुळे साधला. प. प. यतिराजांशी प्रत्यक्ष बोलणे झाले त्याचा गोषवारा असा–

स्वत: यतिराज महाराज अतिशय प्रसिद्धी पराङमुख ! ब्रह्मर्षी दत्तमहाराज व त्यांचा संबंध मोठा मजेशीर आला. यतिराजांच्या बाबतीत पू. दत्तमहाराजांचा मोठा विलक्षण भाव ! यतिराजांचा काही शास्त्राभ्यास पू. कवीश्वर शास्त्रींजवळ झाला. त्यामुळे यतिराज त्यांना 'शास्त्रीबुवा' या नामाने संबोधितात. "शास्त्रीबुवांजवळ ब्रह्मसूत्र शिकल्यामुळे माझा फार लाभ झाला"– असा कृतज्ञतापूर्वक खुलासा ते करतात. त्यांच्या मनात शास्त्रीबुवांबद्दल नितांत आदर आहे. पू. शास्त्रीबुवा देखील यतिराजांबद्दल अतिशय पूज्य भाव बाळगून आहेत. या दोघा महापुरुषांची जेव्हा प्रत्यक्ष भेट अधून–मधून होते तेव्हा तेव्हा त्यांना होणारा आनंद, त्यांचे वागणे, बोलणे–आदर व्यक्त करणारी भावना, त्यांचा सुख–संवाद, शास्त्र चर्चा इत्यादी सर्व विलोभनीय असते. त्याचे वर्णन शब्दात करणे कठीणच आहे. ज्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून तो आनंद अनुभवलाय ते भाग्यवानच !

मोठमोठ्या प्रतिभावान व्यक्ती आपापल्या क्षेत्रात रमतात. परंतु त्यात मुरलेले फार अपवादात्मक आढळतात. एकदा कांची कामकोटी पीठाचे परमाचार्य प. प. चन्द्रशेखरेन्द्र सरस्वती स्वामी महाराज यांनी प. प. यतिराज महाराजांजवळ असा सहज अभिप्राय व्यक्त केला की, "येथे आलेली अनेक विद्वान दिग्गज मंडळी, ही त्यांच्या क्षेत्रात वावरणारी व कर्माचरणी आहेत, परंतु आमचे कवीश्वरशास्त्री हे खरे मुरलेले आहेत. जसा मुरलेला आवळा हा परिपूर्ण, तृप्त व संपृक्त द्रावण होऊन अधिकाधिक गुणकारी असतो त्याप्रमाणे !" मोठ्यांच्या खाणाखुणा मोठेच जाणे– तेच खरे ! ही गोष्ट प. प. यतिराजांनी प्रत्यक्ष मला सांगितली व तिचा उल्लेख या लेखात आवर्जून करावा अशी मौलिक सूचनाही त्यांनी केली, म्हणून हे प्रकट करीत आहे. प. पू. कवीश्वर महाराजांचे प. प. यतिराजांना आलेले पत्रही त्यांनी कृपावंत होऊन छापण्यास अनुमती दिली म्हणून त्याची सत्य प्रतिलिपी येथे उद्‌धृत करीत आहे– ही त्यांचीच कृपा ! सर्व साधकांनी अक्षर न् अक्षर मन:पूर्वक वाचावे व त्यातील सर्व भाव ध्यानात घ्यावे. त्यावर भाष्य करण्याचा अधिकार माझा नाही. (पत्र विभागात हे पत्र वाचावे)

या लेखात ज्या महापुरुषांचे, संतांचे, अधिकारी सत्पुरुषांचे उल्लेख आहेत त्या सर्वांचे चरणी माझे अनंत प्रणिपात प्रविष्ट करतो! इत्यलम्.

* * *


**Shri Gurudeo Datta**

*With best compliments from*

# INDIA TEXTILE TRUST

**Founder :** Late Shri. N. V. Bhagwat

*Manufacturers of*

'Diamond Brand' Stamping Paste, Roller Varnish, Stencil Marking Inks and Auxiliaries.

**Address :** Janaki Nivas, 69, Jyotiba Fule Road,
Naigaum, Dadar, Bombay 400014.

Tel. No. : 4137990
4133700

Grams : YOGAYOG
Bombay 400014

**Shrimati Mandakini Narayan Bhagwat.**

# श्रीवासुदेवनिवास पीठाची पुण्याई

लेखक – श्री. ल. व्यं. वाकडे, रि. इंजीनिअर,
विश्वस्त, श्रीवासुदेवनिवास ट्रस्ट, पुणे,

प. पू. श्रीसद्गुरु गुळवणीमहाराज यांनी पू. श्रीदत्तमहाराजांच्यावर सर्व कार्यातील महत्त्वाची जबाबदारी प्रथमपासून अखेरपर्यंत टाकलेली होती. आपल्याला माहीत नसलेली कितीतरी महत्त्वाची कामे पू. श्रीदत्तमहाराजांकडून सद्गुरुमहाराज खाजगीत करून घेत असत. एकदा सद्गुरुमहाराज आजारी असताना, त्यांनी २० नारायण पेठेत पू. श्रीदत्तमहाराजांकडून स्वतःसाठी श्रीमत्भागवत्सप्ताह करून घेतला होता याची कल्पना कोणालाही अजून नसेल. अनेक प्रकारच्या–स्वतःच्या व इतरांच्या आपत्ती निवारण्यासाठी प्रश्नावलीत आलेली–द्विसाहस्त्री–दत्तपुराणादि सारखी किंवा श्रीगुरुचरित्राचे सप्ताहादि सारखी अनेक अनुष्ठाने अनेकवेळा सद्गुरुमहाराजांनी श्रीदत्त महाराजांकडून करवून घेतली आहेत. धर्मशास्त्र, वेदान्त–तत्त्वज्ञान या विशाल नि व्यापक विषयातील शंका घेऊन येणाऱ्या सर्व विद्वानांना सद्गुरुमहाराजांनी श्रीदत्तमहाराजांकडे पाठविले, त्यांचेकडून शंका-निरसन करविले. सद्गुरु महाराजांनी स्वतःही अनेक अनुष्ठाने केली, त्याचे संकल्प श्रीदत्तमहाराजांकडून घेतले. फार काय श्रीदत्तमहाराजांना मुद्दाम वाडीला अनेक अनुष्ठानांसाठी महाराज पाठवीत होते. श्रीवासुदेवनिवास हे महान धर्मपीठ अशा महान पुण्याईवर उभे राहिलेले आहे.

पण आश्चर्याचा भाग असा आहे की कामाव्यतिरिक्त श्रीदत्तमहाराज सद्गुरुमहाराजांकडे कधीही थांबत नसत. बोलावले की जायचे, सांगतील ते शुद्धभक्तीने निर्दोषपणे करायचे आणि काम पूर्ण झाले की निवेदन करून निघून जायचे. यामुळे ते कधी आश्रमात किंवा २० नारायण पेठेत दिसत नसत. करून अकर्ते राहिल्यामुळे

कोणाला कळले नाहीत. त्यावेळी सद्‌गुरुमहाराजांच्या आड लपता येत होते. पण सद्‌गुरु गुळवणी महाराजांच्या निर्वाणानंतर श्रीदत्तमहाराजांना मुख्य ट्रस्टी म्हणून गुरुमहाराजांनी ट्रस्टडीडमध्ये स्पष्ट लिहून ठेवलेले असल्यामुळे सर्वांच्यापुढे उभे रहावे लागले. मुख्य आधार नाहीसा झाल्यामुळे अंत:स्थ अडचणींचे पेव फुटले होते. फार मोठा कसोटीचा काळ होता तो. आज त्या दिव्यातून पार पडून यशस्वी वाटचाल चालू असल्यामुळे समाधान वाटते, पण अजूनही ते दिवस आठवले तरी अंगावर काटा उभा रहातो.

सद्‌गुरुमहाराजांच्या निर्वाणामुळे विश्वस्ताची जागा रिकामी झाली होती. श्रीदत्तमहाराज प्रथमपासूनच विश्वस्तमंडळात होते. या जागेसाठी सद्‌गुरुमहाराजांनी काही विश्वस्तांच्याजवळ माझ्या नावाचा उल्लेख करून ठेवला होता. मला तसे सांगण्यात आले. मलाही सद्‌गुरुमहाराजांची अंतिम इच्छा म्हणून विश्वस्तपद स्वीकारावे लागले. माझा येथील दैनंदिन कार्यक्रमाशी काहीच संबंध नव्हता. मी नोकरी-निमित्त परगावीच असे, पण काही पुण्याईमुळे सद्‌गुरुमहाराजांची दीक्षा झाली, संबंध वरचेवर येऊ लागले. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामीमहाराजांचे दर्शनासाठी काशीला जाऊन आलो. आश्रमनिर्मितीच्या कामात थोडाफार हातभार लागला. नंतर सद्‌गुरुमहाराजांच्या पश्चात् विश्वस्ताच्या भूमिकेतून सेवेची संधी मिळाली. ही संधी म्हणजे आम्हा सर्व विश्वस्तांची अग्निपरीक्षा होती. मला तरी आत्मविश्वासाने ठामपणे सांगितले पाहिजे की पू. श्रीदत्तमहाराज मुख्य विश्वस्त होते म्हणूनच ही संस्था अभंग राहिली. सद्‌गुरु महाराजांच्या प्रतिष्ठेला साजेशी राहिली. या संस्थेचा जो लौकिक श्रीगुरुमराहाजांच्या काळात होता तसाच आज आहे.

वर्षातील सर्व उत्सव पूर्वीप्रमाणे अखंड १६ वर्षे चालू आहेत. नित्य दैनिक कार्यक्रमही सद्‌गुरुमहाराजांच्या इच्छा–अपेक्षेप्रमाणे चालू आहेत. परगावची भक्तमंडळी येतात, रहातात, जातात. चांगले प्रवचनकार, कीर्तनकार येथील व्यासपीठावर येत असतात. भजनी-मंडळाचे कार्यक्रम होतात. पू. श्री. दत्तमहाराज सद्‌गुरु महाराजांप्रमाणे दरवर्षी श्रीगुरुद्वादशीला वाडीला जातात. श्रावणात तुळजापूर–गाणगापूरला जातात. सद्‌गुरुमहाराज आपल्या मातापित्यांच्या प्रीत्यर्थ

त्यांच्या श्राद्धदिनी वाडी–औदुंबर–गरुडेश्वर आदि ठिकाणी देवाला पूजा व प्रसाद करण्यासाठी म. ऑ. ने संभावना पाठवीत असत, ही गोष्ट लक्षात ठेवून श्रीदत्तमहाराज त्या त्या ठिकाणी सद्‌गुरुमहाराजांच्या मातापित्यांच्या प्रीत्यर्थ स्वतः म. ऑ. करीत असतात.

आश्रमातील उत्सव उत्तम रीतीने पार पडावेत म्हणून बारकाईने लक्ष ठेवून श्रीदत्तमहाराज कार्यक्रम ठरवितात. समाजाचे प्रबोधन व्हावे म्हणून उत्तमोत्तम प्रवचनकार, कीर्तनकार यांचेशी संपर्क साधून त्यांना आग्रहाने आणीत असतात. उत्सवाचे आधी परगावी गेले असतील तर पत्राने कार्यक्रम ठरवतात. आणि सर्व उत्सवामध्ये स्वतः उपस्थित असतात. सर्वांचा योग्य तो सत्कार होतो. अन्नदान होत असते. श्रीमत् शंकराचार्यांसारखे महापुरुष पुण्यात आले म्हणजे त्यांना आश्रमात आणले जाते. त्यांची पाद्यपूजा–प्रवचन इ. योजनापूर्वक होते. दरवर्षी प्रौष्ठपदीमध्ये श्रीदत्तमहाराजांचा श्रीमत् भागवत् सप्ताह होतो. प्रत्येक उत्सवाच्या सप्ताहामध्ये प. प. श्री टेंबे स्वामीमहाराजांच्या सर्व ग्रंथांचे पारायण होते.

**शक्तिपात दीक्षा साधना** – सद्‌गुरुमहाराजांचे उत्तराधिकारी श्रीदत्तमहाराज यांनी प्रयागला श्रीसद्‌गुरुमहाराजांचा अस्थिकलश गेला तेव्हा अस्थिविसर्जनानंतर लगेच दुसरेच दिवसापासून शक्तिपात साधन दीक्षा देण्यास सुरवात केली. त्यावेळेपासून अव्याहत दीक्षा होत आहेत. श्रीदत्तमहाराजांचेही अनुगृहीत हजारोंच्या संख्येने मोजावे लागतील. श्रीदत्तमहाराजांची विनम्रता कमालीची आहे. ते दीक्षा घेणाऱ्याला सांगतात "महाराजांचे पुढे नारळ ठेवा. फोटोला हार घाला, व आपल्यावर कृपा करायला सांगा. ते कृपा करतील." साधक शिष्यांना साधना करीत जा म्हणून नेहमी सांगत असतात. पत्रातूनही लिहितात. साधक शिष्यांना उत्तम अनुभव येत असल्याचे नेहमी ऐकायला मिळते. श्रीदत्तमहाराजांचा फार मोठा पत्रव्यवहार हा या साधनेच्या संबंधीच असतो.

**श्रीवामन निवास** – हे कार्य सद्‌गुरुमहाराज असताना संकल्प सोडलेले कार्य होते. परंतु मध्यंतरीच्या प्रतिकूल काळात या कार्याला गतीची प्रतीक्षा करावी लागली. श्रीगुरुमहाराजांच्या जन्मशताब्दीचे

वेळी श्रीगुरुकृपेने अनुकूलता आली. स्वत: श्रीदत्तमहाराजांनी सारखा परगावचा दौरा करून बांधकामासाठी पैसा उभा केला. आणि इ. स. १९८६ मध्ये ही इमारत एक मजली उभी राहिली. या वास्तूत श्रीगुरुमहाराजांचा जन्मशताब्दी महोत्सवही भव्य प्रमाणात साजरा झाला. पू. श्री नाना महाराज तराणेकर, प. प. श्रीस्वामी शिवोम तीर्थजी महाराज, श्रीमच्छंकराचार्य आदी महापुरुषांचे श्रीपदकमल या वास्तूला लागले.

श्रीवामन निवासाचे कार्य दूरदृष्टी ठेवून चालू आहे. "सर्वे सन्तु निरामया:" याला अनुसरूनच चालू आहे.

**आरोग्य मंदिर** – श्रीवामन निवासात गेली सहा वर्षे हे आरोग्य मंदिर सुरू आहे. यासाठी डॉ. पाध्ये व सौ. पाध्ये यांना मुद्दाम पुण्यात आणले आहे. सामाजिक ऋणाची जाणीव असलेले डॉ. पाध्ये आहेत. केवळ सेवाबुद्धीने त्यांचे उभयतांचे हे कार्य चालू आहे. त्यांचा वैद्यकीय क्षेत्रातील अनुभव – त्यांच्या उपायांनी रुग्णांना होणारा लाभ– सौजन्यशील व कळकळीची वृत्ती अशा गुणांच्या कार्यकर्त्यामुळे संस्थेचाही लौकिक वाढत असतो.

याचप्रमाणे जळगावचे डॉ. वाघण्णा हे गेली दोन वर्षे महिन्यातून एकदा येथे येऊन पोलिओसारख्या दुर्धर रोगावर उपचार करीत असतात. त्यांच्या उपचारांचा गुण येत असल्याने अशा विकारांचे रुग्ण वाढू लागले आहेत. डॉ वाघण्णांची ही सेवा सेवावृत्तीनेच चालू आहे.

**शताब्दी महोत्सव** – या महोत्सवात सद्गुरु गुळवणी महाराजांच्या जीवनचरित्राचे ग्रंथ प्रकाशित होण्यास प्रारंभ झाला. या वर्षात १. सप्रेम आशीर्वाद विशेष, २. स्मर्तृगामींच्या स्मृती, ३. सद्गुरु साधक संवाद आणि ४. जीवनगंगा अंतिम कलश असे चार ग्रंथ प्रकाशित झाले. हे सर्व लेखन गुरुभक्त अच्युतराव पोटभरे करीत आहेत.

या संस्थेचे प्रकाशित वाङमय बरेच आहे. श्री. टेंबे स्वामींचे वाङमय हा यातील सर्वात मोठा विभाग. सध्या काही पुस्तके आवृत्ती संपल्यामुळे विक्रीस ठेवता येत नाहीत. आहेत त्या पुस्तकांची विक्रीही समाधानकारक नसते. आमचेकडे मनुष्यबळ नसल्याने आम्ही ग्रंथविक्रीची एखादी योजनाही राबवू शकत नाही. तसेच गुरुमहाराजांचे,

श्रीदत्तमहाराजांचे, श्रीस्वामी महाराजांचे असे संप्रदाय परंपरेचे फोटोही विक्रीस ठेवले जातात.

दरवर्षी सद्‌गुरु पुण्यतिथी महोत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा होतो. उत्तम भरपूर कार्यक्रम असतात. धार्मिक अनुष्ठाने असतात. भोजनव्यवस्था असते. शेवटच्या दिवशी सर्व भक्तांना भंडारा होतो. स्मृतिसभा होते. सायंकाळी रथ मिरवणूक निघते व श्रीवासुदेव निवासात येऊन महोत्सवाची सांगता होते. दरवर्षी हा उत्सव वाढत्या प्रमाणात साजरा होत आहे.

श्रीदत्तमहाराजांचे आश्रमाकडे, शिष्यभक्तांकडे संपूर्ण लक्ष आहे. आश्रमाची सर्व व्यवस्था, व्यवहार त्यांच्या संमतीने होत असतो. नित्यक्रम, देवाची कामे, कचेरी, व्यवस्थापना, आल्यागेल्या अतिथींची चौकशी, परगावच्या भक्तांची चौकशी इ. सर्व बाबतींत श्रीदत्त महाराज चौकशी करून व्यवस्थेचे मार्गदर्शन करीत असतात. मधूनमधून अनेक भक्तांचे देवाला अर्चन–नैवेद्य, महापूजा असतात ते सुद्धा श्रीदत्तमहाराजांच्या संमतीने होत असते. त्यांचा परगावी दौरा असतो तो शिष्यभक्तांसाठीच असतो. तेथेही त्यांचे अखंड मार्गदर्शन चालू असते. श्रीदत्तमहाराज सारखे परगावी जातात ते कार्यहेतू ठेवून जात असतात. जिथे असतील तिथे त्यांच्या दर्शनभेटीस अनेक मंडळी सारखी येत असतात. आर्तपीडितांच्या दुःखनिवृत्तीचे उपाय सांगत असतात. आता या परंपरेचा शिष्यपरिवार फार मोठा झाला आहे. तेव्हा पहिल्यासारखे सद्‌गुरु मोकळे सापडणे शक्य होत नाही. मार्गदर्शन थोड्या शब्दांनीही होते. संकल्पाने होते. दृष्टीने होते. श्रीदत्तमहाराजांच्या वयाचा, प्रकृतीचा विचार करून त्यांच्या दर्शनाने, स्मरणाने समाधानी होता आले तर त्यांचा ताण कमी होईल. संधी असेल तर लाभ असा घ्यावा की आपली उपाधी कोणास होऊ नये. दिवसेंदिवस हा विचार जास्त होणे आवश्यक आहे.

काळ हा खरा न्यायाधीश आहे. सोळा वर्षे झाली. श्रीदत्तमहाराजांच्या सहनशीलतेचा थांग लागत नाही. आपले मत कोणावरही लादत नाहीत. खरे म्हणजे त्यांचे मत कळणेही कठीण जाते. त्यांनी कोणालाही दुखावलेले पाहिले नाही. गप्प बसतील पण शब्दाने

दुखवत नाहीत. शांत, प्रसन्न, गंभीर असे नेहमी असतात.

श्रीवासुदेव निवासपीठ हे दोन महापुरुषांच्या पुण्याईने निर्माण झाले आहे– उत्तम स्थितीत स्थिराबले आहे आणि भव्यतेचे भाग्यही या पीठाला या महापुरुषांच्या पुण्याईने मिळणार आहे. ते महापुरुष म्हणजे श्रीसद्‌गुरु गुळवणी महाराज आणि ब्रह्मश्री श्री दत्तमहाराज कवीश्वर !

आश्रमीय भक्तांतर्फे श्री मनोहर पादुकांना प्रार्थना आहे की श्रीदत्तमहाराजांना निरामय दीर्घायुरारोग्य लाभो आणि आम्हा भक्तांना कृपाकूर्म दृष्टीचा अखंड वर्षाव प्राप्त होवो.

* * *


प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर यांचे अभीष्टचिंतन

**मराठवाडा खादी ग्रामोद्योग समिती**

**राजेंद्रप्रसाद रोड, नांदेड, ४३१ ६०१**

- ग्रामीण जनतेला रोजगाराची हमी देणारी मराठवाड्यातील एकमेव संस्था.
- वार्षिक १॥ कोटी रु. चे खादी उत्पादन–तितकीच खादी आणि ग्रामोद्योगाची विक्री.
- दोन हजार गरिबांना सध्या रोजगार उपलब्ध.
- विविध ग्रामोद्योग वस्तूंचा भरपूर आकर्षक साठा.

**खादी वापरा आणि देश बलवान करा**

नारायण, सदस्य मंत्री

मराठवाडा खादी ग्रामोद्योग समिती, नांदेड



– ह. भ. प. श्रीधुंडा महाराजांचा सत्कार –



पू. श्री गुळवणी महाराज श्रीधुंडिराजशास्त्री पू. श्री दत्तमहाराज

दाते पंचांगकर्ते

( जुने ऋणानुबंध – वर्तमान गौरव समितीचे अध्यक्ष )

॥ श्री पांडुरंग प्रसन्न ॥



# धुंडा महाराज

संस्थान – देगलूर व पंढरपूर

मि. देगलूर- ८-५-७१

के०श०सं०

श्रीयुत रा. रा. श्री प०पू० पं० दत्तमहाराज कवीश्वर शास्त्री

यांचे चरणी कृ० सा० नमस्कार. आम्ही दोन दिवसा पूर्वीच प्रवासातून येथे आलो, आपले मागील पत्र ~~पत्र~~ही पहावयास मिळाले. तसेच आपले दि० २९ चे पत्र ही आज मिळाले. आपली आज्ञा यथाशक्य पालन करण्याचा प्रयत्न करीत आहे.

वास्तविक आपल्या शिष्याचाही शिष्य होण्याचा अधिकार आमचा नाहीं, तरी आपण ~~सेवे~~ कांहीं आज्ञा करीत आहात, ती पालन करणे हे आमचे परमपवित्र कर्तव्य आहे. मी पत्र व्यवहार चालू केला आहे १०-१५ दिवसांत नक्की दिवस कळवीन. कळावे. कृपादृष्टि असावी.

प०पू० सद्गुरु योगिराजांचे चरणी कृ० सा०

नमस्कार

भवदीय

धुंडामहाराज.

# ॥ वासुदेवः सर्वम् ॥

लेखक – श्री. शरद जनार्दन जोशी
M. A. संस्कृत B. Ed. बार्शी.

संदर्भ – श्री. शरद जनार्दन जोशी हे वे. शा. सं. श्रीदादाशास्त्री जोशी, बार्शी यांचे सुपुत्र. हे M. A. (संस्कृत) B. Ed. आहेत. पू. श्री. गुळवणी महाराजांचे या घराण्यावर प्रथमपासून अपार प्रेम आहे. महाराजांच्या पहिल्या अनुगृहीत शिष्या सौ. गोपिकाबाई या श्री. शरदच्या आजी, आणि पू. श्री. प्रल्हादशास्त्री हे आजोबा. या घरातच वेदान्त अध्ययनाची परंपरा आहे. पू. श्रीदत्तमहाराजांचे जवळ श्री. शरदजींचे वेदान्ताचे थोडेफार अध्ययन झाले आहे. पितृपरंपरेनुसार संस्कृत पाठशाळेत अध्यापनाचे काम चालू आहे. सरकारी नोकरीमध्ये आहेत. श्रीगुळवणी महाराजांचे अनुगृहीत आहेत. प्रतिश्रावण मासात गाणगापूर येथे श्रीवासुदेवानंद सरस्वती धर्मशाळेत श्री. शरदजींचा श्रीमत् भागवत् सप्ताह गेल्या ४–५ वर्षांपासून सुरू झाला आहे. पू. श्रीदत्तमहाराजांची या घरावर वात्सल्यपूर्ण कृपादृष्टी आहे. बार्शी आणि महाराज हे सबंध या लेखातून भावोत्कटतेने व्यक्त झाले आहेत. विशेषतः पू. श्री डोंगरे महाराज व पू. श्री दत्तमहाराज यांच्या अपूर्व भेटीचा प्रसंग या लेखाचे वैशिष्टच आहे.

श्री शरदजी हे बार्शी परिसरातील धार्मिक सांस्कृतिक संस्थाचे विश्वस्त आहेत. 'भारतीय दर्शन परिषद' ही संस्था चालविली आहे.

—संपादक

॥ श्रीगुरुःशरणम् ॥

दृष्टान्तो नैव दृष्टस्त्रिभुवनजठरे सदगुरोर्ज्ञानदातुः ।
स्पर्शश्चेत्तत्र कल्प्यः स नयति यदहो स्वर्णतामश्मसारम्
न स्पर्शत्वं तथापि श्रितचरणयुगे सद्गुरुः स्वीयशिष्ये
स्वीयं साम्यं विधत्ते भवति निरुपमस्तेन वा लौकोकोपि ॥
( शतश्लोकी )

भगवान शंकराचार्यांनी वरील श्लोकात सद्गुरु संबंधात अत्यंत उच्चकोटीचे वर्णन केलेले आहे. या त्रिभुवनामध्ये सद्गुरूंना शोभेल असा दृष्टान्तच मिळत नाही. परिसाची उपमा द्यावी तर परिस लोखंडाला स्वर्णत्व देतो तरी परिसत्व देत नाही. परंतु सद्गुरु मात्र आपल्या शिष्याला स्वतःचे साम्य देतात आणि त्यामुळेच ते निरुपम आहेत. तसेच प्रपंचातीत असाही त्यांना योग्य दृष्टान्त मिळत नाही. कारण ते आत्मरूप झालेले असतात. सारांश सद्गुरूंच्या संगतीवाचून व ते प्रसन्न होऊन त्यांचा अनुग्रह झाल्यावाचून कोणाही साधकाला कृतार्थ होता येत नाही. तस्मात गुरुपसदन ( शरण जाणे ), गुरुसेवा व तद्द्वारा त्यांची प्रसन्नता हीच परमपुरुषार्थ प्राप्तीची उत्कृष्ट साधने आहेत.

श्रीसद्गुरु दत्तात्रेय, पू. श्री. श्रीपाद वल्लभ, पू. श्री. नरसिंह-सरस्वती, पू. भगवान शंकराचार्य, श्री. पू. लोकनाथतीर्थ स्वामी पू. वासुदेवानन्दसरस्वती, पू. श्री वामनरावजी गुळवणी महाराज, पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर हे आठ अवतार एकच आहेत. हे सद्गुरु अवतार आहेत. ईश्वरी अवतार दैत्यांना शासन करण्याकरिता झाले. गुरुस्वरूप अवतार हेही ईश्वराचेच आहेत. ते अज्ञान दूर करण्याकरिता झालेले आहेत.

आदरणीय श्रीदत्तमहाराज कवीश्वर हे साक्षात दत्तात्रेयांचे अंशावतार आहेत त्याबद्दल संशय नाही. संपूर्ण भारताला मार्गदर्शन करणारी व्यक्ती विभूतीरूप श्रीदत्तमहाराज आहेत. त्यांचा त्याग, ज्ञान, संकल्पशक्ती हे सर्वच पाहण्यासारखे आहे. वरील उल्लेखिलेल्या ज्ञानी महात्म्यांची जीवनचरित्रे वाचली म्हणजे त्यांच्या जीवनकार्या-प्रमाणेच पू. महाराजांचे कार्य आहे, याची साक्ष पटेल.

भगवत् पूज्यपाद शंकराचार्य यांचे वाङ्मय व त्यांचे तत्त्वज्ञान, सिद्धान्त हा महाराजांचा अतिशय आवडता विषय आहे. अद्वैत तत्त्वज्ञान म्हणजे पूर्णशांती आहे. सद्गुरु श्रीवासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामीमहाराजांनी आचार्यांच्या सिद्धान्ताप्रमाणे सर्व विवेचन आपल्या ग्रंथामधून केलेले आहे. हे सर्व वाङमय श्रीदत्त-आज्ञेनुसार निर्माण केले. व ते वाङ्मय प्रकाशित करण्याचे महान कार्य आठव्या अवतारातच पूर्ण केलेले आहे. हा योग नसून ईश्वरशक्तिरूप

कार्य आहे.

एवढा अधिकार असूनही पू. महाराजांच्या ठिकाणी विलक्षण नम्रता आहे. 'वासुदेवःसर्वम्' हे शब्द महाराजांच्या मुखातून अनेकांनी ऐकलें असतील. सर्वत्र दशदिशांना वासुदेव आहे, सर्व ठिकाणी ईश्वर आहे, ही भावना आहे. सर्व हे वासुदेवमय आहे. अहं नाही. प्रत्येक कृती, कार्य वासुदेवः सर्वत्र, अशी आहे. ईश्वरी अंशावताराशिवाय हे शक्य नाही. मात्र हे खरे म्हणूनच 'यस्यास्ति भक्तिर्भगवत्यकिञ्चना सर्वैगुणैस्तत्रसमासते सुराः ।' भागवत ५।१८।१२, ज्याला भगवंताच्या ठायी शुद्ध निर्भेळ भक्तियोगाची प्राप्ती झाली आहे, त्यांच्या ठिकाणी देवदेवतांच्या सर्व महद्गुणांचा विकास असतो याची साक्ष पटते.

अखंड अगर्वता होऊनी असती । तयांते विनयो हेचि संपत्ती ।
जे जयजयमंत्रे अर्पिती । माझांचि ठायी ।। ९ (२६)
तिथे विनयद्रुमाचिये आखी । सुरवाडली सात्त्विकांची माधवी
म्हणोनि करसंपुटपल्लवी । तू होतासि फळ ।। (११-३७)

पू. ज्ञानेश्वरमहाराजांनी वरील केलेल्या वर्णनाबरोबरच अमानित्व या गुणांचे वर्णन इतके पराकोटीचे केलेले आहे. त्याचा आनंद फार वेगळा आहे.

पूज्यतां डोळा न पहावी । स्वकीर्ति कानी न ऐंकावी ।।
हा अमुका ऐसा न होआवी । सेचि लोका ।।

से–सय म्हणजे आठवण. आपली आठवण काढण्यासारखी परिस्थिती असूनही आपला सामान्यपणा, आपले साधेपणा पराकोटीचा असतो.

आणि गंगा शंभूच्या माथां । पावोनि संकोचे जेवि पार्था ।।
तेवी मान्यपणे सर्वथा । लाजणे जे ।। १६ (५)
तेही पुढतपुढती । अमानित्त्व जाण सुमती ।। १६ (६)

श्रीमद्भागवतामध्ये भगवंताचे भक्त नेहमी शांत आणि प्रसन्न असतात आणि कोटचवधी लोकांनाही त्यांच्यासारखी संसिद्धी फार क्वचितच दृष्टोत्पत्तीस येते. असे वर्णन केलेले आहे.

मुक्तानामपि सिद्धांना नारायणपरायणः ।
सुदुर्लभः प्रशान्तात्मा कोटिष्वपि महामुने ।।

## शुक व्यास संवाद

अधिकमास आणि पू. महाराजांचा श्रीमद्‌भागवत सप्ताह हे बार्शीचे समीकरण आहे. पू. वक्रतुंडमहाराज यांचेपासून चालत आलेली परंपरा अद्यापही अखंडित चालू आहे. अंबरीषवरद श्रीभगवंताच्या कृपेने आम्हा बार्शीकरांना प्रति अधिकमासात श्रीमद्‌भागवत ऐकण्याचा योग येतो हे परम भाग्य आहे. श्रीमद्‌भागवतावरील त्यांचा अधिकार तर सर्वश्रुतच आहे. श्रीमद्‌भागवताचा आत्माच त्यांना विदित असल्या-मुळे साक्षात् व्यासच विवेचन करीत आहेत असे वाटते. पू. डोंगरेमहा-राजांच्या बार्शीच्या १९८८ साली झालेल्या श्रीमद्‌भागवत सप्ताहाचे वेळी दोघांचा सुखसंवाद ऐकण्याचा योग आला,

महाभागवत डोंगरेमहाराजांनी पू. दत्तमहाराजांचे बार्शीत आगमन झाल्याबरोबर स्वत: येऊन श्री गणेशमंदिरात साष्टांग नमस्कार केला. त्यावेळी अथांग भक्तगण उभयता श्रेष्ठांचे स्वागतासाठी उपस्थित होते. हा प्रसंग अगदी अंगावर आनंददायक रोमांच आणणारा होता. त्यावेळी सर्व भक्तवृंदातून 'गोपालकृष्ण महाराज की जय' याचा उत्स्फूर्तपणे जयजयकार झाला. उत्तरादाखल आपल्या महाराजांनी नम्रपणाने त्यांनाही वंदन केले. पू. महाराज नेहमीच्या पद्धतीप्रमाणे पू. डोंगरे महाराजांना आसनावर बसण्यासाठी सांगून स्वत: जमिनीवर बसले. परंतु डोंगरे महाराजांनी त्यांच्या हातास धरून आपल्या आसनावर बसविले. त्यांचा पुष्पहार, श्रीफल, श्रीमहावस्त्र देऊन सत्कार केला. व दोघांमध्ये जो संवाद झाला. त्याचे शब्दांकन असे–

पू. महाराज – मी आपली प्रसादवाणी ऐकण्यासाठी आलो आहे.

पू. डोंगरेमहाराज – आमच्यामध्ये आपण ऐकण्यासारखे काही नाही. आपणच आज रोजी प्रथम व्यासपीठावर येऊन आम्हास उपदेश करावा व आम्हास पावन करावे.

पू. महाराज – आपली उपासना फार मोठी आहे. अनन्यसाधारण अशी श्रीकृष्णभक्ती आहे. श्रीकृष्णाच्या कृपेने आपला कार्यक्रम चालू आहे. मध्येच मी सांगणे (बोलणे) योग्य होणार नाही. शास्त्रामध्ये बसत नाही.

पू. डोंगरेमहाराज – आपण व्यासरूप आहात. शास्त्राचा संबंध येत

नाही. आपण जरूर उपदेश करावा. आपण ज्येष्ठ व श्रेष्ठ आहात.

असे म्हणून पू. डोंगरेमहाराज श्रीदत्तमहाराजांना अत्यंत आग्रहपूर्वक घेऊन स्वतःच्या गाडीमध्ये बसवून कार्यक्रमाचे ठिकाणी घेऊन गेले. जणू काही शुकव्यास संवादाची आठवण झाली. या दोघांची हृद्य भेट झाली. त्यावेळी श्रीराधाकृष्ण मंडळाचे सदस्य व इतर भाविकांनी दोन श्रेष्ठ संतांच्या विनम्रतेचा अनुभव घेतला.



कार्यक्रमस्थळी गेल्यावर पू. महाराजांच्या हातास धरून प्रथम पू. डोंगरेमहाराजांनी व्यासपीठावर बसविले. किमान १० हजार श्रोतृवृंद जमलेला होता. भव्य मंडप योजना करण्यात आली होती. आणि आपले महाराज बोलू लागले.

"पूजनीय डोंगरेमहाराजांच्या आज्ञेने या व्यासपीठावर बसून बोलत आहे. या भागवतसप्ताहाचे हे दृश्य बघितल्यानंतर कलियुगामध्ये जणू कृतयुगाचा अवतार झाला आहे असे वाटत आहे. श्रीगोपालकृष्णाने उद्धवास जशी आज्ञा करावी त्याप्रमाणे पू. महाराजांची आज्ञा मी प्रमाण मानतो–

श्रवणभक्तीने अंतरंगशुद्धि व बुद्धिविकास होतो. श्रवण मनन

आचरणामुळे कृतयुगामध्ये ज्याप्रमाणे गोपगोपी पावन झाल्या त्याप्रमाणे आपण (श्रोतृवृंद) या श्रवणाने पावन होत आहात.

दुरितांचे तिमिर जावो – विश्वस्वधर्म सूर्ये पाहो
जो जे वांछिल तो ते लाहो .... त्याप्रमाणे

विश्वाचे कल्याणासाठी अवतारी पू. डोंगरेमहाराजांचे कार्य आहे.

हे 'चक्षुर्वैसत्यं' बघितल्यानंतर

कैवल्याचा अधिकारी। मोक्षाची सोडीबांधी करी।
की जळाचिये परी। तळवटु घे ॥ १२ (२२०)

याची साक्ष पटते म्हणूनच–

म्हणोनि गा नमस्कारु। तयाते आम्हा माथा मुकुटकरूं।
तयाची टांच धरू। हृदयी आम्ही ॥

श्रीभगवंताची अवस्था अशी होत आहे तर आमच्यासारख्यांची अवस्था काय बरे होईल? तसेच स्वामी लोकनाथतीर्थ महाराज योगीराज गुळवणीमहाराजांचीसुद्धा श्रीमद्भागवतावरील नितांत श्रद्धा दिसून येते ती त्यांच्यापुढील पत्रावरून दिसून येते. ही पत्रे ती. दादांना (पं. दादाशास्त्री जोशी) श्रीगुळवणी महाराजांनी लिहिलेली आहेत.

दि. ३।१०।१९३४

श्री. स्वामीमहाराजांचे (पू. लोकनाथ तीर्थ) एक वर्षानंतर पुनः पत्र आले. ४ दिवस झाले. चातुर्मास पुरा करून श्रीशुकदेवजी नावाच्या क्षेत्रास गेले आहेत. 'इस स्थानपर शुकाचार्य महाराजने राजा परिक्षितीको श्रीमद्भागवतका उपदेश किये थे, यह स्थान श्रीगंगाजीके तीरपर है।'

—वा. द. गुळवणी

तसेच दि. ३०।१।१९६२ च्या पत्रामधील उल्लेख पहा–

"गेले २ महिने प्रकृती बरी नसल्याने घरी पडून आहे. यथाशक्ति दैवी व लौकिक उपाय चालू आहेत. श्रीकृपेने व आपणा सर्वांच्या शुभेच्छेने लौकरच बरे वाटेल. रविवारपासून श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांच्याकडून घरी श्रीमद्भागवत सप्ताह चालू केला आहे."

—वा. द. गुळवणी

**पत्रं प्रसन्नं गंभीरं**

भगवान आचार्यांच्या भाष्य ग्रंथाबद्दल पू. वाचस्पति मिश्रांनी 'भाष्यं प्रसन्नं गंभीरं' असे म्हटलेले आहे. त्याप्रमाणे प. पू. दत्तमहाराजांची पत्रेसुद्धा प्रसन्न आणि गंभीर म्हणजे गांभीर्य किंवा त्याचा अभिप्राय समजल्यानंतर विलक्षण आनंद होतो. त्याचा नमुना.

दि. ८।३।७१

श्रीमहाराजांचे कार्यामध्ये आपण सर्व मंडळी तनमनधनाने सर्वदाच तत्पर आहात. त्याकरिता अन्य कोणाचीही प्रेरणा अकिंचित्कर आहे. 'याञ्चा मोघावरमधिगुणे' 'अक्लेशयित्वा चात्मानं यदल्पमपि तदबहू' नास्ति खल्वसाध्यं नाम तापसाम्' इत्यादी वचनानुसंधानपूर्वकच आपणासारख्या व्यवहारज्ञ कार्यकर्त्यांकडून सोत्साह प्रयत्न चालू राहील यांत शंका नाही.

—दत्तात्रेय कवीश्वर

कृ. शि. सा. न. चैत्र शु १० इंदोर १९७३

पत्राद्वारे पारमार्थिक मार्गदर्शन कोणालाही करण्याची वास्तविक माझी पात्रता नाही. प्रथम स्वधर्म सूत्रग्रथित जीवांची वृत्ति– 'वाहिल्या उद्वेग दुःखचि केवळ। भोगणे ते फळ संचिताचे ।। या संतांच्या उक्तीतील सिद्धांत लक्षात आणून– 'नित्यं च समचित्तत्त्व मिष्टानिष्टोपपत्तिषु' 'ठेविले अनंते तैसेचि रहावे। चित्ती असो द्यावे समाधान।' इत्यादी सदुक्तीप्रमाणे दृढसमाहित स्थितीत राहण्याचा प्रयत्न जीवांनी केला पाहिजे. तरच काहींचा सुखाभास प्रपंचात भासू शकतो. हा अभ्यास होण्याच्या दृष्टीने श्रीमद्भागवतातील जडभरतचरित्र (५ स्कं) श्रीनाथभागवतातील भिक्षुगीताध्याय इत्यादी ग्रंथ वाचनीय आहेत. ऊन अत्यंत तापू लागले म्हणजे लवकरच वळवाचा पाऊस पडून हवा थंड होते व ताप भोगलेल्या माणसाला त्यामुळे सुख लाभते हे खरे. पण या दोनही स्थिती अनित्य असल्याने 'तांस्तितिक्षस्व भारत' हाच श्रीभगवंतांनी सिद्धांतभूत उपदेश केला आहे. ही स्थिती लाभणे फार कठीण आहे असे वाटत असल्यास 'मच्चित्त सर्व दुर्गाणि मत्प्रसादात्तरिष्यसि या भगवदुक्तीवर पूर्ण विश्वास ठेवून आर्त भक्तांच्या भूमिकेवरून भगवत्सेवा

म्हणून काही साधन करण्यास हरकत दिसत नाही. कृशानुप्रतिम् दुर्वास-महर्षीच्या क्रोधाग्नीपासून परमभयत्र अंबरीष राजाला ज्या भक्तवत्सल प्रभूने वाचविले त्या प्रभूची सेवा संकटातून मुक्त करणारी आहे. इतरांच्या अंत:करणात उत्पन्न झालेली आपल्याविषयी शत्रुत्वभावना लयाला जाऊन तेथे मैत्रीभावना निर्माण होण्याकरता भगवत्प्रीत्यर्थ हे कर्म मी करीत आहे. अशी वृत्ती ठेवून अनुष्ठान करावे.

– दत्तात्रय कवीश्वर

दि. २९–६–१९७१

आपणाबरोबर सकाळी शांतिपाठपूर्वक भाष्यचिंतन आणि दुपारी किंवा रात्री सिद्धान्तबिंदु सिद्धान्तलेशसंग्रह यांचे चिंतन व्हावे हा मुख्य उद्देश आहे. ४।५ महिने तरी राहता आले पाहिजे म्हणजे वरील दोन ग्रंथ संपून वेदान्तप्रक्रियेचे उत्तम ज्ञान होईल. दुष्पूरप्रपंचाकरिता कोठे तरी फिरण्यात वेळ जातो आणि वेदान्तचिंतन घडत नाही. 'वेदान्त-वाक्येषु सदा रमन्त:' हे तर भाग्य नाहीच पण अल्पकाळीही ते साधत नाही. प्रवासामध्ये याला अवसरच नाही. आपणासारख्या शमप्रधान वृत्तीच्या विद्वज्जनांचे बरोबर केलेले चिंतन फलपर्यवसायी ठरेल असे वाटते. श्रीभगवंताच्या कृपेने कधीतरी घडून येईल. त्यांची प्रार्थना करीत राहणे इतकेच जीवाचे कर्तव्य आहे. 'नामा म्हणे केशवराजा। केला पण चालवी माझा।' हेच खरे.

–दत्तात्रेय कवीश्वर

अशा प्रकारच्या अनेक पत्रांद्वारे ती. दादांना व मला मार्गदर्शना-तून फार मोठा कृपाशीर्वाद दिलेला आहे. त्याचा संग्रह केलेला असून ते नित्य वाचनात असल्यामुळे जीवनामध्ये सुलभता प्राप्त झालेली आहे. म्हणूनच 'पत्रं प्रसन्नं गंभीरं' असे म्हणून त्यांना वंदन केल्याशिवाय राहवत नाही.

सहस्ररश्मी सूर्याला नीरांजनाने ओवाळण्याचा हा प्रयत्न आहे. त्यशिवाय भक्तत्रहृदयाला समाधान येत नाही. त्यासाठी हा अल्पसा प्रयत्न आहे.

* * *

# पू. श्री. दत्तमहाराजांची काही उद्बोधक पत्रें

विशेष अंकाच्या छोटया मर्यादेत काही पत्रे देणे शक्य आहे तेवढीच खाली देत आहे. आवश्यक त्या पत्रांना थोडेसे स्पष्टीकरण देत आहे. त्यामुळे पत्रांतील आशय योग्य तऱ्हेने समजण्यास मदत होईल. काही पत्रातील फक्त मार्गदर्शनपर बोधपर वाक्ये दिली आहेत. त्यामुळे पत्र पाठविलेल्या भक्तांच्या नावाचा उल्लेख नसेल. आपला नामनिर्देश नसला तरी कृपया त्याबद्दल कोणीही नाराज होऊ नये. चिंतन-मननाचा आशय महत्त्वाचा आहे इकडे लक्ष असावे.

संपादक

---

नरसोबावाडी २४।४।८४

श्रीमान् माधवराव व सुलभाताई यांना मंगल आशीर्वाद.

क्षेम,

कालपासून चि. सूरज व चि. आमोद या दोघांनी श्रीगुरुचरित्र सप्ताह वाचनास आरंभ केला आहे. काल चार तास लागले. आज लवकर संपेल. त्यांचा उत्साह चांगला आहे. सकाळी देवाकडे नदीवर जाऊन, स्नान दर्शन करून, तीर्थ अंगारा घेऊन, प्रार्थना करून, घरी येतात. ७॥ च्या सुमारास वाचनास आरंभ करतात. येथे आमच्या उपाध्यायांच्या घरी (येथेच श्री मौनीस्वामी रहात होते) बाहेर वाचन होते. मध्ये उठत नाहीत. दूधही घेत नाहीत. सकाळी एकदा पेय घेऊन बसतात. उत्साहाच्या भरात तहानभूकही विसरते हे चांगले लक्षण आहे. आम्हाला सुद्धा असे करता आले नाही.

(बहुतेकजण) प्रथम थोडे थोडे श्रीगुरुचरित्र वाचन सुरू करतात. चांगली सवय झाल्यावर सप्ताह वाचन करता येते. या दोघांनी तर प्रथमच सप्ताह वाचन सुरू केले ही ईश्वराची कृपा समजण्यास हरकत नाही. येथे देवाच्या पांढरीत श्रीगुरुचरित्र वाचन सुरू झाल्याने पुढे केव्हाही इष्ट कार्यसिद्धीकरिता त्या पवित्र बटूंनी गुरुचरित्र पारायण

१५ दिवसांत किंवा २१ दिवसांत का होईना घरी केल्यास सर्व संकट-परिहार होऊन कार्यसिद्धी होईल. देवांनी गुरुचरित्र वाचन करणारे पवित्र बटू घरी पाठविले आहेत हे लक्षात ठेवून मध्ये मध्ये त्यांच्याकडून पारायण करवून घेऊन आपली कार्यसिद्धी करून घ्यावी. त्यांची शाळा असल्याने सात दिवसांचा नियम न ठेवता १५–२१–२८ दिवसांचे पारायण ठरल्यास रोज मिळणाऱ्या वेळेत होईल. उन्हाळ्याचे व दिवाळीचे सुट्टीत सप्ताह पारायण करण्यास हरकत नाही. अध्याय वाचताना २० व २१ आणि ३०, ३१ व ३२ हे अध्याय ज्या दिवशी येतील त्या दिवशी संपूर्ण वाचावेत. मध्ये अर्धे सोडू नयेत.

२९ तारखेस सप्ताह पूर्ण होतील. ३० तारखेला पोथीला नैवेद्य व ब्राह्मण सुवासिनी भोजन होईल. त्याच दिवशी दुपारी देवाकडे दोघांचेकडून महापूजा, अन्नदान, नैवेद्य होऊन कार्यसमाप्ती होईल. दोघांच्याही प्रकृती बऱ्या आहेत. तीर्थ–अंगारा हे मुख्य औषध येथे सर्वांना सुलभ आहे. क. हे. आ.

आपला

दत्तात्रय कवीश्वर

वरील पत्र पू. महाराजांनी जावई व मुलगी यांना लिहिले आहे. सूरज मुलीचा मुलगा, तो यावेळी आठवीत आहे. आमोद हा अशोकचा मुलगा आहे. तो तर सहावीत आहे. हे दोन्ही नातू वाडीला पारायणासाठी असताना त्याचे सविस्तर वर्णन पत्रात महाराज करीत आहेत. आपल्याला ही माहिती उपयुक्त ठरणारी आहे.

---

खालील पत्रात श्रीमत् भागवतसप्ताहाला प्रकृती ठीक नसल्यामुळे येऊ शकत नाही याची हळहळ वाटणाऱ्या भक्तास लिहिलेल्या पत्रातील विचार–

२०।९।८५

"प्रकृति स्वास्थ्य नसेल तर श्रवण निश्चितपणे घडणार नाही. आणि दुसरी एक ईशेच्छेने यात अनुकूलता अशी आहे की तिथे राहून इकडील सप्ताह स्थानाकडे लक्ष राहील. सप्ताहस्थानात शरीराने उपस्थित राहून घराकडे चित्त जाण्यापेक्षा घरात राहून आश्रमाकडे

लक्ष राहणे केव्हाही श्रेष्ठ होईल. तरी झाले हे योग्यच झाले. ही ईश्वरकृपाच आहे असे समजून शांतपणे भगवत्स्मरण करीत असावे."

–दत्तात्रेय कवीश्वर

---

"पुण्यकर्म करणे हाही प्रयत्नवादच आहे. केवळ भौतिक वाद मानून वागणे हा ही प्रयत्नवादच आहे. पहिल्या प्रयत्नवादास सर्वज्ञ सर्वेश्वराचे साहाय्य संभवनीय आहे. पण त्याकरिता प्रयत्न करणाऱ्याची मनोवृत्ती विश्वास बाळगणारी लागते.

भौतिक वादातील प्रयत्न स्वतःच्या मताप्रमाणे चालू असतो. तोही एक प्रयोग आहे आणि ईश्वर मानणाऱ्यांचाही प्रयोग आहे. आपापल्या प्रयोगावर दोघांचाही विश्वास असतो. त्यात मध्ये होणाऱ्या काही घटना उभयत्र असल्याने त्याबद्दल संदेहस्थिती दोन्हीकडेही निर्माण होते. कुंभमेळ्यामध्ये पन्नास माणसे मेली याचे उत्तर 'प्रारब्ध' असे एक प्रयोग मानतो. दुसऱ्यालाही काही उत्तर पाहिजेच. तो म्हणेल, संरक्षणाची व्यवस्था चांगली राहिली नाही. कठडे मजबूत राहिले नाहीत. इ. उत्तरे आहेत. या दुसऱ्या पक्षात ज्यांच्यावर मृत्यूचा प्रसंग आला त्याला त्यांचा दिसणारा दोष नसल्याने सर्व दोष दुसऱ्याचेच आहेत असे मानावे लागते, व ज्याला दुःख झाले त्याचा काहीच दोष नाही असे मानावे लागते. आणि हा दोष दृश्य नसल्याने तो पूर्ण निर्दोषी ठरतो. लाखोंच्या गर्दीत, निर्दोष असून हेच पन्नास का गेले याचे उत्तर न देता, प्रारब्ध हे उत्तर चुकीचे ठरवून, आपला भौतिक प्रयत्नवाद बरोबर असल्याचे समाधान फक्त मानावे लागते."

–दत्तात्रेय कवीश्वर

---

**संदर्भ** – चि. सुरज, श्री. माधवराव तांबोळी यांचा धाकटा मुलगा. श्रीदत्तमहाराजांचा नातू. त्याची वार्षिक परीक्षा संपली आहे. आता आईवडील परगावी गेले आहेत. एकटचा सूरजला घरी रहावे लागले आहे. त्याला लिहिलेले **पत्र**–

श्रीदत्त १५–४–८७

सप्रेम आशीर्वाद वि. क्षेम

आता तुमची परीक्षा संपली असेल. यामुळे तुम्हाला एकटचालाच

घरी थांबून घर सांभाळावे लागले.

लहानपणासून नियति-प्राप्त कर्तव्य पाळण्याचा अभ्यास तुम्हाला घडत आहे हा परमार्थदृष्टीने चांगला योग ईशकृपेने येत आहे. ‘ठेविले अनंते तैसेचि रहावे। चित्ती असो द्यावे समाधान’ हाच खरा परमार्थ आहे.

काशी–प्रयाग इत्यादी यात्रा चित्ती समाधानाचा अभ्यास चालू ठेवणाऱ्यांना बहिरंग आहे, ‘परोहि योगो मनसः समाधिः’ मनाचे समाधान रहाणे हा श्रेष्ठ योग आहे. असे भगवान श्रीकृष्ण सांगतात.

ईश्वरनामस्मरण, संतांच्या ग्रंथांचे वाचन, सौ. ताईमहाराजा-सारख्या संतांचे दर्शन इ. साधनांनी हा श्रेष्ठ योग साधून जीवन सुखी होते.

–दत्तात्रेय कवीश्वर

---

‘सत्संगती, संतांच्या ग्रंथांचे वाचन, व ईश्वर प्रार्थना याने विवेक-प्राप्ती होते. ईश्वर प्रार्थनापूर्वक नामस्मरणाने, गायत्रीमंत्र जपाने बुद्धी स्थिर होते. हा प्रयोग आहे. निश्चयाने करून पहावा.’

–दत्तात्रेय कवीश्वर

---

‘वृद्धांची सेवा करणारा, त्यांना अभिवादन करणारा, असा जो असेल त्याचे आयुष्य, विद्या, यश व बल यांची वृद्धी होत रहाते.’ असे मनुराजाने सांगितले आहे.’

हे सत्पुत्र कर्तव्य ईशकृपेने आपणाकडून घडले आहे. श्रद्धा भक्तीने व अत्यंत धर्मभावनेने हे घडून येते.

–दत्तात्रेय कवीश्वर

---

गायत्री जपाचे अल्प अनुष्ठान रोज चोवीसशे प्रमाणे पंचवीस दिवस केल्यास पापक्षय, बुद्धी शुद्धी, बुद्धी विकास, इ. सर्व इष्ट सिद्धीस याचा उपयोग होणारा आहे.

–दत्तात्रेय कवीश्वर

'मंडळींच्या वंशपरंपराप्रेमामुळे त्यांचेकडे जावे लागते. थांबावे लागते. हे प्रेम संभाळण्यात समाधान आहे. पुढील पिढीने हे संभाळले तर सर्वांनाच समाधान लाभेल.'

—दत्तात्रेय कवीश्वर

---

'गृहेषु अतिथिवद्वसेत' या वचनाप्रमाणे आपण एक पाहुणे आहोत ही भावना ठेवून, सर्वांच्या उपयोगी पडून, आपले कर्तव्य करीत रहावे, देवाचे स्मरण ठेवावे, म्हणजे ईशकृपेने सर्व घडून येते. काळजी नसावी.'

—दत्तात्रेय कवीश्वर

---

गायत्री मंत्राचा जप रोज एक माळ झाल्यास तो बुद्धिस्थैर्यास व परीक्षेस पोषक ठरेल. प्रयोग करून पहावे.

—दत्तात्रेय कवीश्वर

---

पशुपक्ष्यांच्यापेक्षा मानवांच्या बाबतीत विशेषतः स्त्रियांबद्दल शास्त्रकारांनी शुचितेबद्दल अधिक विचार केला आहे व तो विचाराअंती हितावहही आहे. स्त्रियाच वीरमाता, वीरपत्नी इत्यादी रूपाने श्रेष्ठ बनू शकतात हा शास्त्रीय शुचितेचा प्रभाव आहे.

—दत्तात्रेय कवीश्वर

---

"दुसऱ्याने कसे वागावे या विचारापेक्षा आपण कसे वागावे इकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे. यानेच आत्मशुद्धी, जनानुराग, समाधान या गुणांचा लाभ होतो. म्हणूनच 'गुणाः पूजास्थानम्' हा सिद्धान्त प्राचीन शास्त्रज्ञांनी मांडला आहे. गुणी माणूस स्त्री असो, बालक असो, कोणीही असला तरी त्याच्या गुणामुळे तो पूज्य आहे. यामुळे संघर्ष-शांति होते. श्रीरामचंद्र प्रभूंनी राजधर्म पालनाकरिता सीतादेवीचा त्याग केला असला तरी त्यांनी आरंभ केलेल्या यज्ञात त्यांची सहधर्म-चारिणी सीता देवीची सुवर्णमूर्तीच होती. ही व्यक्तिपूजा नसून गुणांची पूजा आहे."

—दत्तात्रेय कवीश्वर

बायकांची सहनशीलता व संकोचवृत्ती पुरुषांपेक्षा जास्ती मानली तरी त्यांनी स्वतःच्या शरीराची उपेक्षा त्या जोरावर करणे योग्य ठरणारी नाही. सुगृहिणीने स्वतःचे शरीरास निर्भीडपणे जपले पाहिजे. मुलामुलींची, पतीची, अतिथींची व्यवस्था सुगृहिणीच चांगली करू शकते यासाठी प्रथम स्वतःचे शरीर उत्तम बळकट ठेवण्याकडे विवेकाने लक्ष ठेवावे.

–दत्तात्रेय कवीश्वर

---

शुचित्त्वाचे रक्षण कर्तव्यबुद्धीने स्त्रियांनी विशेष दक्षतेने केले पाहिजे. मासिक अस्पर्शतेचे चार दिवस स्वतःहून जपले पाहिजेत. स्त्रीवर्गातून ही बुद्धीची दक्षता कमी कमी होत चालल्याने सर्व प्रपंच चिंताग्रस्त होत चालले आहेत. देहबुद्धीशिवाय खरी मःनशुद्धी होत नाही. पुरुषांनाही शुचितेची इच्छा असली पाहिजे.

–दत्तात्रेय कवीश्वर

---

प्रपंचात कोणतीही संकटाची परिस्थिती आली असता आपल्या इष्ट देवतेचा मंत्रजप करण्याचे ठेवले म्हणजे सर्वबाधा परिहार होईल. निदान संकटाचे वेळी तरी ईश्वराबद्दल कृतज्ञता बुद्धी असावी यातच कल्याण आहे.

–दत्तात्रेय कवीश्वर

---

श्रीसद्गुरु गुळवणी महाराज यांच्या शांति-समारोहासंबंधी

श्रीदत्तमहाराजांनी, श्री. दादाशास्त्री जोशी, बार्शी यांना पाठविलेले पत्र पुढीलप्रमाणे.

पुणे १–३–७१

श्रीदत्त

वे. शा. सं. दादाशास्त्रीजींना सप्रेम नमस्कार,

"आयुर्वृद्धि व आरोग्य संपत्ति श्रीमहाराजांना लाभावी हा शांतीचा मुख्य उद्देश आहे. या दृष्टीने मृत्युंजय जप व्यवस्थित व्हावा म्हणून वे. गणपतिबुवांजवळ प्रार्थना केली आहे."

" धनापेक्षा वाणी व मनाने कार्याचा प्रसार अधिक होतो. "

ज्याचा सखा हरि । त्यावरी विश्व कृपा करी ॥ १ ॥
उणे पडो नेदि त्याचे । वारे सोसी आघाताचे ॥ २ ॥
त्याविण क्षणभरी । कदा आपण नव्हे दूरी ॥ ३ ॥
आंग आपुले वोडोनि । त्याला राखे जो निर्वाणी ॥ ४ ॥
ऐसा अंकित भक्तासी । म्हणे नामयाची जनी ॥ ५ ॥

या जनाबाईंच्या अनुभवसिद्ध उद्गाराप्रमाणे भगवद्कृपेने सिद्ध-पुरुष स्वाधीन कुशल असतात. सेवाबुद्धीने त्यांचे कार्यात भाग घेणारेही तसेच होऊ शकतात. "

आपला
दत्तात्रेय कवीश्वर

---

श्री. दादाशास्त्री जोशी यांसी–

इंदोर, चैत्र शु. १०–१८७३

सप्रेम नमस्कार विशेष–

" सत्कुलप्रसूत, शास्त्रश्रवण संस्कृतबुद्धीच्या मंडळींनी श्रीटेंबे स्वामी महाराजांच्या ग्रंथांचे निष्ठेने परिशीलन करून, त्यातील प्रतिपाद्य शास्त्रीय मार्गाचा उपदेश समाजाला करून, समाजाला शांतीचा मार्ग दाखविणे हाच खरा प्रचार अपेक्षित आहे. "

—दत्तात्रेय कवीश्वर

---

**श्री. दत्तमहाराजांनी सुविद्य तरुण पिढीला केलेले आवाहन**

२४।८।८२

सप्रेम आशीर्वाद विशेष–

" भैषज्यमेतद दुःखस्य यदेतन्नानुचिंतयेत " हा एक दुःखोपशमाचा मार्ग आहे. दुःख विसरून जाण्याचा अभ्यास कष्टसाध्य असून असे अधिकारी फारच थोडे असतील. याकरिता दुसराही एक मार्ग विदूरजींनी सांगितला आहे. तो असा–

" प्रज्ञया मानसं दुःखं हन्यात् शारीरमौषधैः" यात मानसदुःखोप-शमनी प्रज्ञाच दाखविली आहे.

भारतात ही प्रज्ञा पिढ्यान् पिढ्या अनुवृत्त असल्याने, जी आजपर्यंतच्या पूर्व पिढ्यांना उपयोगी पडली व समर्थ ठरली ती या वर्तमान पिढीला अनुपयुक्त व असमर्थ कशी ठरेल ?

भारत, रामायण, संतवाङ्मय, प्राचीन नवीन अध्यात्म विद्यासंबंधीचे वाङ्मय इ. चा वाचनाभ्यास, त्याचे सारग्रहण, लेखन, हा व्यासंग करीत राहून श्री. शेवडे इ. च्या प्रमाणे वाग्मी प्रचारक होण्याचे ध्येय ठरविले तर ते सुविद्य महत्त्वाकांक्षी तरुणमंडळींना असाध्य ठरणार नाही. सोलापूरचे पं. धुंडिराजशास्त्री दाते यांनीही वेदशास्त्रज्ञान संपादून प्रसंगी पौरोहित्य व प्रवचनही चालू ठेवले आहेच.

४।५ वर्षापूर्वी आम्ही बडोद्याला मार्गशीर्षात श्रीमहाराजांचे जयंति निमित्त गेलो होतो. जेथे आम्ही उतरलो होतो त्या यजमानांच्या घरी एकदा उदकशांति झाली. त्यावेळी एक महाविद्यालयाचे प्राचार्य, एक बँकेचे मॅनेजर अशी ब्राह्मण मंडळी म्हणण्यास होती. एकदीड तास उदक शांत म्हणून ती मंडळी आपापल्या ऑफिसचा पोषाख करून ऑफिसला रवाना झाली. त्यांचेजवळ अर्थार्जनाचे लौकिक साधन भरपूर असूनही त्यांनी हे ज्ञान मिळवून ठेवले आहे, तेही प्रसंगी अर्थोत्पादक ठरते. पवित्र वेदमंत्र पठण हे दुरितक्षयकारकही आहे. “विप्रस्य वेदाभ्यासोही तपःपरीमिहेव्यते” हे प्रसिद्ध आहे.

नोकरी हा सामान्य धर्म आहे. न्यायानुसारी स्वतंत्र प्रज्ञ बनून लोकनेतृत्त्व संपादणे हाच असामान्य धर्म आहे.

जिज्ञासा हा फार मोठा गुण असून तोच तत्त्वज्ञानाचे मुख्य साधन आहे.

आपला

दत्तात्रेय कवीश्वर

---

“सर्व श्री प्रेरक सर्वांतर्यामी श्री भगवंताची इच्छाच सर्वकार्य निर्वाहक समर्थ आहे. मानवी प्रयत्न निमित्तमात्र आहे. तथापि तो प्रयत्न ईश्वरस्मरणपूर्वक करणे आवश्यक आहे.”

—दत्तात्रेय कवीश्वर

---

सप्रेम नमस्कार, विशेष

प्रारब्धयोग अपरिहार्य आहे. इलाज नाही. श्रीतुकाराम महाराजांनी आपल्या परिवाराला व्यवहारात सुखी का केले नाही, कळत नाही. साठलेली कामे संपविण्याकरिताच काही न्यायाधीशांची नेमणूक होत असते. त्यांनी नवीन काम घ्यायचे नाही.

मनुष्य जन्म उपान्त दुरितक्षयार्थच प्राधान्याने असावा. क्रियमाणाचा विनियोग "धर्मेण पापमनुंदति" या उक्तीप्रमाणे या करिताच होत असावा.

–दत्तात्रेय कवीश्वर

---

'योग्य वक्त्यांच्या मुखातून हरिगुण श्रवण करणारे श्रोते जर भगवत्कृपेने आपद्विमुक्त होतात तर वक्ता का होणार नाही ?' हरिस्मृतिः सर्व विपद्विमोक्षणम्' हे वचन प्रसिद्धच आहे. 'सर्वासां विपदां विमोक्षणम्' असे दोन्हीही अर्थ घेता येतील.'

–दत्तात्रेय कवीश्वर

---

**प्रपंच आणि व्यवहारात तितिक्षेचे महत्त्व स्पष्ट करणारे पत्र**

'अतृणे पतितो वन्हिः स्वयमेवोपशाम्यति' अशा वृत्तीने म्हणजे तितिक्षेने रहावे.

'मत्सरोजन्य शुभद्वेषः' हा विकार पूर्वदुरितवशात मनात उत्पन्न झाल्यामुळे 'स्वयं नष्टः परान्नाशयति' असे क्रियमाण कर्म घडून 'प्रेत्यानन्तसुखायच' या भगवदादेशाकडे लक्ष जात नाही. असे 'प्राचीन कर्म बलवन्मुनयो वदन्ति' हे सत्य आहे.

अनुकूल किंवा प्रतिकूल घटना दोन्हीही 'आगमापायिनोऽनित्या' या उक्तीप्रमाणे संपणाऱ्या असल्याने 'तांस्तितिक्षस्व भारत' हाच शेवटचा आदेश आहे. तितिक्षा पदार्थं 'नित्यं च समचित्तत्त्वामिष्टानिष्टोपपत्तिषु' असा भगवंतांनी ज्ञानसाधन म्हणून सांगितला आहे.'

–दत्तात्रेय कवीश्वर

---

**दीक्षा देताना दिसून येणारी गुरुनिष्ठ वृत्तीची दक्षता**

दिनांक....पहाटे ५।५॥ ला स्नान करून देवापुढे नारळ ठेवून

अनुग्रह करण्याबद्दल प्रार्थना करून ठीक ६ वाजता डोळे झाकून शांत बसावे. श्रीगुरुमहाराज कृपा करतील. काळजी नसावी. यापुढेही रोज सवडीप्रमाणे बसण्याचा अभ्यास चालू ठेवावा. तो प्रसादाचा नारळ दुसरे दिवशी फोडून सर्वांनी प्रसाद घ्यावा. कळावे, श्री आज्ञेवरून–

दत्तात्रेय कवीश्वर

---

**पौरोहित्य करणाऱ्यांसी महत्त्वाचा विचार**

'याज्ञिक करून दक्षिणा घेण्यास हरकत नाही. त्याच्यावरच वृत्ती अवलंबून आहे. अडचणीचे ठिकाणी जावे लागल्यास नंतर गायत्री मंत्रजप एकशेआठ करावा म्हणजे दुरितक्षय होऊन जाईल. आसक्ती मनात नसली म्हणजे झाले. ईश्वराचे नामस्मरणही सवडीने चालू ठेवावे. समाधानाने व यजमानाच्या आदरबुद्धीने मिळेल ते घेण्यास हरकत नाही.'

–दत्तात्रेय कवीश्वर

---

आपणास साधनेत आलेला अनुभव वाचून समाधान वाटले. अनुभव चांगला आहे. ईश्वराचे अस्तित्व असल्याबद्दल श्रद्धा दृढ होणेकरिता असे अनुभव येत असतात. या दृष्टीने हा अनुभव आला आहे.

–दत्तात्रेय कवीश्वर

---

आपली काव्यशक्ती निसर्गतःच आहे. पण 'सति उत्तमश्लोक गुणानवादे जुगुप्सितं न स्तवयंति सभ्याः' असेही महात्मे सांगतात.

–दत्तात्रेय कवीश्वर

---

'एकमेकां साह्य करू। अवघे धरू सुपंथ' अशीच संतांची कार्यपद्धती आहे. तसे घडत राहिल्यास कार्याचा प्रसारही चांगला होतो. आणि त्यामुळे कार्यकर्ताही प्रसन्नचित्त असतो. परंतु एकाच कार्याबद्दलही 'पिण्डे पिण्डे मतिर्भिन्ना' अशी स्थिती दिसून आल्याने उत्साही कार्यकर्त्यालाही विषाद निर्माण होऊन, आता येथेच थांबावे काय ? असे वाटणे स्वाभाविक आहे. अशाही प्रसंगी विघ्नैः पुनः पुनरपि प्रति हन्यमानाः। प्रारब्धमुत्तमजना न परित्यजन्ति ' अशी ईशदत्त धृतिशक्ती बाळगणारे कर्मयोगी ईशकृपेने अधिक उत्साहाने ईश्वर-

प्रसादसंपादक सत्कार्य करीतच राहतात.

कृतिप्रधान वृत्तीच्या माणसामध्ये निश्चय आणि अनिर्वेद उत्साह हे दोन महत्त्वाचे गुण असावे लागतात म्हणजे कार्य साफल्य होते.

—दत्तात्रेय कवीश्वर

---

पुण्यानेही पापक्षय होतो पण त्याकरिता पुण्यही खर्ची पडते. भोगाने पापक्षय झाला तर संचित पुण्य अबाधित राहू शकते. ईशगुरुकृपा ती हीच आहे. 'तया सत्कर्मी रति वाढो' ही पुण्यकर्माचरणाबद्दल सद्बुद्धी, त्याप्रमाणे पुण्यसंचय व भोगाने पापक्षय हे देणे ईश्वराचे आहे. 'दुःखाचे वेळी देवाने आमच्याकडे का पाहू नये' असा विचार मात्र साधकाचे मनात येऊ नये.

—दत्तात्रेय कवीश्वर

---

श्रीगुरुमहाराजांनी दिलेल्या साधनेचा अभ्यास रोज चालू असणे हितावह ठरेल. इच्छा नसताना निषिद्ध स्पर्शादी घडले तर त्याबद्दल हे प्रधान साधन बंद ठेवण्याचे कारण नाही. प्रयत्न केल्यास ईशकृपेने निषिद्ध स्पर्शादी दोषही टाळता येणे शक्य आहे. अज्ञानावस्थेत त्याचा संबंध विशेष घडणार नाही.

—दत्तात्रेय कवीश्वर

---

अन्य शास्त्रानुसार कोणी काही सांगितले तरी हा संप्रदाय कल्याणकारक नाही असा सिद्धान्त ठरू शकणार नाही. आणि पूर्ण विचार झाल्याशिवाय इतर सांप्रदायिकांचा बुद्धिभेद करणे शास्त्रसंमत नाही, तसेच बुद्धिभेद करून घेणे ही शास्त्रसंमत नाही.

— दत्तात्रेय कवीश्वर

---

"पूर्ण आत्मसाक्षात्कार दृढ होईपर्यंत द्वैतातच सर्वांनाच रहावे लागते. तरी श्रीगुरुमहाराजांनी दिलेली साधनाच चालू ठेवावी. तसेच त्यांनी सांगितलेला जप होईल तेवढा वाचिक व मानसिक चालू ठेवावा. गायत्रीमंत्राचा जप ब्राह्मणांना विशेष उपकारक असल्याने त्याचा यथाशक्ती जप आपण करू शकत असाल तर करावा. जसजशी तळमळ वाढत जाईल तशी कार्यसिद्धी लवकर होऊ शकते."

— दत्तात्रेय कवीश्वर

# पू. श्रीदत्तमहाराजांचे हृद्गत व्यक्त करणारे अपूर्व पत्र

**संदर्भ** – प: प. श्रीनारायणानंद सरस्वती स्वामी महाराजांना लिहिलेले पू. श्रीदत्तमहाराजांचे हे एक पत्र आहे. या पत्रातून पू. श्रीदत्तमहाराजांच्या अंतरंगाचे अध्यात्मनिष्ठ, मनोज्ञ जीवनदर्शन होते. आपण ज्यांना आदर्श म्हणून भावभक्तीने श्रीगुरुरूपात त्यांचे शिष्यत्व स्वीकारले आहे त्यांच्या अंतरंगातील गुरुभक्तीची–अंतर्निष्ठ गुरुसेवेची तळमळ एका अधिकारसंपन्न यतिमहाराजांना अत्यंत कळवळ्याने कळविली आहे. यामध्ये मोक्षगुरु म्हणून त्यांनी प. प. श्री नृसिंहसरस्वती ( दीक्षित ) स्वामी महाराज यांचा उल्लेख केला आहे. बालवयापासून ज्यांचे मार्गदर्शन लाभले, ज्यांच्या सान्निध्याने व कृपाकूर्मदृष्टीने संपूर्ण जीवन अध्यात्मप्रवण झाले, ज्यांनी श्रीमत् भागवतासारख्या महाग्रंथाचे अनन्य भक्त बनविले त्या श्रीवासुदेवानंद स्वामी महाराज प्रतिबिंबित झालेल्या श्रीदीक्षित स्वामीमहाराजां-संबंधी अनन्यनिष्ठा या पत्रात स्वाभाविकपणे प्रगट झाली आहे. ही निष्ठा या गुरुदेहात आहे तशीच ती त्यांचे प्रमाणेच असलेल्या महापुरुषांच्या ठिकाणीही निस्संदेह शिष्याची असते. हे पू. श्रीदत्त-महाराजांकडे पाहून आपणही निश्चित केले पाहिजे. " साधू दिसती वेगळाले परि ते स्वरूपी मिळाले " हे कसे असते ते यातूनच शिकावयाचे असते.

या पत्रातील तळमळ अत्यंत आत्मनिष्ठतेची आहे. लोक कार्याच्या व्यग्रतेने स्वत:ला स्वत:चे काही करता आले नाही. धारवाडला शिकत असताना (बालवयात) काशीहून प. प. श्रीनृसिंहसरस्वती दीक्षित स्वामी महाराजांचा ( मोक्ष गुरूंचा ) पत्राने संकल्पादेश आला तो व त्याची पूर्तता करण्याची तळमळ या पत्रात आहे.

ही पूर्तता श्रीयतिमहाराजांच्या कृपेने व्हावी अशी प्रार्थना पत्रात आहे.

श्रीदत्त

इचलकरंजी कार्तिक शु.।। १२ भृगुवार १९११

श्री. प. प. योगत्रय, प्रशांतचित्त, श्रीनारायणानंद सरस्वती स्वामीमहाराज यांचे पवित्र चरणकमल सन्निधी साष्टांग वंदनपूर्वक

विज्ञापना वि.

श्री. शिरटीकर, चातुर्मास्य समाप्तीस आपणाकडे येत असल्याने, त्यांचेजवळ हे उत्कंठा–प्रार्थना पत्र, मूलाधार परमात्मस्मरणपूर्वक लिहून देत आहे. या प्रार्थनेचे साफल्य तत्स्वरूप आपल्याच कृपाकूर्म दृष्टीने होणारे आहे.

श्रीमोक्षगुरूंनी बालवयात धारवाडला शिकत असताना वाराणसी-हून पत्ररूपाने संकल्पादेश दिला, त्याचा आशय " विद्याभ्यास चांगला करून प्रस्थानत्रयीचा अभ्यास चांगला करावा. पुढे त्याचे श्रवण व पुराण आम्हाला अमरापुरी अमलेश्वर दत्तगुरुसन्निध करवावे. पुढे प्रपंच करून परमार्थ लाभही संपादन करावा. हे सर्वही उपास्य देवता, श्रीगणपति श्रीदत्त, श्रीगुरुमहाराजांचे कृपेनेच व्हावयाचे आहे.

–नारायण "

असा आशय त्या पत्रादेशाचा आहे. हे पत्र पाहून चित्तातील तळ-मळ शांत होऊन वैयक्तिक ध्येय व तत्पूर्तीबद्दलचे आश्वासन समजून आल्याने चित्त शांत झाले. पण अद्यापि प्रपंचासक्ति सुटत नसल्याने ही ध्येयपूर्ति या जन्मी का पुढील जन्मी हा संदेह निर्माण होऊन चित्त व्याकुलीभाव पुनः निर्माण झाला.

प्रति चातुर्मास्यामध्ये श्री. दिवेकर, श्री. शिरटीकर प्रभृति बहुत सुकृताची जोडी आपण हे सज्जन साधकांना आपल्या – आत्मज्ञानये प्रयता संपादक पवित्र संगतीचा व सच्छास्त्र श्रवणाचा लाभ आपल्या कृपेने होतो. तसाही लाभ स्वीय दूरदृष्टीने अंतराय ग्रस्त, मायाबुद्धि निमग्न या जीवाला आजपर्यंत झाला नाही. तसे घडले तरी अंशतः तरी सद्गुरूंच्या आज्ञेचे पालन घडल्याचे समाधान लाभून इहलोक त्यागसमयी काही तरी लाभेल, पण हे सर्व

'हृदिबुद्धिप्रदातृत्वाद् बहिःसिद्धी प्रदत्वतः' अशा सर्व समर्थ श्रीसिद्धिबुद्धिपतींच्या इच्छेवरच अवलंबून असणार, तथापि 'आठवण तुम्ही द्यावी पांडुरंगा' या श्रीतुकारामांच्या प्रार्थनेप्रमाणे हे सर्व आपणा-सारख्या निरवधिकृपापूर्ण महापुरुषांच्या संकल्प प्रभावानेच घडून येणारे आहे. वयाला ऐंशी वर्षे होत आली पण हे सर्व आयुष्य 'निद्रया ह्नियते नक्तं दिवा चार्थेह्या तथा' या श्री प्रल्हादजींच्या उक्तीप्रमाणे व्यर्थ गेले

आहे. पश्चिमेकडे रथ चालला आहे, तो कोठे केव्हा थांबणार हे समजत नाही. असा नैराश्यात्मक व्याकुलीभाव या पत्ररूपाने आपल्यापुढे मांडला आहे. इत:परं आत्मारामः आप्तकामः श्रीचरणा एव परमं प्रमाणमिति विश्वस्य विरमामि तावत्, 'नान्तो न चादिर्नच संप्रतिष्ठा' इति श्रीभगवदुपवर्णित निरवधि स्वकर्म सूत्र ग्रथितः अधन्यजीव व्यापार लेखनादिती।

कृपाकटाक्षाभिलाषी
शिष्य परमाणुः
कवीश्वरकुल जनुर्दत्तात्रेय शर्मा

॥ श्री ॥

**परमपूज्य श्रीदत्त कवीश्वर महाराज के**
**सहस्रचंद्र दर्शन शांति महोत्सव के उपलक्ष्य में**

# शुभ चिंतन

श्रेष्ठ तपस्वी ब्रह्मश्री और वैदिक धर्माधार।
दत्त कवीश्वर महाराजका आज भव्य सत्कार ॥ १ ॥
महाक्षेत्र नरसोबावाड़ी स्थल में जन्म लिया।
न्याय श्रुती वेदान्त शास्त्र का दृढ अभ्यास किया ॥ २ ॥
गीता ज्ञानेश्वरी भागवत दासबोध में प्रीत।
प्रवचन से आत्मोन्नति करना यही आपकी रीत ॥ ३ ॥
धन्य पिता श्री धुंडिराज़ और सरस्वती माता।
जो थे धार्मिक संस्कृति पोषक पुण्यवंत दाता ॥ ४ ॥
परमभाग्य से प्राप्त हुआ है अशितीपूर्ति सुयोग।
सभेश श्री धुंड़िराज दाते अपूर्व-सा संयोग ॥ ५ ॥
समारोह में बहार आयी हर्षभरा चहुं ओर।
प्रेमभाव से नाच रहा है सबके मन का मोर ॥ ६ ॥
दिन् दूनी और रात चौगुनी प्रगति रहे आबाद।
आत्म रूपसे पूज्य गुळवणी देते आशीर्वाद ॥ ७ ॥

मिले शांति सुख दीर्घायुर्बल कीर्ति संपदा चैन।
हार कभी ना हो जीवन में बजे विजय की बैन ॥ ८ ॥
बसंत ऋतु का समय सुहाना 'बसंत' गाये गान।
दत्तराज की पूर्ण कृपासे बढ़े मान सम्मान ॥ ९ ॥

वसंत अं. तुलजापूरकर
राज्यकवि
हैद्राबाद (आंध्र प्रदेश)

## नवपद्य पुष्पमाला

वृत्त-अनुष्टुप ] [ कवि-ह. ना. वैद्य, बासरकर,
मुदखेड, नांदेड

ॐ कराय दिव्याय गुरवे परमात्मने।
नमो वै योगिराजायानसूया नंदनाय च ॥ १ ॥
न मामि चरण द्वंद्वं योगीजन प्रपूजितम्।
दासोपंतं परं भक्तं सर्व सिद्धि समन्वितम् ॥ २ ॥
मो दयन्तं निजान् भक्तान् मातापुरनिवासिनम्।
अनघारमणं वंदे सत्यदत्तं परं शिवम् ॥ ३ ॥
द त्तात्रेयात्मजं वंदे वामनाख्यं परं गुरूम्।
वासुदेवः सर्वमिति वासुदेवं यतिं प्रभो ॥ ४ ॥
त्ता रयन्तं स्वशक्त्यैव परमानंद दायकम्।
स्वोपासनाख्यरूपेण ब्रह्मरूप प्रकाशकम् ॥ ५ ॥
त्रे धायः स्थितवान् लोके रजसत्त्वतमात्मकः।
त्रैलोक्यपालकोयश्च चिदानंदमयो विभुः ॥ ६ ॥
या जनं यजनं यज्ञः सर्वः सर्वत्र गोऽव्ययः।
चिरंजीवी सर्व त्राता भक्तेभ्यश्चिर सौख्यदः ॥ ७ ॥
य त्नेन साधितां सेवां दत्तात्रेयोत्सवे परे।
चरणेऽर्पयन् दीनो वैद्यो नारायणात्मजः ॥ ८ ॥
नवकं नूतने दिव्य-उत्सवे पुण्यपत्तने।
वासरे शोभने योगे वासुदेवनिकेतने ॥ ९ ॥

॥ इति श्री प. पू. दत्तमहाराज कवीश्वर स्तोत्र, नवपुष्पमाला,
तत्सद्दिगम्बरार्पणमस्तु ॥

# आरती ( हिंदी )

कवी : ह. ना. वैद्य बासरकर, मुदखेड–नांदेड

चाल – करितो प्रेमे तुज नीरांजन

आरती सेवा सादर करता कवीश्वर चरणोंमे ।
नंदित होना, दुःख हटाना जगमो स्मरना मनमें ॥ धृ. ॥
देह देहमें दत्त भरा है चिन्मयानंद विभु जो
दयान्वित विराजित आप हैं चित्तासन मो
तारक संसारी जनके भवभय तुम हारो
त्रेधा गुणसे भूषित सबमें रजसत्त्वतम जगमें ।
आरती सेवा सादर करता ॥ १ ॥

यत्न करे यदि नर जीवनमें दत्तनाम स्मरना
देवही पालन सबका करता वासुदेव भजना
वर दाता वामन बनता दत्तराज कहना
देवदेव के पगको छूना यही रखना जी ! मनमें ।
आरती सेवा सादर करता ॥ २ ॥

वर्णाश्रमका पालन तुमका चित्तशुद्ध रखता
गुरुकृपासे संचित जात क्रियमाण न बनता
निष्काम ही करम गुरूको प्यारा बहु लगता
धन्वंतरी है सब रमता भुलना न हरि मनमें ।
आरती सेवा सादर करता ॥ ३ ॥

भक्ति जलसे धोना पग, गंध ग्यान, करमफूल
माला देना–अग्यानधूप–दीपज्ञान सोऽज्वल
ब्रह्मरसका भोजन रविशशि न्योच्छावर
आनंद दक्षणा रक्षण बालक गुरुपद भज मन में ।
आरती सेवा सादर करता ॥ ४ ॥

[ धन्वंतरी और हरि दत्तके नाम हैं ।
प्रमाण – हरिर्धन्वंतरि साक्षाद्दत्तात्रेयः सदाशिवः ।
योगिराजोऽवधूतश्च षडैते सर्वकामदाः । ]

* * *

# अलौकिक गुरुत्वाचे संपूर्ण निदर्शन

लेखक : **पं. राजेश्वरशास्त्री जोशी उप्पिनबेटिगिरी**, धारवाड

**संदर्भ** – पं. वे. शा. सं. श्रीराजेश्वर शास्त्री जोशी (उप्पिन-बेटीगिरी) हे पू. पं. वे. शा. सं. श्रीभालचंद्र शास्त्रीजींचे सुपुत्र. हे न्याय वेदान्तादी सर्व दर्शनांमध्ये पारंगत आहेत. पू. श्रीदत्तमहाराजांकडून न्यायशास्त्राचे मार्मिकत्व शिकण्यासाठी श्रीराजेश्वरशास्त्री पुण्यात श्रीवासुदेव निवासात वर्षभर येऊन राहिले होते. शास्त्रीबुवांचे घराण्यावर वेदमातेची पिढ्यान् पिढ्या अखंड कृपा आहे. चुलते, बंधू, वडील सारेजण वेदाध्ययन व अध्यापन यामध्ये जीवनभर रमलेले आहेत. धारवाडचे राहणारे. यांची 'श्रीशंकराचार्य वेदपाठशाळा' पूर्वीपासून सुप्रसिद्ध आहे, याच पाठशाळेत श्रीराजेश्वरशास्त्रीचे आजोबा पू. श्रीनागेशशास्त्री यांचेकडे पू. श्रीदत्तमहाराज वेदाध्ययनास राहिले होते. या घराण्याचा श्रीशृंगेरीजगद्गुरुपीठाशी आत्मीय ऋणानुबंध आहे.

पू. श्रीदत्तमहाराजांच्या चरणी अध्ययनाची संधी लाभलेल्या श्रीराजेश्वरशास्त्रींना श्रीदत्तमहाराजांच्या ठिकाणी अलौकिक गुरुत्वाचे संपूर्ण निदर्शन कसे आढळले ते या लेखात आहे.

—संपादक

### " तस्माद्गुरूं प्रपद्येत " ( श्रीमद्भागवत )

त्रैलोक्यामध्ये अत्यंत महत्त्वाचे स्थान म्हणजे 'गुरुत्व' हे होय. हा धर्म फारच विरळ असा दिसून येतो. "गुरु" हा शब्द देवतांचे आचार्य श्रीबृहस्पति, पिता, वडीलमाणसे, अशा तीन अर्थांमध्ये रूढ आहे. त्यात एकेकांचे गुरुत्व निरनिराळे असते.

बृहस्पत्याचार्य हे आसुरसंपत्तीचे निरसन करून दैवसंपत्ती स्थापन करण्यासाठी इंद्रादिकांचे मंत्री व पुरोहित होऊन त्यांना धार्मिक रीती, व राजनीती यांचे बोधन करीत असतात म्हणूनच त्यांची 'बृहस्पति-स्मृति' बार्हस्पत्यसूत्र व बृहस्पतिधर्मसंहिता, या शिवाय 'बार्हस्पत्य'

नावाचे आधुनिक विज्ञानप्रतिपादकग्रंथ हे प्रसिद्ध आहेत. पूर्वोक्त बार्हस्पत्यसूत्राने चार्वाकमताचा प्रसार करून देहात्मवाद पसरून दैत्यांचे प्रलोभन केले. या युगातसुद्धा चार्वाक मताचे लोक या वादाच्या नादी पडून सर्वज्ञ महर्षिदृष्ट सन्मार्गाला मुकत आहेत. तसेच त्यांच्या धर्मसंहितेचा अभ्यास करून त्यात निरूपण केलेल्या आचरणाने पुष्कळ धार्मिक लोक या कलियुगात देखील सन्मार्गास लागून उत्तम गती प्राप्त करून घेत आहेत. तसेच आधुनिक पाश्चात्त्य लोकांनी या बार्हस्पत्य संहितेचे अवलंबन करून (आश्चर्यचकित करणारी) विविध विज्ञान साधने ऐहिक सुखासाठी अद्यापि निर्माण केली जात आहेत. असे बृहस्पतींचे गुरुत्व राष्ट्रीय, धार्मिक, आध्यात्मिक, कार्यामध्ये लोकोपकारक होत आहे.

(२) आता 'स्यान्निषेकादिकृद्गुरूः' या नियमाप्रमाणे प्रत्यक्ष पित्याच्या ठिकाणी दुसरे गुरुत्व प्रसिद्ध आहे. पिता म्हणजे वडील. पिता दोन प्रकारचा असतो. एक सांसारिक दुसरा आध्यात्मिक. त्यात सांसारिक पिता हा संततीद्वारा आपल्या कुलाचा उद्धार करीत व पुत्रादिकांना वेळोवेळी शास्त्रोक्त विधीप्रमाणे संस्कार व विद्याप्रदान, पालन, पोषण वगैरेंनी त्यांना सन्मार्गास लावून आपल्या वंशाचे श्रेय निर्माण करीत असतो. एखादा पिता ज्ञानी असल्यास उद्दालक ऋषीप्रमाणे पुत्राला आत्मोपदेश करून मोक्षही देऊ शकतो. हाच आध्यात्मिक पिता होय. प्रश्नोपनिषदामध्ये– "त्वं हि नः पिता योऽस्माकमविद्यायाः परं पारं तारयसि" असे म्हटले आहे.

(३) तिसरे गुरुशब्दवाच्य वडील लोक हे वेळोवेळी सर्वांना, लहान मुलांनासुद्धा हितोपदेश करीत आपले अत्यंत उपयोगी असे अनुभव आणि सत्परंपरा यांचे बोधन करून आपापल्या परिसरात असलेल्या अज्ञ लोकांना सन्मार्ग दाखवीत असतात. यांच्यापैकीच काही लोक विद्यागुरु, धर्मगुरु, राष्ट्रगुरु, कलागुरु असे त्या त्या कारणास्तव गुरु होत असतात.

असे तिन्ही प्रकारचे गुरुत्व एकवटून एका ठिकाणीच असणे अत्यंत दुर्मिळ आहे. या अभिप्रायाचा उल्लेख श्रीमद्भागवतामध्ये

"शाब्दे परे च निष्णातं दुर्लभं गुरुमाश्रयेत्"

असा आहे. श्रीशङ्करभगवत्पादाचार्य, श्रीविद्यारण्यमहास्वामी, श्री अप्पय्यादीक्षित वगैरे बोटाने मोजण्यासारख्या काहीच थोड्या व्यक्ती सर्वतोमुखगुरुत्व दर्शविणाऱ्या आढळून येतात. यांचेकडून शिष्योद्धार, राष्ट्रोद्धार कसा झालेला आहे. याच्या उल्लेखाची आवश्यकता नाही. त्याचप्रमाणे अनेक सत्पुरुषही एकेक आध्यात्मिक साधनाचा प्रचार करून सबंध भारतामध्ये आध्यात्मिक उन्नतीचे निदर्शक झाले आहेत, होत आहेत व होणारही आहेत.

श्रीशंकराचार्यांच्या सारख्या महानुभाव व्यक्तीमध्ये पूर्वोक्त तिन्ही गुरुत्वाचे अर्थात पूर्ण गुरुत्वाचे निदर्शन आढळून येते. अलीकडे अधर्माचा प्रवाह मोठ्या वेगाने वाहत असल्यामुळ पूर्ण गुरुत्वाचे निदर्शन होणे फार कठीण होत चालले आहे. तरी काही विशिष्ट पुण्यशाली लोकांच्या भाग्याने कर्नाटक व महाराष्ट्र प्रांतामध्ये शाब्द व परतत्व यांचेमध्ये निष्णात, आत्मानात्मविवेक–शमदमादिषट्कसंपत्ति–विरक्ति–मुमुक्षुत्व या आध्यात्मिक अधिकाराने संपन्न व शिष्योद्धारण समर्थ, "पूर्णगुरुत्वाचे निदर्शन" होत असलेले महापुरुष म्हणजेच ब्रह्मश्री पूज्य दत्तात्रेय महाराज कवीश्वर हे होत, असे निवेदन करणे मुळीच अतिशयोक्तीचे होणार नाही, हे त्यांचे आंतरंगिक लोकांना विदितच आहे.

"अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम्"

या भगवदुक्तीप्रमाणे ब्रह्मश्री ढुंढिराजमहाराज व सौ. सरस्वती देवी या दंपतीपासून श्रीमहाराज यांचा जन्म झाला. श्रीदत्तमहाराज हे जन्मापासून देवमाणूस होते. यांची विद्वत्ता, तपस्या, सदाचार, अत्यंत सात्विकता, भगवद्भक्ती या सद्गुणांमुळे सर्व भक्तांची त्यांच्यावर तशी श्रद्धा आहे. या कारणाने हे आपले महाराज पूर्वजन्मापासूनच योगभ्रष्ट होते हे त्यांच्या अत्यंत बालपणामध्ये श्रीमत्परमहंस दत्तावतार श्री. वासुदेवानंदसरस्वती (टेंबे स्वामी महाराज) यांचे कृपाप्रसादपूर्वक अवलोकनाने सिद्ध होत आहे. अर्थात जन्मापासूनच पूर्वार्जित गुरुत्व यांचे ठिकाणी होते. जातकर्मादिसंस्कारापासून उपनयन, ब्रह्मचर्य, वेदाध्ययन, नंतर अनेक शास्त्रांचे अध्ययन केले. यांनी अनेक अध्यापक-गुरूंचेकडून गुरुत्वाचा संग्रह केला. आपण स्वतः शिष्यांना अध्यापन करू लागल्याने 'सद्विद्यागुरुत्व' प्राप्त झाले. लहान वयापासूनच

आध्यात्मिक प्रवृत्ती, सात्विकता, सत्पुरुष सहवासाची अभिरुची, इ. गुण अवर्णनीय आहेत. पूज्य वडिलांच्या आज्ञेनुसार यांनी केवल "प्रजायै गृहमेधिनां" या न्यायाने अनासक्तीने गृहस्थाश्रमामध्ये आपल्या परिवारास व जिज्ञासूंना बोध करीत आले आहेत. जीवनाच्या या परिपक्व अवस्थेतच

"पूर्वाभ्यासेन तेनैव ह्रियते ह्यवशोपि सः ।
जिज्ञासुरपि योगस्य शब्दब्रह्मातिवर्तते ।।"

या भगवदुक्तीप्रमाणे कर्म-भक्ति-ज्ञान-योगादिकांचे साधन करीत पूर्ण गुरुत्वाचे निदर्शक होऊ लागले. योगिराज श्रीगुळवणी महाराजांचा विशेष संबंध घडल्याने उत्तरोत्तर उत्कर्ष होऊन आता तर हे गुरुस्थानीच आहेत. या गुरुत्वाला श्री. प. प. वासुदेवानंद सरस्वती गौरव ग्रंथमाला प्रकाशनाच्या संपूर्ण कार्यवाहकत्वाची भर पडली आहे. श्रीमत्भागवत, श्रीमद्भगवत्गीता या ग्रंथांतील अमानित्व, अदंभित्व, अहिंसा, क्षांति, आर्जव, आत्मनिग्रह, वगैरे ज्ञानीपुरुषांचे अलौकिक गुण यांचे ठिकाणी वसत असल्याने शाब्दनिष्णातत्व ज्ञानीभक्तांच्या लक्षणांनी परतत्त्वोपदेशक गुरुत्वही आहे. म्हणून या काळात अशी व्यक्ती दुर्मिळच होय.

क्षान्तिर्धर्मम[1]हीरुहस्य निबिडच्छायेति जेगीयते
पूर्वैर्योगिभिरेतया स्वतपसः साफल्यमासद्यत ।
ति[2]ष्येऽस्मिन् कलु[3]षाधिके हि भुवनं स्वाधारशून्यात्मकं
जानन्ती नितरामशिश्रियदिमान् विद्यानयाद्यन्वितान् ।।

— अमृतमहोत्सवातील मानपत्रातील श्लोक

यांचे शास्त्रीय ज्ञानाप्रमाणे राजसगुणाचे अव्यावहारिक ज्ञानामध्ये सुद्धा सात्विकतेची भर घालून निर्दुष्ट व्यवहार कसा करावा हे पुष्कळ प्रसंगी यांनी लोकांना दाखविले आहे. अर्थात बृहस्पत्याचार्यांनी दाखविलेले व्यावहारिक गुरुत्व यांचे ठिकाणी आहे. असा पुष्कळ लोकांचा अनुभव दिसतो.

वर संक्षिप्त रीतीने सांगितलेले विषय प्रसिद्ध झालेल्या यांच्या

---

१. धर्मरूपवृक्ष. २. कलियुग. ३. पापाधिक्य.

चरित्रावरून समजण्यासारखे आहेतच. असे पूर्वोक्त तिन्ही प्रकारचे गुरुत्व श्रीमहाराजांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये असल्याने हे प्रत्यक्ष मूर्तिमंत गुरुत्वच आहेत यात संशय नाही. अशा सत्पुरुषांच्या योगाने अनेक सद्भक्तांचा त्या योगे भारत देशाचा धर्मजागृतीने उद्धार होऊन देश-कल्याण होवो अशी प्रार्थना करीत आहोत.

* * *

---

## २०–२५ वर्षांपूर्वीची हकीगत

कांची कामकोटी पीठाचे जगद्गुरु गुरुस्वामी प. प. श्रीचंद्रशेखर स्वामी महाराज यांनी विजयवाडा येथे अखिल भारतीय वेदशास्त्र संमेलन (विद्वत् संमेलन) बोलावले होते. या संमेलनात नागपूरचे पं. श्री. अंबादास उर्फ भाऊजी शास्त्री आर्वीकर, पं. श्री. भालचंद्र शास्त्री उप्पिनबेटिगिरी, पं. श्री. दत्तमहाराज कवीश्वर ही आपल्या परिचयाची विद्वान मंडळी उपस्थित होती.

येथील शास्त्रार्थ चर्चेत श्रीदत्तमहाराजांची वाग्वैखरी, प्रतिपादन शैली, शास्त्रीय प्रतिभा इ. गुणवैभव पाहून गुरुस्वामी अति संतुष्ट झाले आणि सन्मान समारंभाचेवेळी भर सभेत गुरुस्वामींनी आपल्या व्यास-पीठावरून श्रीदत्तमहाराज यांना पाचारण करविले आणि आपल्या गळयातील तुलसीमाला स्वतः श्रीदत्तमहाराजांच्या गळयात घातली व धन्योद्गार काढून आशीर्वाद दिले.

---

# प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज
## यांचे चरणी आदरांजली

लेखक : प्रा. **गोविंद माधव पानसे**, सासवड

**संदर्भ**–प्रा. गो. म. पानसे यांचे अनेक लेख आपल्या त्रैमासिकातून पूर्वी सतत येत असत. वेदान्तासारखा अवघड विषय सोपा करून सांगणे हे त्यांचे वैशिष्टय ! आश्रमात अनेकदा प्रवचन सेवाही घडली आहे. त्यांच्या तात्त्विक दृष्टीला श्रीदत्तमहाराजांचे घडलेले दर्शन त्यांनी या लेखात सादर केले आहे.

– संपादक

अन्या वो' अन्यामवत्वन्यान्यस्या उपावत । ऋ १०.९७
ताः सर्वाः संविदाना इदं मे प्रावता वचः ॥१४॥
याः फलिनीर्या अफला अपुष्पा याश्च पुष्पिणीः ।
बृहस्पतिं प्रसूतास्ता नो' मुञ्चन्त्वंहसः ॥१५॥

प्रपितामह पू. श्री. भालचंद्र महाराज, पितामह पू. श्री. वक्रतुंड महाराज, पिताजी पू. श्री. धुंडीराज महाराज या श्रेष्ठ सत्पुरुषांनी तेजाळलेल्या कुलात, प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज माघ वद्य ६ शके १८३१ रोजी काही खास विशिष्ट कार्य यशस्वीपणाने करण्यासाठी व सामान्य जनांवर अनुग्रह करण्यासाठी या लोकी मानवी देह धारण करून प्रगट झाले. भारत वर्षाच्या उद्धाराकरिता आवश्यक असलेली उणीव भरून काढण्याकरिता "धर्मसंस्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार । झाले बहुत पुढे होणार । देणे ईश्वराचे ।" या समर्थांच्या वचनानुसार अवतारी पुरुष वरचेवर प्रगट होत असतात.

नियतीच्या ओघात असलेला जीव, त्या जीवाच्या सामर्थ्या-बाहेरची असलेली त्या काळाची गरज भागविण्याकरिता आविर्भूत

असलेला ईश्वरी चैतन्य व अवतारास आवश्यक असलेला तप करणारा कोणीतरी ऋषी, असे तीन घटक अवतारास कारणीभूत होतात. राम, कृष्ण इत्यादी अवतार देखील याच तीन घटकांमुळे झाले असा इतिहास आहे. मानवी जीवनाला अथवा संसाराला रंगभूमीची उपमा नेहमी देण्यात आली आहे. उपमेचे तत्त्व उघड आहे. दृष्ट व दृश्य घटनांचा जो साज असतो त्याचं मूळ अदृश्यात असते. दृश्य घटनांची सारी मूळ तयारी अदृश्यात होत असते. हे तत्त्व विवाद्य नाही व दुर्बोध नाही. प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराजांचे आजपर्यंतचे एकूण आचरण, योग, साधना व विहिताचार तसेच त्यांनी प्राप्त करून घेतलेली विद्या व विद्वत्ता या सर्वांचा साकल्याने विचार केला तर ते 'अवतारी' आहेत या विषयी मतभेद होण्याचे कारण नाही.

अवतार धरिता मानुषी। तयापरी रहाटावे। गुरुचरित्र.

याचा अर्थ असा की, नरदेह धारण केल्यावर देहाची असंपूर्णता जशी अनिवार्य, तशी मनाची असंपूर्णतादेखील अनिवार्य, म्हणून स्वीकारावी लागते. कोणी अवतारी पुरुष असो किंवा सिद्धपुरुष असो, जगातलं त्याचं जीवन मानुषभाव व सत्पुरुषभाव याच विविध मात्रांचं बहुरंग मिश्रणच असतं. आणि म्हणून अनाकलनीय व मानुषभावजन्य असंही पुष्कळसं मानवात असल्यामुळे दोन गोष्टींचा कस आपल्या पूर्वजांनी आपल्या हाती कायमचा देऊन ठेवला आहे. त्या गोष्टी म्हणजे एक शास्त्रप्रामाण्य व दुसरा ध्येयाचा स्वयंप्रकाश. माझ्यासारख्या अगदी सामान्य पामराला प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज यांचा सहवास प्रथम घडला तो १९४४ साली. त्यावेळी मी एम्. ए. चा अभ्यास करीत होतो. वेदांतशास्त्र शिकण्यासाठी शांकर मठ (पुणे) येथे रोज मी जात असे. तेथे प. पू. दत्तमहाराजांकडून श्रीरामानुजाचार्यांचे श्रीभाष्य व अद्वैतामोद हे दोन ग्रंथ त्यांचे जवळ बसून समजावून घेण्याचे भाग्य मला मिळाले. महाराजांसंबंधी वर जे मी लिहिले आहे ते अनुभवावरून लिहिले आहे. शास्त्रप्रामाण्य व ध्येयाचा स्वयंप्रकाश हे दोन विशेष त्यांच्या स्वभावात आहेत असे मला आढळून आले. हे विशेष अवतारी पुरुषांमध्ये असतात. जे अनाकलनीय आहे, जे मानवभावापन्न आहे ते जसेच्या तसे समंजसपणाने व तितिक्षेने घ्यायचं, शास्त्रशुद्ध अनुशासन असेल ते व जीवनाचं अंतिम

ध्येय जे असेल ते सदैव ध्यानात बाळगून डोळसपणाने मार्ग आक्रमायचा असा वैदिकांचा स्वभाव बनला. तोच स्वभाव प. पू. दत्तमहाराजांचा. आणि म्हणून अशा सत्पुरुषासंबंधी लिहिताना माझ्यासारख्या फाटक्या प्राध्यापकाला हाच दृष्टिकोण बाळगून वारंवार विचार करावा लागतो.

प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराजांचा परिचय व सहवास घडण्याचे भाग्य जसे मला लाभले तसेच आणखी एक भाग्य पण मला लाभले. ते म्हणजे ब्रह्मीभूत श्री गुळवणी महाराजांचा परिचय व अल्प सहवास. सोलापूरला ब्र. श्री गुळवणी महाराज श्री. रा. रा. वैद्य यांचेकडे उतरत असत. तेथे श्रीमहाराजांचे दर्शन अनेक वेळा घडले. डोळे व चेहरा नेहमी स्निग्ध असत. महाराज शिक्षक होते. विशेषतः लोक-शिक्षकाच्या ठिकाणी जे गुण असावे लागतात, ते दोन गुण महा-राजांच्या स्वभावात होते. ते दोन गुण म्हणजे दुसऱ्याच्या हिताचा कळवळा व अस्सल निरपेक्षपणा. दुसऱ्याच्या सुतळीचा तुकडा घेण्याची-सुद्धा त्यांना इच्छा नव्हती. एवढेच नव्हे तर 'भलं म्हणवून घेण्याची' ही इच्छा त्यांना नव्हती. अशा निरपेक्ष पुरुषाच्या वृत्ती सदैव मोकळ्या रहातात.

नसे गर्व अंगी सदा वीतरागी
क्षमा शांति भोगी दयादक्ष योगी।
नसे लोभ ना क्षोभ ना दैन्यवाणा।
इही लक्षणीं जाणिजे योगराणा॥

वृत्ती मोकळ्या राहिल्या की साक्षित्वावर चटकन आरूढ होता येते. श्रीगुळवणी महाराज या दर्जाचे योगिराज होते. त्यांच्या गादीवर बसलेले प. पू. दत्तमहाराज तो दर्जा संभाळीत आहेत. मानवी प्रबोधनाची घोडदौड जशी मानवी प्रयत्नाने होते तशीच, किंबहुना त्यापेक्षा जास्त होते ती उपासनेच्या बलाने. प. पू. दत्तमहाराजांची सर्वंकष विद्वत्ता त्यांच्या उपासनेचा परिपाकच होय यात मला तरी संशय नाही.

प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराजांना माघ वद्य ६ शके १९११ (१५-२-१९९० रोजी वयाची ८० वर्षे पूर्ण होत आहेत. प. पू. सौभाग्य श्रीसंपन्न सरस्वतीबाईंनी श्री क्षेत्र नृसिंहवाडी येथे तीव्र

तपश्चर्या केली, तसेच पिताश्री पू. धुंडीराज महाराजांनी अनेक व्रतानुष्ठाने केली. या केलेल्या तपाचा परिपाक प. पू. दत्तमहाराजांच्या रूपाने प्रकट झाला. या लेखाच्या प्रारंभी अवतार का व कसा होतो हे सांगताना तीन घटकांचा उल्लेख केला होता, त्यात 'तप' हा एक घटक नमूद केला होता.

आधुनिक दृष्टचा जुन्यातल्या जुन्या ऋग्वेद कालापासून सर्व ठिकाणी तपाचा जयजयकार केलेला आढळतो. सर्व घटना तपोमूलक आहेत. उत्पत्ति, स्थिति, प्रलय यांना 'तप' मूलभूत आहे ही वैदिक धारणा आहे. ते वैदिक प्रमेय आहे. विश्व नियमबद्ध आहे. ज्या काही घटना घडतात त्या योजनाबद्ध असतात. या तपोमूलकतेचं तत्त्व समूळ जाणून तदनुसार कायावाचामन आटवणारा जीव हा ऋषी किंवा तपस्वी. प. पू. दत्तमहाराजांच्या जीवनाकडे डोळसपणे व जाणतेपणानं पहावयाचे झाल्यास वरील प्रमेय डोळ्यासमोर माझ्या सारख्याने नेहमी ठेवावा, हेच माझ्या कल्याणाला कारणीभूत राहील अशी माझी श्रद्धा आहे.

प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराजांना सपत्नीक सपरिवार दीर्घायु, आरोग्य, ऐश्वर्य परमेश्वराने द्यावे ही ईशचरणी नम्र प्रार्थना.

अखण्डं मण्डलाकारं व्याप्तं येन चराचरम् ।
तत्पदं दर्शितं येन तस्मै श्रीगुरवे नमः ।।
समानीव आकूतिः समाना हृदयानि वः ।
समानमस्तु वो मनो यथा वः सुसहासति ।।
।।।। ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।।

* * *

# ॐ नमो भगवते वासुदेवाय

लेखक : प्रा. गोपाळराव शंकरराव जोशी
श्रीशिवाजी महाविद्यालय, बार्शी

संदर्भ – प्रा. गोपाळराव हे पू. श्री दत्तमह,राज यांचे टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील विद्यार्थी. त्यांच्या या आठवणीवजा लेखातून त्यांचे भाव व श्रीदत्तमहाराजांचे गुणदर्शन आपणास होत आहे.

– संपादक

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या 'बाल मुकुंद संस्कृत महाविद्यालयात' अध्ययनासाठी राहिलो असताना केसरीतून कै. ज. स. करंदीकर (संपादक केसरी) यांनी एक निवेदन प्रसिद्ध केले. 'दशावतार स्तुतीत पुराणात बुद्धांचा उल्लेख कुठे आला आहे?' पाठ संपल्यानंतर ब्रह्मश्री दत्तमहाराजांना मी प्रश्न विचारला तेव्हा त्यांनी तात्काळ सांगितले की श्रीमद्भागवताच्या दशमस्कंधात पूर्वार्धामध्ये ४० व्या अध्यायात अक्रूर स्तुतीत 'नमोबुद्धाय शुद्धाय' असा उल्लेख आला आहे. मी केसरीला पत्राने कळविले. ते पत्रही माझे नावे प्रसिद्ध झाले. 'तेवढेच ज्ञानप्रकाशात' या दिवाकरांच्या नाटचछटेप्रमाणे केसरीत माझे नाव पाहून मला किती आनंद झाला म्हणून सांगू ?

अमरापूरच्या दत्तमंदिरात वयाच्या १६ व्या वर्षापासून श्रीमद्भागवत–पारायणाचा परिपाठ परमपूज्य महाराजांनी चालू ठेवला आहे. त्यावेळी (औरवाडला) म्हणजे अमरापूरला नृसिह वाडीतून नावेतून जावे लागे. त्या पारायणकाळात आलेले टपालदेखील कधी पू. महाराजांनी फोडून वाचले नाही. असा मनाचा दृढ संकल्प पाहून आम्हा विद्यार्थ्यांना आश्चर्य वाटत असे. परमेश्वरावरील दृढ निष्ठाच आपले सर्व काही साध्य करून देण्यास पुरेशी समर्थ आहे असे स्वानुभवावरूनच प्रवचनात सांगतात.

टि. म. विद्यापीठात शिकत असतानाच गांधीवध–अभियोगातून

निष्कलंक म्हणून बेळगाव जवळच्या हिंडलगा तुरुंगातून कै. स्वातंत्र्य-वीर सावरकर यांची सुटका झाली. ते मुंबईला परतताना पुणे स्टेशनवर आम्ही विद्यार्थ्यांनी पुष्पहार घालून पुणे स्थानकावर त्यांचे स्वागत केले. टि. म. वि. चे कार्य काँग्रेसच्या धोरणाप्रमाणे चालणारे होते. केवळ स्वागत करूनच थांबलो नाहीत तर ते वृत्त सिद्धहस्त पत्रकार पं. वसंतराव गाडगीळ यांनी वृत्तपत्रास प्रसिद्धीस दिले. हे वाचून त्या वेळच्या कार्यवाहांनी 'क्षमा–याचना तरी करा अन्यथा वसतिगृह सोडून बाहेर चालू लागा.' असे म्हटल्यावर आम्ही सर्वजण गडबडलो. कुठे कुठे जायचे याचा विचारविनिमय जोरात चालू झाला. त्यावेळी ब्रह्मश्री दत्त-महाराजांनी मध्यस्थी करून हा कलह सामोपचाराने मिटविला. समन्वय, तत्त्व, साम हा महाभारतातला सर्वोत्तम उपाय पू. महाराजांनी सुचवून सर्वांच्या मनातील किल्मिष दूर करून सर्व विद्यार्थ्यांच्या वरचे संकट टळले. असा हा अविस्मरणीय प्रसंग डोळ्यांसमोर उभा राहिला की साक्षात् महाराज समोर दिसू लागतात.

"आई मेली बाप गेला" अशी अवस्था माझी झाली. त्यामुळे विद्यापीठातील शिक्षण सोडून मला माझ्या गावी परतावे लागले. महा-राजांना जाताना काय करू? असे विचारता त्यांनी १२ अध्याय रोज श्रीमद् भागवत वाचायला सांगितले. सर्वात धाकटा भाऊ श्रीकृष्ण यास मांडीवर घेऊन हा क्रम चालू केला. उत्तम संहिता वाचतो म्हणून महा-भागवत श्री चिंतामणिशास्त्री दातार यांनी स्थापन केलेल्या भागवत–पीठावर निपाणी ता. चिकोडी जि. बेळगाव या गावी कै. अश्वत्थामभटजी यरनाळकर यांचे वाड्यात जन्माष्टमी सप्ताहानिमित्त संहिता वाचन करू लागलो. प्राथमिक व माध्यमिक या शाळांमध्ये अध्यापन करताना हा नियम चुकविला नाही. नुकत्याच इचलकरंजी येथे गायत्रीभवनांत झालेल्या सप्ताहात प. पू. श्री चिंतामणिशास्त्री दातार यांनी स्वहस्ते लिहिलेली श्रीमद् भागवताची पोथी ब्रह्मश्री दत्तमहाराजांच्या स्वाधीन करण्यात आली. खरे म्हटले तर हा चिंतामणीच लाभला म्हटले पाहिजे. या पीठांवर संहिता वाचण्याचा योग दत्तमहाराजांच्या मार्गदर्शनानेच लाभला. परिणामतः प्राथमिक व माध्यमिक या दोन्ही पायऱ्यांनंतर मला महाविद्यालयांत प्राध्यापक म्हणून कार्य करण्याची संधी यामुळेच

लाभली. बचत–बँकेत ठेव साठवावी त्याप्रमाणे हे १२ अध्याय पुण्य-संचय करतात असा माझा ठाम विश्वास आहे.

भगवंत–प्रिय दत्तमहाराज यांचा बार्शीवर खूपच लोभ आहे. प. पू. कै. गुळवणी महाराजांची ही कर्मभूमीच ! या भागात महाराजांचा संचार असला की सर्व प्रथम भगवंत–दर्शन ! हा परिपाठ आजही चालू आहे. कै. पं. व्याकरणरत्न लक्ष्मणशास्त्री मुरगूडकर यांच्या स्नुषा कै. डॉ. प्रभावती राजाराम जोशी या माझ्या वहिनी, बार्शीच्या श्रीशिवाजी महाविद्यालयात संस्कृत विभागाच्या प्रमुख म्हणून काम पहात होत्या. त्याचवेळी आमचे गुरुपुत्र डॉ. रा. ल. जोशी सोलापूरच्या संगमेश्वर महाविद्यालयात सं. वि. प्रमुख होते व आजही तिथे आहेत. ब्रह्मश्री दत्तमहाराजांच्या मुखातून वेदस्तुती ऐकावी असा एक संकल्प होता तो महाराजांच्या बार्शी मुक्कामात पार पडला. वेदस्तुती झाल्यावर श्रीमद् भागवताची पोथी मी घेऊन चाललो तेव्हा महाराज म्हणाले, अहो तुम्ही प्राध्यापक–लोक तुम्हाला काय म्हणतील ? आम्ही म्हटले याच श्रीमद् भागवताने आम्हाला बार्शीच्या कॉलेजात भगवंतापुढे आणून पुंडलिका-प्रमाणे उभे केले आहे! माणगावच्या मठामध्ये प. प. वासुदेवानंद सरस्वतींच्या समोर पू. दत्तमहाराजांना इचलकरंजीच्या सप्ताहाचे निमंत्रण भर सभेत देताना महाराज फक्त स्वामींच्या मूर्तीकडे पहात होते ! मंतरलेल्या माणगावच्या मंदिरात केलेल्या सकल्पाने गायत्री–भवनच विना सायास व कपर्दिकेची अपेक्षा न करता सप्ताहासाठी उपलब्ध करून दिले हाच ॐनमो भागवते वासुदेवाय–या मंत्राचा प्रभाव अनुभवायला मिळाला.

गायत्री भवनाचे विश्वस्त मा. सत्यनारायणजी ओझा ॲडव्होकेट यांचेकडे भेटीला गेलो असताना त्यांनी विचारले, कुणाचा सप्ताह आहे? ब्रह्मश्री दत्तमहाराजांचे नाव सांगताना ते गहिवरून आले. प्राप्तिकराचे बाबतीत विख्यात असणारे सत्यनारायणजी ओझा म्हणाले, मी माझ्या आईबडिलांना अमरापूरला (औरवाड) दोन वर्षापूर्वी झालेल्या सप्ताहाला मोटार कारने रोज सकाळी नेऊन सायंकाळी परत आणत असे ! श्रावण बाळाप्रमाणे ही मातृपितृसेवा करणारे वकीलसाहेब काहीसे अंतर्मुख होऊन उद्गारले ! "माझे वडील मराठवाड्यात रामायणातल्या

कार्यक्रमात रामकथा ऐकतांनाच त्यानी राम म्हटले ! त्यांचा मिरज ते पंढरपूर पायी कार्तिकी वारीला जाण्याचा नियम असे !" यंदा त्यांच्या साध्वी मातेने असा हट्ट धरला की ज्या दिवशी मिरजेची दिंडी पंढरीस पोचते त्याच दिवशी मला पंढरपूरला घेऊन चल ! अशा मातृपितृ-भक्तासाठीच पुंडलिकाभेटी परब्रह्म आले गा ! अशा अनंत श्रावण बाळांची दत्तमहाराजांवर असीम निष्ठा आहे.

सदाचार, धर्मनिष्ठा व काही त्याप्रीत्यर्थ अनुष्ठान घडावे असा महाराजांचा उपदेश असतो. उपदेशच करून ते थांबत नाहीत तर इचल-करंजीच्या सप्ताहाचा समारोप करताना या सर्व मंडळींनी गेली ३।४ वर्षे आम्हालाही आपल्यामध्ये समाविष्ट करून घेतले आहे. महा-राजांच्या दर्शनाचा तरी लाभ होईल का ? असे म्हणून धडपडणारे आम्ही महाराजांच्या सहवासात साखरेमहाराजांच्या आश्रमात अमृताहून अधिक गोडी चाखली. मंतरलेल्या माणगावात संजीवनीचा आनंद अनुभवला. इचलकरंजीच्या गायत्रीभवनात गोवर्धनाच्या छायेत सर्व गोपगोपी दंग झाले त्याचा अनुभव घेतला. चालू साली महाराजांची सहस्रचंद्रदर्शन (शांति) समारोह आहे.

या निमित्ताने – आकल्प आयुष्य व्हावे तया कुळा, माझिया भाविका विष्णुदासा – ही प्रार्थना गोपालचरणी करून ही भगवत्सेवा सद्‌गुरुचरणी सर्मपित करतो.

* * *

---

## एक आठवण

पू. श्रीनारायणमहाराज (केडगाव) हे बेंगळूर येथे अतिरुद्र स्वाहाकारासाठी गेले होते. बरोबर फार मोठा शिष्य परिवार होता. या अतिरुद्रासाठी पू. श्रीदत्तमहाराजही गेले होते. या प्रसंगी पू. श्रीनारायण महाराजांचे देहावसान झाले. सर्व संभ्रमात पडले, आता और्ध्वदेहिक कुठे करावे ? केडगाव का बेंगळूर ? तेव्हा पू. श्रीदत्तमहाराजांनी सर्वांना शास्त्राप्रमाणे निश्चित मार्गदर्शन करून नि:शंक केले व पू. श्रीनारायण महाराजांचे और्ध्वदेहिक बेंगळूर येथे झाले.

---

# साधकांचा अक्षय्य वटवृक्ष

लेखक : डॉ. प्र. ना. दीक्षित, फलटण.

संदर्भ : प्रा. डॉ. प्र. ना. दीक्षित हे पू. श्रीगुळवणी महाराजांचे अनुगृहीत. फलटणच्या कॉलेजमध्ये प्राध्यापक. प. पू. श्रीदत्तमहाराजांच्यावर अनन्य श्रद्धा असलेले गुरुभक्त. त्यांनी आपल्या डोळस अनुभूतीने आपणा सर्वांना पू. श्रीदत्तमहाराजांचे विराटदर्शन या लेखातून घडविले आहे. लेखाला नावही विराट अक्षय्यवृक्ष दिले आहे.

—संपादक

प्रातःस्मरणीय, पूज्यपाद, परमभागवत, श्री दत्तमहाराज कवीश्वर यांच्या विलोभनीय अद्‌भुत व्यक्तित्त्वाचा सुगंध जितका सुखद तितकाच विस्मित करणारा आहे. मीमांसादि षड्‌दर्शनांना ज्यांनी लीलया आपलेसे केले, विविध आचार्यांच्या भाष्यांचे रहस्य ज्यांनी सहज ओळखले, पंचदशीसारख्या ग्रंथांशी ज्यांचे सख्यत्व आहे, सुखनिद्रेत असतानाही संस्कृत भाषा ही ज्यांना मातृभाषेसारखी वाटावी, श्रीमद् शंकराचार्यांनी ज्यांच्या विद्वत्तेचा गौरव करावा, राष्ट्रपतींनी ज्यांना विद्यावाचस्पती म्हणून संबोधावे असा हा विद्वत्तेचा महामेरू बोलण्यामध्ये प्रासादिक, वागण्यात प्रेमळ, अंतःकरणाचा निर्मळ आणि वृत्तीने परमकारूणिक असावा ही घटना खरोखरीच ईश्वरी योजना आहे. हे व्यक्तित्व ही ईश्वरनिर्मित अद्‌भुत घटना आहे !

पूजनीय श्रीदत्तमहाराजांनी जे अध्यापन केले, लेखन केले, संपादन, प्रवचन, निरूपण केले त्या सर्वांचा परामर्श घेणे हे या लेखाचे प्रयोजन नाही, किंबहुना तसा परामर्श घेण्यास त्यांच्या तोडीची जी विद्वता असावी लागते तीही या लेखकाच्या ठायी नाही. समुद्राचा तळ गाठणे शक्य नसलेल्या व्यक्तीलाही काठाकाठाने विहार करून सागराच्या अगाधतेची कल्पना करता येते त्याप्रमाणे श्रीकवीश्वर

महाराजांच्या ज्ञानोदधीचे अवलोकन करणे शक्य आहे. परंतु या ‘ विद्यारण्यात ’ दाखल झालेला हा विद्वद्वर तेथील ‘ स्वामी ’ कसा झाला हे पाहणे मला अधिक कुतूहलाचे वाटते. त्यांच्या ठिकाणी प्रापंचिकाचा साधेपणा आहे पण संन्याशाची विरक्तता आहे, ते वाचस्पति आहेत पण वाच्यता मात्र कसलीच नाही ! अगदी जगावेगळी, मुलखावेगळी ही गोष्ट आहे ! किंबहुना हाच खराखुरा पुरुषार्थ येथे अमानित्वाने विराजित झालेला आहे.

## मुलखावेगळे मिश्रण !

साधुत्व आणि विद्वत्त्व एक्या ठायी नांदणे, दोहोंचा परमोत्कर्ष होणे ही अगदी एखाद्या कल्पित कादंबरीत शोभावी अशीच व्यक्तिरेखा आज श्रीदत्तगुरूंच्या रूपाने आपणास प्रत्यक्ष पाहण्यास मिळत आहे. एरवी सामान्यतः विद्वत्ता आणि साधुता या गोष्टी एका ठिकाणी सहसा असू शकत नाहीत. सामान्य माणसाला अल्प स्वल्प जरी ज्ञान झाले तरी त्याची अस्मिता जागी होते, ज्ञान आहे याचे त्याला सतत भान राहते. जेथे ज्ञानाचे भान असते तेथे फळाकडे ध्यान असते, जेथे फळ असते तेथे आसक्ती आधीच वाट पाहत असते, अशी आसक्ती असलेल्या घरट्यात विरक्तीचा चुकूनही रिघाव नसतो. मग तेथे साधुता तरी यावी कशी !

ज्ञान आणि विद्वत्ता या संकल्पनांचा व्यवहारात नेहमीच घोळ असतो. विद्वान म्हणजेच ज्ञानी, ज्ञानी म्हणजेच पण्डित ! पण्डित, विद्वान हे आचार्यही होऊ शकतात. पण ‘ विद्वद्‌जडा परमार्थी अधिकारू नाही ’ किंबहुना ‘ आचार्यां नरक ’ असे एका प्राचीन साधूने निक्षून सांगितले आहे. फार काय श्रीज्ञानेश्वर माऊलींनी ‘ एथ व्युत्पत्ति अवघी अप्रमाण ’ असे ठामेठोकपणे सांगितलेले आहे. शास्त्राध्ययन केलेले, शास्त्रचर्चा करणारे, शास्त्रशरण असणारे जे विद्वान त्यांनाच व्यवहारात शास्त्री, पण्डित असे समजले जाते. आश्चर्य असे की व्यवहारात असे अनेक ज्ञानी अध्यापक विद्वान असतात पण ते साधू नसल्याचे आढळतात. साधुत्व दूर पण सज्जनत्त्वही त्यांच्या ठायी दुर्मिळ असते. विद्वत्ता असणे म्हणजे माहितीचा संग्रह असणे. श्रीदत्तमहाराज म्हणजे तर चालता

बोलता ज्ञानकोशच होय, वैदिक संदर्भ असो, पुराणांतर्गत आख्यान असो, श्रुतिस्मृतींमधील वचन असो वा व्याकरणिकांची समस्या असो, कोणत्याही गोष्टीचा संदर्भ तात्काल त्यांच्या मुखातून जिज्ञासूंनी जाणून घ्यावा. प्राचीन भारतीय संस्कृतीचा जणू जिवंत वारसा म्हणजे श्रीदत्तमहाराज कवीश्वर. केवळ एवढी विद्वत्ता हीसुद्धा व्यक्तीच्या महनीयतेला पुरेशी असते हेही खरे आहे. पण अशा नुसत्या तर्कतीर्थाला, वा वेदान्ततीर्थाला कोणीही शरण जाणार नाही. परंतु श्री. कवीश्वर-महाराज हे तीर्थराज असल्याने प्रातःस्मरणीय ठरलेले आहेत. कोणताही ग्रंथ असो, शास्त्र असो वा शास्त्री असो, त्याच्याजवळ ज्ञानात्मक वचनांचा वा माहितीचा प्रचंड साठा असू शकतो, पण ज्ञान असेलच असे नाही. किंबहुना जगातील कोणत्याही धर्मग्रंथात ज्ञानाचा संकेत करणारी वचने आहेत, प्रत्यक्ष ज्ञान देऊ शकणारी अशी शक्ती त्या ग्रंथातील पामर शब्दात असणार कशी ? म्हणूनच तर तथाकथित ज्ञानी हे खऱ्या ज्ञानापासून दूर असण्याची शक्यता अधिक असते. ' वेदांताचा तो अर्थ ' फक्त संतांना समजतो, साधूंना उमगतो. श्रीदत्तमहाराज शब्दज्ञानी तर आहेतच आहेत पण ते खरेखुरे ज्ञानी असल्यानेच संत आहेत, साधू आहेत !

## शब्दज्ञान हे ज्ञानच नव्हे !

ऐहिक जीवनाला, आधिभौतिक उन्नतीला शास्त्रज्ञान हे आवश्यक असते हे खरेच आहे. ही ज्ञानसंपदा हाही एक पुरुषार्थ आहे. पण ' सत्य ' दर्शन घडवण्याचे अंतिम उद्दिष्ट हे शब्दांना न झेपणारे, बुद्धीला न पेलणारे असल्याने बुद्धीच्या मार्गाने मिळणारे समस्त लौकिकज्ञान हे त्यादृष्टीने ज्ञान तर राहात नाही उलट ती एक उपाधी होऊन बसते ! पंचदशीसारखा वेदान्त ग्रंथ असो वा उत्तरमीमांसेवरील (ब्रह्मसूत्रावरील) भाष्य असो, त्यामध्ये वस्तूची माहिती आहे, त्यावर चर्चा आहे, त्या चर्चेला तर्काचा आधारही कधी कधी घेतलेला असेल, त्या चर्चेत बुद्धीची कुशाग्रता कल्पनेची तरलता, शब्दांची समृद्धता ही सर्व काही दिसतील. अशी सर्व शास्त्रे वर्षानुवर्षे शिकविणारे अध्यापक या भरतभूमीत अनेक पाठशाळांमध्ये शतकानुशतके आहेत. पण ही शास्त्रे ज्या ' वस्तूचा '

इशारा करून मौनावतात ती वस्तू मात्र पाठशाळेत न सापडता कधी कधी एखाद्या निरक्षर वैष्णवाच्या रूपाने सापडत असते. श्रीदत्त-महाराजांना श्री. दीक्षितस्वामींच्या कृपेने, श्रीमत्वासुदेवानंदांच्या परंपरेने, मातापित्यांच्या भाग्याने ही वस्तू आधी बालवयात मिळाली व नंतर मग शब्दज्ञानाची प्रभावळ प्राप्त झालेली आहे हे खरे रहस्य आहे !

## वाद नको, संवाद हवा

निरनिराळ्या पाठशाळांत आणि निरनिराळ्या पीठांत दर्शन-शास्त्रे शिकविली जातात. जीव, जगत् नि परमात्मा यांचे स्वरूप आहे तरी कसे, त्यांचे एकमेकांशी नाते कोणते, या तिघांपैकी म्हणजे जीव, जगत् व परमात्मा यांपैकी सत्य व नित्य कोण ? अशी निरनिराळी प्रमेये प्रत्येक शास्त्रात वा दर्शनात निरनिराळ्या रीतींनी सांगितली जातात. प्रत्येकात तथ्य तर असतेच असते पण प्रत्येकाचे मत मात्र निराळे दिसते. अध्ययन करणाऱ्या बुद्धीलाही नकळत अभिनिवेश येतो. तोच पुढे वाढतो, मग त्याला तर्काची सोबत रुचकर होते, पाण्डित्याची मदत पोषक ठरते, आपले मत खरे ठरण्यासाठी दुसरे मत खोडणे हेही महत्त्वाचे ठरते. पण ह्या सर्व तयारीत 'मी' हा नकळत पुष्ट होतो व 'तो' रुष्ट होत जातो ! ज्ञानाइतकेच किंबहुना अधिक महत्त्व जाण-णाऱ्याला येत जाते. जोपर्यंत जाणणारा शिल्लक असतो तोपर्यंत ज्ञान तरी व्हावे कसे ! याकारणानेच पाण्डित्य व साधुता यांचा एकत्र सहवास हा दुर्मिळ ठरत असतो. पाण्डित्य आले की वाद महत्त्वाचे ठरतात. कोणाचा अद्वैत, कोणाचा द्वैताद्वैत, कोणाचा योग तर कोणाची भक्ती, कोणाचा शिव तर कोणाचा विष्णू ! हे सारे वाद शास्त्रीय पातळीवर महत्त्व पावतात पण त्यातून संवाद फलित होत नाहीत. श्रीदत्तमहाराज हे वादपटू आहेत, स्वमतसिद्धयर्थ ते उत्कृष्ट वाद करू शकतात, त्यांनी वादकौशल्यातच श्रीशृंगेरीपीठाच्या आचार्यांकडून पारितोषिक मिळविले; परंतु वादापेक्षा आत्मसंवाद हा त्यांनी अधिक आत्मसात केलेला अस-ल्याने त्यांची वाङ्मयीन सेवा अमाप असूनही कोठेही घटपटादि चर्चेने त्यांच्या वाङ्मयाची जागा अडवलेली नाही. ज्ञान होऊ इच्छिणारा–

जिज्ञासा असलेला अभ्यासक स्वतःच ज्ञानरूप झाला की ज्या प्रसन्न मौनात सदासर्वकाळ राहातो ती अवस्था येथे पाहण्यास मिळते.

## भागवते बुद्धिमतां परीक्षा ।

श्रीव्यासरचित महापुराण श्रीमद्भागवत हा ग्रंथ जितका मधुर आहे तितकाच पण्डितांची कसोटी घेणारा अलौकिक ग्रंथ आहे. त्या ग्रंथाचे वाचन (संहिता–वाचन) निर्दोषपणे करणे हे सुद्धा सामान्याचे काम नव्हे. ते बालपणी श्रीदत्तमहाराज यांनी श्रीकृपेने सहजपणे केलेले होते. संस्कृत भाषेचे सारे प्रौढत्व त्या ग्रंथातील शब्दाशब्दांत घनीभूत झालेले आहे. काव्यशास्त्र, व्याकरणशास्त्र आणि वेदान्तशास्त्र यांची ज्यांना जाण नाही त्यांना या ग्रंथातील आशय समजणे हे अत्यंत दुष्कर आहे. आशय काही कळावा यासाठी जुन्या काळात संस्कृतातच टीका लिहिल्या जात. नीलकंठी ही अशीच एक प्रसिद्ध व सुंदर टीका भागवतावर आहे. पण ही टीकासुद्धा समजावयाची तर ती प्राणकंठी ठरावी इतके प्रौढत्व या ग्रंथास आहे. पण श्रीदत्तमहाराज हे जेव्हा भागवतावर निरूपण करू लागतात तेव्हा श्रीशारदा प्रसन्न असल्याचा प्रत्यय त्यांच्या प्रासदिक वाणीतून येऊ लागतो. श्वासोच्छ्वासही प्रबंध व्हावेत अशी व्युत्पन्नता असलेल्या श्रीदत्तमहाराजांच्या मुखातून स्रवणारी अमृतवाहिनी हरिद्वारच्या गंगेसारखी स्वच्छ, प्रसन्न व शीतल असते. हरिचरणाचा पावन स्पर्श जिला झाला अशीच ती गंगा !

## ज्ञानगंगा हीच भावसुधा

श्रीमद्भागवत हे महापुराण हा नुसता ज्ञानाचा साठा नाही. ते भक्तीचे माहेर आहे, प्रेमाचे निधान आहे. चिद्वस्तूचे वसतिगृह आहे.

श्रीदत्तमहाराजांच्या बालवयात श्रीक्षेत्रवाडीत श्रीगणेश श्रीदत्तगुरूंच्या सानिध्यात त्यांच्या हाती पहिला ग्रंथ आला तो श्रीमद्भागवत हा होय ! इतर सर्व शास्त्रे आली ती नंतर आली. त्यामुळे जे ज्ञान प्राप्त झाले ते साक्षात ज्ञान प्राप्त झाले. ते शब्दांच्या भिंतींशी थबकले नाही. त्यातून एक व्यक्तिमत्व घडले. हे व्यक्तित्व आहे ते ज्ञानी भक्ताचे !

# जेणे अंतर पालटे ते ज्ञान !

ज्ञान असो की वैराग्य असो, ते असण्यापेक्षा आहे असे दाखवावे, थोडेसे असेल तर ते मिरवावे, हा जीवाचा एक विकार आहे. ज्ञान व वैराग्य ही मिरवण्याची गोष्ट नाही हे ज्यांना कळत नसेल त्यांना ज्ञान आहे असे म्हणता येत नाही. ज्ञानच नव्हे तर प्रेम ही सुद्धा मिरवण्याची किंवा दाखवण्याची गोष्ट नसते. कथाप्रसंगी वक्त्याचा कंठ सद्‌गदित होणे हे प्रेमभावाचे एक लक्षण आहे. हा अमृतानुभव श्रीदत्तमहाराजांच्या कथानिरूपणात कित्येक श्रोत्यांना आलेला आहे. पण त्या मधुर भावनेचेही भडक दर्शन किंवा भावनांचाही भडकपणा त्यांच्या उक्तीत अथवा कृतीत चुकूनही आढळत नाही. भक्त जेव्हा ज्ञानी होतो तेव्हा तो असा एकान्तभक्त होतो. ज्ञानी भक्ताचा वस्तुपाठ म्हणजेच, श्रीदत्तमहाराज हे व्यक्तित्व होय. भव्य, व्यापक, चैतन्यवस्तूचा स्पर्श ज्या जिवाला होतो त्याचे मीपण हे एखाद्या पिकलेल्या फळासारखे केव्हाच गळून गेलेले असावे, त्याचप्रमाणे राष्ट्रीय कीर्तिप्राप्त पंडित असणाऱ्या श्रीदत्त-महाराजांमध्ये मीपणाचा लवलेशही उरलेला आढळत नाही. अमानित्व या पदाचा अर्थ जर कोठे शोधायचा असेल तर त्याला या महान व्यक्तीच्या घराचीच वाट शोधावी लागेल.

आचार्यपद लाभलेला हा महापुरुष आहे. श्री. कवीश्वर आणि श्रीगुळवणी या दोन पीठांचे आचार्यपद लाभलेला हा नृसिंह आहे. पण 'कारुण्यामाजि चाले लपवित पाऊले' असे त्यांचे वर्तन आहे. दुसऱ्याच्या ठिकाणचे कणाएवढे सद्‌गुणही मोठ्या उदारतेने पाहू शकणारा हा महात्मा अत्यंत सुजनतेने प्रेमाने व सहानुभूतीने सर्वांशी वागतो की इतरांनीही नतमस्तक सहज प्रेमाने व्हावे. स्वतःकडे आचार्यपद येऊनही 'देहपातानंतर श्रीगुरु आता सर्वच साधकांच्या रूपाने विराजमान झालेले आहेत' अशा सच्च्या जाणीवेने ते इतर समस्त साधकांशीही मोठ्या लीनतेने नम्रतेने राहू शकतात ! छे छे, तोच त्यांचा स्व–भाव आहे ! कसलाही बडेजाव नाही, कोणतीही उग्रता नाही, दर्प नाही, नम्रता इतकी, की ही कोणी थोर व्यक्ती आहे याचा स्वतःलाही पत्ता असू नये. कोणालाही शब्दानेसुद्धा न दुखवता आपल्या विहित मार्गाने चालणारा

द्रष्टा महात्मा म्हणजे श्रीदत्तमहाराज कवीश्वर ! एखाद्या अपरिचित नवख्या व्यक्तीने ही स्वारी कधी जर प्रथमच पाहिली तर तो हटकून फसेल ! पोटापाण्यासाठी यजमानकृत्य करणाऱ्या एका गुरुजींपैकी हा एक गरीब असावा असा भाव प्रथमभेटीत निर्माण व्हावा असे हे व्यक्तित्व ! पण या भटजी दिसणाऱ्या, भटजीचाच आचारधर्म मोठ्या प्रेमाने श्रद्धेने आणि अभिमानाने आचरणाऱ्या या वैदिकाच्या अंतरंगात विमल असे सत्यदर्शन नांदत आहे हे नवख्या व नेणत्या माणसास चुकूनही कळणार नाही. अमानित्वा, तुझेच रे नाव दत्तात्रय धुंडिराज कवीश्वर !

कमालीचे साधेपणा हा सत्य–स्पर्शातून आलेला आहे. ही नम्रता दुबळ्याची नाही, आणि मूढाची पण नव्हे ! येथे नम्रता ही निर्भयतेची जुळी बहिण आहे. नम्रतेची बहीण निर्भयता हीसुद्धा तिला सोडून कधी राहात नाही. जेव्हा श्रीगुरूंच्या दर्शनाची ओढ अनावर झाली होती तेव्हा लहानगा दत्तू–बाळ दुथडी भरून वाहणाऱ्या तग्रवग्र झालेल्या झंझावाती जलौघावर आरूढ झाल्याची कथा सर्वश्रुत आहेच. ही झाली लहानपणची कथा. पण साठी ओलांडल्यानंतरही ही निर्भयता अनेक रूपांनी विकसित झालेली आहे. औरवाडच्या मठातील श्रीपादुका चोरण्याची लहर एका चोराला झाली होती. प्रसंग बाका होता, प्रकरण मारामारीपर्यंत पोहोचलेले होते. अशावेळी कशाचीही पर्वा न करता श्रीदत्तमहाराज यांनीच त्या पादुका चोराकडून हस्तगत केल्या व त्यांची योग्य ती व्यवस्था केली. प्रपंचातही भोवरे असतातच. देणे घेणे असतें, फसवणूक असते. अशा प्रसंगातूनही गृहस्थाश्रमी कवीश्वरांना जावे लागले. एरवी अत्यंत उदार व कशाचाही लोभ न धरणाऱ्या या महात्म्याने अशाच एका प्रसंगी सत्याचा पक्ष घेण्यासाठी पोलिसी सासुरवासालाही तोंड देऊन आपले सत्य सहज सिद्ध केले.

पारंपरिक शास्त्रांच्या अध्ययनातून आलेली व्युत्पन्नता, भागवत-साधनेने दिलेली प्रेमलक्षणा भक्ती, परंपरेने आलेली गुरुपरंपरा व त्या परंपरेचे गुरुत्व, योगिराज श्रीसद्‌गुरु वामनरावांकडून आलेले शक्तिपात सांप्रदायाचे योगसाम्राज्यविभव असा गुणसमुत्कर्ष असलेले हे व्यक्तित्व फलभाराने लदलेल्या वृक्षासारखे अत्यंत वाकलेले, नम्र झालेले, पण

समूहपणाने व डेरेदारपणाने आणि भव्यतेने सर्वांचे मन वेधून घेत आहे. श्रीगुरुकृपेने ही वृक्षछायाच आम्हा सर्व साधकांचे विश्रामधाम ठरलेलीं आहे. हाच तो अक्षय्य वटवृक्ष !

* * *

---

## चर्चेसाठी खंडनखंडखाद्य !

२५/३० वर्षापूर्वीची ही हकीगत आहे. कर्नाटकचे नवीन व्यंकटेश शास्त्री हे न्याय, मीमांसा, वेदांत, व्याकरण या चारही शास्त्रांत प्रकांड-प्रचंड विद्वान होते. त्यांचेपुढे कोणीही शास्त्रचर्चा करण्यास धजत नसत. या काळात ज्योतिष्पीठाधीश्वर श्रीरामचंद्र तीर्थस्वामी (भंडीगडीमठ) यांनी मद्रासमध्ये विद्वत् सभा बोलावली होती. या सभेसाठी चारही पीठातील विद्वान मंडळी आली होती. या सभेत नवीन व्यंकटेशशास्त्री आले होते. त्यांचेपुढे कोणीही टिकाव धरणारे नव्हते. धारवाडहून श्रीभालचंद्र शास्त्री आणि श्रीदत्तात्रेय शास्त्री गेले होते. या विद्वत् सभेला जाण्यापूर्वी श्रीदत्तमहाराजांनी अद्वैत सिद्धांतावरील महाक्लिष्ट अशा 'खंडनखंडखाद्य' ग्रंथाचा अभ्यास केला आणि त्यातील विषय सभेत नवीन व्यंकटेशशास्त्री यांचेपुढे मांडले. श्रीदत्तमहाराजांची ही अपूर्व तयारी–महाक्लिष्ट ग्रंथाचेही अध्ययन–क्लिष्ट विषय निवडीचे धाष्टर्य–विषय प्रतिपादनाचे मुग्ध करणारे प्रतिपादन इ. गुण पाहून नवीन व्यंकटेश शास्त्री श्रीदत्तमहाराजांचेवर अतीव प्रसन्न झाले आणि भरसभेत त्यांनी स्वतः श्रीदत्तमहाराजांची स्तुती आणि प्रशंसाही केली.

---

# रूप जयाचे मनबुद्धीपर वाचे अगोचरु ....! ! !

–" स्वस्तिश्री " अकलूज

**संदर्भ** – डॉ. श्री. कृ. जामदार हे सोलापूर जिल्ह्यातील अकलूजचे. पू. श्रीगुळवणीमहाराजांचे अनुगृहीत आणि पू. श्रीदत्तमहाराजांचे अनन्य भक्त. डॉक्टरांनी अकलूजला आपल्या मळ्यात श्रीसद्‌गुरूंचा आश्रम निर्माण केला. त्याला ‘ माऊली ’ नाव दिले. तेथे प. पू. श्रीदत्तमहाराजांचे अनेकदा जाणे होते. भागवत् सप्ताह होतात. साधक बंधूंनी या ‘ माऊली ’च्या चरणी एकदा तरी माथा टेकवून यावे अशी अंतर्बाह्य समर्थ वास्तु श्रीकृपेने डॉ. जामदार व त्यांचा परिवार यांचेकडून निर्माण करवून घेतली आहे. पू. श्रीदत्तमहाराजां-संबंधीचा डॉक्टरांचा लेख भावपूर्ण आहे.

– संपादक

पू. श्री. दत्तमहाराज, आपण त्यांना प्रेमाने दादाच म्हणू या ! साधुत्वाचं, सत्पुरुषत्वाचं, विद्वत्तेचं, प्रेमाचं, आपलेपणाचं निर्गुण निराकार स्वरूप दादांच्या ठिकाणी श्रीदत्तात्रेयांच्या नावाने प्रत्यक्ष साधारलंय, म्हणूनच की, काय कवि ‘ सुधांशु ’ च्या या काव्यपंक्ती दादांच्या ध्यान-मूर्तीबरोबर ओठावर येतात.

रूपजयाचे मनबुद्धीपर
वाचे अगोचरू ।
गुरुमहाराजगुरु
जयजयपरब्रह्मसद्‌गुरु ।।

दादांचं जीवन म्हणजे अखंड पवित्र गंगौघ आहे. कोणीकडूनही प्राशन करा अमृतमय, पवित्र ! त्यांच्यातील कोठल्या दिव्य दृष्य जीवन-मूल्यांना विशेषत्वाने चिंतनस्पर्श करावा म्हणून ठरविले तर मधुर द्राक्षघोसांनी लकडलेल्या द्राक्षवेलीवर एखाद्या बालकाची दृष्टी गेली

तर त्याची जशी अधाशी मनोवृत्ति होईल तद्वत माझी अवस्था होते व मनोमन मी म्हणतो– खरंच अजून मला दत्तमहाराज पूर्णपणे उमगलेलेच नाहीत. त्यांनी जोपासलेली जीवनमूल्ये आमची उपास्यदैवते आहेत हेच खरे !

दादांची जीवनगंगा म्हणजे पावनतेचा अथांग दर्या आहे, कोणीही यावं व तृप्त व्हावं ! व गाठी प्रेमच प्रेम घेऊन जावं ! शब्दांच्या पलीकडे असणारं हे रूप शब्दरूपाने साकार करणं बुद्धीच्या पलीकडचं आहे. तरीही " सर्व काही ते करवून घेतात. " या गंगौघातील भावाला त्यातीलच गंगाजलाने अर्घ्य देऊन, त्यांच्या चरणाशी 'सर्वभावे' लोटांगण घालून माझ्या भावना शब्दांकित करण्याचा बालप्रयत्न करतो.

(१) आपलं आणि दादांचं नातं जन्मजन्मांतरीच आहे, हा प्रत्यय क्षणोक्षणी येतो. श्रीसद्गुरु गुळवणी महाराज जरी मायमाऊली आहेत तरी मावशीच्या रूपांत आईपेक्षाही कांकणभर जास्त कृपादृष्टीचा तें वर्षाव करतात हे प्रसंगोपात्त प्रत्यही प्रचीतीस येते. मायमाऊलीबद्दल भीतियुक्त आदरप्रेम होते व आहे, पण या मायमावशीच्या मांडीवर सुपूर्द केलेली आम्ही लेकरं निसंदिग्ध निरागसतेने कृपाछायेखाली बागडतो.

(२) दादांचं स्थूल व सूक्ष्म स्वभावदर्शन घेतलं की, " दैवी संपदा " येथे साधारतेने नटली आहे हे जाणवतं व आपोआपच शरीर लोटांगण घेतं, मन श्रीगुरुभावात लीन होतं व हृदयभावना एक होतात. समुद्राची भरती जशी खाड्या भरतात तशी दादांच्या प्रत्येक शारीरिक, मानसिक, दृष्टिस्पर्शात " केवळ प्रेम, कल्याण व कृपेचा " परिपूर्ण आत्मानंद लाभतो.

(३) श्रीदत्तमहाराचांची दर्शनभेट म्हणजे त्रिविध तापानं पोळलेल्या आम्हा अज्ञ जीवांना सुखदथंड सावली वाटते. प्रथम सर्वांची खुशाली, विचारपूस कुशल विचारल्यावर मग आठवणींना उजाळा व शेवटी स्वस्तुती टाळून भेटावयास येणाऱ्याच्याच गुणांची प्रशंसा हें नित्याचे. काही वेळेस तर त्यांचे उद्गार अर्थगर्भ असतात. एकदा म्हणाले, " आम्ही जनसंपर्कात अपुरेच पडतो. " आणि मी आवाहनातील प्रतिनिधी संस्थांची ही लांबलचक यादी वाचली व दिङमूढ झालो.

केवढी प्रचंड उक्ती आहे हे सर्व साधणाऱ्याची. आसेतु हिमालय आपल्या मधुर पवित्र वाणीने पुनीत केलेल्या या थोर महात्म्याची योग्यता यथार्थ पटते.

(४) आमच्या आईच्या शांत स्वभावाची स्मृती अजूनही दादांच्या स्मृतीत ताजी आहे. त्याचे असे झाले. श्रीगुरुमाऊलीतील श्रीगणेशयागाच्या पूर्णाहुतीच्या निमित्ताने दादा औदुंबराखाली इतर सत्पुरुषांबरोबर होते. केळींची पऱ्हळ आणण्यास थोडा विलंब झाला. वडील जोरात रागावून ओरडले ! अरे लवकर आणा ! आई शांतपणे हळू म्हणाली–' पूर्णाहुती यज्ञाची वेळ आहे. शांततेने घ्या ! कोणावर रागावू नका ! ' आईच्या शांत स्वभावाची स्मृती दादा सतत सांगून तिची आठवण करून देतात.

(५) चार वर्षांपूर्वी श्रीदत्तमहाराजांचा श्रीगुरुचरित्र सप्ताह श्रीक्षेत्र कारंजा येथे होता. त्यानिमित्ताने आम्ही आठ दहा जणांनी शेगांव यात्रा, माहूर, कारंजा यात्रा केली. कारंजा येथे दादांचे दर्शन झाल्यावर त्यानी तेथील विश्वस्तांना आमची सोय करण्यास सांगितले व आमची अत्यंत आपुलकीने, महाप्रसादाची, दर्शनाची सर्व उत्तम सोय झाली. तेथील मुक्कामात सहज बोलण्यात श्रीगुरुभाव किती श्रेष्ठ असतो याची प्रचिती दिली. त्यांच्या संभाषणातील भावार्थ असा – ' प्रपंच व परमार्थ दोन नाही. परमार्थ जसा महाराजांचा तसं प्रपंचही महाराजांचा. दोन्ही महाराजांचे आहे हे ठरविल्यावर हे महाराजांचे व हे आपले असे होतच नाही. सर्व कांही महाराजांचेच आहे हे मानावे. ' किती उदात्त व शाश्वत दृष्टिकोण.

(६) श्री गुरुमाऊलीवर त्यांचे येणे, कृपादृष्टी असणे अनेक आठवणींना उजाळा आणून देते. ते श्रीगुरुमाऊलीच्या उद्‌घाटनापासून ते नित्य माधुकरी, अन्नदान सेवा शुभारंभापर्यंत जवळजवळ अनेकवेळा सप्ताहभर वास्तव्य करून होते. साधकांचे स्नेह–संमेलन, श्रीमद्‌भागवत सप्ताह (तीन), श्रीगणेशयाग, श्रीदत्तयाग, श्रीविष्णुयाग वगैरे अनेक निमित्ताने त्यांचे सान्निध्यात राहून त्यांच्या पूर्ण अमृतमयी कृपेचा लाभ अनेकांना मिळाला आहे. त्यांच्या अमृतमय पवित्र वाणीने श्रीमद्‌भागवत कथा ऐकणे हे भक्तांचे भाग्य व पर्वणी आहे. शांत, अर्थपूर्ण शब्दरचना, अभ्यासपूर्ण विवेचन, नर्मविनोद, सर्वस्पर्शी तत्त्वानुवाद हृदयात सुखद

अनुभूतीकंप निर्माण करतात.

(७) श्रीगुरुमाऊलीत सर्व साधकभक्तांनी तृतीय श्रीमत् भागवत सप्ताह श्रीगुरुमार्फत मागील वर्षी संपन्न केला. सप्ताहाची समाप्ती विष्णुयागाच्या महाप्रसादाने व पू. श्री. दत्तमहाराजांच्या पवित्र करकमलांनी झाली. पू. श्री. मामा देशपांडे, पू. डॉ. कारखानीस उर्फ भाईनाथ महाराज, पू. श्री. पागनीस सर, पू. श्री. माढेकर महाराज, पू. श्री. देहूकर महाराज, पू. श्री. माऊली महाराज अकोलीकर सर्वजण उपस्थित होते. वेदीजवळ श्रीविष्णुयागाच्या पूर्णाहुतीची तयारी चालू होती व एका खास सुशोभित व्यासपीठावर श्रीदत्तमहाराज संपन्न झाले. एकतीस सुवासिनींनी पू. दादांची पूजा करून साक्षात दत्तात्रेयस्वरूप दादांना प्रथम निरनिराळ्या एकतीस पदार्थांची माधुकरी दीक्षा प्रदान केली. तदनंतर पू. श्री दादांनी प्रथम सर्व उपस्थित सत्पुरुषांना, नंतर विश्वस्तांना, नंतर भक्तांना भीक्षा माधुकरी प्रदान करण्याचा समारंभ अत्यंत हृद्य, उत्साही व आनंदी वातावरणात संपन्न झाला ४ जुलै १९८८.

(८) पू. दादांचा पारमार्थिक अधिकार फार थोर आहे. प्रपंचात दक्ष राहून विश्वच माझा संसार मानणाऱ्या दादांची वृत्ती सतत अंतर्मुख असल्याचे प्रत्ययास येते. एकदा असे घडले—हृद्रोगाची पूर्व लक्षणे—धडधडणे वाढली, एक्टॉसिस्टोल्स निदान झाले. दादांनी सांगितलेल्या मंत्रजपाने त्याची परिणती उत्तम आरोग्यात झाली.

दादांकडून मंत्रदीक्षा मिळावी असे नेहमी वाटायचे पण संधी मिळाली नाही. तीही इच्छा त्यांनी इष्ट देवतेचा मंत्र देऊन पूर्ण केली. त्यातही मंत्र कागदावर लिहून दिला व शुचितेने जप करण्याचे सुचविले. दिलेला मंत्र श्रीगुरुमाऊलीत महाराजांपुढे ठेवा व मग सुरू करा असे सांगितले. केवढी महाराजांवर निष्ठा, जबरदस्त प्रेम. अहंकार मीपण अधिकार मिळूनही दिसत नाही. सर्व काही 'ते' घडवून घेतात यावर केवढी आत्मीयता !!! निष्ठा !!!

कारंजास आम्ही त्यांचा निरोप घेताना त्यांनी दोन्ही हातांनी दिलेला आशीर्वाद अजूनही स्मरतो. आमची गाडी दृष्टीआड होईतोपर्यंतच नव्हे तर सदोदित ते भक्तांवर असाच कृपेचा वर्षाव

करतात हा सर्व भक्तांचा त्यांच्याठायी असणारा स्थायी भक्तिभाव आहे.

त्यांना यानिमित्ताने उत्तम आयु व आरोग्य आम्हा भक्तांसाठी लाभावे व त्यांच्या कृपाछत्राखाली आमची साधना पूर्णपणे सिद्धीप्रत जावो हीच त्यांच्या चरणी विनम्र प्रार्थना.

* * *

---

## भाव–पुष्प

गुरु तुझे चरण
चुकवि जन्म मरण ॥ १ ॥
गुरु तुझे पाय
उड्या तुझ्या बळावर ॥ २ ॥
गुरु तुझे हात
लाभे कृपा छत्र ॥ ३ ॥
गुरु तुझे मन
सद्‌गुणांची खाण ॥४॥
गुरु तुझे नयन
प्रेम वात्सल्य भाव ॥ ५ ॥
गुरु तुझी संगत
देई सुविचार ॥ ६ ॥
गुरु तुझा आधार
करी जीवन उद्धार ॥ ७ ॥

–प. पु. सद्‌गुरु चरणी समर्पण,
सौ. आशा गुजर, औरंगाबाद

---

# ‘सौ. लक्ष्मीबाई’ आईसाहेब कवीश्वर

ले. सौ. हेमवती केरूर

**संदर्भ** – गुरुभगिनी सौ. हेमवतीताई म्हणजे डॉ. दि. ब. केरूर यांच्या पत्नी. या दंपतीला श्रीसद्गुरु गुळवणी महाराजांचा अनुग्रह लाभला. श्रीवासुदेव निवासावर अनन्य निष्ठा असलेले हे कुटुंब. सौ. केरूर याही पदवीधर आहेत. लेखनाची आवड आहे. त्यांची ही लेखसेवा श्रीचरणी रुजू होत आहे.

—संपादक

‘अहो भाग्यम् । साक्षात् पार्वतीपरमेश्वरौ । ’ श्रीदत्तमहाराजांच्या अमृतमहोत्सव प्रसंगी अध्यक्ष पं. श्रीनिवासशास्त्रींचे भाषण सुरू होते. आपल्या मनातलेच ते बोलत आहेत असे प्रत्येक श्रोत्याला वाटत होते.

मंचावर फुलांच्या छत्रीखाली अत्यंत विनम्रतेने बसलेले विद्यावाचस्पती विरागी दत्तमहाराज, शेजारी उजव्या हाताला नथ वगैरे आभूषणे ल्यायलेल्या, भरजरी शालू नेसलेल्या प्रसन्न तृप्त सौ. लक्ष्मीबाई. पाठीमागे श्रीगुळवणीमहाराज, श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराज, श्रीलोकनाथतीर्थस्वामीमहाराज, त्याशिवाय श्रीदत्त, श्रीतुळजा भवानी यांची रंगीत भव्य छायाचित्रे मनोमन आशीर्वाद देत असलेली. मंच फुलांच्या माळा, रंगीत पताका, विजेचे दिवे यांनी सजविलेला. समोर भक्तवृंद तटस्थ बसलेला. सत्कार समारंभात बोलला गेलेला प्रत्येक शब्द, प्रत्येक दृश्य मनात कोरून ठेवत असलेला. समोर स्वप्न सुरू आहे का सत्य आहे कळत नव्हते. दृष्ट काढायला आश्रमीय दोन भगिनी मंचावर आल्या तेव्हा आमचे डोळे कौतुकाने तर सौ. लक्ष्मीबाईंचे कृतज्ञतेने भरून आले यात नवल नाही.

समारंभाहून परतताना मनाशी ठरवतच आले की दोन चार दिवसांत सौ. लक्ष्मीबाईंच्याकडे जाऊन त्यांच्या नाथांसारख्या अलौकिक गृहस्थाश्रमाची गाथा प्रत्यक्ष त्यांच्याकडूनच ऐकायची.

गुरुवारी चार जूनला. सकाळी आठ साडेआठ वाजता आम्ही उभयता वर्तक वाड्यातील महाराजांच्या निवासस्थानी गेलो. श्रीदत्त-महाराजांची देवपूजाच चालली होती. डॉ. केरूर तेथेच सतरंजी टाकून बसले, मी मात्र सौ. लक्ष्मीबाईंच्या मागोमाग स्वैपाक घरातच गेले.

घरात शांतता होती. मुले नातवंडे सुट्टी म्हणून आत्रेय वसाहतीतील बंगल्यावर राहायला गेली होती. समारंभाला सौ. लक्ष्मीबाईंची मोठी बहीण आली होती. तिच्याबद्दल विचारता सौ. लक्ष्मीबाई म्हणाल्या, "आल्यापासून बहीण स्वस्थ काही बसली नव्हती. तिचा हात सारखा चालू असे. त्यामुळे घरात एवढे पाहुणे–राऊळे पण कामाचा तेव्हाच उलगडा पडत असे. समारंभ संपल्यावर परवाच ती घरी गेली. जाताना मला फार अवघड वाटले.' हे सांगताना सौ. लक्ष्मीबाई आज पणजी झाल्या आहेत, तरी माहेरच्या मायेने अगदी गहिवरून गेल्या.

सौ. लक्ष्मीबाईंचे माहेर बार्शीला पाठक यांचेकडे. एक वर्षाचा असतानाच आई गेली त्यामुळे मातृसुख असे नाहीच. पण वडिलांनी कुठली उणीव भासू दिली नाही. पाठक–कुटुंब धुंडिराजमहाराज कवीश्वर यांचे भक्त. बार्शीला महाराजांचा मुक्काम असला की पाठक मंडळी दर्शनाला येत. सौ. लक्ष्मीबाईंचे माहेरचे नाव सुंदर. छोटी सुंदर, कधी काकूबरोबर कधी आत्याबाईबरोबर तर कधी आजोळच्या आजी-बरोबर दर्शनाला येई. धुंडिराजमहाराजांच्या पत्नी सौ. आईसाहेब सुंदरच्या हातावर प्रसाद ठेवीत. 'आईसाहेबांनी मला प्रसाद दिला' असे मोठ्या अभिमानाने सुंदर प्रत्येकाला सांगे.

सुबक–ठेंगणी, चतुर, शहाणी, अशी ही सुंदर सौ. आईसाहेबांनी आपल्या चिरंजीवांसाठी हेरून ठेवली होती. एकदा सुंदर आणि तिच्या मैत्रिणी झोपाळ्यावर बसून गाणी म्हणत होत्या तेव्हाच सौ. आई-साहेबांनी चिरंजीवांना ही मुलगी दाखवली होती. त्यानंतर मग सौ. आईसाहेबांनी सुंदरच्या आजीला नातीचे लग्न करत आहा का? आम्हाला मुलगी पसंत आहे हे सांगितले. हे कळताच पाठकांच्या घरात फार आनंद झाला. प्रत्यक्ष महाराजांच्या घरात मुलगी पडणार यापेक्षा आणखी भाग्य ते काय !

मुलीचे टिपण घेऊन वडील महाराजांच्याकडे आले आणि लग्न

निश्चित करूनच परतले. परकरी पोर साखरपुड्याच्या दिवशीच प्रथम साडी नेसली. त्या दिवशी लुगड्याचा पोटापाशी आलेला बोंगा अजून आठवतो आणि हसू येते, असे सौ. लक्ष्मीबाई मोठ्या मोकळेपणाने सांगत होत्या.

विवाहसमारंभ नृसिंहवाडी मुक्कामी कवीश्वरांच्या वाड्यात झाला. ह्या गोष्टीला यंदा पन्नास वर्षे पुरी होत आहेत. विवाहाचा सुवर्णमहोत्सव आणि दत्तमहाराजांचा अमृतमहोत्सव एका वर्षीच यावा हा एक मोठा योगच आहे. लग्नसमारंभ चार दिवस अगदी साग्रसंगीत यथासांग पार पडला. घोड्यावरून वरातही काढली होती. त्या काळात वडिलांनी जावयाला १००१ रुपये वरदक्षिणा दिली असे सौ. लक्ष्मीबाई मोठ्या अभिमानाने सांगत होत्या.

सुंदर आईवेगळी मुलगी. आता परक्याच्या घरी चालली त्यामुळे आजीला अगदी भरून आले. आजी सौ. आईसाहेबांना म्हणाली, ' गंगामाई, मुलीला आई नाही, आता तूच तिची आई हो. '

सासूबाईंना मुलीच्या रूपाचे गुणाचे फार कौतुक सौ. लक्ष्मीबाईंच्या वेणीत सोन्याची गोंडे फुले घातली तर गोंडे फुले संपली तरी हातभर वेणी तशीच खाली राही. सासू-सुना कृष्णेवर स्नानाला जात. सुनेची वेणी पाण्यात भिजू नये म्हणून सासूबाई ती वर धरून ठेवीत आणि सुनेला पाण्यात खुशाल डुंबू देत. मराठवाड्यातील देऊळगाव-राजा येथे धुंडिराजमहाराजांना त्यांच्या एका भक्ताने वास्तू भेट दिली आहे; तेथे महाराजांचा अमृतमहोत्सव होता. सौ. लक्ष्मीबाईंचे वडील त्या निमित्ताने मुलीच्या सासरी आले. जमलेले चहाते पाहून वडिलांना धन्य धन्य वाटले. त्यांनी भक्तिभराने धुंडिराजमहाराजांना मिठीच मारली आणि म्हणाले, ' महाराज, तुमची योग्यता किती मोठी ! तुम्हाला मी ह्या प्रसंगी आहेर तो काय देणार ! ' आणि वडिलांना गलबलून आले.

धुंडिराजमहाराज पाठकांना म्हणाले, ' तुम्ही आपली मुलगी देऊन आधीच आमचा सन्मान केला आहे. '

सोयऱ्या-सोयऱ्यांतील हे प्रेम परस्पर आदर परंपरेने चालत आलेला आहे. दत्तमहाराजांचा सत्कार सुरू असताना महाराजांचे जावई

श्री. तांबोळी, मुलगा अनिलच्या बरोबरीने मागे उभे होते. ह्याबद्दल मी सौ. लक्ष्मीबाईंना विचारताच त्या म्हणाल्या, 'दीक्षा झाल्यापासून तर जावई आंघोळीला पाणी काढून देणे, संध्येची तयारी करणे, इथपासून रात्री अंथरूण घालून देणे, पाय रगडून देणे इथपर्यंत मोठ्या भक्तीने करत असतात. आम्हालाच संकोच वाटतो.'

सुना–जावई–नातवंडे यांचे दत्तमहाराज आणि सौ. लक्ष्मीबाईंवर अकृत्रिम प्रेम आहे. या दोघांनाही परिवाराचा अत्यंत लळा आहे.

महाभाग्याने दत्तमहाराजांसारखा पती मिळाल्याबद्दल सौ. लक्ष्मीबाईंना धन्यता वाटते. प्रपंच परमार्थ एकरूप होण्यास दत्तमहाराजांना सौ. लक्ष्मीबाईंचे मोठे साह्य आहे.

स्त्रीपुरुषांची चित्तवृत्ती ।
अनुकूल वर्ते धर्मप्रवृत्ती ॥

असा लक्ष्मीनारायणाचा जोडा एकचित्ताने उदार प्रेमाने व प्रंपच परमार्थ एक करून आनंदाने नांदत असलेला पाहून आम्हा सर्वांना अपार सुख होते. अशा तुल्यगुण वधूवरांना एकत्र आणून ब्रह्मदेव क्वचित काळी मिळणाऱ्या धन्यवादाला पात्र झाला आहे.

सौ. लक्ष्मीबाईंनी घरची आघाडी अत्यंत समर्थतेने सांभाळली आहे. दत्तमहाराज सांसारिक जबाबदारीबद्दल पूर्णतः निश्चित असतात. सौ. लक्ष्मीबाई आहे त्यांत अत्यंत समाधानाने संसार करणाऱ्या आहेत.

घरची राहाणी साधी टापटिपीची आहे. सौ. लक्ष्मीबाई हौशी व रसिक आहेत. घरीदारी केव्हाही पहावे, वेणीफणी नीटनेटकी, डोक्यात फुले माळलेली, कपड्यांची रंगसंगती बरोबर साधलेली, सदा प्रसन्न, सर्वांशी समतेने वागणाऱ्या, अंगी बहुश्रुतता त्यामुळे सर्व विषयांवर अधिकाराने बोलणाऱ्या, बघता बघता समोरच्या माणसाला आपलेसे करून घेतात.

सौ. लक्ष्मीबाईंसारख्या चतुर बुद्धिमान गृहिणीची जोड असल्यामुळे विरागशील दत्तमहाराजांचा संसाररथ जगाचे पापताप दूर करीत पुढे जात आहे.

का फेडित पापताप । पोखीत तीरीचे पादप ।
समुद्रा जाय आप । गंगे जैसे ॥

* * *

॥ श्रीगुरुःशरणम् ॥

# प. पू. योगीराज गुळवणी महाराजांची अपूर्व योजना

डॉ. प्र. वा. पटवर्धन, पुणे

**संदर्भ** – श्री. पटवर्धन यांचा हा लेख एका स्वतंत्र दृष्टीने लिहिलेला आहे. पू. श्रीदत्तमहाराजांना आपल्या पीठावर स्थापन करणाऱ्या पू. श्रीगुळवणीमहाराजांची दूरदर्शी योजना लेखकांना प्रकर्षाने जाणवल्याने त्यांनी लेखाला नावही तसेच दिले आहे. श्री. पटवर्धन हे श्रीगुळवणी महाराजांचे अनुगृहीत. जुना काल पाहिलेले भक्त. आजही त्यांना पू. महाराजांच्या अपूर्व योजनेचे आश्चर्य वाटत आहे.

—संपादक

१५ वर्षापूर्वीचा प्रसंग आठवतो. प. पू. महाराजांनी आपले जीवित कार्य पौष व. ८ शके १८९५ (दि. १५-१-१९७४) रोजी आटोपते घेतले. एकदम एक गडद अंधार झाला. सर्व भक्त गणांना असे वाटणे स्वाभाविकच होते. यांतून आपणा सर्वांना पुढची वाट कशी दिसणार असा प्रश्न उभा राहिला होता.

श्रीपाद श्रीवल्लभ भक्ती परंपरेचे कार्य व दुसरे सिद्धयोगाचे कार्य पुढे कसे चालू रहाणार ? असा एक प्रश्न ! त्या प्रश्नाचे उत्तर तयार होते.

याकरिताच बरेच वर्षे अगोदर योजना तयार झाली होती. प. पू. गुळवणी महाराजांचे देदीप्यमान व्यक्तिमत्त्व स्थूल रूपातून क्रमाक्रमाने स्थूल – तर – तम सूक्ष्म तर तमामध्ये विलीन होण्याची प्रक्रिया नियती एकीकडे करत होती. दुसरीकडे त्याचवेळी प्रभावी व्यक्तिमत्त्व सूक्ष्म-तम-तर-सूक्ष्म-स्थूलतम-तर-स्थूल अशा अवस्थेत साकारात येत होते.

प. पू. महाराजांचे उत्तराधिकारी म्हणून प. पू. दत्तमहाराजांची नियुक्ती झाली. तेव्हा प. पू. महाराजांच्या योजनेचा तपशील भक्तगणांना समजला. आज या गोष्टीस १५ वर्षे पूर्ण होतील. एक अपूर्व योजना साकारास आली. प. पू. महाराजांच्या निकट सान्निध्यात तयार

झालेले एक व्यक्तिमत्त्व, न्याय वेदांत शास्त्राचे सखोल अध्ययन प्राकृत ग्रंथाचे आकलन अशा विविध पैलूंनी प्रगट झाले.

प्रपंच व पारमार्थिक आघाडीवर प्रथितयश संपादन करून प. पू. दत्तमहाराज प्रगट झाले.

व्यक्ति, संस्कृती आणि समाजसंस्था अशी तीन मानवी जीवनाची अंगे आहेत. यापैकी व्यक्ति सर्वांत अधिक महत्त्वाची असते. निस्वार्थीपणाचे आदर्श दाखविण्याचे काम संस्कृती करते. आदर्श प्रत्यक्षात उतरण्याचे काम समाजसंस्था करतात.

प. पू. दत्तमहाराजाच्या निःस्वार्थीपणामुळे एक आदर्श उभा राहतो. अशा आदर्शाची दखल भारत सरकारने घेतली आहे. त्यांना राष्ट्रीय पंडित व विद्यावाचस्पती असा बहुमान मिळाला.

श्रीसमर्थ रामदासस्वामींनी महंतांच्या लक्षणांमध्ये निःस्पृह वागणूक, आत्मसाक्षात्कारी, अत्यंत विशाल, अनासक्त, एकांतप्रिय, फक्त मार्गदर्शन करण्याकरिता समाजात मिसळणे या गोष्टी साकल्याने सांगितल्या आहेत. ही सर्व लक्षणे प. पू. दत्तमहाराजांच्या व्यक्तिमत्त्वात साकार झाली आहेत.

विद्याविनयसंपन्न हा त्यांचा प्रभावी गुण आहे. प. पू. दत्तमहाराजांचा गौरव म्हणजेच प. पू. महाराजांच्या अपूर्व योजनेचा गौरव ! १५ वर्षांपूर्वी ज्या प्रसंगी एक प्रश्न समोर उभा ठाकला होता त्याचे उत्तर म्हणजे प. पू. दत्तमहाराजांचा सहस्त्रचंद्र शांति महोत्सवानिमित्त केलेले एक प्रगट चिंतन. धन्य ते प. पू. गुळवणी महाराज व धन्य ते प. पू. दत्तमहाराज ! नियतीने अपूर्व काही तयार केले ते साकार झाले. मनातून आनंदाचा हर्ष निर्माण झाला. यापुढे असाच आनंद, हर्ष भक्तजनांना प्राप्त व्हावा ही श्रीपाद श्रीवल्लभचरणी नम्र प्रार्थना.

* * *

## अभीष्ट चिंतन

विद्यावाचस्पते तुभ्यं सच्छास्त्रनिधये नमः ।
दत्तप्रसादात्त्वं जीव वर्धिष्णुः शरदः शतम् ।।

श्रीदत्त कृपाशीर्वादाकांक्षी
**वा. स. पुराणिक, वालावल**



प. प. श्री धुंडिराज महाराज कवीश्वर देऊळगावराजा

॥ श्रीगणेशदत्त गुरुभ्योनमः ॥

# ' प्रभुकृपेने योग्यवेळी योग्य ते घडून येईल '

लेखक : डॉ. मधुकर विश्वनाथ कुलकर्णी, कारवार

' गुरुचरित्र ' या ग्रंथावरील प्रबंधाबद्दल पीएच्. डी. पदवी प्राप्त झाल्यानंतर ब्रह्मश्री श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांनी दि. १२।१०।१९८० रोजी पत्र पाठवून आपला या ग्रंथावरील आशीर्वाद कळविला आणि ' यापुढेही आपल्या इच्छेप्रमाणे श्रीनृसिंह सरस्वती गुरुमहाराज योग्य-वेळी आपल्या प्रबंधाचे प्रकाशनकार्य घडवून आणतील, ' असे त्याच पत्रात म्हटले आहे.

या संदर्भातील काही योगायोग येथे उद्‌धृत करणे अनुचित ठरू नये. ' गुरुचरित्रा ' वरील प्रबंध विद्यापीठात सादर केल्यानंतर मान्यतेसाठी विलंब होणे स्वाभाविक होते. तथापि, श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांच्या आशीर्वादाने ही पदवीमान्यता विनाविलंब प्राप्त झाली.

श्रीदत्तमहाराज कवीश्वर सप्टेंबर १९८० मध्ये कन्यागतासाठी श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथे आले होते. त्याचवेळी हत्तरवाट येथील श्रीविरुपाक्षबुवा नागनाथस्वामी महाराज यांच्या पुण्यतिथी प्रसंगी आपण हत्तरवाट येथे येऊ असे महाराजांनी आधी पत्राने कळविले होते.

श्रीदत्तमहाराज कवीश्वर हत्तरवाट येथे उत्सवाचे तिन्ही दिवस उपस्थित होते, ही आमच्या परम भाग्याची गोष्ट होय. उत्सवामध्येच गुरुपुष्यामृत योगावर महाराजांची पाद्यपूजा आम्हा बंधूंच्या हातून घडली ही घटना त्यातही मणिकांचन योगाप्रमाणे विशेष भाग्याची ठरली.

' गुरुचरित्रा ' वरील माझा प्रबंध मी यावेळी त्यांच्या चरणी ठेवला. आपल्या अमृत दृष्टीने त्यांनी ग्रंथातील कित्येक प्रकरणांचे अवलोकन केले. ग्रंथाचे अवलोकन करीत असताना कोणालाही आत सोडू नये असे त्यांनी श्री. रघुनाथराव कुलकर्णी यांना सांगून ठेवले होते.

श्रीदत्तमहाराज यांनी श्रीविरुपाक्षबुवा नागनाथस्वामी महाराज

यांच्या उत्सवामध्ये मोठ्या आनंदाने भाग घेतला. 'घोरात्कष्टा-उद्धरास्मान्नमस्ते' या विषयावर त्यांचे अत्यंत मार्मिक प्रवचन झाले. आमचे चुलतबंधु श्री. धोंडोपंत नरसिंह कुलकर्णी यांच्या घरीही महाराजांची पाद्यपूजा झाली. उत्सवाचे तीनही दिवस अशा या सोहळ्यामुळे अविस्मरणीय ठरले आहेत.

हत्तरवाट (ता. चिक्कोडी–जि. बेळगाव) येथे श्रीविरुपाक्षबुवा आणि श्री नागनाथस्वामी यांच्या जिवंत समाध्या आहेत. श्री नागनाथ महाराज हे नृसिंहसरस्वती यांचे प्रमुख शिष्य सायंदेव यांचे ज्येष्ठ सुत होत. सायंदेव–नागनाथ–देवराय–गंगाधर व सरस्वती अशी ही परंपरा असून सरस्वती गंगाधर हा 'गुरुचरित्रा' चा कर्ता होय. विरुपाक्षपंत कुलकर्णी हे आमचे पूर्वज, आणि श्री नागनाथ महाराज हे आमच्या घराण्याचे गुरु. या उभय गुरुशिष्यांच्या जिवंत समाध्या हत्तरवाट येथे असून भाद्रपद वद्य सप्तमी, अष्टमी, नवमी हे पुण्यतिथीचे दिवस आहेत. या उत्सवाच्या सोहळ्याच्या संदर्भात मी 'बेलपत्र' नावाची दीर्घकथा लिहिली असून ती 'सत्यकथा' १९६७ च्या दिवाळी अंकामध्ये प्रसिद्ध झाली आहे. ही कथा योगीराज श्री गुळवणी महाराज यांना वाचनासाठी दिली असता त्यांनी 'नागनाथांची समाधि आपल्या गावी असल्याचा उल्लेख वाचला. ही नवीन माहिती मिळाल्याबद्दल विशेष संतोष झाला. सरस्वती गंगाधराने कुठेही उल्लेख केला नाही हे विशेष आश्चर्य आहे' असे पत्रोत्तराने मुद्दाम कळविले आहे.

योगीराज सद्गुरु गुळवणी महाराज यांचे आम्ही अनुगृहीत असून त्यांनी हत्तरवाट येथे यावे, असे आम्हा सर्व बंधूंना मनोमन वाटत होते. १९८० च्या उत्सवाच्या आदल्या वर्षी 'मी येत आहे माझ्यासाठी पान ठेव.' असा योगीराज गुळवणी महाराजांचा स्वप्नदृष्टांत होता आणि योगायोग असा की पुढच्याच वर्षी श्रीदत्तमहाराज कवीश्वर त्याच पानावर येऊन बसले. उत्सवाच्या सोहळ्यामध्ये श्री दत्तमहाराजांच्या स्वरूपात योगीराज श्री गुळवणी महाराजांचे आम्हा बंधूंना प्रसंगा-प्रसंगाने दर्शन घडत होते हा संदर्भ मी श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांना पत्राने कळविला. तथापि नेहमीप्रमाणेच त्यांनी याही प्रसंगी मौन पाळलेले आहे.

***

# श्रीसद्गुरुमाहात्म्य

## विदर्भ-मराठवाड्यातील जनमानसात वंदनीय श्रीदत्तमहाराज

लेखक : **अनंत वासुदेव कवीश्वर** एम. ए. कल्पवृक्ष-जालना

**संदर्भ** – श्री. अनंत वासुदेव कवीश्वर हे पू. श्रीदत्तमहाराजांचे पुतणे. पू. श्री. वासुदेवशास्त्री हे देऊळगावाराजा येथे असतात. कवीश्वरांची ही कर्मभूमी. गेल्या तीन पिढ्यांपासून हे घराणे येथे स्थायिक झाले. येथील ग्रामदैवत 'श्रीबालाजी' हे जागृत स्थान आहे. अनंतराव हे जालन्याला नोकरी निमित्ताने असतात. ते उत्तम लेखक आहेत. ज्योतिषी आहेत. जालनाच्या पू. सौ. ताईमहाराज यांच्या गुरुमंदिराच्या सेवाकार्यात असतात. त्यांनी या लेखात पू. श्रीदत्तमहाराजांच्या मराठवाड्यातील कार्याचा धावता आढावा घेतला आहे.

—संपादक

ओंकार स्वरूपा, सद्‌गुरु समर्था
अनाथांच्या नाथा, तुज नमो ।। तुम नमो ।। तुज नमो ।।
वासुदेव भगवति भक्तियोग: प्रयोजित:
जनमत्याशु वैराग्ये, ज्ञानं यत् ब्रह्मदर्शनम् ।। भागवत ।।

श्रीमद् भागवतात भक्ती, वैराग्य व ज्ञान यांचा जो संबंध वर्णन केलेला आहे त्याचे प्रत्यक्ष स्वरूप ज्ञान 'श्री दत्तमहाराज' हे होत. दुर्वासऋषीप्रमाणे कर्माचा आग्रह, अंबरीषाप्रमाणे भक्तीची अवस्था व वासुदेवानंद सरस्वती टेंबेस्वामी महाराजांच्या प्रमाणे वैराग्य त्यांच्या जवळ आहे. तप व अध्यात्म विद्येची अग्नीप्रमाणे जाज्वल्यता असूनही भक्तिचंद्र किरणांची शीतलताही त्यांचेजवळ आहे. अध्यात्म विद्येच्या साधनेसाठी धर्मजीवन व्यतीत करणारे असे ते ब्रह्मर्षी आहेत. विद्या आणि विनय एकत्र असणारे ते विद्यानिधी आहेत. "आता या परते उरले नाही काही । देहीच विदेही झालो आम्ही," अशा अवस्थेतील ते मुक्तपुरुष आहेत. केवळ लोकसंग्रहाकरता. धर्म, नीती-अध्यात्म

यांच्या मूल्यसंवर्धनाकरिता कार्यरत आहेत. हे ईश्वरी कार्य त्यांचेकडून अखंड चालू आहे. त्यांचे जीवन, कार्य, साहित्य, कृपा हा याच अखंड कर्म यज्ञाचा तेजस्वी सोहळा आहे. तो समजून घेऊन निर्मळ भक्तीचे जीवन जगणे हीच खरी गुरुदक्षिणा आहे.

कवीश्वर घराण्यात चारपाच पिढ्यांपासून वैदिक प्राच्य संस्कृत विद्या, श्रौतस्मार्त यागा तुष्टांत, मन्त्रतंत्र व महाभारत, भागवत गुरुचरित्र इत्यादींवर प्रभुत्व असलेल्या, ईशसेवेत रममाण होणाऱ्या व ईश्वरी वरदान असलेल्या पवित्र, पंडित, थोर, नामवंत शास्त्री घराण्यात श्री दत्तमहाराज यांच्या जन्म झाला. पिता धुंडीराज महाराज व माता सौ. आईसाहेब यांचे पुण्याईबरोबरच प. प. वासुदेवानंद सरस्वती महाराजांची कृपादृष्टी व प. प. दीक्षितस्वामी महाराजांचा अनुग्रह लाभला. कवीश्वर घराण्यात कुलस्वामिनी माहूरची रेणुकामाता आहे. उपासना श्री गणपतीची आहे, तर आराध्य दैवत श्री दत्त आहेत. दैवांच्या आज्ञेने पूर्वज नृसिंहवाडीला वास्तव्य करून काव्य सेवा करीत होते श्री वक्रतुंड महाराज, श्री धुंडीराज महाराज, सौ. आईसाहेब यांच्या कृपेने दत्त महाराजांना सद्भाव व सत्संगती लाभली. शिवलीलामृत, व्यंकटेशस्तोत्र, श्री गजानन महाराज, लोणीचे श्री सखाराम महाराज यांच्या पोथ्यांचे पारायण लहानपणी अखंडित चालूच असे. त्यामुळे त्यांच्यावर ईश्वरी अनुग्रह व अंगी दैवी शक्तीचा लाभ झाला आहे.

प्रथम मराठवाडा व विदर्भ येथे श्री वक्रतुण्ड महाराज कवीश्वर यांनी संचार करून ब्रह्माण्डपुराणातील कथांच्या आधारे ६१ अध्यायांचा 'देवालय ग्राम महात्म्य' हा ग्रंथ स्थान–महात्म्यावर लिहिला आहे. साधना, उपासना, यज्ञयाग, सत्कार, उत्सव, सप्ताह, मंत्रदीक्षा, संचार, गुरुमार्ग, संप्रदाय इत्यादींचा वारसा श्री दत्तमहाराजांना पूर्वजांकडूनच मिळाला आहे. वक्रतुण्ड आण्णानंतर धुंडिराज महाराज यांनी पण भाविकांना भक्तिमार्गाने वाटचाल करण्यास लावून अनेकांची समंध बाधा दूर केली. दारिद्रय दूर केले, रोग नष्ट केले, संतती दिली, मृत्यू टाळले, दुर्जनांना सज्जन बनविले. त्यांच्या अंतःकरणाची शुद्धी केली, इतकेच नव्हे तर निर्वाणानंतरही हिमालयाच्या यात्रेत

शिष्यपरिवारास मोटार अपघातातून वाचविले. त्यांचे निर्वाणानंतर श्री दत्त महाराजांनी संचार करून समाधिमंदिर व दत्तमंदिर उभे केले व तेथे आध्यात्मिक कार्य चालू ठेवले आहे. अत्यंत अल्प काळात ‘ उपासना धाम ’ देऊळगावराजा येथे भव्य वास्तू उभ्या राहिल्या. मूर्तिस्थापना, यज्ञ याग, भजन, पारायण, नामस्मरण, यात्रा, अन्नदान, पुराण श्रवण इत्यादी कार्यांद्वारे भक्तांचे मनोरथ पूर्ण केले. त्यांच्या मार्गदर्शनाने व कृपेने भक्तांचे आत्मकल्याण साधले आहे.

भक्तिमार्ग, कळवळा, दया, शांती, समाधान इत्यादी दैवी गुण तसेच मंत्र, यंत्र इत्यादीद्वारे रोग व दुःख–निवृत्ती, उपासना–प्रवचन सप्ताह, मार्गदर्शन, दृष्टिपात, अनुग्रह, इत्यादिद्वारे उपदेश देऊन भक्तांचे, शिष्यांचे सदैव कल्याण साधले आहे. त्याकरिता अहोरात्र संचार, प्रवास, यात्रा त्यांची चालूच आहे. त्याचबरोबर सर्वसामान्यांच्या अडीअडचणी दूर करून त्यांना आर्थिक तसेच दैवी साहाय्य महाराजांचे कडून लाभले.

कवीश्वर घराण्यात पूर्वजांपासून चालत आलेली शिष्य परंपरा त्यांनी वाढविली आहे. देऊळगावराजा येथे श्री बालाजी व्यंकटेश ‘ गोविंदा ’ची सेवा सप्ताह करून आजही कुलात कायम ठेवली असून श्री बालाजी महाराज उत्सवांतही त्यांना मानाचे स्थान आहे. देदीप्य-मान दैवी शक्तीचे प्रचंड सामर्थ्य त्यांच्या ठिकाणी सद्‌भक्तांना आजही दिसते व ते नतमस्तक होतात. महाराजांची राहणी, वेष, आचार, आहार इ. अत्यंत साधेपणाची व सात्विक असल्यामुळे ते प्रत्यक्ष परमात्मरूप, आत्मानंद सरस्वती असूनही आपल्यातलेच वाटतात. प. प. दीक्षित स्वामी महाराजांच्याकडून त्यांना सुहास्य व गंभीर साहस इत्यादींचा वारसा मिळाला आहे. त्यामुळे दुःखी व अशांत भक्तास ते साहसाने संकटास तोंड देण्यास मृदू भाषेत सांगून त्यास दैवी उपचाराची जोड देतात व त्याचे आत्मबल वाढवतात म्हणून प्रत्यक्ष “ सूर्य जगताचा ज्याप्रमाणे आत्मा आहे; त्याप्रमाणे ते आम्हा साधकांचे आत्मसूर्य आहेत. ”

आपण केवळ कल्पतरु । संसार सागराचे तारु ।
सकळ संतांमाजी मेरु । माझी इच्छा पूर्ण करा ।।

श्री पूज्य धुंडीराज समाधी मंदिर, श्री दत्तमंदिर (देऊळगाव-राजा), सौ. आईसाहेबांचे समाधी स्थान (सुलतानपूर), नंदीमंदिर, राममंदिर, दत्तमंदिर, गुरुमंदिर (जालना), दत्त मंदिर (टेंभुर्णी), गणेशमंदिर (चिखली) इत्यादी बरोबरच पूज्य सौ. ताईमहाराजांचे प. पू. काजळकर महाराज मंदिरावरही त्यांचे अपार प्रेम आहे. तेथे श्रीमद् भागवत सप्ताह, श्री गुरुचरित्र सप्ताह, पंच कुंडात्मक स्वाहाकार यज्ञ इ. मोठमोठे कार्यक्रम हे त्यांच्या कृपादृष्टीनेच पार पडले. त्यावेळी त्यांचा भव्य सत्कार झाला. रौप्यतुला झाली. मिरवणुक व प्रचंड अन्नदान इ. कार्यक्रमांतून भक्तांच्या श्रद्धांची भव्यता दिसून आली. म्हणूनच श्री दत्तमहाराज हे शिष्यांचे जीव की प्राण आहेत. त्यांच्या दर्शनाने भक्तांना कृतज्ञतेचे समाधान मिळते. म्हणूनच त्यांचे सोबत श्री तुळजापूर, गाणगापूर, नरसिंह वाडी, इत्यादी ठिकाणी भक्त जमतात.

कर्म साम्यदशेमध्ये ईश्वरीकृपा सद्‌गुरु अनुग्रह स्वरूपात होते, तत्क्षणी शक्तिपात प्रक्रियेद्वारा ईश्वरच जीवात्म्यास परतत्त्व साक्षात्कारासाठी ऊर्ध्वगती देतो. गुरुप्रसाद हाच मोक्ष आहे. ही अनुभूती विविध प्रसंगांत अनेक सद्‌भक्तांना आलेली आहे. " ही भूमिका ज्यांनी स्वीकारली त्यांना सद्‌गुरूंनी आपल्या कृपेद्वारा कृतार्थ केले. म्हणून 'श्री गुरुःशरणम्' ही भूमिका अवश्य आहे. " गुरूणां गुरुः । योगिनां चक्रवर्तिः ।" असे हे श्रेष्ठ महानुभाव आहेत. म्हणून गुरुस्मरण हे आपल्या पूर्णत्वाचे अनुसंधान आहे. जीवपरमात्म्याचे पारमार्थिक अद्वैत जाणणारे ते ब्रह्मज्ञानी आहेत. सोऽहं साधना सिद्ध असलेले महापुरुष महाराज साक्षात शिवस्वरूप आहेत. त्यांचा अनुग्रह व्हावा, त्याची स्वानुभूती त्यांच्याच कृपेने प्राप्त व्हावी ही प्रार्थना. सौ. ताईमहाराजांचे आश्रमात नित्य रामस्मरण, चिंतन, मनन, भजन, प्रार्थना, ग्रंथ सेवन, अन्नदान इत्यादी सेवांद्वारे सद्‌भक्तांचे महाराजांच्या ठिकाणी नेहमी चित्त रमलेले असते. त्यामुळे त्यांना वरील अनुभूतीचा अनुभव वारंवार येतो. सर्वांची नामावळी, प्रसंग, घटना इ. विस्तार अशक्य आहे.

गुरुचरणी रत होती सदा । त्यासी कैची भवभय आपदा ॥
धनधान्याची नाही मर्यादा । भेदा खेदा वरिले ॥

(श्री शिवलीलामृत अ. ७)

श्री दत्त महाराजांनी वेदवेदान्त, न्याय, व्याकरण, अलंकार, इत्यादी सर्व शास्त्रांचे अध्ययन पुणे, म्हैसूर, बडोदा इत्यादी ठिकाणी पूर्ण करून अवघ्या सोळाव्या वर्षी श्रीमद्‌भागवताचा प्रथम सप्ताह केला, त्यावेळी प. प. श्री दीक्षित स्वामी महाराज सप्ताहास हजर असत. अध्यापन, प्राचीन ग्रंथ परिशीलन, संशोधन, पुराण वाचन व प्रवचन कार्याबरोबरच मंत्रदीक्षा, गुरुमंत्र, शक्तिपात दीक्षा इत्यादी अमोघ कार्यही चालू आहे. त्यांचा उचित संस्कार, गौरव अनेक संस्थांकडून, श्रेष्ठ व्यक्तीकडून, शासनाकडून झालेला आहे. होत आहे. 'राष्ट्रीय पंडित', 'न्यायरत्न', 'विद्यावाचस्पती' इ. पदव्यांबरोबरच उत्तम संस्कृत शिक्षक म्हणूनही त्यांचा सन्मान झालेला आहे. ते प्रकांड पंडित असूनही फार मोठे संत पुरुष आहेत. अत्यंत विनयशील, साधे व प्रसिद्धिपराङ्मुख आहेत. त्यांना सरस्वतीचे वरदान असून ओघवत्या मधुर वाणीने विषय प्रतिपादन करण्याची त्यांची शैली अपूर्व आहे. 'श्री वासुदेव निवास' पीठाचा 'वामन निवास' पीठापर्यंतचा प्रवास हेच त्यांचे जीवनाचे सार आहे. त्यांच्या अमृत वाणीचा लाभ ही ईश्वरीकृपा व त्यांची कृपादृष्टी हा ईश्वर साक्षात्कार आहे.

प. पू. श्री दत्त महाराजांचे मराठवाड्यातील कार्य फार मोठे असून, अप्रसिद्ध आहे. अत्यंत श्रद्धाभाव अशा शिष्य व भक्तमंडळींना दत्त महाराज हे प्रत्यक्ष परमेश्वराचे स्वरूपच आहेत. आपल्या भक्तीने आणि श्रद्धेने त्यांनी आत्मबळ वाढविले आहे. सर्व भार सद्‌गुरूवर टाकून अत्यंत निष्ठेने भजन, पूजन, यजन करून नामस्मरणात लीन राहणाऱ्या व स्वतःस पुत्रवत अज्ञानी व अजाण समजून संत वाक्यावर विश्वासणाऱ्या श्रेष्ठ भक्तांना पाहिले की, गोकुळातल्या गोपगोपींनी श्रीकृष्णावर केलेल्या निर्व्याज भक्तीची आठवण होते. इतके भक्तिप्रेम क्वचितच् इतरत्र पाहावयास मिळते.

जालना, जाफ्राबाद, औरंगाबाद, अंबड, बीड, उस्मानाबाद, तुळजापूर, सोलापूर, इत्यादींबरोबरच देऊळगावराजा, चिखली, बुलढाणा, खामगाव, अकोला, कारंजा, मेहेकर, पुसद, नागपूरपर्यंत श्री दत्त महाराजांचा शिष्य वर्ग अफाट पसरलेला असून सर्वांच्या हृदयस्थ गुरुमहाराज सदैव स्थित आहेत. संपूर्ण देशभरात श्री गुरुचरित्रावर

अधिकारवाणीने भाष्य श्री दत्तमहाराजांच्याशिवाय अशक्यप्राय आहे.

श्री महाराज संपूर्ण जीवनात गुरुचरित्र जगले आहेत. इतर शास्त्र वेदान्त भागवत पांडित्या बरोबर गुरुचरित्राचा सुधारस हा अमृत योग आहे. विदर्भ, मराठवाडा ही संतांची भूमी आहे. ज्ञानेश्वर, नामदेव, समर्थ रामदास स्वामी, एकनाथ महाराज, रंगनाथ महाराज, आनंदी-नाथ स्वामी महाराज, सदानंद महाराज इ. महात्म्यांच्या या भूमीवर श्री अनवीकर महाराज, श्री लोणीकर महाराज, हरिहरानंद सोनईकर महाराज, साखर खेर्डा येथील महाराज, सौ. ताईमहाराज इत्यादी संस्थानांमध्ये श्री दत्त महाराज यांना अत्यंत आदर असून श्री धुंडीराज महाराजांचे सुपुत्र म्हणून त्यांच्याकडे पुत्रवत वात्सल्याने तर विद्वत्तेमुळे आदराने पाहिले जाते. श्री महाराज ज्या ज्या वेळी या ठिकाणी दर्शनास जातात त्यावेळी त्यांचा योग्य त्या आदरातिथ्याबरोबरच सत्कारही केला जातो. श्री महाराजांनी वारंवार यावे, आपल्या मधुर व रसाळ वाणीने पुराणे सांगावीत ही सर्वांचीच इच्छा असते. वार्षिक पुराणांचे व सप्ताहांचे निमित्ताने सर्व भक्तांचा मेळावा भरतो, प्रवचनाचा लाभ घेतला जातो. कृतार्थ होऊन भक्त आनंदाने देहभान, संसार विसरून जातात. चितांतील सर्व मल दूर होतात. निभ्रांतपणाने सर्वांना प्रत्यक्ष परमेश्वराच्या दर्शनाचा लाभ होतो. अशा रीतीने श्री दत्त महाराजांच्या दर्शन, श्रवण, सत्संगाने कृतार्थ झालेल्या सत्शिष्यांना मोक्षसुखाचा लाभ होतो. श्री महाराजांची कृपादृष्टी नरांतील नारायणास जागृत करते. तरी त्यांच्या या शांतीच्या निमित्ताने सर्वांची ईश्वराजवळ प्रार्थना आहे की त्यांना आयुरारोग्य लाभावे. त्यांच्या संस्कारांचा लाभ व्हावा, पुराण श्रवणाचा अमृत योग यावा, त्यांची विमल दृष्टी आम्हावर पडून आमचे ठिकाणी विवेक योग वाढावा. त्यांची तन मन धनाने सेवा घडावी. त्यांच्या मार्गदर्शनाचा अमृत योग यावा तसेच त्यांच्या आशीर्वादाने भगवतीची आम्हावर कृपा व्हावी. दुरितांचा नाश व्हावा हीच प्रार्थना.

केले भक्त सुखी अनंत । दुरिते दुर्दम्य संहारुनि ।।

* * *

# हृद्यस्मृती

डॉ. मनोहर कृष्ण कुबडे M. A. Ph. D., सोलापूर

**संदर्भ** – डॉ. मनोहर कृष्ण कुबडे हे गुरुभक्तकेसरी कै. बापूसाहेब कुबडे यांचे सुपुत्र. आईवडिलांच्या पुण्याईने जन्मापासूनच सत्संगती लाभली आहे. नुसतीच संगत नव्हे तर संतसेवेचे भाग्यही लहानपणापासून लाभले आहे. गणित विषयाचे ते प्राध्यापक आहेत. त्यांनी या लेखात आठवणी दिल्या आहेत. कै. बापूसाहेबांच्या लेखाची उणीव मनुभाऊंनी लेख देऊन अंशत: भरून काढली आहे.

—संपादक

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु: गुरुर्देवो महेश्वर: ॥
गुरु: साक्षात्परब्रह्म तस्मै श्रीगुरुवे नम: ॥

जगातील सर्व देशांपेक्षा भारताचे वैशिष्टच म्हणजे दैवी संपत्ती हीच होय. हिचा उत्कर्ष जसा भारत देशात आढळून येतो तसा अन्य देशांत दिसून येत नाही असे म्हटल्यास अत्युक्ती होणार नाही. देहेंद्रियादि सर्व सुखांमध्ये रममाण होणाऱ्यांना असुर अशी संज्ञा आहे. त्यांच्या साधनांना आसुरी संपत्ती असे म्हणतात. ही प्रतिक्षणी सर्वांच्या अनुभवाला येत असतेच. आज भारतात सर्वत्र आसुरी संपत्तीची भरभराट चाललेली दिसते आहे. त्यामुळे वैयक्तिक व सामाजिक जीवनाच्या सर्वही क्षेत्रांत आज अशांती माजलेली आहे. भगवान् श्रीकृष्णांचा जन्म श्रावण कृष्ण अष्टमीला मध्यरात्री झाला हे सर्वांना ज्ञातच आहे. मनुष्यांचा दिवस-रात्र हा २४ तासांचा असतो. पितरांचा एक दिवस रात्र म्हणजे एक महिना. त्यातील शुक्ल पक्ष हा त्यांचा दिवस व कृष्ण पक्ष म्हणजे रात्र. मनुष्यांचे एक वर्ष म्हणजे देवतांचा एक दिवस-रात्र. उत्तरायण म्हणजे त्यांचा दिवस व दक्षिणायन ही त्यांची रात्र. यावरून असे दिसते की भगवान श्रीकृष्णांचा जन्म हा मनुष्यांच्या मध्यरात्री, पितरांच्या मध्यरात्री व देवतांच्याही मध्यरात्री झालेला आहे. अंधारात

ज्याप्रमाणे प्रकाशाची आवश्यकता जास्त असते त्याप्रमाणे अज्ञांच्या समूहात मार्गदर्शन करणाऱ्या ज्ञानी महात्म्यांची आवश्यकता जास्त असते.

भगवद्गीतेतील सोळाव्या अध्यायात दैवी संपत्तीचे वर्णन आहे. इतरही अध्यायांमध्ये स्थितप्रज्ञांचे, ज्ञानी भक्तांचे वर्णन आहे. अशा दैवीसंपत्तिगुणांनी अलंकृत असे ज्ञानी भगवद्भक्त महात्मे फार विरळ असतात. या काळात तर अत्यंत दुर्मिळच आहेत. पण आपल्या भाग्याने या अशा दैवी गुणांनी मंडित अशी महान विभूती आपले गुरुमहाराज राष्ट्रीय पंडित, विद्यावाचस्पति ब्रह्मश्री प. पू. दत्तमहाराज कवीश्वर यांचे रूपाने आज आपले डोळ्यांपुढे आढळते हे विशेष अभिमानास्पद आहे.

प्रातःस्मरणीय प. पू. दत्तमहाराजांचा व माझ्या वडिलांचा ती. बापूंचा गेल्या पन्नास वर्षांपासून परिचय, स्नेह व ऋणानुबंध आहे. त्यामुळे मला अगदी लहानपणापासून त्यांच्या सहवासाचे महद्भाग्य लाभले व अजूनही ते लाभत आहे. प. पू. महाराजांच्या सहवासाचे क्षण म्हणजे आयुष्यातील सर्वोच्च आनंदाचे क्षण. दरवर्षी श्रावणात नागपंचमीला सोलापूरला ते आमचे घरी येतात ते दिवस तर अगदी दिवाळीपेक्षाही जास्त आनंदात उत्साहात व समाधानात जातात. "साधुसंत येती घरा, तोचि दिवाळी दसरा" याचा आनंद दरवर्षी आम्हाला त्यांच्या कृपेने मिळत असतो. मलाच काय पण कोणालाही त्यांचा पूर्ण परिचय झालेला नाही. ज्या व्यक्तीला त्यांचा पूर्ण परिचय होईल त्या व्यक्तीला निश्चितच पूर्णता प्राप्त होईल. त्यांचा पूर्ण परिचय फक्त प. पू. योगिराज गुळवणी महाराजांनाच झालेला होता असे म्हटल्यास ते वस्तुस्थितिदर्शकच ठरेल.

माझे वडील ती. बापू व आई सौ. मा यांच्या पुण्याईमुळेच प. पू. महाराजांचा आम्हाला लहानपणापासून सहवास लाभला व अजूनही तो लाभतो आहे. प. पू. गुळवणी महाराजांप्रमाणे प. पू. महाराजांचे कृपाछत्र पहिल्यापासून आमचे कुटुंबावर नित्य आहे. आम्हाला लाभलेला त्यांचा संश्रय व त्यांचे मिळत असलेले मार्गदर्शन हेच आमच्या जीवनाचे सारथी आहेत व हेच आमचे सर्वांत मोठे

भाग्य आहे. त्यांचे मार्गदर्शन, त्यांचा आशीर्वाद, त्यांचे कृपाछत्र याशिवाय दुसरे कोणते महद्‌भाग्य असू शकते ?

प. पू. महाराजांचे एक वैशिष्टय म्हणजे त्यांना काही सांगावे लागत नाही. ते सर्व जाणून असतात. त्यांच्या सर्वज्ञतेचा अनेकवेळा अनुभवही आलेला आहे. मी १९७४ साली एम. ए. ची परीक्षा पास झालो. त्यानंतर एक पूर्ण वर्ष मला कोणतीही नोकरी नव्हती. अनेक ठिकाणी प्रयत्न चालू होते. पण कुठेही प्रयत्नांना यश मिळत नव्हते. त्यानंतर एकदा काही कारणाने पुण्यात श्रीवासुदेव निवासात मुक्काम असताना रात्री एक स्वप्न पडले. त्या स्वप्नात प. पू. दत्तमहाराज आले व त्यांनी विचारले की "तुला अजून नोकरी मिळाली नाही ? मी तुला एक मंत्र देतो. कशी नोकरी मिळत नाही ते पाहू." व ते मला मंत्र देण्यासाठी बसले. तेथेच ते स्वप्नही संपले. त्यानंतर दोनच दिवसात प. पू. महाराजांनी आश्रमातच समक्ष तसाच प्रश्न विचारला व नोकरी मिळण्यासाठी एका मंत्राची उपासना करण्यास सांगितली. त्या मंत्राच्या उपासनेच्या संकल्पासह तो मंत्र लिहून दिला व सांगितला. एका विशिष्ट संख्येइतका त्या मंत्राचा जप करण्यास सांगितले. त्यांचे आज्ञेप्रमाणे त्या दिवसापासून त्या मंत्राचा जप सुरू केला. त्यांनी सांगितलेल्या संख्येइतका जप पूर्ण झाल्यावर एक महिन्याच्या आत माझ्या हातात ॲपॉईंटमेंट ऑर्डर मिळाली. तोपर्यंत माझा जप चालूच होता. नंतर नोकरी सुरू झाल्यानंतर या सकाम उपासनेची आवश्यकता नाही असे वाटल्यामुळे तो जप बंद करण्याची दुर्बद्धी झाली. ज्या दिवशी जप बंद केला त्याच दिवशी मला मंजूर झालेली वेतनश्रेणी नामंजूर होऊन क्लॉक अवर बेसिसवर काम करण्यास सांगितले गेले. त्यानंतर आठ दिवसांनी दुसरे कुठलेही प्रयत्न न करता पुनः जप सुरू केला. त्यानंतर लगेच चारपाच दिवसात माझी पहिली वेतनश्रेणी पुनः मंजूर झाली व व्यवस्थित नोकरी सुरू झाली.

असाच आणखीन एक अनुभव सांगतो. प. पू. महाराजांचे सहाध्यायी कोल्हापूरचे पं. श्रीपादशास्त्री जेरे यांची कोल्हापुरात श्रीमद्‌भगवद्‌गीतेवर प्रवचने चालू होती. कोल्हापुरातील काही मंडळींनी ती प्रवचने टेप करून घेऊन लिहून काढली व शास्त्रीबुवांचेकडून

तपासून घेऊन त्याचे 'ज्ञानगंगा' नावाचे एक पुस्तक १९७५ साली प्रकाशित केले. या पुस्तकाला प. पू. दत्तमहाराजांची प्रस्तावना आहे. त्या पुस्तकाच्या प्रकाशकांचे काही प्रतिनिधी या पुस्तकांच्या प्रती घेऊन सोलापूरला आले होते. ते पुस्तक फार आवडल्यामुळे ते विकत घेण्याची फार इच्छा झाली. पण तेव्हा मला नोकरी नसल्यामुळे व ती. बापूही सेवानिवृत्त झालेले असल्यामुळे आम्हाला ते पुस्तक विकत घेणे शक्य झाले नाही. त्यानंतर त्याच आठवड्यात पुण्याला एका मुलाखतीसाठी जाण्याचा योग आला. त्यावेळेस प. पू. महाराजांचा भागवतसप्ताह चालू होणार होता म्हणून मी त्या सप्ताहश्रवणासाठी आठ दिवस तेथेच राहिलो. तो सप्ताह चालू असताना एक दिवस कोल्हापूरच्या काही मंडळींनी त्या 'ज्ञानगंगा' या पुस्तकाच्या तीन प्रती प. पू. महाराजांना आणून दिल्या. त्यावेळेस प. पू. महाराजांनी ताबडतोब त्यातील एक प्रत मला प्रसाद म्हणून दिली व हे लिखाण शास्त्राला अविरुद्ध असे आहे असे सांगून वाचण्यास सांगितले. मी कोणतीही इच्छा प्रकट न करता त्यांनी मला एक प्रत दिली हा मी तरी नुसता योगायोग समजत नाही. 'प्रसादो अनुग्रहबुद्धि' या प्रसाद शब्दाच्या आचार्यांनी केलेल्या व्याख्येप्रमाणे त्यांनी माझ्यावर केलेला अनुग्रहच होता.

आणखी एक आठवण विशेष अशी आहे. १९८३ च्या फेब्रुवारीत माझी आई सौ. मा ही फार क्षीणता आल्यामुळे अंथरुणाला खिळून होती. तसा कोणताही आजार नव्हता पण केवळ क्षीणता मात्र होती. त्यावेळेस तिचे बोलणेही फार कमी झालेले होते. तेव्हा अचानक कोणतीही पूर्वकल्पना नसताना प. पू. दत्तमहाराज सोलापूरला आले व तिला भेटून लगेच वैरागला रवाना झाले. त्यावेळेस सौ. मा ला ही फार आनंद झाला व ती प. पू. महाराजांशी व्यवस्थित बोलली. त्या दिवशी बुधवार होता. प. पू. महाराजांबरोबर झालेले बोलणे हेच तिचे शेवटचे बोलणे ठरले. त्यानंतर तीन दिवसांनी शनिवारीच तिने देह ठेवला. त्यावेळेस प. पू. गुरुमहाराजांची सोलापूरला येण्याची कोणतीही शक्यता नसतानासुद्धा तिला त्यांनी शेवटी दर्शन दिले हे तिचे खरोखरच मोठे अहोभाग्य. अशा अनेक आठवणी आहेत. विस्तारभयास्तव जास्त

लिहिणे शक्य नाही.

प. पू. महाराजांच्या वक्तृत्वात एक असाधारण असा गुण आहे. तो असा की संस्कृत असो व मराठी, त्या भाषेत पाच मिनिटांपासून पाच तासांपर्यंत त्यांच्या प्रवचनात गंगाप्रवाहासारखा अव्याहत मुद्देसूद विषय मांडला जातो व त्यात असंबद्धता, शिथिलता, विषयांतर इत्यादी कोणतेही दोष असत नाहीत. संपूर्ण निर्दोष वक्तृत्व कसे असावे तर प. पू. महाराजांसारखे. प्रवचन ऐकताना 'वक्ता दशसहस्रेषु' याची कल्पना येते व 'स्वेषां परेषां विश्वेषां द्विषामविदुषामपि' आनंद देणारी मार्गदर्शन करणारी, श्रोत्यांना त्यांच्या आचारात परिवर्तन करण्यास भाग पाडण्याइतका त्यांच्या मनावर परिणाम करणारी अशी त्यांची अधिकारी, प्रभावी व परतत्त्वाचा स्पर्श झालेली वाक्सरणी सत्पक्षपाती, गुणग्राही जिज्ञासूंचे नेहमी मार्गदर्शन व समाधान करीत असते. प. पू. महाराजांचे प्रवचन ऐकणे ही एक अपूर्व अशा विद्यानंदाची पर्वणीच असते.

प. पू. गुरुमहाराजांचे दुसरे एक वैशिष्टय म्हणजे दुसऱ्याचे परमाणूएवढे गुण पर्वताएवढे मोठे करून सांगणे व कौतुक करणे. दोषां-कडेही गुणदृष्टीने पाहण्याची त्यांची दृष्टी पाहून आमच्यासारख्या अनेक दोषांनी परिपूर्ण असणाऱ्यांना खरोखरच लाज वाटते. आज या ८० व्या वर्षातही त्यांचे अखंड भागवतज्ञानयज्ञ चालू आहेत. सतत श्रमंती चालू आहे. हे सर्व पाहिल्यावर त्यांच्या अलौकिकत्वाची, असामान्यत्वाची खात्री पटते. असेच त्यांचे कृपाछत्र आमच्यावर नित्य असावे. व त्यांचा शंभरावा वाढदिवस याहीपेक्षा मोठ्या प्रमाणात साजरा करण्याचे भाग्य आम्हाला लाभावे ही त्यांचे चरणी नित्य प्रार्थना.

* * *

---

कर्म ईश्वराहून श्रेष्ठ आहे. कर्माप्रमाणे फळ देणे हे त्याचे कार्य आहे. सत्कर्माला वाईट फळ तो देऊच शकत नाही. संत सत्कर्माला प्रवृत्त करतात म्हणून संत ईश्वरापेक्षा श्रेष्ठ असतात.

– पू. श्रीदत्तमहाराजच्या श्रीमत् भागवत सप्ताहातील

---

॥ श्रीगुरुः शरणम् ॥

# नित्यजागृती देणारे सद्‌गुरु

श्री. विवेक ग. आपटे

**संदर्भ** – श्री. विवेक आपटे हे तरुण उत्साही प्रयत्नशील साधक आहेत. श्रीवासुदेव निवासाच्या कार्यातही त्यांचा सेवेचा वाटा आहे. अनेक संत सत्पुरुषांचे दर्शन व सहवास त्यांना होत असते. नावाप्रमाणे परमार्थात विवेकाच्या दृष्टीने वाटचाल चालू आहे. त्यांचे काही अनुभव या लेखात दिले आहेत.

—संपादक

प्रथम श्रीगणेशरूपी श्रीसद्‌गुरूंचे जे सर्वव्यापक सर्वांतर्यामी ब्रह्म-चैतन्य आहेत, जे साक्षात् ब्रह्म, विष्णू व महेश आहेत, त्यांचे स्मरण करून त्यांच्याच प्रेरणेने, शक्तीने काही अनुभव, आठवणी लिहीत आहे. ज्यांच्या केवळ संकल्पाने कुंडलिनी शक्ती जागृत होते व निरनिराळ्या क्रिया करवून घेऊन साधकाला आत्मदर्शनापर्यंत घेऊ जाते, अशी शक्ती ज्यांची अंकित आहे असे थोर महायोगी माझे सद्‌गुरु प. पू. श्रीदत्त-महाराज यांचे विषयी काही लिहावयास मिळत आहे हे मी माझे परम-भाग्य समजतो.

प. पू. दत्तमहाराजांविषयी विचार करायला, चिंतन करायला लागलो की मला ते आकाशाप्रमाणे विशाल वाटतात व नंतर मनात येते की अरे जेथे श्रुतीनेही नेति नेति म्हटले त्या ब्रह्मस्वरूप श्री. महाराजांचे मोजमाप कसे होणार ? असे वाटून मन शांत गंभीर होते. प. पू. श्रीदत्तमहाराजांचे सान्निध्यात २।३ वेळा नरसोबाचे वाडीला जाण्याचा रहाण्याचा योग आला. त्यावेळची त्यांची दिनचर्या पाहिली की आपण दिपून जातो. नतमस्तक होतो. प. पू. श्रीदत्तमहाराज पहाटे ३॥ वा. उठल्यानंतर थंडी, वारा, पाऊस काहीही असो, चालत कृष्णा नदीवर जात. तेथे स्नान झाल्यावर मग देवाला पाणी घालून मग रोजचे

आन्हिक इ. सुरुवात होत असे. मला मात्र ते सांगत की तुम्ही काही उठायची घाई करू नका, प्रवासाने दमला आहात. प. पू. महाराजांची पूजा पाठ चाललेले असले तरी लोकांचे जाणे-येणे चालू असे. प. पू. महाराज त्यांच्याशी बोलून परत आन्हिक सुरू करीत असत. प. पू. महाराज नेहमीच सहज समाधीत, अनुसंधानातच, असतात. ते एकटे असले तरीही ज्या शांत स्थितीत असतात तितकेच हजारो लोकांत असले, कोणाला काहीही सांगत उपदेश करीत असले तरीही असतात. कोणताही कितीही विचित्र, बिकट प्रश्न श्रीमहाराजांना विचारला तरी ते शांतपणे त्याला योग्य व अचूक उत्तर देऊन परत आपल्या अनुसंधानात जातात. कोणतीही स्थिती असो ते नेहमी अनुसंधानातच असत. उलटपक्षी हेच खरे की ते बोलतेवेळी वा कार्य करतेवेळीही अनुसंधानातच असतात व कार्य होत असते.

त्यांचे मला आलेले काही अनुभव देत आहे.

(१) प. पू. श्री. दत्तमहाराजांचा अनुग्रह होण्याआधी मला समर्थ सद्गुरु श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर यांचेकडून एक महान नाममंत्र मिळाला. त्याचा मी सारखा जप करायचा. तसेच त्याबरोबर मूळ उपासनाही व्यवस्थित चालली होती. त्यावेळी मला शिवलिंगाचे, औदुंबर श्रीपादुकांचे दर्शन, दृष्टांत व्हायचे. नंतर मला प. पू. श्री. दत्त-महाराजां कडून दीक्षा लाभ झाला. त्यानंतर सारखे वाटायचे की जो मंत्र आपल्याला समर्थ सद्गुरु श्री गोंदवलेकर महाराजांकडून मिळाला आहे तोच जर प. पू. श्री दत्तमहाराजांकडून मिळाला तर किती बरे होईल ? व नंतर त्याच सहजसंकल्पाने मी ‘ श्रीदत्त माहात्म्य ’ हा ग्रंथ वाचनास घेतला. एका गुरुवारी पहाटे दृष्टांत झाला. प. पू. श्रीदत्त-महाराज स्वप्नात आले. मी त्यांना प्रार्थना केली की मला मंत्र मिळावा. तेव्हा ते म्हणाले की सकाळी ये. मंत्र देईन. व स्वप्न संपले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यावेळी मला माहीतही नव्हते की प. पू. महाराज पुण्यात आहेत. ( कारण नेहमी ते धर्मकार्यासाठी गावोगाव फिरत असतात. ) ते आहेत का हे विचारण्यासाठी मी प्रथम ‘ श्रीवासुदेव आश्रमात ’ गेलो. तेथे श्री. महाराज पुण्यात आहेत असे कळले म्हणून तसाच श्रीमहाराजांच्या घरी गेलो. त्यावेळी प. पू. श्रीमहाराज पूजेत सोवळचात

होते. तरीही मी गेल्यावर त्यांनी माझी अत्यंत प्रेमाने चौकशी करून येण्याचे कारण विचारले. त्यांना मी स्वप्न-दृष्टांत सांगितला. त्यावर त्यांनी त्यांचे नातवाला कागद पेन आणायला सांगून नंतर इष्टदैवत विचारले व नंतर प. पू. गोंदवलेकर महाराजांनी दिलेलाच नाममंत्र लिहून दिला. व म्हणाले हा सिद्ध मंत्र आहे. व तुमचे छान चालले आहे. मी नमस्कार करून अत्यंत आनंदाने परतलो.

वरील अनुभवावरून स्पष्ट होते की प. पू. श्रीदत्तमहाराज व प. पू. श्री. गोंदवलेकर महाराज हे एकच आहेत. श्री समर्थांच्या भाषेत सांगायचे म्हणजे " साधु दिसती वेगळाले. ............ "

(२) हा अनुभव १५ जून १९८६ चा आहे.

त्या दिवशी फॅक्टरीत मला खूप काम पडले. घरी परतल्यावर काही वस्तू घेण्यासाठी खाली वाकलो आणि एकदम उसण भरली व जोराची चक्कर येऊन खालीच बसलो. मला हालताही येईना. तसाच मी शवासनाचे स्थितीत पडून होतो. फार दुखत होते. हे सर्व घडले संध्याकाळी. रात्री झोपतेवेळी प. पू. श्रीमहाराजाची प्रार्थना केली की महाराज असेच पडून रहायला लागले तर उद्याची बैठक आणि स्नान संध्या कसे होणार? नंतर नामस्मरण करीत झोपलो. दुसऱ्या दिवशी सकाळी हालता येत नव्हते तरीही स्नान आटोपून आन्हिक आटोपले. संध्याकाळी माझी पत्नी चि. सौ. साधना आश्रमात गेली होती. इकडे मला दुखत होते व उठवत नव्हते तरीही साधनेला बसावेसे वाटू लागले. व तशाच स्थितीत मी श्रींचे फोटो समोर जाऊन ( नित्याचे बैठकीचे जागी ) बसलो व श्रींचे स्मरण केले आणि ध्यानात गेलो. आश्चर्य म्हणजे क्रियाही झाल्या व मला एकदम बरे वाटले. शेवटी साधनेत मी महाराज आले, महाराज आले असे म्हणत होतो. नंतर माझी पत्नी चि. सौ. साधना आश्रमातून आली. व मला बैठकीवर साधना करताना पाहून तिला आश्चर्य वाटले. ती म्हणाली आश्रमात दर्शन घेताना श्रीं नी तुमची चौकशी केली की ते का आले नाहीत ? तर मी सांगितले त्यांना मुळीच बरे नाही. उसण भरली आहे व झोपून आहेत, नीट उठताही येत नाही. त्यावर श्री म्हणाले काळजी करू नका, त्यांना बरे वाटेल. व खरोखरीच मला बरे वाटले व माझे नित्याप्रमाणे

व्यवहारही लगेच सुरू झाले. श्री सद्‌गुरु आपल्या शिष्यांकरिता काय करीत नाहीत ? सर्वच करतात. सर्व बाबतीत शिष्यांच्या पाठीशी समर्थपणे उभे राहून त्यांना मार्गदर्शन करतात व पुढे नेतात. असा माझा नित्य अनुभव आहे.

(३) हा तिसरा अनुभव मला स्वत:ला आलेला नाही. परंतु माझे मुंबईचे परमप्रिय गुरुबंधूना आलेला आहे. मी तो केवळ श्रींचे प्रेरणेनेच देत आहे. ह्या अनुभवावरून असे दिसेल की प. पू. श्रीदत्त-महाराज किती मोठे थोर सत्पुरुष आहेत व त्यांच्या मागे त्यांची परंपरा कशी समर्थपणे उभी आहे.

पूर्वी एकदा प. पू. श्रीमहाराज आजारी होते. श्रीमहाराज आजारी आहेत हे कळल्यावर हे आमचे परमप्रिय गुरुबंधू श्रीमहाराजांना येऊन भेटून गेले व चिंता करू लागले की श्रीमहाराजांना आराम कसा पडेल ? बरे कसे वाटेल ? आपल्याला काही करता येईल का ? ज्या विषयी आपल्याला प्रेम असते तिकडेच आपला ओढा असतो व त्या गोष्टीचेच आपण चिंतन करीत असतो. ह्याप्रमाणे ह्या गुरुबंधूचा सारखा विचार चालला होता की आपल्याला श्रीमहाराजांकरिता काहीतरी केले पाहिजे, जेणे करून त्यांना आराम वाटेल. अशाच विचारात असताना एका रात्री त्यांना खालील स्वप्नदृष्टांत झाला. स्वप्नात त्यांनी प. पू. गुळवणी महाराजांना झोपाळ्यावर बसलेले पाहिले. त्यांचे मागे प. प. श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज उभे होते. व त्यांच्या मध्ये श्रीगुळवणी महाराजांचे मागे प. पू. श्री दत्तमहाराज शांतपणे झोपले होते. प. पू. श्री गुळवणी महाराजांनी अत्यंत शांतपणे आमच्या ह्या गुरुबंधूंकडे पाहिले व हसत त्यांना म्हणाले "तुम्ही कशाला श्री दत्तमहाराजांची काळजी करिता ? त्यांची काळजी घेण्यास आम्ही समर्थ आहोत. काळजी करू नका."

व स्वप्न संपले : ह्या अनुभवावरून, दृष्टांतावरून स्पष्ट होते की प. पू. श्रीदत्तमहाराज हे श्रीदत्तच आहेत व त्यांचेमागे केवढी मोठी थोर परंपरा समर्थपणे उभी आहे.

प. पू. श्रीदत्तमहाराजांनी वेळोवेळी केलेले उपदेशामृत.

(१) मंत्रानुष्ठानाने / मंत्रजपाने किरकोळ प्रारब्ध जळून जाऊ

शकते, पण काही गहन मोठी कर्मे मात्र भोगावीच लागतात. साधनाने त्याची तीव्रता मात्र कमी होते.

(२) साधनेत येणाऱ्या अडचणी दृढ निश्चयाने केलेल्या साधनेमुळेच नाहीशा होतात. त्याकरिता साधन होत नाही म्हणून तक्रार न करिता रोजचे साधन नियमितपणे करावे.

देवाकडे अनुष्ठान करून लोक काही मागतात, देव त्यांना ते देतोही. पण जर साधकाने साधन, नामस्मरण केले व देवाकडे काहीच मागितले नाही तर देवच त्याची सर्व बाबतीत काळजी घेतो.

. "अनन्यार्श्चितयन्ते माम्........"

प्रारब्धावर देह टाकणे हे फार कठीण आहे. असे करण्यास ठाम भूमिका, देवावर विश्वास लागतो. हे प. प. श्री वासुदेवानंदसरस्वती स्वामी महाराज, (मोठे महाराज) श्रीगुळवणी महाराज करू शकले. कारण ते साक्षात श्री दत्तस्वरूपच होते.

(५) मुमुक्षुने / साधकाने नेहमी संत सत्पुरुषांनी दाखविलेल्या मार्गानेच जावे, त्यातच त्यांचे कल्याण आहे.

(६) प्रारब्ध म्हणजे तरी काय पूर्वी केलेल्या कर्माचे फळाचा संस्कार म्हणून माणसाने नेहमी सत्संगतीच धरावी. सत्कर्मेच करावीत.

(७) नेहमी नामस्मरण करावे. ध्यान करावे. आपल्या श्री सद्गुरूंचे ध्यान केल्याने पापक्षय होतो.

(८) सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे साधन. नियमितपणे करावे व जे काही घडते ते तटस्थपणे साक्षित्वाने पहावे.

[ह्यात महत्त्वाचे म्हणजे प्रकृतीही त्रिगुणात्मक आहे व तिचे कार्य अव्याहतपणे चालू आहे. प्रत्येक व्यक्ती ही आपले प्रारब्ध भोग भोगीत असते. साधनेला बसल्यावर आपण साक्षित्वाने होणाऱ्या मानसिक शारीरिक क्रिया पहात असतो. आपण द्रष्टा साक्षी असतो. हाच द्रष्टा साक्षी भाव साधना झाल्यावरही ठेवून रहाता आले पाहिजे व तोच साक्षीभाव रहाण्याचा अभ्यास करणे हे फार महत्त्वाचे आहे, आपले काय होते की साधना संपल्यावर आपण ह्या सर्व गोष्टी विसरतो. जाणतेपणे साधना करीतच नाही. साधना ही आपल्या प्रत्यक्ष जीवनात उतरली पाहिजे. रोजच्या व्यवहारात आलो की आपण त्या विषयाशी इतके तादात्म्य

पावतो की आपण विषयरूप होऊन जातो. ह्या दृष्टीने श्रीसम रामदासस्वामींचा एक श्लोक फार चांगला अर्थपूर्ण आहे.

" निरूपणी जी सदृवृत्ती होते.
स्थळ त्याग करिता सवेची जाते.
काय करू रे काही कळेना- - - -

याचा आपण विचार केला पाहिजे व सतत अभ्यास केला पाहिजे. आपल्याला मिळालेले महायोग साधन हे महान साधन आहे. त्यामुळे साधनेवर भर देऊन सतत अखंड नामस्मरणही केले पाहिजे. सतत त्याचा ध्यास, अभ्यास केला पाहिजे. जेव्हा आपण त्या विषयाचा ध्यास घेऊ त्यावेळी त्या विषयाशी तादात्म्य पावू व त्यातून जीवनाचा खरा अर्थ आपल्याला कळू शकेल. आणि आत्मज्ञान-साक्षात्कारापर्यंत आपण पोहोचू शकू.

आज आपण सर्व गुरुबंधु मिळून प्रार्थना करू या की आमच्या सद्गुरूंना प. पू. श्री. दत्तमहाराजांना आयुरारोग्य, दीर्घायुष्य लाभो व आम्हा सर्वांकडून उत्तम प्रकारे साधन होऊन त्यांची सेवा ही आमच्या कडून होवो !

(९) श्री सद्गुरु हे एक तत्त्व आहे व ते तत्त्व निरनिराळ्या अंगांनी, बाजूंनी आपल्या शिष्याला घडवीत असते. खाली देत असलेला अनुभव मलाच आलेला आहे. परंतु तो स्वामी श्री माधवनाथ महाराज (प. पू. सद्गुरु श्री स्वामी स्वरुपानंदांचे परंपरेतील) यांचे विषयीचा आहे.

माझी पत्नी चि. सौ. साधना हिला स्वामी श्री. माधवनाथ यांनी अनुग्रह दिला आहे. व आम्ही दोघेही वेळोवेळी श्री स्वामींच्या रसाळ अशा प्रवचनांना जात असतो. जुलै १९८८ मध्ये गुरुपौर्णिमा जवळ येत होती. आम्हा दोघांनाही त्याचे वेध लागले होते. अशा वेळी आम्हा उभयतांचा संवाद व्हावयाचा की, ही म्हणायची श्री स्वामींची पूजा केली पाहिजे. उत्तमोत्तम गोष्टी, धोतर इत्यादी दिल्या, केल्या पाहिजेत. मी मात्र नेहमी म्हणायचो की अग श्री सद्गुरूंची खरी सेवा म्हणजे त्यांनी दाखविलेल्या मार्गाने जाणे. तो आचरणात आणणे. त्यांनी सांगितलेली, दिलेली साधना नियमितपणे करणे. ह्याचा अर्थ असा नव्हे की गुरुपौर्णिमेचे दिवशी श्री गुरूंची पूजा करूच नये.

उलट जरूर अत्यंत प्रेमाने करावी. परंतु अखंड साधन करणे मुख्य. ही गोष्ट मी २/३ वेळा तरी तिला बोललो. व गुरुपौर्णिमेच्या जवळपासच श्री स्वामींनी दृष्टांत दिला. स्वप्न असे पडले की, मी स्नान करून नदीवरून उघडा पंच्यावर एका रस्त्याने येत आहे. मनात असा विचार आहे की आज श्री स्वामी माधवनाथ माझेकडे पूजेला येणार आहेत व आम्हाला त्यांची पूजा करायची आहे. तेवढ्यात समोर हिरवळ व मैदान दिसले. व तेथेच श्री स्वामी व त्यांचा शिष्यपरिवारही सोबत दिसला. त्यांचे बरोबरच बाजूलाच माझी पत्नी चि. सौ. साधनाही होती. मी पुढे होऊन श्री स्वामींच्या पायावर डोके ठेवले. त्यावेळी श्री स्वामींनी माझ्या पाठीवरून अत्यंत प्रेमाने हात फिरवला व म्हणाले अरे, तुझी पूजा झाली, बरं का ! त्यावेळेस मी त्यांच्या शिष्य-परिवाराकडे बघून म्हणालो, 'आपली तर ११॥ वा. दुपारी वेळ ठरली होती. तुम्ही जरा लवकरच आलात.' तेव्हा स्वामी हसले व त्यांनी आशीर्वाद दिला. त्या हसण्यातच मला जाणवले की त्यांना म्हणावयाचे आहे की अरे श्री सद्गुरूंनी दिलेले साधन नियमित करून त्यांनी दाखविलेल्या मार्गाने जाणेच हीच खरी श्रींची पूजा आहे असे वागण्यानेच श्रीसद्गुरूंना संतोष व समाधान होते.

ही विचार करण्याची गोष्ट आहे की उभयतांचा संवाद श्री स्वामी महाराज ऐकणे कधीच शक्य नव्हते. परंतु श्री सद्गुरूतत्त्व हे विशाल, सर्वव्यापी, सर्वस्पर्शी आहे. व त्यामुळेच त्यांनी हे जाणून मला वर दिलेला दृष्टांत दिला.

॥ अवधूत चिंतन श्रीगुरुदेवदत्त ॥

* * *

---

## पत्रातील सुविचार

"ईश्वरस्मरणपूर्वक रोज वेळ मिळेल तेव्हा साधनाभ्यास चालू ठेवावा. इतर वेळी भगवन्नामस्मरण, संतांचे ग्रंथवाचन करीत असावे. याने चित्तशांती लाभून योग्य मार्गदर्शन होत राहील. 'उपासनेला दृढ चालवावे' व 'सत्कर्म योगे वय घालवावे' या संतांच्या आदेशाप्रमाणे वागून मनुष्यजन्माचे सार्थक करावे."

—दत्तात्रेय कवीश्वर

॥ श्री ॥

# प्रकाशमयी गुरुमाऊली

सौ. वासंती उद्धवराव जोशी, उस्मानाबाद

श्रावणमहिना ! श्री तुळजाभवानी जगदंबेच्या दरबारात मातेची महापूजा बांधण्याकरिता प. पू. महाराज प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी आलेले ! मी नुकताच त्यांचा अनुग्रह घेतलेला ! मनामध्ये गुरुमूर्तीला जवळून पाहण्याची, त्यांची पादचपूजा करण्याची अतीव इच्छा होती, आणि लवकरच तो महन्मंगल योग जुळून आला.

प. पू. दत्तकवीश्वर महाराजांचा परिचय झालेला नव्हता. पण छे ! माझा परिचय त्यांना होताच की ! जन्मलेल्या बालकाला आपल्या मातेची ओळख नसते पण मातेला मात्र त्या जन्मलेल्या बाळाची युगानुयुगे सहवास असल्यासारखी ममता असते. 'ओढ' असते. काळजी असते. जन्मल्या क्षणापासून ती त्याला सुखविण्यासाठी, घडविण्यासाठी-सुसंस्कृत करण्यासाठी उत्सुक असते, कृतिशील असते. तद्वतच माझ्या गुरुमाऊलीचे नाही का ? असा विचार मनात आला आणि मी प. पू. महाराजांना भेटण्यासाठी पुढे सरसावले. काय करू ? दमच निघेना ! प. पू. महाराज जगदंबेच्या पूजेनंतर महाप्रसाद घेऊन नुकतेच आपल्या खोलीत आले होते. त्यामुळे आत जावे की नाही ? असा विचार करीत होते. त्यांची काळजी घेणारे ज्येष्ठ भक्त तेथे होतेच ! ते म्हणाले "महाराजांची विश्रांतीची वेळ आहे, नंतर भेटा." मलाही ते कळत होते. पटत होते. पण दुसरे दिवशी दूरच्या गावी नोकरीवर हजर व्हायचे होते. आजच पादचपूजा व्हायला हवी. मनाची कशी घालमेल चालली होती. इतक्यात "ये हृदयीचे ते हृदयी ओतिले ! " याचा मला अनुभव आला. खोलीतून महाराजांचा आवाज आला, "येऊ द्या त्यांना आत ! " ते शब्द आत्मा थंड करून राहिले. मी लगबगीनेच आत गेले. प. पू. महाराजांचे चरणी नतमस्तक होऊन मनीचे 'गूज'

थरथरत्या आवाजात महाराजांना सांगितले. त्यांनी श्रीगुरुजीना हाक मारली व म्हणाले, "यांच्या पूजेची वेळ ठरवा!" श्री गुरुजी थोडेसे घुटमळले. पण लगेच म्हणाले, 'आज संध्याकाळी ५–५॥ च्या सुमारास सवड आहे. तेवढ्यात जायचे का?' प. पू. महाराज 'हो' म्हणाले. ब्रह्मानंद झाला! श्री. गुरुजींकडून पूजा साहित्याची यादी घेतली. आम्ही भगिनी चि. मंदा, मीरा, गीता यांनी सर्व तयारी भराभर अतीव उत्साहाने केली. सुंदर हार गुंफले. घर – घर कसचे ते? या मुलींची विद्याभ्यासासाठी केलेली छोटीशी खोली. त्या छोट्याशा विद्यार्थिनींच्या कुटीत एका महान ज्ञानयोग्याने तत्काळ येण्याचे आमंत्रण स्वीकारले. सारखे आनंदाचे गहिवर दाटून येत होते. घरात असलेले सामान नीटनीटके करून खोली स्वच्छ करून सजविली. प. पू. महाराजांना बसण्यासाठी एका कोपऱ्यात बैठक तयार केली. वर घालण्यासाठी शेजाऱ्याकडून मृगाजिन मिळाले. मेणबत्त्यांची रोषणाई केली. चौरंगाला आरास केली. त्यासमोर सुंदर रांगोळी घातली. प. पू. महाराजांच्या समोर नयनमनोहर रांगोळी घातली. प्रसादाचे साहित्य तयार केले. दूध आटवले. प. पू. महाराजांना काय द्यायचे? ते काय घेतील बरे आपल्याकडे? एवढ्या जवळून त्यांच्याशी कसे वागावे? काही काही सुचत नव्हते. तरीपण सर्वांचे हात सारखे चालूच होते. अशारीतीने सर्व तयारी होऊन पाच केव्हा वाजले ते कळलेच नाही.

गल्लीत ज्याच्या–त्याच्या तोंडी, "अहो! पोरींच्या खोलीवर प. पू. महाराज येणार आहेत. –खरं का? छे! हो! ते काय येतात पोरीसोरींच्या खोलीवर! त्यांच्या पूजेसाठी रांगा–नंबर लागलेले असतात. मोठ–मोठी–मान्यवर, असामान्य माणसे सदैव त्यांच्या अवती भोवती असतात. त्यांना कुठली सवड?" असे काही काही कानांवर पडत होते. मन धास्तावत होते. पण उत्साह वाढतच होता. अंतर्यामीही खात्रीच वाटत होती की– प. पू. महाराज येणार म्हणजे येणारच! अंगावर कसे आनंदाचे रोमांच उठत होते. माऊलींच्या प्रेमपान्ह्याचा वारंवार उमाळा अंतरी दाटत होता. मन तृप्त तृप्त होत होते. ५–३० झाले. छोट्या भगिनी साशंक होऊ लागल्या. 'अजून कसे येत नाहीत ग महाराज आक्के?' 'अग येतीलच एवढ्यात! निघतच असतील' 'अग

पण त्यांना आणायला आपण कार नाही पाठवली ?' 'अग पण त्यांनी आपला पत्ता विचारून घेतलाय. फारसे लांब नाही तुमचे घर. मी चालतच येईन असे ते मला म्हणालेत.' आणि 'अवधूत चिंतन श्री गुरुदेवदत्त !' चा गजर कानी पडला. आम्ही भगिनी बोळाकडे धावलो! दुरून प. पू महाराज ५-६ शिष्यांसमवेत येत असलेले दिसले. लगबग उडाली. छोटी गितू-जलकुंभ महाराजांच्या चरणांवर अर्पण करून कृतार्थ झाली. महाराज अतीव प्रसन्न दिसत होते. मोठ्या दरवाज्यातून आत येत असताना छोटी मुले-मुली गच्चीवर उभी राहून नाजूक सुगंधी प्राजक्त फुलांचा, गुलाब पाकळयांचा वर्षाव प. पू. महाराजांवर करीत होती. आणि प. पू. महाराज आत आले. मी पाद-प्रक्षालनासाठी त्यांच्या चरणांवर पंचामृत घातले. नेत्र आनंदाने पाझरत होते. औक्षणासाठी हातात नीरांजन तेवत असलेले ताम्हन घेतले. आणि महाराजांच्या भाली कुंकुमतिलक कसा कोठे लावला कुणास ठाऊक ! पण-पण-एकदम महाराजांच्या कपोलातून एक प्रकाशझोत निघाला. तो प्रकाशझोत मोठा होत होत एवढा मोठा झाला की त्यापुढे मला काहीच दिसेनासे झाले. माझे डोळे दिपून गेले. महाराजांच्या जागी एक मोठा प्रज्ज्वलित नि प्रसन्न प्रकाशझोत दिसू लागला. मी अत्यानंदाने डोळे मिटले तरीही सगळीकडे प्रकाशच प्रकाश दिसू लागला. ही अवस्था किती वेळ होती कुणास ठाऊक ! सगळे शांत ! प. पू. महाराजांनी 'हां ! हां ! शांत व्हा !' असे म्हणून किंचित डोक्यावर स्पर्श केल्यासारखे वाटले व मी हळूच डोळे उघडले. थरथरत्या हाताने प. पू. महाराजांना औक्षण केले. माझ्यानंतर छोटया भगिनींनीही औक्षण केले. प. पू. महाराज छोटयाशा खोलीत छोटयाशा आसनावर बसले. ते अतीव प्रेमाने-कौतुकाने सारे पहात होते. पूजेची सर्व सिद्धता त्यांच्या मनास आली. श्री दीक्षित गुरुजींनी यथासांग पूजा सांगितली. माझे पती श्री. उद्धवराव जोशी व मी मध्ये बसून बाजूने भगिनीगण बसला. आम्ही सारे हर्षविभोर झालो होतो. प. पू. महाराजांनी आमच्या समवेत श्री. दत्तगुरूंची आरती म्हटली. नैवेद्य आरतीनंतर प. पू. महाराजांनी स्वहस्ते सर्वांना प्रसाद दिला. एकच किलो पेढे आणले होते. एक डझनच केळी आणली होती. परंतु तेवढाच प्रसाद शे-पाचशे लहान थोरांना पुरून उरला ! अगोबाई !

पोरींच्या घरी महाराज आलेत का ? असे म्हणून कौतुकाने, औत्सुक्याने स्त्री-पुरुष बऱ्याच लांबलांबून महाराजांना बघण्यासाठी, दर्शनासाठी येत. प्रसाद घेऊन जात. आम्हालाही परम प्रेमाने त्यांनी प्रसाद दिला. आम्ही सर्वांनी अगदी जवळून दर्शन घेतले. आम्ही साऱ्याजणी सनाथ झालो. आमची आई या छोटया भगिनी अगदीच अजाण असता स्वर्गवासी झालेली. तेव्हा त्यांना कोठल्याही प्रकारचा त्रास होऊ नये, त्यांच्या वास्तव्याला प. पू. महाराजांचे पाय लागावेत म्हणजे सर्वपरीने त्यांचे कल्याण होईल ही सदिच्छा फलद्रूप झाली. सर्वांची शिक्षणे चांगल्या रीतीने पार पडली. त्या सुस्थळी पडल्या. त्यांना मुलं-बाळं-ऐश्वर्य सारं मिळालं.

मोठया समाधानाने महाराज निघाले. ती घटिका कधी संपूच नये असे वाटत होते. श्री. रघुनाथरावांची सारखी चुळबूळ चालली होती. कित्ती निवांत बसलेयत महाराज ! श्री दीक्षित गुरुजीही प्रसन्न होते. भारावलेल्या अवस्थेत आम्ही भगिनी बोळीच्या तोंडापर्यंत पोहोचविण्यास गेलो. "थांबा आता !" असे हात वर करून प. पू. महाराज म्हणत आहेत. तर ते प. पू. महाराज नसून प. पू. श्री गजानन महाराज आहेत असाच सारखा भास मला होत होता. तेच रूप सारखे डोळयांत दिसत होते. आणि महाराज दृष्टीआड झाले. सुदाम्याचे पोहे श्रीकृष्ण परमात्म्याने कसे आवडीने खाल्ले. विदुराच्या कण्या आपणहून त्याच्या घरी जाऊन खाल्ल्या. त्याच परमात्म्याने आमच्या घरी येऊन आमचे घोटभर 'दूध' पिऊन आम्हाला अमृत-प्राशनाचा आनंद दिला. अशा माझ्या भक्तवत्सल गुरुमाऊलीस माझे अनन्यभावे अनंत प्रणाम !

* * *

---

## पत्रातील सुविचार

"श्रीगुरुमहाराजांच्या कृपेने आपला साधनाभ्यास व्यवस्थित सुरू झालेला आहे. तो नित्य श्रद्धेने चालू ठेवावा. कल्याणाचा मार्ग आहे. पुण्यास गेल्यावर श्रीमहाराज बसतात त्या खोलीत बैठक करावी."

—दत्तात्रेय कवीश्वर

---

॥ श्री ॥

# चैतन्यमूर्ती दत्त कवीश्वर

सौ. वासंती जोशी, उस्मानाबाद

खड्र्याजवळील एक छोटेसे खेडे 'मोहरी!' नावाप्रमाणेच छोटेसे! तेथील जगदंबेच्या मंदिरावर कळस बसविण्याचा सोहळा प. पू. गुरुमाऊलीच्या हस्ते होणार असल्याचे आम्हाला समजले. अनायासे त्या दिवशी रविवार! बरेच दिवसांपासून गुरुमाऊलींचे दर्शन न झाल्याने मनाला सारखी हुरहुर लागून राहिलेली होती. नोकरी निमित्ताने मुद्दामहून पुण्यास माऊलीच्या दर्शनास जाणे अशक्य! अशावेळी ही शुभवार्ता समजली नि मन आनंद–विभोर होऊन उठले.

त्या मोहरी गावात माझी मैत्रीण सौ. शालिनी वकील व आमचे सारे कुटुंब सकाळी ९ वाजता येऊन पोहोचलो. साऱ्या गावात एकच धांदल चालली होती. महाराज येणार! साधू-सत्पुरुष येणार! फिरता फिरता एका घरात पूजेची बरीच तयारी चाललेली दिसली. म्हणून विचारपूस केली–उत्तर आले–हो! महाराज येथूनच निघणार आहेत. ब्रह्मानंद झाला. आम्ही त्या घराला चिकटलो! विचारपूस करताना देवीच्या मंदिरावर जो कळस बसवायचा होता तो तेथेच आहे असे कळले. तो मागून घेतला. सुंदर कळस! तो स्वच्छ केला घासघासून! मनात विचार आला असे कित्ती कित्ती 'जीवनरूपी कळस' "या" माऊलीने उत्तुंग आकाशात नेऊन पोहोचविले आहेत. मी कळसच घासत नव्हते तर–जणूकाही गुरुकृपेने अंतर्बाह्य माझे पापी–मलिन जीवनच घासून स्वच्छ करीत होते. ती कृती करताना अपार आनंद होत होता. त्या कळसाला मी व मैत्रिणीने सजविले. सुंदर सुगंधित फुलांनी सजविले. हळदी–कुंकवाचे सुरेख टिळे देऊन सजविले. गुरुमाउलीनेही आमची जीवने अशीच सुंदर–पवित्र विचार देऊन सजविली आहेत. आमची मने कळसाला बसविलेल्या सुगंधी फुलासारखी परिमलित–प्रसन्न केली

आहेत ! ठरल्याप्रमाणेच ठीक ९–३० ला महाराज जीपमधून आले. आम्ही सारेजण धावलो. गुरुमाऊली पाहून नेत्र तृप्त झाले. आनंदाचे गहिवर दाटले. पायी माथा टेकून दर्शन घेतले. औक्षण केले. सुवासिनींनी जलकुंभ आणून पादप्रक्षालन केले. उत्साहाला कसे उधाण आले होते. छोटीशी 'मोहरी' प्रसन्न वातावरणाने मोहरली होती. धुंद झाली होती. मंत्रमुग्ध झाली होती. जीपच्या पुढे वाजंत्री, लेझीम, धर्मध्वज, परातीत ठेवून किसानाने डोक्यावर घेतलेल्या कळसाची मिरवणूक–वाजत–गाजत निघाली. वातावरण 'अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त !' प. पू. दत्त कवीश्वर महाराज की जय अशा गर्जनेने दुमदुमून गेले होते. हळूहळू जीप पुढे जात होती. पावला–पावलावर सुवासिनी हौसेने जलकुंभ अर्पण करीत होत्या. "प्रत्येक सुवासिनीला हळदी कुंकू लावा !" असे महाराजांनी सांगितले. त्याप्रमाणे आम्ही हळदी–कुंकू लावीत चाललो होतो. महाराजांसमवेत असणारी मंडळी, ताई–जीपमध्ये बसा म्हणून आग्रह करीत होती. परंतु 'त्यांच्या' जवळ बसण्यापेक्षा 'त्यांचा' 'मागोवा' घेत जाणेच मला जमावे –'कणभर'– तरी– असा विचार करीत मी जीपच्या मागून चालत होते. गावापासून बऱ्याच दूरवर उंच डोंगर नि त्या डोंगरावर देवीचा तांदळा डोंगराला चिकटून असलेला. तो डोंगर कोरून–खर्डा येथील 'न्यू इंग्लिश स्कूल संस्थेच्या मुख्याध्यापकाने – देवीचे मंदिर बांधून त्यावर कळस बसविण्याचा संकल्प केला होता. हे शिक्षक पायाने अधू असलेले ! त्यांनी अथक प्रयत्न व कष्ट करून वर्गणी जमविली. आधुनिक पद्धतीने युक्त असे मंदिर त्या उंच डोंगरावर बांधून घेतले. आणि त्या मंदिराला कळस बसविण्याचा मान आपल्या गुरूंना–प. पू. दत्तमहाराजांना दिला. खरोखरच गुरुकृपेने– "पंगुम् लंघयते गिरिम् ।" हे दृश्य यांचि डोळा पहावयास मिळाले. गुरुमहाराजही आपल्या शिष्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी एवढ्या दुर्गम ठिकाणी आले. शिष्याच्या कार्याचा कळसही गुरूंनीच बसविला. तो शिष्य धन्य झाला. गावकऱ्यांनी त्याला प्रेमाने भरआहेर व एक सुवर्ण अंगठी अर्पण केली. तत्क्षणी त्या शिष्याने ती गुरुचरणी अर्पण केली. पहाणारांचे डोळे दिपले. नेत्र आनंदाने पाझरले. गहिवराने मने दाटली. सुवर्णकलश मंदिरावर बसविण्याचा सोहळा चैतन्यमय

वातावरणात साजरा झाला. मोहरीची जगदंबा या अपूर्व दृश्याने गहिवरल्याचा भास झाला मला !

डोंगर चढताना किती कठीण उभी चढण ! पण महाराज बोलत हसत–हसत–चढत होते. भोवती शिष्यपरिवारही भान विसरून चढण चढत होते. बाजूला मंजूळ आवाजात सरिता वहात होती. तो वाहण्यातला मंजूळपणा गुरुमाऊलीकडून तर तिने घेतला नाही ना असे मला वाटून गेले. माउलीच्या सहवासात मोठमोठे पाषाण सुद्धा भावमय होऊन आनंद व्यक्त करण्याचा प्रयत्न करीत आहेत असे वाटले. हिरवी वनश्री अधिकच हिरवीगार–सस्यश्यामलरूपाने सारखी आनंदहिंदोळे घेत होती. सोहळा संपवून आम्ही पुन्हा गावात डोंगरपायथ्याशी आलो. भरलेल्या नयनानेच गुरुमाऊलीचा निरोप घेत होते. तोच–ते– 'चैतन्यरूप' डोळा भरून राहिले. नि 'सदैव कार्यरत–चैतन्यरूप' रहाण्याचा प्रयत्न करा–असे–'ते मनिचे– ये मनि' सांगूनि गेले.

श्री गुरुचरणी 'अर्पण' असो !

* * *

---

## पत्रातील सुविचार

"अतिथी कितीही आले, कितीही दिवस राहिले तरी न कंटाळता, तनु–मन–धनाने होणारे कष्ट सोसून अतिथींना स्वत:प्रमाणे सांभाळणारी सज्जन मंडळी आजही ईश्वरकृपेने पाहाण्यास मिळतात. स्त्रियांना पुरुषांपेक्षा संसारात अधिक दक्षता, कर्तव्यनिष्ठा बाळगावी लागते. माहेरची अथवा सासरची कोणतीही भगिनी आली तरी दोघींचेही आतिथ्य मन:पूर्वक करणे हा प्रयोग सोपा नाही. आदरातिथ्य सारख्या भावनेने करणे या समदृष्टीलाच परमार्थात महत्त्व आहे. यामुळेच त्रिमूर्तींना अनसूयेचे घरी बाळ होऊन रहावे लागले. हे शिक्षण कोठल्याही महाविद्यालयातून मिळत नाही. तर ईशकृपेने लाभलेल्या सत्संगतीने मिळते."

–दत्तात्रेय कवीश्वर

---

# प. पू. श्रीदत्तमहाराजांचे वस्तुनिष्ठ दर्शन

नित्य श्रीसान्निध्य निवासी रघुनाथ कुलकर्णी

संदर्भ– प. पू. श्रीदत्त महाराजांच्या नित्यसान्निध्याचे परमभाग्य लाभलेले श्री. रघुनाथराव कुलकर्णी यांनी प्रत्यक्ष अनुभवलेले श्रीचे अंतरंग व बहिरंग जीवन दर्शन या लेखात वस्तुनिष्ठपणे मांडले आहे. त्यांना सांगण्या–लिहिण्यासारखे विपुल आहे पण भौतिक मर्यादा ठेवून एका छोटया कलशात ही गंगा आपल्यासाठी त्यांनी दिली आहे. त्यांच्या लेखनात संक्षेपाच्या मर्यादा आढळल्या तरी विवेकी भावग्राही भक्तांना परम संतोषाचा लाभ होईल.

यद्यदाचरति श्रेष्ठचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः
स यत्प्रमाणं कुरूते लोकस्तदनुवर्त ते ॥

– संपादक

प. पू. श्रीदत्तमहाराजांसंबंधी लिहिणे फार कठीण काम आहे. त्यामुळे वाचकांच्यापुढे मी 'चक्षुर्वैसत्यम्' घटना प्रसंग जशा स्मरतील तशा देण्याचे ठरविले आहे. म्हणजे विचक्षण वाचक त्यातून हवा तेवढा बोध घेऊ शकतील. मला त्यांचे सान्निध्य मिळाले हे भाग्याचे असले तरी त्यांना नेमके समजून घेण्याची माझी कुवत नाही. ते माझ्या दोषांवर पांघरूण घालून सांभाळून घेतात याचीही मला जाणीव आहे. मुलाने आपल्या वडिलांसंबंधी काही आठवणी सांगाव्यात त्यातला हा प्रकार आहे. ही त्यांची स्तुती नसून वस्तुस्थिती आहे.

१. धारवाड येथे संस्कृत पाठशाळेचा शताब्दी महोत्सव मे ८९ मध्ये झाला. यासाठी पाठशाळेचे आजी व माजी विद्यार्थी, शिक्षक हे तत्पूर्वी दोन वर्षे तयारी करीत होते. या पाठशाळेशी दत्तमहाराज यांचे आत्मीयतेने ऋणानुबंध आहेत. येथे अध्ययन झाले व अध्यापनही काही काल केले. त्यामुळे येथे प. पू. दत्तमहाराजांसंबंधी अत्यंत आदराची, पूज्यतेची भावना सर्वांची आहे. या समारंभास पू. दत्तमहाराजांनी उपस्थित रहावे म्हणून तेथील मंडळींनी खूप प्रयत्न केले. धारवाडला

महाराज गेले होते तेव्हा, वाडीत मुक्काम होता तेव्हा आणि पुण्यातही प्रत्यक्ष भेटून खूप आग्रहाने निमंत्रण केले होते. पू. श्रीदत्तमहाराजांनाही या पाठशाळेबद्दल पूर्ण आदर आहेच. तेव्हा धारवाडच्या मंडळींची खात्री होती की पू. श्रीदत्तमहाराज उत्सवाला प्रमुख म्हणून उपस्थित राहून भूषविणार !

मलाही वाटत होते की महाराज धारवाडचे निमंत्रण स्वीकारतील आणि जाण्याचे जमवतील. कारण तत्पूर्वीच्या काळात पू. श्रीमहाराजांना श्रीगरुडेश्वर, श्रीनारेश्वर, बडोदा येथे श्रीमत् भागवत सप्ताहासाठी मुक्काम करावे लागले. या कार्यक्रमामध्ये केव्हा तरी मला धारवाडच्या कार्यक्रमाला जाण्यासंबंधी बोलतील असे वाटत होते. कारण या कार्यक्रमानंतर लगेच धारवाडचा कार्यक्रम होता. पण त्यांनी मजजवळ काहीच स्पष्ट उल्लेख केला नाही. त्यांच्या जाण्यासाठी गाडी, तिकिटे, वेळा हे ठरविणे, नक्की करणे यालाही फारसा अवधी राहिला नव्हता. मीच मधून मधून धारवाडला जाण्यासंबंधी विषय काढीत होतो. पण मलाही त्यांनी आपले मत प्रकट रूपाने बोलून दाखविले नाही.

मी मोठ्या बुचकळ्यात पडलो. तरी माझ्या पुष्कळशा प्रयत्नाने एकदाचे त्यांनी आपले मत प्रकट केले. त्यांची धारवाडला या समारंभासाठी न जाण्याची अंतरंगातली अडचण वेगळी होती. त्यांचे उत्तर ऐकून मी निरुत्तर तर झालोच पण निःस्तब्ध होऊन माझा मीच आत्मचिंतन करू लागलो. ते त्यांचे उत्तर तुम्हालाही चिंतन करायला लावील. आपण सर्व परमार्थ मार्ग स्वीकारलेले आहोत. आपल्या निर्दोष वाटचालीला या उत्तराचा आणि त्यांच्या वर्तनाचा लाभ होईल म्हणून ही आठवण देत आहे. त्यांनी मला असे उत्तर दिले–

"पूज्यता डोळा न देखावी । स्वकीर्ती कानी नायकावी ।
हा अमुका ऐसी नोहावी । सेचि लोका ।। १३।८८
तेथ सत्काराची गोठी । कें आदरा देईल भेटी ।
मरणेसी साठी । नमस्कारिता ।। १३।८९
तेथे गेल्यावर स्तुती करीत बसतील म्हणून न गेलेले बरे."

कोणते उत्तर केव्हा व कसे द्यावे याबाबतीत पूर्ण कुशलता दिसून येते.

कोणा हिंदी कवीने म्हटले आहे–

कञ्चन तजना सहज है। सहज स्त्रियाका स्नेह।
मान बड़ाई ईर्ष्या, दुर्लभ तजना येह ॥

मोठेपणाची इच्छा सोडणे सर्वांत कठीण म्हटले आहे. महाराजांच्या सर्व वर्तनातून त्यांचे अमानित्वच प्रगट होत आहे.

२. जानेवारी १९९० ला सहस्त्रचंडीयागाचा कार्यक्रम नाशिकचे श्री. रघुनाथराव दशपुत्रे यांनी तत्पूर्वी चार महिने ठरविला. त्याला जोडून त्यांनी त्यांच्या नातवाची मुंजही ठरविली. दशपुत्रे कुटुंबच महाराजांचे एकनिष्ठ भक्त. त्यांनी महाराजांना या कार्यक्रमास उपस्थित राहण्याची प्रार्थना केली. महाराजांनीही तत्काल होकार दिला. पुढे या मधल्या काळात महाराजांचा श्रीमत् भागवत सप्ताह पावसच्या श्रीस्वामी स्वरूपानंदांच्या मंदिरात व्हावा असे तेथील मंडळींना वाटले. ते निमंत्रण देण्यास आले. महाराजांनी नाशिकचा कार्यक्रम त्याच तिथीचा ठरला आहे असे सांगितले. मंडळींनी खूप आग्रह केला. महाराजांनाही वाटले सार्वजनिक कार्यक्रम जमवून आणणे अवघड असते. व्यक्तिगत कार्यक्रम थोडा पुढे ढकलण्यास सांगितला तर दशपुत्रे आपलेच आहेत, ऐकतील, असा विचार करून पावसकरांना होकार दिला.

श्री. दशपुत्रे कुटुंबीयांचा आणि त्यांचे उपाध्याय वे. शा. सं. श्री. महाशब्दे या सर्वांचा विरस झाला. त्यांना फार वाईटही वाटले. पण तेवढ्यात अनिवार्य कारणाने पावसचा कार्यक्रम पुढे ढकलला. त्यामुळे नाशिकचा कार्यक्रम पक्का झाला.

नंतर ठरल्यावेळी महाराज नाशिकला आले. तेथे महाराजांच्या स्वागतासाठी मंडळी उपस्थित होती. तेवढ्यात सर्व प्रथम उपाध्याय श्री. महाशब्दे यांना महाराज म्हणाले–

"आपण काढलेला मुहूर्त उत्तम होता."

सहज अशा वाक्याने त्या मंडळींना शब्दातीत समाधान वाटले.

३. एकदा पू. श्रीनाना महाराज तराणेकरांची भेट झाली त्यावेळचा प्रसंग आठवतो. पू. श्री. नानामहाराज म्हणाले. "दत्तमहाराजांमध्ये विनय आहे. विद्या आहे. अमानित्व आहे. श्रीदत्तप्रभूंचाच जणू अवतार आहेत." वर्णन पुढे चालू राहिले होते. पण तेवढ्यात पू. श्रीदत्तमहाराज

म्हणाले. " आपला दिवस कुठला ठरला ? " असे कुशलतेने दोन शब्द वापरून आपली स्तुती बंद पाडली.

४. श्रीक्षेत्र बार्शी येथे पू. श्री. डोंगरे महाराजांचा श्रीमत् भागवत सप्ताह संपन्न झाला त्यावेळचा प्रसंग--

बार्शीकर भक्तांनी पू. श्रीमहाराजांना एक दिवस तरी या सप्ताहात येऊन जावे म्हणून आग्रह धरला. त्याप्रमाणे एका संध्याकाळी आम्ही बार्शीत पोचलो. श्रीगणेशमंदिरात उतरलो.

पू. श्रीमहाराज आणि पू. श्रीडोंगरे महाराज या दोघांनाही शक्य तेवढे लौकर भेट घेण्याची इच्छा होती. प्रवासामुळे रात्री जाणे दोघांनी टाळले. सकाळी लवकर उठून आपले आन्हिक उरकून भेटीला जाण्याच्या तयारीला दोघेही लागले. आणि पू. श्री. डोंगरे महाराज पू. श्री. महाराजांकडे आले.

जवळ येताच दोघेही नमस्कारासाठी खाली वाकलेले. वर उठावयास दोघेही तयार नाहीत. पू. श्रीमहाराज म्हणाले—

" शेवटी गोपाळकृष्णाला यावं लागलं ! "

यावर पू. श्री. डोंगरेमहाराज म्हणाले,

" नाही. मी दर्शनाला आलो आहे. "

येथून (गणेशमंदिरातून) अति आदराने श्रीमत् भागवत मंडपात नेण्यात आले. व्यासपीठावर दोघेही आल्यावर पू. श्री. डोंगरे महाराजांनी महाराजांना साष्टांग नमस्कार घातला व म्हणाले,

" आज आपले निरूपण झाले पाहिजे. "

महाराज म्हणाले— " आपले चालू द्या. " शेवटी आग्रहाने पू. श्री डोंगरे महाराजांनी आपल्या आसनावर महाराजांना बसविले. महाराजांनी पाच मिनिटे सेवा केली व पू. डोंगरे महाराजांना पुनः 'पुढे चालू करावे' असे सांगितले.

तेव्हा डोंगरे महाराज पुनः साष्टांग नमस्कार घालून म्हणाले,

" व्यासांची आज्ञा " आणि निरूपण केले.

हा प्रसंग सर्व बार्शीकर प्रेक्षकांनी—श्रोत्यांनी पाहिला तेव्हा अक्षरशः सर्वांच्या डोळ्यांतून भक्तीप्रेमाचे अश्रू वहात होते. देवदुर्लभ दृश्य पाहतांना सर्वजण रोमांचित झाले होते.

५. कांची कामकोटी पीठाचे श्रीमत् शंकराचार्य पू. श्रीचंद्रशेखरेंद्र सरस्वती स्वामी महाराज उगार खुर्द येथे कृष्णेकाठी असताना पू. श्रीदत्तमहाराज त्यांचे दर्शनास गेले होते.

सकाळी ९।१० वाजता आम्ही तेथे पोचलो. स्वामी महाराज बहिर्दिशेहून आले. थंडीमुळे गेटाजवळ उन्हात बसले. श्रीदत्तमहाराजांना स्वामींच्या दर्शनाची उत्कट इच्छा म्हणून त्यांनीही मुखमार्जनादी काही न करता भेटीसाठी गेले.

पू. श्रीस्वामी उन्हात बसले होते तेथे जाऊन महाराजांनी साष्टांग नमस्कार घातला. स्वामींनी महाराजांना बसण्यासाठी आसन देवविले.

यानंतर दोघांची शास्त्र चर्चा सुरू झाली ती १।। वाजेपर्यंत. त्यानंतर सर्व उरकून भोजनास ३।४ वाजले. रात्रीही १० वाजता श्री. आचार्य स्वामींचे श्रीमहाराजांना पुन: चर्चेसाठी बोलावणे आले. यावेळी रात्री २।३ पर्यंत चर्चा चालली होती. दुसरा दिवस आराधनेचा. आराधना झाली. रात्री पुन: चर्चा झाली.

३ दिवस अशी शास्त्रचर्चा चालली होती. स्वत: आचार्य बोलवून घेत होते.

एकदा वाक्यार्थाबद्दल कांचीकामकोटीचे पीठाधीश्वर श्रीचंद्रशेखरेंद्र स्वामींनी आपल्या गळ्यातील हार महाराजांचे गळ्यात घातला. या घटनेमधून महाराजांचे विद्येचे स्थान अति उच्च असल्याचे दिसून आले.

बीडच्या मुक्कामात शृंगेरी पीठाचे पीठाधीश्वर यांच्या भेटीचा योग आला होता. त्यांनीही श्रीमहाराजांशी अत्यंत आदराने, गंभीरपणे, अत्यल्प काळ शास्त्रचर्चाही केली. यावेळचे छायाचित्र श्रीवासुदेवनिवासाच्या अंकात पूर्वी आले आहे.

६. दोन वर्षापूर्वी श्रीदत्तजयंतीचे अगोदर कोसंब्याचे श्री. पंडितजी मुंबईस आले होते. त्यांना भेटण्यासाठी श्रीमहाराज मुद्दाम गिरगावला गेले होते. श्रीपंडितजी रागदारीत उत्तम भजने म्हणतात. ती ऐकण्याची महाराजांची नेहमी इच्छा असते. यावेळी श्रीपंडितजींनी मालकंस रागातील भजने म्हटली. श्रीमहाराजांनी त्या अगोदर माझ्याजवळ मालकंस रागाची प्रशंसा केली होती. श्रीदत्तमहाराजांना मालकंस रागातील

भजने ऐकण्याची इच्छा झाली म्हणून ते अंतर्ज्ञानाने जाणून श्री. पंडितजींनी तशी भजने म्हटली का श्री. पंडितजी आज मालकंस रागातील भजने म्हणणार हे अंतर्ज्ञानाने ओळखून त्या रागाची प्रशंसा श्रीदत्तमहाराजांनी केली हे त्यांचे त्यांना माहीत. पण अशातला हा प्रकार होता एवढे मात्र आपल्या लक्षात आल्याशिवाय रहात नाही.

८. पू. श्रीदत्तमहाराजांसंबंधी काही छोटया प्रसंगांतून–शब्दांतून दिसणारे त्यांचे अंतरंग दर्शन–

**बोलणे**

एकदा बोलता बोलता प्रसंगवशात पू. श्री म्हणाले,

" न बोलायचेच शिकावे लागते, बोलता तर न शिकवता येत असते. या गोष्टीचा सर्वांनाच अनुभव आहे. न बोलण्याचा अभ्यास करावा लागतो. न बोलण्याची गोष्ट पू. श्रीमहाराजांमध्ये प्रकर्षाने पाहावयास मिळते.

कुठल्याही गोष्टीला स्पष्टपणे नकारात्मक उत्तर देत नाहीत. मग ती गोष्ट कितीही अवघड असो. एकदम पाशुपतास्त्राचा वापर करू नये. सकृतदर्शनी हो म्हणतात नंतर माझ्याजवळ हवी असेल त्या गोष्टीचा उलगडा होतो."

**स्नान**

मंगलस्नान घ्यावयाचे म्हणजे त्यांना मनापासून आवडत आही. कारण तेलकटपणा रहातो, व अनेकजण पाणी घालतात, ते पाणी अंगात मुरतं–त्याचा परिणाम पडसं–खोकला–ताप सुरू होतो. तरीसुद्धा निमूटपणे सहन करतात, व शांतपणे काहीही न बोलता दिनचर्या चालू रहाते पुष्कळ ठिकाणी प्रतिकूल परिस्थिती असतानाही हा मंगलस्नानाचा सोहळा शांतपणे सहन करतात. ताप असतानाही भक्तांच्या इच्छेसाठी नाही म्हणत नाहीत.

**एकाग्रता**

पू. श्रीमहाराजांच्या एकाग्रतेचे वर्णन कागदावर उतरू शकत नाही. त्यांचे समक्ष दर्शन म्हणजे ब्रह्मदर्शनच आहे. नित्याच्या उपक्रमामध्येसुद्धा एकाग्रता दिसून येते.

श्रीमत् भागवत प्रवचनाचे वेळी त्यांची एकाग्रता विशेष जाणवते.

४–४ तास किरकोळ हालचाल सोडली तर सिद्धासनाची मांडी तशीच रहाते. ही आसनसिद्धी आहे पण तसे ते भासवीत नाहीत.

दोन तास अर्थकथन झाल्याचे त्यांना भान नसते. त्यांना विश्रांतीची गरज भासू लागते. त्यावेळी खंड पाडण्याचे काम माझ्याकडे येते. समोर जाऊन हाताची हालचाल केली तरी अमृतमय वाणी चालू रहाते. त्यांच्या ओघवत्या वाणीत खंड पडत नाही. अशावेळी दोनचार शब्द मधेच बोलून उठवावे लागते.

५–७ वर्षापूर्वी पू. श्रीमहाराज, चैत्र महिन्यात, वाडीतील श्रीगुरुनिवासात रहात होते. मागील बाजूस मागाचा कारखाना रात्रंदिवस चालू असतो. त्याची खट् खट् सारखी चालू असते. दिवसाचा हा त्रास एकवेळ सोसवेल पण रात्री या आवाजाचा झोपेला केवढा व्यत्यय ! पण दत्तमहाराजांचे यासंबंधीचे विधान असामान्य आहे. ते म्हणाले, "त्याच तालात झोपायचे म्हणजे त्रास वाटत नाही."

अशा प्रकारे प्रतिकूल वातावरणातसुद्धा तात्काळ समरस होऊन तक्रारीचे शब्दसुद्धा निघत नाही.

पुष्कळ वेळेला प्रवासात गाडीमध्ये दाटीवाटीत बसावे लागते. यातूनच विनोदात्मक रीतीने गैरसोयीमध्ये सुख मानायचे या धोरणाने 'सामानाचं टेकण आहे' अशा विनोदाने प्रवास सुसह्य करतात.

**मराठवाडा विदर्भादि भागातील भक्तांचे अपूर्व दर्शन**

खडर्यातील गल्ली गल्लीतील सर्व प्रजा महाराजांच्या मंत्रदीक्षेची अनुगृहीत आहे. घरी आलेली नवीन सून मंत्राश्रित करणे हे पहिले कर्तव्य समजतात. तसेच मुलं–मुली मोठ्या झाल्या की मंत्रानुग्रहाची वाट पहातात. श्री. पारगावकर हे असे भक्त आहेत की अजून नातवंडाकडे बोट दाखवून म्हणतात 'हा महाराजांच्या कृपेचा प्रसाद आहे.'

या लहानशा गावातील प्रत्येकाची श्रद्धा अशी आहे की, श्रीदत्तमहाराजांची उपस्थिती म्हणजे प्रत्येक कार्यातील यशाची खात्री. त्यांचे पत्र आशीर्वाद म्हणजे यशस्वितेचीं पावती.

कोणत्याही गावातून जाताना रस्त्यातच पुष्कळ भक्त दर्शन घेतात. हे सुद्धा लांबून नाही, पायावर डोके ठेवून, साष्टांग नमस्कार घालून नमस्कार करणार. कधी कधी अशावेळी एखादा भावावश

झालेला भक्त मध्येच घुसून पायात हात घालून किंवा डोके घालून नमस्कार करतो. तरीसुद्धा महाराज शांतपणे सहन करतात. त्यांच्या चित्ताची प्रसन्नता ढळत नाही. श्रद्धाभक्तीचे खरे दर्शन मराठवाड्यातील सर्व भागांत पहावयास सापडते. भक्तांच्या आग्रहामुळे घरोघर जाण्याने महाराजांची अतिशय दमणूक होते. तोल जातो. ताठ उभे राहवत नाही. पण भक्तांच्या इच्छेला नाही म्हणत नाहीत. एकदा मेहेकरला तर या प्रकाराने सहनशीलतेची परिसीमा झाली.

तुळजापूर–गाणगापूरची दरवर्षीची यात्रा अशाच भक्त मेळाव्यात होत असते. गेल्या वर्षी मात्र प्रकृतीने असहाय्यता फार केली. तरी सर्व ठरलेले कार्यक्रम कसे तरी पार पडले आणि महाराजांना तात्काळ पुण्यास यावे लागले. १६ वर्षांच्या काळात एवढा त्रास यावर्षी प्रथम झाला. महाराजांचे मनोधैर्य फार मोठे म्हणून सर्व त्रास सहन करीत शांतपणे पुणे गाठले.

महाराजांच्या खाण्यापिण्याच्या काहीही आवडीनिवडी नसतात. जे सर्वांना तेच त्यांना असले पाहिजे ही इच्छा मात्र आवर्जून सांगतात. कुठल्याही गावी गेले तर आर्त, पीडित, दुःखी भक्तांकडे जाऊन त्यांचे सांत्वन करून येण्यास कधीही विसरत नाहीत. पतीदुःखातील विरहिणीला सांत्वन करताना अत्यंत पटणारी उदाहरणे देऊन सांत्वन करतात. ‘देवमाता कौसल्येवरसुद्धा असा प्रसंग आला. दुःखाला काळ हेच औषध आहे.’ दुःखाची वार्ता कळताच तत्परतेने सांत्वनपर पत्र पाठवितात. तसे कोणाच्याही घरी मुक्काम झाला तर पत्रद्वारा कृतज्ञता व्यक्त करतात. दिलेला शब्द पाळण्याचा कटाक्ष असतो. गरीब–श्रीमंत भेद नसतो. लहानमोठ्या कार्यक्रमाविषयी भेद नसतो.

श्रीनृसिंहवाडी, श्रीगरुडेश्वर, श्रीनारेश्वर अगर कोणत्याही तीर्थक्षेत्री स्नानाला गेल्यावर प्रथम तेथील जलदेवतेला साष्टांग नमस्कार घालतात आणि मग स्नानाला उतरतात.

दर वर्षी अश्विन महिन्यात गुरुद्वादशीचे वेळी ५ दिवस व चैत्रात श्रीनारायणस्वामींच्या उत्सवात ८।१० दिवस वाडीत मुक्काम होतो.

पहाटे ३ च्या दरम्यान ‘दिगंबराची’ फेरी होते तेव्हा उठतात. ४ वाजता काकड आरतीला जातात. सतत नामस्मरण चालू असते.

काहीवेळ देवाच्या मागच्या ओरीत बसून रहातात. स्तोत्रे भूपाळ्या म्हणतात. श्रीगणपती देवाची घंटा व ' भक्तवत्सल भक्ताभिमानी ' ही ललकारी होताच उठून उभे रहातात. मग स्नान करून देवाला पाणी घालतात. मग घरी येऊन २।३ तास नित्य आन्हिक चालते. सायंकाळी ६ वाजता देवाच्या कट्टयावर बसतात. तेथे अनेक जुन्या मंडळींची भेट होते. सायं. ७ ला स्वारीची पूजा सुरू होते तेव्हापासून स्वारी पालखी-साठी निघेपर्यंत पुराण सेवा करतात. पालखी झाल्यावर संध्या-तीर्थ अंगारा घेऊन घरी येतात. रात्री जेवण नसते. दूध फलाहार असतो. दिवसभर भक्त मंडळी येत असतात. सर्वांशी हवे तसे बोलणे होते. मार्गदर्शन होते. वाडी सोडताना श्रींची परवानगी घेतात. सर्व देवांना साष्टांग नमस्कार घालतात.

सर्व एका लेखात लिहिणे शक्य नाही. जे जसे आठवले तसे लिहिले आहे. यात कुठेही अतिशयोक्ती नाही. सत्य वस्तुस्थिती सर्वापुढे ठेवली आहे.

* * *

---

## " वेदांत पारिजात सौरभ " – भूमिका

कोणताही समाज किंवा राष्ट्र आध्यात्मिक शक्तीशिवाय स्थिर राहू शकत नाही. म्हणून दार्शनिकांच्या मार्गाने आत्मोन्नती करून घेणे यातच जीवनाचे खरे साफल्य आहे.

विज्ञान हे एक जीवनाचे गौण साधन आहे.

अनुवादक

द. धुं. कवीश्वर, वेदान्तवाचस्पति

---

॥ श्रीगुरुदेवदत्त ॥

# एक हृदय-दोन देह !

लेखक आणि लेखिका : श्री. प्रमोद नगरकर आणि
सौ. उमा नगरकर, औरंगाबाद

संदर्भ – श्री. प्रमोद नगरकर हे पू. श्री गुळवणी महाराजांचे अनुगृहीत. लौकिक दृष्टीने विज्ञान क्षेत्रातील उच्च पदवीधर. विज्ञानात कुशाग्र बुद्धीने संशोधनात रमलेले. आधी मुंबईत मोठ्या कंपनीत नोकरीस होते. आता केवळ सद्गुरु इच्छेमुळे औरंगाबादेस राहतात आणि पैठणला रासायनिक कारखाना सुरू केला आहे. श्रीकृपेने व्यवसाय प्रगतिपथावर आहे. पारमार्थिक दृष्टीने ते अनन्य गुरुनिष्ठ आहेत. जीवनातील प्रत्येक श्वासाला त्यांना श्रीगुरूंचे स्मरण असते. प्रत्येक पाऊल श्रीगुरु–इच्छेप्रमाणे टाकत आहेत. त्यांच्या पत्नी खऱ्या अर्थाने सहधर्मचारिणी आहेत. त्यांच्या जीवनातील अनुभव दोघांनी मिळून एकाच लेखात दिले आहेत. अशा लेखातून आपल्या गुरुबंधूंचे आपणास खूप मार्गदर्शन होत असते.

इ. स. १९७४ मध्ये पू. श्रीगुळवणी महाराजांच्या निर्वाणानंतर आज १६ वर्षे प. पू. श्रीदत्तमहाराजांचे त्यांना मार्गदर्शन लाभत आहे. पूर्वीच्या आणि आत्ताच्या गुरुत्वामध्ये ज्या एकाच दृष्टीचा आणि वृत्तीचा त्यांना पदोपदी अनुभव येत आहे, त्यातील काही त्यांनी दिले आहेत. —संपादक

संत सत्पुरुष हे बाह्यरूपावरून किंवा बाह्यांगावरून किती थोर आहेत हे सहजपणे ओळखता येत नाही. त्यांना त्यांच्या स्वरूपात ओळखण्यासाठी आपले मन तेंवढे शुद्ध आणि तेवढे ऋजु व्हावे लागते, पवित्र असावे लागते, तेव्हाच त्यांच्या प्रेमाचा सुगंध आपल्या हृदयाला हळुवार फुंकर घालून आपलंसं करतो. यातूनच त्यांच्या सहवासाची ओढ वाढत जाते. अशा भावनिक सहवासाची फार आवश्यकता असते,

माझ्या प्रत्यक्ष अनुभवावरून माझी पूर्ण खात्री झाली आहे की पू. श्रीगुळवणीमहाराज आणि पू. श्रीदत्तमहाराज हे भिन्न नाहीत.

एकाच सूत्राची दोन रूपं आहेत. एक अंत:करण, दोन आकृत्या आहेत. एक हृदय, दोन देह !

(१) इ. स. १९६६ सालची घटना. मी मुंबईला नोकरीला होतो. पू. श्रीगुळवणीमहाराज मुंबईला श्री. भागवत यांच्या घरी आले होते. त्यावेळी मी त्यांच्या भेटीस प्रथम गेलो. मला दीक्षा झाली नव्हती. पण तेव्हापासूनच मनाला त्यांची ओढ लागली. मी त्यांच्या भेटीला सारखा पुण्याला येऊ लागलो. माझी आई पुण्याला होती. तिला माझे सारखे पुण्याला येणे आवडत नसे. तिला वाटे, चांगल्या नोकरीवर वाईट परिणाम होईल. म्हणून ती माझेवर रागावत असे. माझे येणे मात्र चालू होते. मी एकदा श्रीमहाराजांनाच म्हणालो "माझ्या सारख्या पुण्याला येण्याने आई रागावते तेव्हा मी काय करावे ?" श्रीमहाराज स्मित हास्य करून म्हणाले "आई रागावते तर आश्रमात यावे. हे तुझेच घर आहे." त्यानंतर मी नि:संकोचपणे आश्रमात येऊ लागलो. आजपर्यंत मी पुण्याला नेहमी आश्रमातच येत असतो. अगदी माझा सर्व परिवार घेऊन येतो.

(२) इ. स. १९७८ मध्ये माझ्यासमोर माझ्या मुलाच्या मुंजीचा प्रश्न उभा राहिला, कारण सौ. आईचे देहावसान नुकतेच झालेले होते. मुलगा मुंजीचा झालेला. घरातील परिस्थिती नाजूक झालेली. पू. श्रीदत्तमहाराज मुंबईस आले असता आमच्या प्रार्थनेवरून घरी आले होते. त्यावेळी मी त्यांना विचारले, महाराज ! मुलाची मुंज करायला पाहिजे. पण एकूण परिस्थितीवरून कुठे करावी, केव्हा करावी, काही कळत नाही. त्यावेळी पू. श्रीदत्तमहाराजांनी पंचांग मागून घेतले. तिथी काढून दिली. आणि म्हणाले, "घरच्या लोकांनी आश्रमात यावे आणि शास्त्रविधी उरकून घ्यावा." त्यावेळी बरोबर श्री जगन्नाथशास्त्रीही होते.

आश्चर्य हे की, स्वत: महाराजांनी पुण्याला आल्यावर उपाध्याय सांगून ठेवले, (जगन्नाथशास्त्री नव्हे). न्हावी सांगितला. विशेष म्हणजे आश्रमातील मंडळींचा विरोध सहन करून हे केले. देवप्रतिष्ठा बसविल्यावर उपाध्याय म्हणाले "घरचा आहेर आणा." तेव्हा स्वत: श्रीमहाराज आहेर घेऊन उभे राहिले व आम्हा सर्वांना आहेर केला.

या पितृतुल्य भावनेला मी कोणत्या शब्दांत लिहू? त्याप्रसंगी तर ते परम प्रेमवर्षाव करीत होते व माझ्या डोळ्यांतून अश्रुप्रवाह वाहात होते. घरचे लोक म्हणजे मी, माझी पत्नी व मुले, एवढेच मुंजीला होतो. आश्रमातली मंडळीही त्या दिवशी कोणीही तेथे असू नयेत अशी महाराजांनी योजना केली होती. या प्रसंगाचे स्मरण झाले तरी मन हेलावून जाते.

पू. श्रीगुळवणी महाराजांचे ते शब्द किती यथार्थ आहेत याचा प्रत्यय या घटनेने दिला एवढेच नव्हे तर त्याच अन्तःकरणाची, वात्सल्य-वृत्तीची प्रचिती पू. श्रीदत्तमहाराजांकडूनही येत आहे. आश्रमात मुलाची मुंज होईल असे कधीही वाटले नव्हते. पण 'हे तुझे घरच आहे' हा त्यांचा आशीर्वाद होता. म्हणून त्याच भावनेने पू. श्रीदत्तमहाराज वडिलांच्या नात्याने पाठीशी उभे राहिले. महाराज आणि दत्तमहाराज मी भिन्न मानूच शकत नाही.

असे हे सर्व काही करून पू. श्रीदत्तमहाराजांनी याची कधीही कुठेही वाच्यताच काय उल्लेख सुद्धा केलेला नाही.

(२) दोन्ही महाराज एकच आहेत याचा अपूर्व प्रत्यय माझ्या पत्नीला आला त्यासंबंधी ती तिच्याच शब्दांत लिहीत आहे–

माझे लग्न ७० साली झाले. त्यानंतर २/३ महिन्यांनी पू. श्रीगुळवणी महाराज श्रीक्षेत्र गरुडेश्वर येथे जाणार होते. माझ्या यजमानांचा व महाराजांचा पुष्कळच सहवास लग्नापूर्वी झालेला होता. परंतु मला या सर्व गोष्टी अगदी अनभिज्ञ होत्या. माझे यजमान म्हणाले की तू पू. श्री महाराजांचे बरोबर गरुडेश्वरला जावे असे मला वाटते, व तूही त्यांची दीक्षा घ्यावीस असे वाटते. त्यावेळी मला त्यांचा खूप राग आला. कारण माझा या गोष्टीशी लग्नापूर्वी कधी संबंधच आला नाही. त्यामुळे मला या गोष्टींचे प्रेम तर सोडाच उलट अतिशय भीती वाटत असे. मी माझ्या यजमानांना रागाने म्हटले, "तुम्ही हालता–झुलता तेवढे पुरे! मला नको तसे!" त्यावर यजमान काहीच म्हणाले नाहीत व पुन्हा कधीही आग्रह केला नाही.

दरम्यान यजमानांची साधना नित्य चालू होती. मी त्यांच्याशी त्यांचा नियम पाळण्यावरून, घरातील आचरणावरून, सोवळे ओवळे

यावरून वारंवार भांडत असे. मला हे सर्व नवखे होते. कधीच न बघितलेल्या, न अनुभवलेल्या गोष्टी कराव्या लागत होत्या, म्हणून मधूनच खट्टू होत असे, नाराज होत असे व त्यामुळे वाद करीत असे.

मला यांच्या साधनेबद्दल आस्था नव्हती तसेच औत्सुक्यही वाटत नव्हते. पू. श्रीमहाराजांच्या कृपेने मला ह्यांच्याबद्दल प्रेम मात्र वाटत होते व ते टिकून होते. म्हणून एक कर्तव्यबुद्धीने व प्रामाणिकपणे मी ह्यांच्या मतानुसार घरातील आचरण करीत होते.

त्यानंतर १० वर्षांनी म्हणजे ८१ सालच्या महाशिवरात्रीचा प्रसंग म्हणजे माझ्या आयुष्यातील सोन्याचा दिवस ठरला. पू. श्रीगुळवणीमहाराज देहरूपात नव्हते. त्या महाशिवरात्रीला माझ्या मनात आले, चला आज आपण शंकराचा शिवलीलामृतातील ११ वा अध्याय तरी वाचू या. घरात कुणीच नव्हते. मी एकटीच होते. देवापुढे पाट मांडला. त्या अध्यायाचे वाचन केले व डोळे बंद करून नमस्कार घालावा व उठावे म्हणून नमस्कारासाठी जे डोळे बंद केले ते काही केल्या उघडतच ना! मी सतत उघडण्याचा प्रयत्न करीत होते पण कोणत्या तरी शक्तीने ते घट्ट बंद ठेवले होते.

विशेष म्हणजे नुसतेच बंद नव्हते तर त्या बंद डोळ्यांपुढे मला अत्यंत तेजस्वी असा निळ्या रंगाचा लख्ख प्रकाश दिसत होता. त्या प्रकाशात माझ्यापुढे अतिशय तेजःपुंज वर्तुळात पू. श्रीगुळवणीमहाराजांचा स्मितहास्य चेहरा एकदा दिसत असे व लगेच दोन – तीन सेकंदात पू. श्रीदत्तमहाराजांचा चेहरा दिसत होता. आश्चर्य म्हणजे असा प्रकार जवळ जवळ अर्धा तास चालू होता व तेवढ्या काळात माझी बसलेली अवस्था तसूभरही बदललेली नव्हती. माझी सर्व इंद्रिये अगदी निश्चल होती व मला माझे शरीर हलके फुलके वाटत होते. बऱ्याच वेळानंतर म्हणजे जवळ जवळ एक तासाने माझ्या डोळ्यावरील पकड हलकेच सैल झाली व ते उघडू लागले.

संध्याकाळी माझे यजमान घरी आले तेव्हा त्यांना मी हा सर्व प्रकार सांगितला. त्यांना अतिशय आनंद वाटला व मला म्हणाले, यात घाबरण्यासारखे काहीच नाही. तुझ्या प्रामाणिकपणामुळे पू. श्रीमहाराजांनी तुझ्यावर कृपा करून तुला एवढा अनुभव दिला. दोन्ही महाराज एक

असल्याचे या अनुभवाने दाखविले आहे.

पुढे पू. श्रीदत्तमहाराजांना हा प्रसंग सांगितला तेव्हा महाराज तेजस्वी नजरेने माझ्याकडे पाहून अत्यंत शांत स्मित करून म्हणाले, "चांगलं आहे, तुम्हाला महाराजांचे दर्शन झाले."

(४) ही एकत्वाची वस्तुस्थिती खात्रीलायक पटवून देणारा माझ्या यजमानांचा एक अनुभव बोलका आहे.

इ. स. १९७० साली हे मुंबईला भाटवडेकरांच्याकडे नोकरी करीत होते. त्यावेळी पू. श्रीगुळवणी महाराजांच्या सहवासात बराच काळ जात होता एकदा सहज ह्यांच्या मनात विचार आला की आपण कारखाना का काढू नये? म्हणून श्रीगुरुमहाराजांना ह्यांनी विचारले. तर काय आश्चर्य! श्रीगुरुमहाराज हसून म्हणाले "काढावा की! न काढायला काय झाले?" पुढे काही दिवसांनी म्हणजे ७२ साली एक दिवस हे सहज विचार करीत बसले होते तर अचानक श्रीसद्गुरूंनी एका प्रयोगाचे ज्ञान देणारे अत्यंत स्वच्छ असे चित्र यजमानांच्या मनश्चक्षूंसमोर उभे केले. ही घटना माझ्या यजमानांनी श्रीगुरुमहाराजांना सांगितली. त्यावर त्यांना श्री. निगुडकरांशी धंद्याच्या संदर्भात बोलण्यास सांगितले. पण अनेक अडचणीमुळें ते तसेच राहून गेले. व यजमानांनी कंटाळून या विषयाचा नाद सोडला. पुढे जाने. ७४ मध्ये श्रीमहाराजांनी देह ठेवला.

त्यानंतर घरात पुष्कळ अप्रिय घटना घडल्या. इ. स. ७८ मध्ये माझ्या सासूबाईंचे दुःखद निधन झाले. त्यावेळी आम्ही सर्वच विमनस्क स्थितीत होतो. असेच एकदा विमनस्क स्थितीत यजमान असताना पू. श्री दत्तमहाराजांना भेटले. त्यांना पूर्वी श्रीगुळवणी महाराजांशी झालेले बोलणे कधी सांगितले नव्हते. तरी श्रीदत्तमहाराजांनी मे ७९ (म्हणजे श्रीगुळवणीमहाराजांनी देह ठेवल्यावर ५॥ वर्षांनी) पैठणला व्यवसायासाठी जागा घेण्यास सांगितले व यजमानांनी पैठणला जागा घेतली. माझे यजमान धंदा करण्यास फारसे उत्सुक नव्हते. त्यामुळे त्यानंतर चार वर्षे तशीच शांत गेली. मुंबईच्या नोकरीत मालकांनी पगारवाढ देऊन प्रेमाने वागण्यास सुरुवात केली होती. (८२ मे) ही गोष्ट यजमानांनी श्रीदत्तमहाराजांना सांगितली असता श्रीदत्तमहा-

राज हसून म्हणाले, " आपला स्वतःचा व्यवसाय हळू हळू सुरू करावा. "

तरीही यजमानांची इच्छा नव्हती. ते श्रीमहाराजांना म्हणाले, " आहे ते ठीक आहे असे वाटते महाराज ! " त्यावर श्रीदत्तमहाराजांनी यजमानांकडे रोखून पहात म्हटले, " मग काय मालकांना बुद्धी विकण्याचे ठरविले काय ? " मग मात्र माझे यजमान काहीच बोलले नाहीत. व व्यवसायाची यथामती आखणी करू लागले.

थोडक्यात ७२ सालीच पू. श्री गुळवणी महाराजांनी यजमानांची आंतरिक इच्छा जाणून ती पूर्ण करण्यासाठी त्यांना धंदा काढून द्यायचे ठरविले होते. नेमकी तीच राहिलेली गोष्ट पुढे सात वर्षांनी श्रीदत्त-महाराजांनी यांच्याकडून करवून घेण्यास सुरुवात केली.

असे प्रत्यक्ष अनुभव येत गेल्यामुळे आणि अजूनही नित्य येत असल्यामुळे दोन्ही महाराजांत भेददृष्टी कशी ठेवता येईल? एक हृदय दोन देह अशी स्थिती आहे. व्यवहारात देहदृष्टीने दोन व्यक्ती दिसतात पण ही बाह्यदृष्टी आहे. आंतर–दृष्टीने हे नक्की आहे की दोघांत काही फरक नाही.

गुरुबंधूंच्या दृष्टीमध्ये ही दृष्टी आली तर आपल्या सद्गुरूंना संतोष होईल या सद्भावनेने या घटना लिहिल्या आहेत. यात आमचा काहीही मोठेपणा नाही. केवळ 'एकमेकां सहाय्य करू। अवघे धरू सुपंथ।' या भावनेने हे लिहिले आहे. ✻ ✻ ✻

---

## " वेदांत पारिजात सौरभ " – भूमिका

भारतवर्ष हे एकच राष्ट्र अनादि कालापासून आध्यात्मिक प्रवृत्तीचे दिसते. अध्यात्मविद्येचे प्रकाशन करणारे वेद हे भारताचे अविनाशी अमूल्य धन आहे. वेदामध्ये संपूर्ण विश्वाचे ज्ञान भरलेले आहे. भारतीय श्रौतदर्शनकार वेदांची उत्पत्ति व नाश मानत नाहीत तर आविर्भाव व तिरोभाव मानतात. कोणत्याच पदार्थाचा तत्त्वतः नाश होत नसून रूपांतर होते हे मत आजच्या विज्ञानयुगातही मान्य आहे. हा सिद्धान्त वैदिक महर्षींनी हजारो वर्षापूर्वी व्यक्त करून ठेवला आहे.

द. धुं. कवीश्वर

---

# गुरुकन्येचे हृद्गत !

सौ. सुलभा माधवराव तांबोळी, "श्रीदत्तसुता" – मुंबई ( माटुंगा )

गणेश गकार हुताश रकार । लक्ष्मीश उकार गुरुदत्त ।।
अविद्या गुकार तन्नाशक रुकार । गुरुदत्त परपार दाता ।।
गुरु दत्त माता गुरुदत्त पिता । तोचि भयहर्ता त्राता माझा ।।
गुरुपादपाथ तेचि माझे तीर्थ । गुरुदेव समर्थ स्वार्थ दाता ।।
गुरुदत्तनाम तेचि पुण्यधाम । जे घेता कुकर्म होम करी ।।
गुरुदत्त सेवा परिहारी भवा । संसाराब्धिनाव भावार्थिया ।।
वासुदेव म्हणे येणे कोण शीणे । गुरुविणे जीणे भेणे तेचि ।।

प. पू. श्रीदत्तमहाराजांची कन्या म्हणून जन्मास आले ही गोष्ट पूर्वसुकृताची आहे हे खरं असलं तरी तेच माझे मोक्षगुरु होऊन त्यांनी मोक्षाची वाट सोपी केली या दुहेरी ऋणानुबंधाने आयुष्याला नवी दृष्टी आली. वडिलांकडे गुरु म्हणून पाहताना प्रत्येक प्रसंगात विशेष जाणीव होऊ लागली. त्यातही विशेष असे आहे की त्यांनी दीक्षा दिल्यापासून तर आम्ही अक्षरशः गुरुमय होऊन गेलो आहोत. दीक्षा घेतल्यापासून प्रत्येक क्षणाला प. पू. महाराज आमच्या बरोबर असतात हा आमचा सर्वांचा अनुभव आहे. त्यासाठी ते प्रत्येकवेळी आम्हाला दिसलेच पाहिजेत असा आमचा कधीच आग्रह नसतो, पण ते सदैव आमच्या जवळ आहेत हे मात्र नक्की जाणवते. याची प्रचिती दाखविणारे काही प्रसंग –

( १ ) १९८० मध्ये माटुंग्याला आमचेकडे पू. महाराजांचा श्रीमत् भागवत सप्ताह ठरविला. सर्व तयारी झाली. सप्ताहाला अनेक मंडळी येणार याची कल्पना होती. पण पाण्याचा प्रश्न खूप प्रयत्न करूनही सुटू शकला नाही. माटुंगा भागात पाणी अगदी कमी दाबाने व कमी वेळ यायचे.

२५ नोव्हेंबरला चतुर्थीच्या दिवशी पू. महाराजांचे आगमन

झाले. सर्वजण त्यांना श्रीगणेशरूप मानतात. चतुर्थीचे दिवशी ते आले. सायंकाळी श्रीगणेशरूपाची पूजा झाली. मोदकाचा नैवेद्य महाराजांनाच दाखविला. सर्वांनी प्रसाद घेतला आणि विघ्नहर्ता गणेशाची प्रचीती आली. दि. २५ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर पर्यंतच फक्त पहाटेपासून दुपारी १२ पर्यंत नळाला धो धो पाणी येत होते. दि. ५ डिसेंबर पासून पाणी पूर्ववत बारीक झाले. आम्ही या गोष्टीची शहानिशा केली नाही, कारण आम्हाला ही गुरुकृपेची किमया वाटते.

( २ ) मोठ्या मुलीचे ६ वर्षे डोके दुखत होते. अनेक डॉक्टर झाले. हॉस्पिटलमध्ये एक्स रे काढले पण निदान नीट झाले नाही. मुलगी काळवंडली होती परंतु योगायोग असा की गुजराथला जाताना महाराज मुंबईला घरी आले होते. यावेळेस त्यांना मुलीच्या प्रकृतीबद्दल जाणवले. ते गुजराथला गेल्यानंतर एक गुरुबंधू व भगिनी घरी आले. मुलीला घेऊन वैद्यराजाकडे गेले. त्यांनी अचूक निदान व योग्य योजना केली. व दोन महिन्यांत मुलगी गुलाबी-गोरी दिसू लागली. तिची डोकेदुखी गेली आणि आमची पण गेली. सद्गुरुकृपेचा संबंध आला म्हणून यश मिळाले.

(३) एकदा माझ्याकडे माझी धाकटी बहीण आली होती. ती टॅक्सीने पुण्याला निघाली. ते दोघे, त्यांचे मित्र, ड्रायव्हर गाडीत बसले. आम्ही निरोप देण्यासाठी गाडीजवळ उभे असताना गाडी सुरू झाली. मागील बाजूचे चाक माझ्या पायावर गेले. तेव्हा स्वाभाविकच मी मोठा आवाज केला, म्हणून लगेच गाडी थांबवली व ड्रायव्हरने ती रिव्हर्स-मध्ये घेतली, त्यामुळे पुनः ते चाक पायाच्या बोटावरून गेले. सर्वजण घाबरले. पण त्या लोकांना जायला उशीर नको, म्हणून तसे काही विशेष नाही असे दाखवीत निरोप दिला. मी घरात लंगडतच आले. मुलांनी गरम पाण्यात पाय ठेवायला लावला. आयोडेक्स लावले व आम्ही झोपलो. दुसरे दिवशी सकाळी रोजच्यासारखे मी कामाला लागले होते. गोष्ट तशी किरकोळ आहे. पण काटयाचा नायटाही होऊ शकतो. तसे तर काही झाले नाहीच पण एका रात्रीत पाय पूर्ववत झाला. गुरुकृपा-शक्ती ही संरक्षक शक्ती आहे, हे मात्र मनात आल्याशिवाय रहात नाही.

(४) धाकटा मुलगा सायकलवरून पोहायला जात होता. चौकात सिग्नलमुळे सर्व गाड्या थांबल्या होत्या. थोड्या वेळात हा वळणावरून पुढे गेला तर तिकडून येणाऱ्या एका टॅक्सीने याला जी धडक दिली तो हा डबलडेकरच्या उंचीपर्यंत उडाला व खाली पडला. हा अपघात दादरच्या सेनाभवन चौकात घडला. जवळच पोलिस चौकी होती. पोलिसांनी त्याला उचलून बाजूला नेले व कुठे लागले वगैरेची चौकशी केली, तर फारसे काही लागले नाही असे म्हणाला. तेथून तो पोहायला गेला आणि मग घरी आला. थोडसं लागलेलं दिसल्यावर चौकशी केली. तो म्हणाला, "स्वामी सदैव जवळ आहेत ना, म्हणून घरी आलो." आणि वरील सर्व हकीगत सांगितली.

(५) सद्गुरु कसे अंतर्यामी व भक्तवत्सल असतात त्याची छोटी प्रचिती-- माझे यजमान श्रीगुरुचरित्राचे पारायण करून पौर्णिमेचे दिवशी पू. महाराजांच्या दर्शनासाठी पुण्यास गेले. मी तर दत्तमहाराजांची मुलगीच आहे. माझी श्रद्धा त्यांच्यावर आहे हे विशेष नाही. पण हे त्यांचे जावई असून–स्वत:बद्दल मोठेपणाचा अभिमान वाटावा असे असून ते महाराजांना सासरे न मानता गुरु मानतात–भक्तीने त्यांची सेवा करतात. हा बदल पाहून तर मला किती धन्यता वाटते याला शब्दच नाहीत. मुलांच्या मध्येही केवढी श्रद्धा आहे, ते पाहून मला माझी भक्ती कमी वाटते. सद्गुरुकृपेचा हा परिणाम आहे. तेव्हा पू. महाराजांच्या दर्शनाला हे पुण्याला गेले. महाराज पुण्यात नव्हते. जालन्याला गेले होते. त्या दिवशी येणार होते. संध्याकाळ झाली–रात्र झाली पण महाराज काही आले नाहीत. दुसरे दिवशी सकाळी नोकरीसाठी मुंबईला तर ह्यांना यायलाच हवे होते. अगदी चातकासारखी वाट पहात होते. तेवढ्या रात्री पावणेबारालापू. महाराज आले. त्यावेळी ह्यांनी पू. महाराजांना ओवाळले–दर्शन घेतले. ह्यांना केवढा आनंद झाला. तेव्हा श्री. रघुनाथराव म्हणाले, "माधवराव, तुमची तीव्र इच्छा होती. केवळ दर्शनासाठी मुंबईहून पुण्याला आलात. म्हणूनच महाराज रात्र झाली तरी आले आहेत."

(६) मुलाची श्रीगुरुचरित्र वाचण्याची सुरुवातही पू. महाराजांनीच करून घेतली. मुलाने ८ वीत असताना वाडीक्षेत्री पू. महाराजांच्या

समोर पहिला श्रीगुरुचरित्र सप्ताह केला. त्यावेळी भावाच्या मुलानेही सप्ताह केला–तो तर ६ वीत होता. त्यावेळी पू. महाराजांचे आम्हाला दोन्ही मुलांबद्दल कौतुकास्पद पत्र आले. त्यात मुलांचे कौतुक तर होतेच परंतु सप्ताह कसा करावा, कोणत्या दिवशी किती अध्याय वाचायचे ही सर्व माहिती कळविली होती. ते पत्र वाचल्यानंतर मात्र यजमानांना एकदम प्रेरणा झाली आणि तेव्हापासून त्यांचे श्रीगुरुचरित्र वाचन सुरू झाले.

(७) मुलीच्या लग्नाची सर्वजण काळजी करीत असताना चार दिवसांतच काहीही अडचणी न येता, काहीही कमी न पडता, व्याही लोकांचा कुठल्याही गोष्टीचा आग्रह नाही, असं एकंदरीत उत्तम प्रकारे कार्य पार पडले. कदाचित देव–गुरूवर श्रद्धा नसणारी मंडळी याला 'योगायोग' म्हणतील. त्यांच्या योगायोगाला कोणीही कर्ता नसतो. आणि कर्त्याशिवाय कार्य होऊ शकत नाही. हे शास्त्र त्यांच्या जाणिवेत आलेले नसावे. आम्ही मात्र अनुभवाने निर्माण झालेल्या श्रद्धेच्या जोरावर हे कार्य श्रीगुरुकृपेमुळे झाले असे ठामपणे मांडतो.

(८) माझे वयोवृद्ध सासरे आज या जगात नाहीत. परंतु गेल्या वर्षी डिसेंबर ८८ मध्ये ते आजारी असताना पू. महाराज घरी आले होते. सासरे खूपच थकलेले होते. पू. महाराजांच्या बरोबर बोलताना त्यांचे हृदय भरून येत होते. डोळे सुद्धा पाण्याने भरत होते. बोलता बोलता त्यांनी पू. महाराजांचे दोन्ही हात आपल्या हातांनी घट्ट पकडून ठेवले होते. ते दृश्य अतिशय भावप्रधान होते. जणू ते पू. महाराजांचा अखेरचा निरोप घेत होते. त्यांचे बोलणे पू. महाराजांनी शांतपणे ऐकून घेतले आणि म्हणाले, "तुमची सर्व तयारी झाली आहे. काळजीचे कारण नाही." पू. महाराजांनी या शब्दांनी त्यांना आधार आणि आशीर्वाद दिला आहे. या हृद्य भेटीनंतर १॥ महिन्यानेच सासरे गेले. पण इतक्या शांतपणे मरण आलेले आम्ही पाहिले नाही आणि ऐकलेही नाही. ती हृद्य भेट आम्ही आयुष्यात विसरू शकणार नाही.

(९) नोव्हेंबर ८९ मध्ये पू. महाराजांचे बरोबर आम्ही काही मंडळी हरिहरेश्वर येथे गेलो होतो. आमचा मोठा मुलगा व जावई एक दिवसासाठी मोटारसायकलने आले. पू. महाराजांचे दर्शन घेतले. आणि

दुसरे दिवशी निघाले. पेण जवळ आल्यावर मागील टायर पंक्चर झाल्यामुळे दोघेही रस्त्याच्या कडेला फेकले गेले. रस्त्याने अनेक वाहाने जात होती. त्यात एक टेम्पो जणू काही यांच्यासाठी कोणी पाठवावा असा त्यांच्याजवळ आला. टेम्पोवाल्याने चौकशी करून, डॉक्टरकडे नेऊन मलमपट्टी औषधपाणी करवून मुलांची गाडी आपल्या टेम्पोमध्ये घेऊन, दोघांना गादीवर झोपवून त्यांना माटुंग्याला घरी आणून सोडले. पुढे दोन दिवस फोन करून मुलांच्या प्रकृतीची चौकशीही केली. एवढा जबरदस्त अपघात होऊन केवढे संरक्षण गुरुकृपेने केले.

म्हणूनच एकसारखं आळवावंसं वाटतं की,

तुजवीण आम्हा कोण देवा।
धाव यादवराया मायबापा, मायबापा ॥

आमचा यादवराया आमचे गुरुच, त्यांच्यातच आम्हांला सर्व विश्व सामावलेले दिसते.

प. पू. श्रीगुळवणी महाराजांनाही आम्ही दादा म्हणत होतो. आता तर काय त्यांनाही आम्ही पू. श्रीदत्तमहाराजांमध्येच बघतो. दोन्ही महाराज सदैव आमच्या जवळ आहेत.

आता थोडे सौ. आईसाहेबांबद्दल –

इ. स. १९७९ मध्ये चातुर्मासात सौ. आईने पू. श्रीदत्तमहाराजांच्या चरणांचे तीर्थ रोज घेण्याचा नियम केला. महाराज परगावी जाणार असतील तर जाण्यापूर्वी चरणतीर्थ बाटलीत भरून ठेवायचे पण रोजचा नियम चुकवायचा नाही. असे लक्ष ठेवून कटाक्षाने हे व्रत पूर्ण केले. या व्रताचे उद्यापन म्हणजे माहेरहून आहेर असतो. परंतु सौ. आईला तर माहेरी कोणी नाही. तेव्हा तिने स्वतःच हे काव्य करून पू. श्रीमहाराजांना अर्पण केले.

चरणतीर्थ घेतले – उपकृत जाहले।
धुंडीराजसुत लाभले – सर्वस्व त्यांना अर्पिले ॥
थोर कुल कवीश्वरांचे – घराणे असे महंतांचे।
पूर्व सुकृत असे साचे – म्हणून लाभले पाय त्यांचे
पूर्व संचिताचे फळ – लाभले हे संतकुळ।

वाणीमध्ये द्यावे बळ – नाम घेता जाई वेळ ॥
संतकुळी जन्मला तुम्ही थोर
पुत्ररूपी पाठिशी तीन शिलेदार
कन्या तिन्हीही सांभाळती संसार
बघून त्यांचे सुयश – आनंद झाला फार ॥
तुमचेची घेणे – तुम्हासी देणे
तुमच्यापाशी – काय उणे
परि अल्प पाकळी स्वीकारणे

सौ. लक्ष्मी कवीश्वर

पू. श्रीदत्तमहाराजांचे वडील प. पू. श्रीधुंडिराज महाराज हे (सुनेचे) सौ. आईंचे गुरु. त्यांच्यावर सौ. आईने "श्रीगुरूची दृष्ट" असे काव्य केले आहे. तेही या ठिकाणी देत आहे –

= श्रीगुरूची दृष्ट =

दृष्ट झाली माझ्या आता श्रीगुरुवरा ॥ धृ० ॥
ज्ञान निखारे फुलवून
काम क्रोध मिरची लवण
दुर्बुद्धी मेथी मोहरी जाण – उतरी गुरुवरा माझ्या श्रीगुरुवरा । १ ।
मन कोंबडा मारून
वासना लिंबू उतरुन
स्थूल देह हा जाळून, लावू अंगारा, माझ्या श्रीगुरुवरा ॥ २ ॥
नरनारी दर्शना येती
दृष्ट लावूनिया जाती
आता दृष्ट उतरून काढू श्रीगुरुवरा, माझ्या श्रीगुरुवरा ॥ ३ ॥
धुंडिराज गुरु मी केले
देहमन शुद्ध झाले
देहभान विसरून गेले, श्रीगुरुवरा माझ्या श्रीगुरुरवरा ॥ ४ ॥
दीन लक्ष्मी परी लीन
मागतसे भक्तीदान
चरणापाशी रहावे म्हणून मागे आसरा, माझ्या श्रीगुरुवरा ॥५॥

सौ. लक्ष्मी कवीश्वर





प. प. श्रीसच्चिदानंद स्वामी पू. श्रीधर-स्वामींचे उत्तराधिकारी यांचे समवेत | पू. सौ. आईसाहेब | पू. श्रीदत्त महाराज | पू. श्रीभाईनाथ महाराज



पू. श्रीदत्तमहाराज, सहकार महर्षि श्री. शंकरराव मोहिते पाटील, डॉ. जामदार
'श्रीगुरुमाऊली' साधनामंदिर – अकलूज – उद्घाटन १९७४



पू. भाऊजी आर्वीकर  कै. प्रा. सोमलवार  वे. श्री. गोविंदराव आर्वीकर



श्री. वाळवेकर कुलकर्णी यांचे घरी – शर्करातुला –

दत्तप्रभूंचा अवतार
घेऊन अवतरले धरतीवर ॥ धृ० ॥
नाव तयांचे 'दत्तात्रेय' सुंदर
विद्या विनयेन शोभते दर्शन
अमृत मी मानतो
अपार विद्येचे भांडार
परी नाही अहंकार
मूर्तिमंत साक्षात्कार दत्तप्रभूंचा – दत्तप्रभूंचा अवतार ॥

'सूरज' – तांबोळी

* * *


*With Best Compliments from*

**S. P. Kothari**

**Regular & Reliable Transports**

**Lorry owners & Car. Transport Contractor**

Resi – 24/8 Premnagar Housing Society
PUNE – 411 037

Office – Transport centre – Maldhakka
PUNE – 411 011

## श्रीवासुदेवनिवास : पंथराज : प्रकटन : फॉर्म नं. ४


रूल नं. ८ रजिस्ट्रेशन ऑफ न्यूजपेपर्स सेंट्रल रूल्स १८५३ अन्वये प्रकाशित.

प्रकाशन स्थळ : श्रीवासुदेव निवास, कर्वे पथ, ४२/१७ एरंडवन, पुणे ४.

संपादक : श्री. अ. सि. पोटभरे, राष्ट्रीयत्व : भारतीय.

पत्ता : "श्री सिद्धनाथ निवास" २१६ सहकार नगर नं. २, पुणे ९

मुद्रक : श्री. मा. गो. जोशी, राष्ट्रीयत्व : भारतीय.

पत्ता : आनंद मुद्रणालय, १५२३ सदाशिव, पुणे ४११०३०.

प्रकाशक : श्री. द. धुं. कवीश्वर, राष्ट्रीयत्व । भारतीय.

पत्ता : श्रीवासुदेव निवास, ४२/१७ एरंडवन, पुणे ४.

मालक : श्री. प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज
व श्री. प. प. श्रीलोकनाथतीर्थ स्वामी महाराज स्मारक ट्रस्ट
श्रीवासुदेव निवास, कर्वे पंथ, ४२/१७ एरंडवन, पुणे ४.

मी दत्तात्रेय धुंडीराज कवीश्वर, असे जाहीर करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरा आहे. द. धुं. कवीश्वर, प्रकाशक


---

### जपयज्ञ

॥ दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा ॥ आणि

या श्रीः स्वयं सुकृतिनां भवनेष्वलक्ष्मीः
पापात्मनां कृतधियां हृदयेषु बुद्धिः
श्रद्धा सतां कुलजन प्रभवस्य लज्जा
तां त्वां नताः स्म परिपालय देवि विश्वम् ॥

या महामंत्राचा आत्मकल्याण व लोककल्याण यासाठी
शुचित्वाने नित्य जप करावा

# पू. श्रीदत्तमहाराजांची समन्वयी वृत्ती

लेखक : **श्री. भीमभट चिंतामणीभट पुजारी**, श्रीक्षेत्र गाणगापूर

श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांना त्यांच्या अपूर्व विद्वत्तेमुळे राष्ट्रीय पंडित म्हणून अनेक सन्मान मिळाले आहेतच. परंतु आमच्यासारखी सामान्य मंडळी, त्यांच्या असामान्य गुणामुळे दत्तावतारी–दत्तमहाराज–मानतात, हे सर्वश्रेष्ठ मानपत्र आहे. श्री महाराजांचे स्वभाववैशिष्टच हे की, ते कोणासही न दुखविता समन्वय साधितात. याबद्दलचा घडलेला प्रसंग. श्री महाराजांचा श्रावण वारीतील मुक्काम, श्रीक्षेत्र गाणगापूर येथील "श्री गुळवणी महाराज धर्मशाळा" येथे होत असे. परंतु एका वर्षी "श्री महाराजांचा मुक्काम (श्रावणवारीचा) आमच्या घरी होणार" असा निरोप स्व. श्री. जगन्नाथ गुरुजींकडून आला. निरोप ऐकून श्रीमहाराजांची सेवा करण्याची व सहवासाची संधी मिळत असल्याबद्दल आनंद वाटला. निरोपाप्रमाणे श्री महाराज आमच्या घरी संध्याकाळी ७ च्या दरम्यान आले. सोबत स्व. श्री. जगन्नाथगुरुजी व इतर काही मंडळीपण होती. श्री महाराज आसनस्थ झाल्यावर नमस्कार व सुखगोष्टी झाल्या. तेवढ्यात एक गृहस्थ म्हणाले, "हीच काय व्यवस्था ?" कारण श्रीगुरुमंदिराचे सान्निध्य ही एकच सोय येथे होती. आणि बाकी सर्वच गैरसोय. ते गृहस्थ जे म्हणाले त्यात गैर काही नव्हते. काही मंडळींच्या आग्रहामुळे श्री महाराजांना, धर्मशाळेत मुक्कामासाठी जावे लागले. हाती आलेली सेवेची संधी गेल्यामुळे आम्हा मंडळींना खेद वाटला. पण श्रीगुरूंची इच्छा काही निराळीच होती. कारण श्री महाराज रात्री ९ च्या दरम्यान सामानासह मुक्कामासाठी परत घरी आले. आणि दुसऱ्या दिवशी श्रींच्या मठात, निर्गुण पादुकेची पूजा व इतर सर्व कार्यक्रम व्यवस्थित करण्यात आले. तेव्हापासून श्री महाराज श्रावणवारीत, आमच्या येथे मुक्काम करून, पूजा वगैरे कार्यक्रम करीत असतात. आम्हास सेवा करण्याचे भाग्य श्रींच्या इच्छेनेच

मिळाले, असे आम्ही मानतो. घडलेल्या घटनेने सिद्ध होते की, कोणासही न दुखविता समन्वय कसे साधिले गेले. श्रीगुरु-माऊली श्री महाराजांना दीर्घायु-आरोग्य द्यावे; व आम्हा मंडळींना सेवेचा लाभ मिळत राहावा, हीच श्रीगुरुचरणी प्रार्थना. इति.

* * *

## स्व. प्रो. मोरार तेजा उर्फ भाईजी चौहान, पुणे, यांना श्रद्धांजली

श्रीसद्‌गुरुमय झालेले प्रो. भाईजी चौहान यांना श्रद्धांजली समर्पण करण्याचा प्रसंग इतक्या लवकर यावा यावर अजूनही विश्वासच बसत नाही. श्रीगुरुमहाराजांच्या नुकत्याच झालेल्या १६ व्या पुण्यतिथी महोत्सवात त्यांची रोज भेट होत होती. प्रसन्नतेने बोलणे होत होते. उत्सवातील मंगळवारी -आश्रमात भजनाला नेहमीप्रमाणे थांबले- भजने म्हटली आणि आरती करून गेले तोच शेवटचा निरोप ठरला.

श्रीसद्‌गुरूंच्या सान्निध्यात अत्यंत निकटवर्ति सहवासाचे सद्‌भाग्य लाभलेल्या प्रा. भाईजींनी त्याचा पारमार्थिक पूर्ण लाभ करून घेतला. श्रीगुरुमहाराज गेल्यानंतर गेली १६ वर्षे प्रा. भाईजी पूर्ण गुरुमय होऊन गेलेले होते. संतभजनामध्ये सतत रमलेले असायचे. त्यांच्या भजनाची निवड व आवड पाहून त्यांच्या पारमार्थिक स्थितीची कल्पना निश्चित करता येते. संत कबिरांवर – समर्थ रामदासांवर – श्रीरामकृष्ण परम हंसांवर – श्रीरमण महर्षीवर त्यांचे हार्दिक प्रेम होते. उर्दू शेरशायऱ्या सुद्धा अशा म्हणत की अद्वैतीसुद्धा हरखून जावा.

प्रा. भाईजी हे विद्वान प्राध्यापक, निष्ठावंत समाजसेवक, देशाभिमानी, स्वातंत्र्य सैनिक, कलावंत काष्ठशिल्पी, अनन्य गुरुनिष्ठ, तत्त्वनिष्ठ, तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ, साहित्य-रसग्राही, पूर्ण विवेकी, आत्मतृप्त, निःसंग, निष्काम, आत्मरत, सहज सरळ वृत्ती, अदांभिक, अमानी इ. मोलांच्या गुणांची खाण होती. श्रीसद्‌गुरुकृपेने त्यांचे जीवन कृतार्थ झाले. श्रीसद्‌गुरुमहाराजांना शेवटी म्हणून दाखविलेल्या कबीराच्या फकीरीचे भजन म्हणजे प्रा. भाईंचे श्रीगुरुमहाराज गेल्यानंतरचे १६ वर्षे जगलेले जीवन होते. त्याच अवस्थेत ‘ भलीबनी आयी सबुरीमें ’ याचा अनुभव घेत घेत ‘ साहब मिलत है सबुरीमें ’ ही स्थिती गाठली.

श्रीगुरुमहाराजांच्या पुण्यतिथीच्या दुसऱ्या दिवशी – दि. २० जाने. ९० – शनिवारी प. पू. श्रीदत्तमहाराज भेटण्यास गेले असता, त्यांचेकडे पाहून दर्शन घेतले, आणि डोळे झाकून घेतले. अशा या भाग्यवान पुण्यात्म्याला आमचे कोटी कोटी प्रणाम-हीच श्रद्धांजली !

# स्थितप्रज्ञमूर्ती

लेखक : श्रीदत्त कृपाकांक्षी
श्री. व्यं. नखाते, पुणे

ब्रह्मश्री श्री दत्तमहाराज कवीश्वर यांच्याविषयी लिहिण्यास लेखणी हाती घेताच त्यांच्या सर्वांगीण स्थितप्रज्ञतेची मूर्ती मनश्चक्षू-पुढे उभी राहते. " अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एवच । निर्ममो निरहंकारः समदुःख सुखः क्षमी ।। हा श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील बाराव्या अध्यायातील श्लोक संपूर्णपणे ज्याच्याबाबत सत्य आहे अशी ज्ञान-मूर्ती कोणाला पाहावयाची असेल तर त्याने एकदा पाच मिनिटे श्री दत्त महाराजांपुढे बसावे आणि मनोमन प्रत्यय घ्यावा, की भक्तांची आवड भगवंताला का पडत असेल याची खात्री करून घ्यावी.

श्री दत्तमहाराजांच्या सहस्रचंद्र-दर्शनाचा सोहळा आता मे महिन्यात आहे. तेव्हा त्यांना एखादे फूल अर्पण करण्याचा योग यावा, असे वाटणाऱ्या अनेकांपैकी मी एक आहे.

श्री दत्तमहाराज येथील टिळक विद्यापीठात शिकवीत असताना आणि प.पू. श्री गुळवणी महाराज यांनी परमहंस टेंबेस्वामी यांचे समग्र वाङ्‌मय प्रकाशित करण्याचे ठरविल्यानंतर त्यांनी त्याचे संपादनाचे कार्य केले, त्यावेळी श्री दत्तमहाराजांना अगदी जवळून पाहण्याचा योग आला आणि त्यांच्या प्रसिद्धीपराङ्मुखतेचा, विद्वत्तेचा, नम्रतेचा, स्थितप्रज्ञतेचा आणि सर्वात अधिक त्यांच्या भगवत् प्रेमाचा ठसा मनावर उमटल्याशिवाय राहत नाही. त्यांच्या जीवनातील सर्वच प्रसंग मनाला गहिवरून टाकणारे आहेत. त्यांचा सर्वोच्च मान राष्ट्रीय पंडित पुरस्काराने झाला असे बाह्यतः तरी सर्वांना ठाऊक आहे, पण त्याहूनही अधिक मोलाचा मान कामकोटी पीठाच्या वयोवृद्ध श्री चंद्र-शेखरेंद्र सरस्वतींनी सुवर्ण कंकण देऊन केला तो होय. अनेक विद्वानांशी अनेक शास्त्रांबाबत चर्चा–बोलणी श्री. चंद्रशेखरेंद्र सरस्वतींनी

केली व आपल्या मठातर्फे बहुमान मिळण्यास श्रीदत्तमहाराजच सर्वाधिक योग्य आहेत, असा त्यांनी निर्णय केला व सुवर्ण कंकण देण्याचे ठरविले व दिलेही. यावेळी धारवाडच्या पाठशाळेतील श्री उप्पन बेटिगिरी शास्त्री होते. श्री दत्तमहाराजांनी हा बहुमान झाल्याची वार्ता स्वतःहून कोणासही–श्री गुळवणी महाराज यांनाही–दिली नाही. तशी ते देणार नाहीत, हे ध्यानी घेऊन श्रीः उप्पन बेटिगिरी यांनी श्री महाराजांना पत्र लिहून ही हकीकत कळविली. त्यानंतर श्री दत्तमहाराज येथे (पुण्यास) आले. ते आल्याबरोबर श्री गुळवणी महाराजांनी त्यांना श्रीनृसिंह वाडीस (काही अनुष्ठानपूजेच्या निमित्ताने) पाठविले. तेव्हा त्या काळात श्री महाराजांची एक कन्या कालवश झाली. श्री महाराज अनुष्ठान आटोपून परत-आले. त्यावेळी ते नारायण पेठेत कन्याशाळे-समोरच्या घरात वरच्या मजल्यावर राहत असतः श्री दत्तमहाराज परत आले म्हणून त्यांच्या दर्शनासाठी, कन्या दिवंगत झाली म्हणून त्यांच्याकडे बरेच लोक येत–जात होते. त्यात मीही असाच एकदा गेलो होतो. योगायोगाने आम्ही गेलो त्याच सुमारास त्यांचे सुवर्ण कंकण कामकोटीहून आले होते, ते घरी आले. श्री दत्तमहाराजांनी ते घरातून आणून बाहेर आलेल्या मंडळींना पाहण्यासाठी हातात दिले आणि म्हणाले की, श्री भगवंताच्या इच्छेने सुवर्ण कंकण मिळाले, त्याच्याच इच्छेने मुलगीहि देवाघरी गेली. सुखदुःखे समे कृत्याचा हा प्रत्यक्ष पाठच ते तेथील उपस्थितांना देत होते. ही एक घटना जरी कोणा त्यांच्या भक्ताच्या हृदयात दृढावली तरी त्याची आध्यात्मिक वाटचाल वेग घेईल.

श्रीदत्तमहाराज सर्व शास्त्रांचे जबर ज्ञाते आहेत. पण भागवत शास्त्राची त्यांना फार ओढ आहे. श्री वासुदेव निवासांत श्रीमद्भागवत सप्ताह करण्याचा निर्णय श्री गुळवणी महाराजांनी केला व एक वर्षी पंडित आत्माराम शास्त्री जेरे व एक वर्षी दत्तमहाराज असा हा उपक्रम सुरू झाला. श्री आत्माराम शास्त्री वयाने श्रीदत्तमहाराजांपेक्षा मोठे होते. तरीहि श्री दत्तमहाराजांचा सप्ताह असताना मध्यंतरासाठी थांबत तेव्हा माडीवर जाऊन श्रीदत्तमहाराजांच्या विश्रांतीसाठी अंथरूण घालण्याचे काम श्री आत्माराम शास्त्री करीत. त्यावेळी ते म्हणत,

महाराष्ट्रातच नव्हे तर सर्व देशांत श्रीमद्भागवत उत्कृष्ट सांगणाऱ्यांत श्रीदत्तमहाराज सर्वश्रेष्ठ आहेत. इतर शास्त्रांप्रमाणे श्री भागवत शास्त्रहि श्री दत्तमहाराजांना बायपाठ (तोंड पाठ) आहे.

श्रीमद्भागवताच्या सप्ताहांत पुष्कळ वर्षे श्रीदत्तमहाराज समग्र संहिताहि वाचत असत. ते वाचन ज्यांनी ऐकले आहे ते धन्य होत. विशेषत: रासक्रीडेतील श्री गोपीगीत ते गात असत आणि त्याचा प्रभाव श्रोत्यांवरहि इतका पडे की, त्यांनाहि आनंदाश्रू येत. श्री भागवतातील अनेक प्रसंग, प्रल्हाद–ध्रुव अत्यंत चित्रोपम रीतीने ते सांगतात व ते ते भाग आपल्या डोळ्यापुढे ते उभे करतात.

श्रीदत्त महाराजांनी श्री निंबार्कांच्या ब्रह्मसूत्र टीकेचा वेदान्त पारिजात सौरभ या शीर्षकाचा ग्रंथ केला आहे. टिळक महाविद्यापीठाने तो प्रकाशित केला आहे. त्याची प्रस्तावना शंभर पानांहून अधिक आहे. ती वाचताना श्रीदत्तमहाराजांचा मूळ स्वभावांकुर भक्तीचा आहे, हाच ठसा वाचकांच्या मनावर उमटतो. श्रीमहाराजांविषयी लिहावे तेवढे थोडे आहे. त्यांची श्रीसद्गुरुभक्ती व प्रेम अपूर्व आहे. त्यांना त्या भक्तीचा श्रेष्ठ लाभही झाला आहे, असे त्यांच्याकडे व त्यांच्या क्रियांकडे पाहताच पटते.

आता थोडा वेगळा, पण सुसंवादी सूर ऐका. श्री महाराजांची श्रीसद्गुरुभक्ती अपूर्व आहे. प. प. दीक्षित स्वामी (औरवाड) यांच्याकडून अगदी लहान वयात त्यांना श्रीमद्भागवत हातात मिळाले व त्याचबरोबर आशीर्वादही मिळाला. तो असा की, तू श्रीमद्भागवत पुराण सांग. तू महाविद्वान् होशील. सद्गुरूंचे हे शब्द त्यांच्या अपेक्षेपेक्षाही अधिक सफल झाले आहेत हे सांगण्याची गरज आहे का ?

श्रीदत्तमहाराजांच्या डोळ्यांचे ऑपरेशन झाले आणि नंतर बरेच दिवस त्यांना कमी दिसत असे, त्रास होत असे. आमच्यासारखे लोक म्हणत की, महाराज, थोडी विश्रांती घ्या म्हणजे बरे. ही सदिच्छा गृहीत धरूनही श्रीमहाराज म्हणत की, 'इतके दिवस चांगले (सत्) दिसले, चांगले ऐकू आले यापेक्षा भगवंतांची अधिक कृपा ती काय असू शकेल ?' धन्य आहे या महामनी स्थितप्रज्ञाची.

एकदा घरी काही प्रेमी भक्तमंडळी आली. त्या सर्वांसाठी सौ.

आईसाहेबांनी चहा वगैरे केला व बाहेर आणून ठेवला. श्रीदत्तमहाराजांनी सावकाश चव घेत घेत घेतला. लोकांनीही तो तसाच घेतला आणि आतून सौ. आईसाहेब म्हणत आल्या की, अहो साखर घातली नाही तरी तो आपण तसाच घेतला व सर्वांनाही तसाच प्यावा लागला.

अशी एक ना अनेक उदाहरणे देता येतील. श्रीमहाराज हे स्वामी महाराजांचे व श्रीदत्तांचेही लाडके आहेत. अशा ईश्वरभक्ताचे आपणा सर्व साधकांवर प्रेम आहे ही जितकी अभिमानाची तितकीच जबाबदारीची गोष्ट आहे. आपण आपले साधन, त्यांच्या आशीर्वादाने नेटाने, निष्ठेने अखंडपणे चालवू असा निर्धार करूया व तो पूर्णपणे पार पडो, यासाठी त्यांचा आशीर्वाद दीर्घकाळ मिळू द्या, अशी श्रीसद्गुरुचरणी प्रार्थना. इति.

* * *

## " श्रीगुरुमाऊली " अकलूज – साधनकेंद्राकडे पू. श्रीदत्तमहाराजांची कृपाकूमदृष्टी

१ इ. स. १९७४ मध्ये वास्तुशांती उद्घाटन समारंभ महाराजांचे पवित्र करकमलांनी झाला. अध्यक्षस्थानी सहकारमहर्षि कै. शंकरराव नारायणराव मोहिते पाटील होते.

२ इ. स. १९८२–८५ व ८८ मध्ये तीन वर्षांच्या अंतराने ३ भागवतसप्ताह झाले. तीनही सोहळे ' न भूतो न भविष्यति ' अशा उत्साहाने झाले, ही श्रीदत्तमहाराजांची कृपा !

३ या स्थानात झालेल्या श्रीगणेशयाग – श्रीदत्तयाग व श्रीविष्णुयागाचे तीनही वेळी पू. श्रीदत्तमहाराज येऊन आशीर्वाद देऊन गेले.

४ प्रतिष्ठानचा ' माधुकरी अन्नदान सेवा ' शुभारंभ आगळ्या वेगळ्या वैभवात संपन्न झाला. संतांची मांदियाळी उपस्थित होती. आणि पू. श्रीदत्तमहाराज संतशिरोमणी होते. आजपर्यंत झालेल्या कार्यक्रमांचा हा कळस झाला. मा. ना. श्रीविजयसिंह शंकरराव मोहिते पाटील अध्यक्ष होते.

**डॉ. जामदार**, अकलूज

# श्रीगुरुकृपा काय नोहे !

लेखक : गोविंद गो. कुलकर्णी
११३ मार्कंडेयनगर, कुमठा नाका, सोलापूर ३

जगी जन्मुनी जाहलो धन्य धन्य
असा सद्गुरू लाभला पूर्व पुण्य
म्हणूनी तया वाहुनी पुष्पमाला
नमस्कार माझा श्री दत्तमहाराज कवीश्वरांना ।।

प. पू. दत्तमहाराजांचा मी पत्राद्वारे झालेला अनुगृहीत शिष्य. पूर्वपुण्याईमुळेच हे भाग्य मजला लाभले. १० एप्रिल १९८२ हा माझा सोनियाचा दिवस. वडील बंधु बाळासाहेब यांच्या सोबत मी भूम मुक्कामी दीक्षा घेण्यास बसलो व मी अनुगृहीत झालो.

प. पू. गुळवणी महाराजांचे दर्शन मी १९७० साली तुळजापूरला असताना घेतले होते. त्यांचे उत्तराधिकारी दरवर्षी त्यांच्याप्रमाणेच कार्यक्रम करतात, हे माहीत झाले. श्रावण महिन्यात आम्ही तुळजापूरला जाऊन महाराजांचे दर्शन घेतले.

महाराजांचे अबोल, तेजपूर्ण, विद्वत्तापूर्ण असे व्यक्तिमत्त्व पाहून डोळ्यातून आनंदाश्रू आले. आजोबांसारखा आधार, त्यांचे दर्शन घेताना वाटला. श्री. पाठकांच्या घरी त्यांच्याजवळ बसलो होतो. स्वतःचा त्रास इतरांना कमी व्हावा, हे व्रत कटाक्षाने महाराज पाळतात. मोजके बोलून ते मार्गदर्शन करतात.

माझे वैयक्तिक जीवन सर्वसामान्य माणसाचे. १९७८ साली लग्न झाले. एकनाड, पत्रिकेत ८ गुण मिळून, अशा मुलीशी मी विवाह केलेला. दरवर्षी अपत्यप्राप्तीसाठी त्रास झालेला. तीन गर्भपात झाले. सर्व महाराजांची सेवा केली, सोलापुरात प्रभाकर महाराज, राघवेंद्र स्वामी, इ. सेवा केली.

वडील बंधूंनी, अनुग्रह घेतल्यास सर्व दोष जातील व चांगले

होईल म्हणून सांगितले. शेवटी निर्णय घेऊन वरील तारखेस अनुग्रह घेतला. आश्चर्य म्हणा, आशीर्वाद म्हणा, मला ३०-७-८२ रोजी पुत्र-प्राप्ती झाली. व १०-१२-८४ रोजी दुसरा मुलगा झाला. हे फळ गुरुकृपेशिवाय मिळूच शकत नाही. विज्ञानयुगात हे सांगणे आवश्यक आहे.

माझी आर्थिक परिस्थिती बेताचीच. शहरात लोकांचे सुख बघितले की वाटायचे आपण काहीतरी धडपड करावी अगर पत्नीस नोकरी लावावी. फक्त S. S. C. कसेतरी पास झालेली पत्नी. नोकरीची वयोमर्यादा संपलेली. वशिला नाही, कोण नोकरी लावणार ? मॉंटेसरी कोर्स पोस्टाने बळेच दिला. दरवर्षी न चुकता महाराजांच्या दर्शनास कुबडे यांच्या घरी, बार्शी, तुळजापूर, शक्य तिथे जाऊन घेत होतोच. संभाजी विडी उद्योगातर्फे प. पू. महाराजांची साखरतुला झाली. "दत्तयोग" झाला होता. तेथेही गेलो.

बार्शीच्या भगवंत मंदिरात महाराजांचे सकाळी प्रवचन होते. मी येरमाळ्याहून येताना दर्शनास गेलो. माझे गाऱ्हाणे शब्दाने सांगण्याची गरज नसतेच. आपला भक्त संकटात आहे, त्याची इच्छा पूर्ण व्हावी, असाच त्यांचा आशीर्वाद. सोलापुरी आलो तर "संचार"मध्ये एक बालवाडी शिक्षिकेची घराजवळील शाळेची जाहिरात बघितली. मुलाखत होऊन गेलेली. सहज भेटायला गेलो. पत्नीचा अर्ज ठेवून घेतला. पण निवड पूर्वीच झालेली. पुन्हा निराशाच.

पण काळजी घेणारे सद्‌गुरुच असतात. दुसऱ्याच दिवशी शाळेतर्फे पत्नीला शिक्षिकेची ऑर्डर आली व लगेचच नोकरी सुरू झाली. हेसुद्धा गुरुकृपेचेच फळ. घराजवळ, सकाळी ७॥ ते १०॥ शाळा. तेवढेच पुण्यकर्म व आर्थिक सहकार्य संसारात लाभू लागले.

दि. ८-१-८८ रोजी प. पू. महाराजांची पादयपूजा भूम मुक्कामी "गोकुळ" या वास्तूमध्ये झाली.

आमचे कुटुंब नशिबवान. महाराजांचा सहवास ५-६ तास सर्वांना मिळाला. "दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा"चा जप चालू होता. मी दररोज एक पानभर हा जप लिहितो. नू. म. वि. सारख्या शाळेत माझ्या दोन्ही मुलांना अल्प देणगीमध्ये प्रवेश मिळणे

इ. सर्व गोष्टींमध्ये यश, हे महाराजांचे माझ्यावरील आशीर्वाद. महाराजांना उदंड आयुष्य मिळो, ही प्रार्थना. असे अनेक शुभप्रसंग आहेत. त्यातले थोडे लिहिलेत.

* * *

। श्री गणेशदत्तगुरुभ्यो नमः ।

## " दिव्यदर्शन "

दत्तमहाराजांना प्रणती
या शुभ समयाप्रती
मानसी भक्तीफुले उमलती ॥धृ०॥

कवीश्वरांचे कुलही पवित्र
धुंडिराजशास्त्रीसत्पुत्र
ज्ञानसूर्य प्रगटे सर्वत्र
विद्वज्जन पूजिती ॥ १ ॥

गणेशापरी दत्तोपासना
गुरुदत्तयोगाची साधना
त्रिगुरुचरणी पूज्य भावना
विद्यावाचस्पती ॥ २ ॥

बहुमानांचे कंठी हार
निरहंकारी वृत्ती अपार
श्रीदत्ताचे जणु अवतार
स्मर्तृगामी पावती ॥ ३ ॥

गुरुदेववाङ्मय प्रकाशन
महाराजांची इच्छा पूर्ण
बहुमोल असे ते संशोधन
कुंठित होई मती ॥ ४ ॥

साऱ्या विद्या एकजुटींनी
उभ्या ठाकती हात जोडुनि
भागवताच्या सप्ताहांनी
सद्वृत्ती जागती ॥ ५ ॥

गुळवणी महाराजांचे वारस
गौरव त्या कार्याचा खास
सहस्रचंद्रदर्शन शांतीची
आगळीच महती ॥ ६ ॥

सुस्वागत ते मान्यवरांचे
शुभचिंतनही गुरुवर्यांचे
संमेलन हे शिष्यजनांचे
गुरुकृपा हीच ती ॥ ७ ॥

उत्सवास विद्वज्जन येती
भक्त गुरुचरणी विसावती
यज्ञयाग ते अनेक होती
कीर्तनेही रंगती ॥ ८ ॥

पुण्यनगरी ही धन्य होतसे
सत्कार्यांनी फुलुनि जातसे
रम्य सोहळा नयनी भरतसे
सर्व ईशमहती ॥ ९ ॥

विद्यावाचस्पती, ब्रह्मश्री
प. पू. दत्तमहाराजांच्या ८१ व्या
वर्धापनानिमित्त स्फुरलेले गीत.
रचना दि. १०।२।१९९०

विनीता शिष्या
**सौ. शांता र. गोवईकर**

# संत संतांना ओळखतात

लेखक : **अनिल सुलाखे**, १७८ पर्वती पुणे ९.

**संदर्भ** – श्री. अनिल सुलाखे यांचे लेखन अधूनमधून अंकात येत असते. या विशेषांकासाठी त्यांनी पू. श्रीदत्तमहाराजांची एक आठवण सांगितली आहे. श्री. अनिल सुलाखे कवीपण आहेत.

## अंतरी सर्व संत एकच असतात

संतांना सूक्ष्म, दिव्य व दूरदृष्टी असते. सामान्यजनांना त्यांचे साधे आकलनही नसते. प. पू. दत्तमहाराजांना भविष्यकाळातील जे अभिप्रेत होते ते मला त्यावेळी अनाकलनीय होते. आपले मनी टोचणारे दुःख, आपली शंका, आपण आपले सुखार्थ साधुसंतांजवळच व्यक्त करणे इष्ट असते. महाराजांचे माघारी प. पू. दत्तमहाराजच आपले अडचणीचे निरसन करतील या आशेने मी त्यांची त्यांचे घरीच भेट घेतली. ती वेळ दुपारी चारची होती. साल १९७५–७६ असावे.

परंतु तत्पूर्वी मी प. पू. गुळवणीमहाराजांचा सन १९७०–७१ साली अनुग्रह घेतला होता त्याप्रमाणे साधना चालू होती. पुढे १९७५–७६ सालामध्ये मला प. पू. कलावती देवीच्या पुण्यात चालणाऱ्या वेगवेगळ्या देवालयात भजनास जाण्याची इच्छा झाली. मी जाऊ लागलो. मनास शांतता लाभू लागली. पुढे पुण्याहून कोल्हापूर येथे प्रादेशिक परिवहन कार्यालयात बदली झाली. तेथे श्रीमहालक्ष्मीचे मंदिरात सकाळी प. पू. कलावती देवीचे भजनास जाऊ लागलो. माझी आई मजकडे कोल्हापुरास आली. माझी खानावळ टळली. आईचेच हृदय ते! माझी आईपण दुपारी भजनास जाऊ लागली. माझे मन मला खात होते आपण गुरु केले कुणाला ? व हे होतंय काय ? घडतंय काय ? यापूर्वी आम्हाला भजन फक्त आकाशवाणीवरच ऐकावयाचे एवढेच विदीत होते. शिवाय एकाएकी भजनाकडे मी व पाठोपाठ माझी आई

आकृष्ट होतेय यामागे संतांचेच सूत्रसंचलन असावे. आपण केवळ कळ-सूत्री बाहुल्या असतो. तथापि आपलं निश्चित काहीतरी चुकतंय या अपराधी भावनेने मी पुण्यास आलो असताना प. पू. दत्तमहाराजांकडे आलो होतो. मी साशंक होतो ते महाराजांनी केव्हाच ताडले होते. मी म्हणालो– " प. पू. महाराजांचा अनुग्रह घेतला आहे. भजनाकडे मन वळतंय हे कसं ? माझ्या हाती काही राहिलंच नाही. आपसूकच घडतंय, तसं कुणीतरी घडवतंय असं झालंय. "

महाराज क्षणात उत्तरले, " **असं म्हणू नये. हे देवाघरचं लेणं आहे–** "

मी परतलो. ते एकच वाक्य माझ्या हृदयात तेव्हापासून खोचले गेले ते कायमचे खोचले गेले, कोरले गेले. प. पू. गुळवणी महाराजांच्या वदनातून सहजगत्या उच्चारलेली साधी वाक्ये ही पुढे अनुभवाअंती त्रिकालबाधित सत्ये निघाली होती. पुण्याहून मी कोल्हापुरास गेलो.

माझे वडिलांचे १९७३–७४ मध्ये प्राणोत्क्रमण झाल्यापासून भावनेच्या भरात माझ्या आईची देवावरची श्रद्धा जराशी ढळली होती. ती भजनाला जात होती पण तिच्या मनात कुणाचा अनुग्रह घ्यावा असे येत नव्हते. माझे वडील असताना माझे आईवडील उभयता प. पू. गुळवणीमहाराजांचा उपदेश घेणार होते पण योग नव्हता. मला मात्र आतून वाटे की माझे आईनी प. पू. कलावती देवींचा तरी उपदेश घ्यावा. मी तिला सांगू मात्र शकत नव्हतो. मी तिला दर्शनार्थ बेळगावी घेऊन गेलो. बेळगावला बसस्टॉपवर मी अप्रत्यक्षपणे तिला अनुग्रह घेण्याबाबत सुचविले. तिचा नकारच होता. पुढे तेथे हरिमंदिरात एकादशीला माझे आईचे मन पालटले. तिने अनुग्रह घेण्याचे ठरविले तोपर्यंत संध्याकाळ झाली होती. यावेळी उपदेश देत नसत. मी तसेच विचारले. अपवादा-त्मक माझे आईला अनुग्रह मिळाला. तिचेपेक्षा मलाच विशेष आनंद झाला.

त्यानंतर बरेच दिवसांनी, नव्हे बऱ्याच वर्षांनी मला प. पू. दत्त-महाराजांचे शब्द आठवले " **हे देवाघरचं लेणं आहे. असं काही म्हणू नका–** "

ज्या गोष्टीस मी नावे ठेवीत होतो ती गोष्ट फोल ठरली. मी

माझे आईचे अनुग्रहास निमित्त ठरलो होतो. माझेद्वारा माझे आईस भजनास बेळगावास जाणे झाले व तिला अनुग्रह मिळाला. समजा मी प.पू. दत्तमहाराजांकडे त्यावेळी गेलोच नसतो तर कदाचित गैरसमजाने मी आईस घेऊन अनुग्रहाशिवाय पुण्यास परतलो असतो किंवा तिला बळजबरी सक्ती केली असती तरी पण विपरित परिणाम होऊन तिने शेवटपर्यंत नकारच दिला असता. संतांच्या वचनावर माझी श्रद्धा तर होतीच शिवाय संतांचे दारी अशक्य ते शक्य घडते हे मीं वाचले, अनुभवले पण लगेचच नाथषष्ठीस (१९७८) माझ्या आईचे निधन झाले होते.

प. पू. दत्तमहाराजांच्या त्या वचनाचा गूढार्थ मला फार उशीरा समजला. मी थोडी जरी दिरंगाई केली असती किंवा मनी गैरसमज केला असता तरी माझे आईस अनुग्रह मिळाला नसता. माझ्या आईचे लगेचच मार्च ७८ मध्ये निधन झाले होते. प. पू. दत्तमहाराजांचे बोल किती अचूकवेळी मार्गदर्शक ठरले होते हे आठवले की संतवचनाचे महत्त्व कळते. माझ्या घरात वंशोवंशी पारंपरिक पंढरपूरची दसरा – द्वादशी वारी आहे. मी दरवर्षी दसरा द्वादशीस पंढरपूरी जात असतो. याचाच परिणाम मी भजनाकडे वळलो किंबहुना हरि–कृपा, संत–कृपा झाल्याशिवाय भजनमार्ग लाभत नसतो तेच खरे, ते मला प. पू. दत्त-महाराजांच्या उद्गारावरून उशीरा समजले. विचारांचा कीस काढल्या वर उशीरा समजले. ज्याप्रमाणे भवसागरात आपली जीवननौका हेल-कावे खाते, उसळत्या लाटांवर जेव्हा संसारात वादळ उठते विचारांच्या नव्हे अविचाराच्या विचारांचे थैमान उसळते तेव्हा दूरवर एक दीपस्तंभ आपणास दिसतो व आपली बुडणारी नौका पैलतीरास पार होते. आणीबाणीच्या कसोटीच्या वेळी मला प. पू. दत्तमहाराज असे दीपस्तंभाप्रमाणे भेटले. त्यांच्या दिव्य वचनाने माझ्या वा माझ्या आईच्या जीवनास पैलतीर दिसले. मी तर माझे आईच्या अनुग्रहास निमित्त ठरलो, तथापि प. पू. दत्तमहाराजांची भेट, त्यांचे दिव्य वचन एकच एक वाक्य माझे कानी न पडते तर दीपस्तंभाअभावी माझ्या आईची जीवननौका अनुग्रहाअभावी बुडाली असती.

पू. कलावती देवींचा मी अनुग्रह घेतलेला नाही. पण तेथे भजने

ऐकायला मी जात असे. मला ती आवड आहे. त्यांच्या शिष्यभक्तांमध्ये मी वेगळा, नवखा दिसत असे. आई भजनाला बसत असे, म्हणूनही मला जावे लागे. एकदा माझ्या आईच्या देखत एका बाईने पू. कलावतींदेवींना माझ्याबद्दल विचारले, "हे जे गृहस्थ आपल्या येथे भजन ऐकायला येऊन बसतात, त्यांनी अजून आपला अनुग्रह घेतलेला दिसत नाही." यावर पू. कलावतीदेवी म्हणाल्या, "त्याच्या पाठीशी ब्रह्मज्ञानी सिद्धपुरुषाची शक्ती आहे. फार मोठ्या आपत्तीतून तो गुरूमुळे सुटला आहे. आपल्या येथे त्याला आनंद वाटतो म्हणून येतो. त्याची आई येते. तिच्या सोबतीसाठी येतो पण इथेच भजनातही रमतो."

मी अनुगृहीत आहे ते न सांगता पू. कलावती देवीने सांगितले आणि आमचे गुरु ब्रह्मज्ञानी–सिद्धपुरुष आहेत हे शब्द त्यांच्या मुखातून निघाले आहेत.

* * *


प. पू. श्रीदत्तमहाराजांचे कृपाशीर्वादाने चाललेली आमची प्रतिष्ठाने

**मेसर्स नागनाथ रघुनाथ कोटलवार,**
**बार्शी, जि. सोलापूर**

**जवाहर मार्केट यार्ड** – अन्नधान्ये, तेलबिया, चिंच, इ. मालाचे ठोक कमिशन एजंट व आडत व्यापारी.
ऑफिस टे. फो. नं. २२१०. पोष्ट बॉक्स नं. ७.

— आणि —

**योगेश स्टील एम्पोरियम्** – ३२९२ महावीर मार्ग, बार्शी
ऑफिस टे. फो. नं. २२५०.

सर्व प्रकारचे तांबा, पितळ, अल्यु. **स्टीलची भांडी, प्रेझेंटेशन आर्टिकल्स,** 'हॉकिन्स' – 'मार्लेक्स' – 'राजे' – 'प्रेस्टीज' **कुकर्स.** 'गोपी' – 'सुमित' – 'रेमी' – 'क्लासिक' – 'क्राऊन' – 'ओजेस' चे **मिक्सर्स** अंजली किचन वेअर्स व निर्लेप नॉनस्टिक कुकवेअर्सचे अधिकृत विक्रेते.

सर्व कंपन्यांचा खात्रीशीर माल – गॅस शेगड्यांची खात्रीशीर दुरुस्तीचे एकमेव ठिकाण—

**तारेचा पत्ता : "ओनेष्टी" घरचा फोन नं. : २२७०**

# निकट सहवासाचा आकस्मिक व अपूर्व लाभ

लेखिका : सौ. सुनंदा दामोदर कुलकर्णी
हत्तरवाटकर, बंगलोर.

भक्तवत्सल भक्ताभिमानी प. पू. दत्तमहाराज कवीश्वर बेंगलोर येथे आल्यावेळी त्यांचे आमच्या घरी वास्तव्य व त्यांच्या निकट सहवासात रहाण्याचे परमभाग्य आम्हाला मिळाले.

जून १९८३ मधील ही घटना. बेंगलोर येथे श्री. रा. रा. खोडे यांनी २० जून ते ३० जूनपर्यंत 'गायत्री मंत्रा'ची सांगता करण्याचा समारंभ आखला होता. धार्मिक समारंभाकरिता अनेक विज्ञान, शास्त्री, पंडित वगैरेंना पाचारण केले होते. वेदशास्त्र पारंगत ब्रह्मवृंदही हजर होणार होता. विद्यावाचस्पती, राष्ट्रीय पंडित आणि संस्कृततज्ज्ञ प. पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वरांना संस्कृत संमेलनाकरिता आमंत्रण होते. महाराजांनी या कार्यक्रमास येण्याची समंती दिली होती हे आम्हास कळले होते, पण महाराज कुठे रहाणार याची कल्पना नव्हती.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे श्रीदत्तमहाराजांची व्यवस्था आमच्याकडे केल्याचे समजले. श्री. रा. रा. रघुनाथराव कुलकर्णी यांचे पत्र पण आमच्या 'ह्यांना' म्हणजे श्री. रा. रा. दामोदर विश्वनाथ कुलकर्णी हत्तरवाटकरांना आले. महाराजांचे पाय आपल्या घरी लागणार, ते आपल्या घरी रहाणार या कल्पनेनेच त्यांच्या आनंदाला उधान आले.

साधुसंत येती घरा । तोचि दिवाळी दसरा ।।

या कल्पनेने तयारी सुरू झाली. माझ्या मनात मात्र सारखी उगीचच भीती वाटत होती की, आपली जागा अशी ही लहान. महाराजांची जेवणाची, रहाण्याची व्यवस्था आपल्या हातून ठीक रीतीने होईल ना! पण पुन: वाटले की, श्रीसद्गुरु सहवास आणि त्यांची सेवा करण्याची दुर्मिळ संधी चालून आलेली आहे. आपल्याकडून होईल तितकी खटपट करावयाची व महाराजांना सर्व रीतीने अनुकूलता करून द्यावयाची.

श्रीदत्तमहाराज दुसऱ्या दिवशी नक्की कोणत्या गाडीने येणार, हे कळले नव्हते तरी आमचे हे भल्या पहाटेच आपले आन्हिक वगैरे आटोपून स्टेशनवर गेले. सकाळचे दहा वाजून गेले. पुण्यावरच्या गाड्या येऊन गेल्या. यांची जरा निराशाच झाली. पण दुपारी १२ वाजता टॅक्सी आमच्या घरासमोर येऊन उभी राहिली. प. पू. श्रीदत्तमहाराज व श्री. रघुनाथराव कुलकर्णी गाडीतून उतरले. आमचे घरमालक व श्रीदत्त महाराजांचे विद्यार्थिमित्र श्री. गुरुभट्ट जोशी त्यांना वर घेऊन आले. आम्ही वरच्या मजल्यावर रहातो. वेदोक्त मंत्रांनी महाराजांचे स्वागत श्री. गुरुभट्ट यांनी केले. महाराजांना त्यांनी हार घातला. मी व माझ्या मुलीने मिळून महाराजांना औक्षण केले. महाराज आत येऊन आसनावर बसले. सर्वांनी साष्टांग दंडवत घातले.

प्रवासाचा शीण महाराजांना बराच झाला होता. तरीपण त्यांना तेल लावून अभ्यंग स्नानाची त्यांची सोय केली. स्नान, संध्या–जपजाप्य वगैरे झाल्यावर भोजन झाले. विश्रांतीनंतर बोलता बोलता कळले की, गाडी बरीच उशिरा आली. दुसरे दिवशी सकाळी धारवाडचे वे. मू. भालचंद्रशास्त्री उप्पीन बेटगिरी आणि काही भक्तमंडळी महाराजांच्या दर्शनाकरिता आली. प्रवचनाची वेळ वगैरे ठरली. महाराज कार्यक्रमा-करता कोठे कोठे जात, पण परत येत.

पहिले एक-दोन दिवस मी श्री. रघुनाथरावांना विचारून महा-राजांना काय आवडते, काय नाही याची माहिती करून घेतली. पण नंतर मात्र भीड चेपली. महाराजांची कसलीच आढ्यता नव्हती. महाराजांचे जेवण बेताचे, पण जे खातील ते चवीने खात. दक्षिणेकडील पदार्थ म्हणजे इडली, दोसा, चित्रान्ना, बिसीबेळे भात वगैरे वगैरे एकेक दिवस एक असे करून घातले. 'हैग्रीव' त्यांना फारच आवडले. "वा ! छान झाले आहे. हा जिन्नस आमच्याकडे करत नाहीत !" म्हणून सांगून त्यांनी कौतुकच कौतुक केले.

महाराजांचा स्वभाव अतिशय संकोची. फार मोजके बोलणार. वर मान करून बोलणे कमीच. कधीतरी दुपारी माझी मुलगी कु. अलका (सौ. नीता शिरगुरकर) व चि. शिरीष यांच्याशी आपल्या नातवंडांप्रमाणे गप्पा करीत. चि. शिरीष कधी कधी त्यांचे पाय

पुसावयाचा; तर त्यांना कोण कौतुक.

श्री दत्तमहाराज म्हणजे सोज्वळता आणि सरळता, साधेपणा आणि नम्रता त्यांच्या अंगअंगातून बाणलेली दिसते. कोणी काही विचारले तर ते म्हणत "गुरुमहाराजांकडे प्रार्थना करा. त्यांच्या कृपेने व आशीर्वादाने सर्व ठीक होईल." अध्यात्मक्षेत्रात त्यांचा केवढा मोठा अधिकार, पण कशाचेही कर्तृत्व आपल्याकडे घेत नव्हते. विद्वत्ता आणि विनय दोन्ही एकीकडे फारच क्वचित, आढळतात.

'विद्या विनयेन शोभते' हेच खरे. श्रीदत्तमहाराजांचे आणखीन एक वैशिष्टच जाणवले ते म्हणजे त्यांना कधीही राग येत नसे अथवा दुसऱ्याने चूक केली असे वाटत नसे. खरोखरीच त्यांना सत्पुरुष म्हटले पाहिजे. कोणाच्या मनाला ते दुखवत नसत. श्रीदत्तमहाराज भारतीय ख्यातीचे विद्वान, प्रतिभावान् आणि अवतारी पुरुष आहेत. त्यांचे स्वरूप विशाल आणि विराट आहे, पण त्यांची स्वतःची भूमिका मात्र वामनाप्रमाणे लहान आहे.

श्रीदत्तमहाराजांच्या सहवासात दहा-बारा दिवस कसे निघून गेले समजले नाही. निघावयाच्या दिवशी आमचे हे देवासमोर पूजा करीत बसले असताना श्रीदत्त महाराजांनी स्वतः त्यांच्याजवळ येऊन 'मंगलमूर्ति मोरया' म्हणत ह्यांच्या पाठीवर रेशमी धोतर पांघरून कृपाशीर्वाद दिला. आजही त्यांना त्या मायेची ऊब जाणवते. मला व मुलांना माहेरवाशिणीप्रमाणे आहेर केला. आमची अंतःकरणे गहिवरली व डोळे पाण्याने तरळले. आमचे हे फारच भावनाप्रधान. त्यांच्या डोळयातून घळाघळा अश्रू वाहू लागले व तोंडून शब्दच फुटेनात. आम्ही सर्वांनी प्रेमाश्रूंच्या प्रवाहांनी महाराजांच्या चरणावर मस्तक ठेवले.

गाडीची वेळ झाली. आम्ही स्टेशनवर जाण्यास निघालो. निघताना महाराजांच्या तोंडून आलेले शब्द आम्ही आयुष्यभर विसरणे शक्य नाही. ते म्हणाले, "दामूअण्णा, इथे असेतो आम्हाला घरची आठवण झाली नाही. पण तुम्हा सर्वांची आठवण मात्र आम्ही पुण्यास गेल्यावरही होणार ! दुसरी गोष्ट म्हणजे येथे गुरुमहाराजांचे (योगीराज गुळवणी महाराज) वास्तव्य आम्हास सतत जाणवले."

महाराजांनी इतक्या आपुलकीने आमच्याबद्दल उद्गार काढावे

असे काय केले होते ? महाराजांनी आमची सेवा गोड मानून घेतली यातच सर्व आले. श्रीदत्त महाराजांनी आम्हा सर्व हत्तवाडकर कुटुंबावर अशीच कृपाकूर्म दृष्टी ठेवून, आपल्या मायेची शाल पांघरून सतत आमचे रक्षण करावे, एवढीच प्रार्थना नतमस्तक होऊन श्रीदत्त महाराजांकडे करतो. व आम्ही सर्वजण ब्रह्मश्री दत्तमहाराजांच्या सहस्त्रचंद्रदर्शन शांती प्रसंगी प. पू. श्रीदत्तमहाराजांना आयुरारोग्याभिवृद्धी होऊन आमच्यासारख्या पामरांना त्यांची उत्तरोत्तर सेवा करण्याचा अधिकाधिक लाभ होवो, अशी श्रीचरणी प्रार्थना करतो.

* * *


पुण्याची शान

संपूर्ण स्वयंपाक वनस्पती तुपाविरहित

**सात्विक थाळी**

१५२८ सदाशिव, पेरूगेट,

टिळक स्मारक रस्ता, पुणे ३०

फोन ४३५९६७

शुक्रवार सुट्टी : सकाळी ११ ते २, सायं. ७।। ते १०



p. p. 448878

**S. U. AMBARDEKAR**

**Government Contractor**

482 Narayan Peth

Pune 411030

# प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज एक दिव्य आणि आगळे व्यक्तिमत्त्व

लेखिका : **सौ. शकुंतला जतकर**, बंगलोर.

परमपूजनीय ब्रह्मश्री दत्तमहाराजांचे लौकिक आणि पारमार्थिक जीवन अथांग सागरासारखे विशाल आहे. त्यांचा आध्यात्मिक अधिकार फार मोठा आहे. प. पू. गुळवणी महाराजानंतर त्यांच्या कार्याची धुरा ते समर्थपणे सांभाळीत आहेत; पण त्यामागे अधिकाराची भावना नसून मी एक 'सेवक' आहे, 'कर्ता करविता परमेश्वर आहे.' अशी लीन भावना आहे. "समर्थाघरचे श्वान, त्यास सकळही देती मान" ही स्वत:बद्दलची त्यांचीच विनयशील भावना आपल्याला त्यांचा मोठेपणा दाखवून देते. त्यांच्यामधील दिव्यत्वाची भावना जाणवून देते. आपोआपच आपले कर जुळले जातात व आपण नतमस्तक होतो.

संसारांत राहून संसारांच्या मायपाशांत न गुरफटता विवेक आणि वैराग्य यांच्या साहाय्याने संसार आणि परमार्थ दोनही सारख्याच वृत्तीने चालवणारे प. पू. श्री दत्तमहाराज हे कर्मयोगी आणि ज्ञानयोगी आहेत असे म्हटले तर अतिशयोक्ती होईल असे वाटत नाही. त्यांचे साधे, स्वावलंबी, त्यागमय जीवन आम्हा सामान्य जनांना अनुकरणीय ठरावे असेच आहे.

प. पू. दत्तमहाराजांना भेटण्याचे प्रसंग अनेकदा आले. मी जेव्हा जेव्हा त्यांना भेटले तेव्हा पाहिले की, महाराज लहानपणापासून थोरापर्यंत सर्वांना आदराने वागवतात. आपुलकीने त्यांच्याकडील इतर माणसांची चवकशी करतात आणि त्यामुळेच प्रत्येकाच्या मनात त्यांच्याबद्दलचा आदर द्विगुणित होतो. भक्तांनी त्यांना आपले कष्ट दु:ख सांगितले तर ते शांतपणे ऐकून घेतात. बराच वेळ काही बोलत नाहीत. पुन: विचारले कीं, 'महाराजांकडे प्रार्थना करा. आपला त्रास कमी होईल; अथवा आपले काम होईल' असे सांगतात आणि मनाला धीर

देतात. आपल्याकडे मोठेपणा कधीच घताना दिसत नाहीत. कशाचा आग्रह पण करीत नाहीत. माझ्या भाचीला त्यांनी मंत्र सांगून सवडीनुसार करीत जा असे सांगितले आहे, भाच्याला गायत्री मंत्र रोज म्हण पण गुरुचरित्र सुट्टीत वाचीत जावे असे सुचविले आहे. ही मुले विद्यार्थी आहेत याची त्यांना चांगली कल्पना आहे. सांगावयाचा उद्देश हा की महाराज तसे कर्मठ नाहीत. आधुनिक काळाशी अनुसरून जाणारे आहेत.

अगदी अलीकडे महाराजांना भेटण्याचा योग आला तो नृसिंहवाडी येथील मे महिन्यातील श्रीनारायणस्वामी महाराजांच्या उत्सवात. उत्सव संपवून परत निघताना मी महाराजांना सांगितले, " काश्मीरच्या प्रवासास निघाले आहे. वैष्णवीदेवी येथे जाण्याचा विचार आहे. आपला आशीर्वाद असावा.' महाराज म्हणाले, " काश्मीरची हवा मे महिन्यात छान असते. काही त्रास होणार नाही. वैष्णवी देवीची चढ मात्र त्रासाची आहे असे म्हणतात. मुंबईहून परत जाताना श्री भागवत सप्ताहास जमल्यास या." काश्मीरचा प्रवास उत्तम झाला. अडचणीमुळे वैष्णवीदेवी येथे जाता आले नाही. महाराजांनी आधीच सुचविले होते असे आता वाटते.

श्रीमद्भागवतावरील प्रवचन ऐकण्याचा सुयोग मात्र नृसिंहवाडी येथे आला. मुंबईच्या श्री झुरळे महाराजांनी हा सप्ताह घडवून आणला होता. सात दिवस महाराजांचे श्री भागवतावरील रसाळ प्रवचन ऐकून खरोखरीच कान तृप्त झाले. श्री दत्तमहाराज त्यावेळी रोज रात्रीच्या उपहारास वे. शा. सं. अवधूत शास्त्री यांच्याकडे येत होते. माझा मुक्काम वे. अवधूत शास्त्री यांच्याच घरी असल्यामुळे मला श्री दत्तमहाराजांची अल्पस्वल्प सेवा करण्याचा योगही आला. एवढेच नाहीतर सौ. आईसाहेब व जालन्याच्या सौ. ताईसाहेब यांच्या दुपारच्या जेवणाचा सहपंक्तींचा लाभ मिळाला. सौ. आईसाहेबांच्याकडून महाराजांच्याबद्दल थोडी फार माहिती मिळाली.

सप्ताह काळांत श्री दत्तमहाराज सकाळची संहिता वाचीत नसल्यामुळे सकाळी ९ नंतर भक्त त्यांच्या दर्शनास येत. मीपण महाराजांना एक-दोन शंका विचारल्या त्या अशा.

मी : एकाच जपमाळेवर वेगवेगळे जप करावे का न करावे ?

महाराज : त्याला काहीच हरकत नाही. मात्र एक जप पुरा झाल्यावर दुसरा करावा.

मी : श्रीपाद श्रीवल्लभस्तोत्र हे रात्रीच म्हणावे अथवा केव्हाही म्हटले तरी चालते ?

महाराज : अहो ! ही प्रार्थना आहे. प्रार्थना केव्हाही करावी.

मी : श्री वासुदेवनिवास येथे सेवाधन ठेवावे असे वाटत आहे, ते कोणत्या उपक्रमांतून ठेवावे ?

महाराज : वा ! छान ! ही ईश्वरी प्रेरणा आहे ! थोरले महाराज आहेत. गुरुमहाराज आहेत. आपण कशाही स्वरूपात ठेवू शकता. विद्यादान करावे. अन्नदान करावे...

श्री दत्तमहाराजांनी मार्गदर्शन केल्याप्रमाणे सावनूरला आल्यावर वासुदेवाश्रमात सेवाधन पाठवले. आठच दिवसांत महाराजांकडून आशीर्वादपर पत्र आले. आशीर्वादामुळे अननुभूत अशा झालेल्या आनंदाची गोडी आजही जाणवते.

जीवनात ज्या ज्या वेळी सुखदु:खाचे प्रसंग आले त्या त्या वेळी श्री दत्तमहाराजांनी सांगितल्याप्रमाणे महाराजांकडे (प. पू. गुळवणी महाराज) प्रार्थना केली असता एक वेगळ्याच प्रकारचे मनोधैर्य व मानसिक शांती मिळते. 'महाराज आपल्या पाठीशी आहेत,' याची जाणीव होते.

श्री दत्तमहाराजांबद्दलची असलेली आदरणीय भावना शब्दांतून व्यक्त करणे अशक्य आहे. त्यांना त्रिवार वंदन करून श्रीचरणी प्रार्थना करते की, प. पू. श्री दत्तमहाराजांना आयुरारोग्याभिवृद्धी प्राप्त होवो व आम्हांला त्यांची सेवा करण्याचे योग येवोत.

* *

**श्री वासुदेव निवास प्रकाशनाची पुस्तके पारमार्थिक उपासना व मार्गदर्शन यासाठी अत्यंत उपयुक्त आहेत.**

काव्यविभाग

# निशिदिनी ध्यावे-सद्गुरुनाम

कवयित्री : **श्री. कुसुम स. जोशी**, डोंबिवली

निशिदिनी ध्यावे सद्‌गुरुनाम
शांती सुखाचे हे सुखधाम ॥ धृ० ॥

अखंड जपता नाम वाचे
रूप येतसे पाठी त्यांचे
अमूर्त येते रूप घेऊनी
घेता मंगल नाम ॥ १ ॥

हृदय सिंहासनी सद्‌गुरु बसले
मिटता नयने लोचनी दिसले
अंतर तुटूनी अंतरी हंसले
होता मन निष्काम ॥ २ ॥

"वामन" नामा घेऊनी येती
पाहु जाता इथे प्रगटती
"वामन" "दत्तात्रय" गुरुमूर्ती
देती जीवा आराम ॥ ३ ॥

जीव तळमळे या संसारी
कूर्म दृष्टीने आम्हा सावरी
तव पायासी या दासीला
देई सदा विश्राम ॥ ४ ॥

* *

# 'ज्ञानयोगी दत्त'

कवी : **विठ्ठल पवार**, रा. रत्नापूर, ता. कळंब,
जि. उस्मानाबाद, (मराठवाडा)

'ज्ञान योगी दत्त,' पाहिले डोळे भरून ।
चित्त मन बुद्धी, एकाग्र करून ।। धृ० ।।
कृपा आईची, आत्मा आनंदला ।
श्रावण मासी, तुळजापूरला ।।
कूर्म दृष्टीने, मला पाहून ।
दिव्य दृष्टी दिली, आत्मा जागवून ।।
तेव्हापासून, साधनेत चमत्कार झाला ।
एक मूर्ती, तीन रूपात देव दिसला ।।
'ज्ञान योगी दत्त' पाहून, अष्टभाव प्रगटले ।
श्री गुळवणी महाराजांच्या कृपेमुळे ।।
न बोलता कळो येते, सद्गुरूंना अंतर ।
गुरु महिमा न वर्णवे, मी एक पामर ।।

* *

**मराठवाडा सहकारी साखर कारखाना लि.**
**शिवाजी नगर, पो. डोंगरकडा, जि. परभणी**
तार : जटाशंकर, नांदेड        फोन : २४११ नांदेड, २६ डोंगरकडा
**कारखान्याची उज्वल भविष्याकडे वाटचाल**

* दररोज १२५० मे. टनापेक्षा जास्त गाळप
* शुभ्र दाणेदार साखर निर्मिती
* मशिनरी आधुनिकीकरण करून कमी खर्चात जादा साखर उत्पादन आणि उतारा जास्तीत जास्त मिळविणे
* शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संचालक मंडळ कटिबद्ध

**शंकरराव देशमुख** — उपाध्यक्ष
**दत्ता शिंदे** — कार्यकारी संचालक
**विठ्ठलराव देशमुख** — अध्यक्ष

# दत्त गुरु आई

कवयित्री : **सौ. पद्मावती रामचंद्र येडलवार,**
मु. पो. ता. बार्शी, जि. सोलापूर.

दत्त गुरु आई धावूनी येई ऽऽ
तुज वाचूनिया जगी कोणी नाही
दत्त गुरु आई ऽऽ ॥ धृ० ॥
तूची माता–पिता–बहिण–बंधू–चुलता
तूची मुक्ती दातामज मुक्ती देई
दत्त गुरु आई ऽऽ ॥ १ ॥
तुज आठविता व्याकुळ प्राण होई
हात माझा धरून निजपदा नेई
दत्त गुरु आई ऽऽ ॥ २ ॥
विनविते तुजला पद्मावती दासी
कैवल्यपदासी मजला नेई
दत्त गुरु आई ॥ ३ ॥

*With Best Compliments From :*

# " LIMCO "

1426 Kasba Peth, Phadke Houd Poona 411011

Prop. D. M. Limbhore

**Industrial Manufacturers**
**& Suppliers**

# आलो गुरुचरणी

अनंत साठे, माटुंगा, मुंबई

किती जन्म मी आलो गेलो
   मायामोहामधेच रमलो
ह्या सगळयातुन सुटण्या आता
   आलो गुरुचरणी, पहा मी आलो गुरुचरणी. ॥ १ ॥

जन्मजन्मीच्या कृतकर्मांचे
   काटे वाटेवरी पसरले
मोहपाशही घडीघडीला
   मार्गी मज अडविले, पहा हो मार्गी मज अडविलें. ॥ २ ॥

देहसुखांची ती क्षणिकता
   अन् देहाची क्षणभंगुरता
तृष्णेला ना कधी पूर्णता
   ही जाणीव अता झाली, माझ्या जाणीव मना आली. ॥३॥

कुशाग्र नाही बुद्धी लाभली
   देहपिडाही कधी ना सुटली
परी सत्संगाने आत्मोन्नतीची
   ओढ मला लागली, मनाला ओढ मज लागली. ॥ ४ ॥

पराजयाने गर्व पळाला
   श्रेष्ठत्वाचा दंभ गळाला
गुरुकृपेविण होत न काही
   ही खूण पहा पटली, मनाला खूण पहा पटली. ॥ ५ ॥

व्रतवैकल्ये कधी न केली
पाटी मनाची कोरी राहिली
त्या पाटीवर गुरुचरणांची
शुभचिन्हे उमटली, पहा हो पदचिन्हे उमटली. ॥ ६ ॥

माझे मीपण सरले आता
आचरिन जे सांगाल तत्त्वता
आता केवळ श्रीगुरुसत्ता
मजला प्रतिपाळी, खरोखर मजला प्रतिपाळी. ॥ ७ ॥

* * *

*With best compliments from :*

# Radiant Transport Co.

Transport Contractors & Tank Truck Fleet Owners, Carriers of Petroleum Products, chemicals, edible oils, Spirits & Molasses througout India. Suppliers of fresh water in GREATER Bombay,

Phones :
862313
862039
862492
863515

Grams–" READY SERVE "

Telex–011 75335 JOE IN

**Sujata Apartments. Gr. Floor**
**8/10 Dock Yard Rd. Mazgaon**
**Bombay–400010**

# १. श्रीगुरुदेव प्रार्थना

कवि – **जनार्दन कुलकर्णी**, भांडूप ( पूर्व ), मुंबई

माझे गुरु ब्रह्म महेश मुरारी ।
भव भय हारी भक्त कैवारी ।। धृ० ।।

अज्ञान वासना जाई नारे बापा ।
ज्ञान वैराग्य देई मज राया ।।
सर्वस्व अर्पीले तव पद्मचरणी ।
तुज विण दुजा नाही तारक कोणी ।। १ ।।

गुरु-वामन-दत्त भेद नाही त्यात ।
गुरुतत्त्वची आहे तया अंतरात ।।
परंपरा दिव्य तव योगशक्तिपात ।
न्हाऊ घाल गुरुराया तू मज त्यात ।। २ ।।

* * *


*With Best Compliments From :*

SUDHIR MUDHOLKAR

**GAYATRI ENTERPRISES**

**Commercial Display Translite**

Plot No. 3 - Room No. 202
MAYUR COLONY, Opp Kiloskar Kissan
KOTHRUD 411029
Tel. No. C/o 331248

## २. श्रीदत्तमहाराज

कवि – जनार्दन कुलकर्णी, भांडूप ( पूर्व ) मुंबई

मी अज्ञ अकुशल कर्मी
तू सर्वज्ञ कुशल अंतर्यामी
तुला सोडुनी नाही अन्य
सौख्य-मोक्षास तूच शरण्य ॥ १ ॥

क्षमा शांति कृपा मूर्ती
जवळ घे मज दत्तमूर्ती
करी हृदय सांत्वनपूर्ती
मग तरीन भवसागर अंती ॥ २ ॥

म्हणुनि आर्त दीनावरी
तू गुरुमाऊली कृपा करी
सर्व अर्पिले तव पायावरी
श्रीदत्तगुरु तू अवतारी ॥ ३ ॥

* * *


*With Best Compliments From :*

**ROCH INTERIORS** & for LUXURY CARS
**ROKSONS TRAVELS**

**Jayant Rokade**
**23/325 Lokmanya Nagar**
**PUNE–411030**

Tel : 424295

# ३. गुरुपदी मन लागु दे ।

कवि - **जनार्दन कुलकर्णी**, भांडूप ( पूर्व ), मुंबई

( राग : ललित कामोद )

गुरुपदी मन लागु दे । मम...
गुरुपदी मन लागु दे । मन लागु दे ॥ प ॥

मनभ्रमर तव पादपद्मी
गुरुकृपामृत सेऊ दे । मन सेऊ दे ॥ १ ॥

भान विसरुनि कमलचरणी
लीन होऊनि राहु दे । मन राहु दे ॥ २ ॥

कठिण वृक्षे कोरणारे
भ्रमर कमळे शोधितो । नित शोधितो ॥ ३ ॥

भ्रमर पुष्पे पाहता निज
कठिणवृत्ती सोडितो । तम सोडितो ॥ ४ ॥

तैसे सद्‌गुरु पाहता मज
संसार वृत्ती जाऊ दे । सुख लाभू दे ॥ ५ ॥

धुंद मधुकर सेविता मधु
कमळ हृदयी झाकिती । निशि रक्षिती ॥ ६ ॥

तैसे सद्‌गुरु माय माझे
तव कृपा मज रक्षु दे । नित रक्षु दे ॥ ७ ॥

* * *

श्रीगुरुः शरणम्

# तस्मै श्रीगुरवे नमः

विनिता शिष्या
**सौ. शांता र. गोवईकर, सोलापूर**

**संदर्भ** – गुरुभगिनी सौ. शांताबाई गोवईकर या कविहृदयाच्या आहेत. त्यांनी अनेक प्रसंगांवर कविता केलेल्या आहेत. त्यांच्या काव्याचा विषय गुरु-ईश्वर-परमार्थ एवढाच आहे. त्यांनी आपला काव्य-गुण श्रीगुरुचरणी समर्पण केला आहे. काव्यगायनही चांगले करतात.

गणेशदत्तभक्तीने कुळात संत जन्मले
धुंडिराजशास्त्री ज्ञानी श्रेष्ठ पिता लाभले
देवी सरस्वती–माऊलीस पुत्र जाहले
दत्तमहाराज जणु दत्तरूपी प्रकटले ।।१।।

न्यायशास्त्र मीमांसा धर्मशास्त्र व्याकरण
संपादुनि 'ब्रह्मश्री' नित्य करिती ज्ञानदान
'निंबार्क-भाष्य' 'सर्वदर्शन' मराठीत प्रगटले
'न्यायरत्न' दत्तमहाराज ख्याती पावले ।।२।।

कामकोटी शृंगेरी आंध्रप्रांती वेंगरूळी
विद्वत्संमेलनी प्रकट झालीसे हुशारी
'विद्याभ्यसणं व्यसनं' हेच ध्येय मानिले
दत्तमहाराज पूर्णज्ञानब्रह्म प्रकटले ।।३।।

संस्कृतचा प्राकृतचा व्यासंगही तो प्रचंड
अध्यात्मिक वैचारिक प्रवचनात नाही खंड
उपासनेत योगसाधनेत चित्त रंगले
विद्यावाचस्पती दत्तयोगी प्रकटले ।।४।।

वासुदेवानंदसरस्वती–शताब्दी पातली
गुरुदेवहस्तलिखित वाङमयास गति दिली
योगीराज आज्ञेने ग्रंथकार्यं जाहले
दत्तमहाराज दत्तभक्त शिष्य गाजले ॥५॥

धर्मपत्नी लक्ष्मीदेवी साथ देत प्रेमळ
पुत्रसुना कन्याजामात लाभलेत सोज्वळ
‘ रेणुकानिवास ’ स्थान गोकुळची भासले
प्रवचने ती रंगता दत्तकृष्ण भेटले ॥६॥

संसारी तरी विरक्त अंतरात ईशभाव
स्वावलंबी समाधानी नम्र सात्त्विक स्वभाव
दत्तमहाराज उत्तराधिकारी शोभले
लक्ष लक्ष शिष्यांना दीक्षागुरु लाभले ॥७॥

गाणगापुरात ते ‘ गुरुदेव–धर्मस्थान ’
पुण्यनगरी आश्रम ‘ वामन–निवास ’ धाम
प्रवचनांनी धर्मकार्य अर्थकार्य साधिले
दत्तमहाराज संकल्प पूर्ण जाहले ॥८॥

ब्रह्माविष्णूमहेश दत्तरूपी विनटले
तसेच वासुदेवानंद लोकनाथ आगळे
योगीराज गुळवणीही ज्ञानी संत गाजले
दत्तमहाराजस्वरूपी सद्गुरूंना वंदिले ॥९॥

घडे न काही साधना तशीच ती उपासना
काव्यातुनि सद्गुरुंना सादर ही वंदना
गुरुमहिमा गाताना अष्टभाव दाटले
अंजलीसह शांताने दत्तगुरु पूजिले ॥१०॥

* * *



पू. श्रीदत्तमहाराज पू. श्री गुळवणी महाराज प्रो. दामले पुणे

– समान मान सन्मान –



पू. दत्तमहाराज प. प. श्रीसत्यदेवानंद सरस्वती स्वामीमहाराज कै. नातू. श्री अजित कुलकर्णी



जिज्ञासापूर्ति
श्रीवासुदेवनिवास पीठाधीश्वर

कुतूहल !
शृंगेरी पीठाधीश्वर



प. पू. श्री दत्तमहाराज, प. प. श्रीस्वामी शिवोम्तीर्थजी महाराज
— शक्तिपातयोगपीठाधीश्वर —

# गुरु-महिमा

कवयित्री-सौ. शांता र. गोवईकर सोलापूर

गुरुनाम जिव्हेवरी ।
गुरुमूर्ती अंतरी ।
गुरूपदेश आचरी ।
अज्ञ हे मना ।।

गुरु नाही घरीदारी ।
गुरु नाही मंदिरी ।
गुरु नित्य अंतरी ।
जसा श्रीहरी ।।

गुरूचे गुरुत्व साऱ्या ग्रहात ।
गुरूचे महत्त्व नरजीवनात ।
गुरूचे कर्तृत्व मित भाषणात ।
गुरूचे ममत्व निज माउलीत ।।

नयनात नांदो गुरुदेवमूर्ती ।
स्मरणात राहो गुरुदेव कीर्ती ।
काव्यास देवो गुरुदेव स्फूर्ती ।
गुरुदेवचरणी जीवितपूर्ती ।।

* * *

*With Compliments from :*

**M/s. ACCURATE SALES & SERVICES PVT. LTD.**

67, Hadapsar Industrial Estate, POONA – 411013

**Precious GAUGES**
**Measuring Instruments & Machine Tools**
**3–Co-ordinate Measuring Machine**

# आल्हादिनी शक्तीचे अमृतप्रवाह

लेखांक ९ वा

डॉ. ज. वा. जोशी

( भक्तियोग, अद्वैतदृष्टी आणि शक्तिपात साधना )

भारतीय भक्तिशास्त्र हे मोक्षविद्येचे एक परममङगल ईश्वरी लेणे आहे. भारतीय संतांनी आपले अनुभव आणि प्रासादिक साहित्य यांमधून भक्तीचा गौरव केला आहे. परंतु भक्तियोग साधनेविषयी अनेकविध अपसमजही प्रचलित आहेत. भक्तिमार्ग हा भोळयाभाबडया, अज्ञ जनांसंबंधी आहे हा एक गैरसमज तर ज्ञानाच्या तुलनेने भक्ती हे सुलभ, सोपे मोक्षसाधन आहे, हा दुसरा गैरसमज. भक्ती हे आत्मज्ञानाचे केवळ साधन आहे, तिला स्वयंमूल्य नाही, हा आणखी एक गैरसमज.

अद्वैत हा ज्ञानमार्ग आहे आणि शक्तिपात विद्या हा योगमार्ग आहे. साहजिकच यामध्ये भक्तीला स्थान वा महत्त्व नाही, असाही गैरसमज आहे. हे आणि असे गैरसमज भारतीय साक्षात्कार दर्शनाची मीमांसा, त्याचे समग्र एकात्म आणि समन्वयी स्वरूप लक्षात न घेतल्याने निर्माण झालेले दिसतात.

भगवत्पूज्यपाद श्रीमत् शंकराचार्यांनी 'मोक्षसाधनसामग्र्यां भक्तिरेव गरीयसी' अशा भाषेत भक्तियोगाचा गौरव केला आहे. मात्र वेदवेदांतप्रणीत अद्वैत आणि आगमप्रणीत शक्तिपात साधना यांचा काळाच्या ओघात बराच विपर्यास झाला. अद्वैतदृष्टी म्हणजे मायावाद, स्वप्नवाद, भौतिक जगापासून पलायनवादी वृत्ती असे समजले गेले. शक्तिपात साधनेचे विशुद्ध स्वरूप लोकांपुढे न येता तंत्रमार्गी कर्मकांड, गूढविद्या, पंचमकार यांच्या आवर्तात ती सापडली. ही प्रदूषणे दूर करून श्रुती आणि संतसाहित्य यांचा यथार्थ अन्वयार्थ पाहिला तर

अद्वैत भक्तियोग आणि शक्तिपात साधना यांचे परस्परसंबंध नीटसपणे प्रगट होतात. श्रुति आणि संतसाहित्य यांचा अनुबंध एकच आहे. वेदांचा, तो अर्थ आम्हासीच ठावा । इतरांनी वहावा वृथा भार ॥' हे संतांचे उद्गार अद्वैत, भक्तियोग, शक्तिपात साधना यांच्या एकात्म सूत्रातून प्रगट झाले आहेत, ते 'अनुभवसूत्र' आहे. साक्षात्कार, अपरोक्षानुभूती हे श्रुतीचे आणि संतजीवनाचे प्रयोजन आहे. 'याचि देही याचि डोळा । पाहू मुक्तीचा सोहळा' या प्रतिज्ञेने श्रुति आणि संत यांचे जीवनभाष्य प्रगट झाले आहे. साहजिकच श्रुतिद्रष्टे ऋषी आणि जीवन्मुक्त संत यांच्याशी आंतरिक संवाद साधला तर भक्तियोग, अद्वैत आणि शक्तिपात साधना यांचे एकात्म हृदगत् प्रगट होते. दुर्दैवाने अद्वैत हा शब्द पंडितांचा शब्दच्छलविषय झाला. शक्तिपात ही गुह्यविद्या बनली. त्यामुळे उभयतांमागील भक्तीचा जिव्हाळा, ज्ञानदृष्टी यांकडे दुर्लक्ष झाले. अद्वैत सिद्धांत आणि शक्तिपात साधना यांच्या संदर्भात भक्तीची श्रेष्ठता स्पष्ट करताना भगवान श्रीसूतमहर्षी म्हणतात,

भक्तिरेव भवरोगनाशिनी । भक्तिरेव परमार्थदायिनी ।
भक्तिरेव परवेदनप्रदा । भक्तिरेव परमुक्तिकारिणी ॥

सूतसंहिता : यज्ञवैभवखंड : ४.२६.२८

अर्थात भक्तियोगाचे हे महत्त्व समजावून घेताना भक्तीचे स्वरूप यथार्थपणे आकलन होणे अगत्याचे आहे. दुर्दैवाने 'भारतीय भक्तिशास्त्राचे अंतरंग' सिद्धांत आणि साधना या दृष्टीने समजून घेतले गेले नाही. त्यामुळे भक्तीच्या नावे एक कर्मकांड फोफावले; संकुचित स्वरूपाचा द्वैतवाद वाढीस लागला. सांप्रदायिक भेदबुद्धी वाढली. त्यामुळे मोक्षविद्येचे प्रबोधन प्रदूषित झाले. ऋषी आणि संत शंकराचार्य आणि ज्ञानेश्वरांसारखे तत्त्वज्ञ यांच्या जीवनदृष्टीचा मागोवा घेतला तर भारतीय भक्तिशास्त्राच्या परममंगल भागीरथी प्रवाहाचे मनोज्ञ दर्शन घडते.

भारतीय साक्षात्कार साधनेत 'पातंजलयोगसूत्र' परंपरेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. दुर्दैवाने तिचा भक्तियोग आणि शक्तिपात साधनेशी अंतरंग संबंध आहे, याची अनेकांना कल्पना नसते. योगसूत्र ग्रंथात 'कुंडलिनी' शब्द नाही, त्यामुळे कुंडलिनी महायोगपरंपराही योगसूत्र

परंपरेहून भिन्न असल्याचा गैरसमज आहे.

'ततः प्रत्यक् चेतनाधिगमोऽप्यन्तरायाभावश्च ॥ पा. यो. सूत्र १.२९

या योगसूत्रातील भूमिका स्पष्ट करताना स्वामी शिवोमतीर्थ म्हणतात–

"जब चेतना प्रत्यक्–चेतना (अन्तर्चेतना, अन्तर्मुखी, जागृत) हो जाती है, तब अन्तरायोंका अभाव हो जाता है। 'चेतना' शक्तीके उस स्तर को कहा जाता है। जिसमें वह इंद्रियोंपर कार्य करती एवं बहिर्जगदाभिमुखी होती है। यही चेतना जब शुद्ध चैतन्यरूप धारण करने हेतु आत्माभिमुखी जागृत होती है तब प्रत्यक् चेतना कही जाती है। इस प्रकार प्रत्यक् चेतना कुण्डलिनी शक्तीकाही नामांतरमात्र है।" (कुण्डलिनी सिद्धमहायोग पृ ११२–११३).

हाच अभिप्राय स्वामी विष्णुतीर्थ यांनी 'शक्तिपात सूत्राणि' विशद करताना प्रगट केला आहे.

'समाधिसिद्धिरीश्वर प्रणिधानात्।' पा. यो सूत्र २.४५

या योगसूत्रामध्ये भक्तियोग, ईश्वरप्रणिधान यांचा उल्लेख आहे. याचा शक्तिपात साधनेशी प्राणभूत संबंध आहे, याची अनेकांना कल्पना नसते. स्वामी शिवोमतीर्थ म्हणतात–

"ईश्वरप्रणिधान का अर्थ ईश्वरीय शक्ति कुण्डलिनी अथवा प्रत्यक् चेतनाकी अंतर्मुखी जागृति होकर क्रियाशीला हो जाना है... ध्यानसे देखा जाय तो योगदर्शनमें जितनेभी साधन वर्णित है, वे किसी न किसी स्तरपर अन्तर्शक्तिकी जागृतिकी ओरही ले जाते है...प्रथम समाधिपादमें विभिन्न साधनोंका उल्लेख किया है। जिनमें ईश्वरप्रणिधान सर्वश्रेष्ठ एवं सर्वोत्तम साधन है। (पूर्वोक्त पृ. १०१–१०२).

ईश्वरप्रणिधानात्मक भक्तियोग आणि त्याचे अंतरंग असणारी शक्तिपातसाधना या उभयतांचा संबंध ज्ञानशास्त्रदृष्टचा वेदान्ताशी आहे. स्वामी शिवोमतीर्थ पुढे म्हणतात–

"चैतन्यका संयोग होने के कारणही चित्तमें अविद्या, जीवत्व, संस्कार, वासनाएँ, विकार, वृत्तियाँ, मानसिक संकल्प-विकल्प इत्यादि उदय होते हैं। चैतन्य एवं जड चित्तके इसी संयोगको वेदान्त 'चिज्जड

ग्रंथी ' कहता है। इस संयोगके टूटतेही आत्मा अपने स्वरूपमें अवस्थित हो जाता है। (पूर्वोक्त पृ. १०३).

अद्वैतवेदान्त, योगदर्शन, भारतीय भक्तिशास्त्र आणि शक्तिपात-साधना यांचे अन्योन्याश्रयी परस्परसंबंध लक्षात घेऊन भारतीय साक्षात्कारदर्शनाची भूमिका निश्चित करणे अगत्याचे आहे. ते न झाल्याने वेदवेदान्त विद्या ही बहिर्मुखकर्मकांड वा निष्क्रीय परोक्षज्ञात बनली; योगसाधना म्हणजे आसन-प्राणायाम यांची कसरत ठरली; भक्तिसाधना म्हणजे पूजा-पाठ-जपजाप्य ठरली. शक्तिपात साधनमार्ग म्हणजे ' हे तो प्रचीतीचे बोलणे ' असल्याने, कुंडलिनी महायोग ही सर्वस्पर्शी, सर्व समावेशक साधना असल्याने तिचे सिद्धान्त विशेष साक्षेपाने समजून घेणे महत्त्वाचे आहे.

भारतीय भक्तिशास्त्राच्या भागीरथीमध्ये अद्वैतवेदान्त, योगदर्शन, पराभक्ती, कुण्डलिनी महायोग हे आणि असे परममंगल विचारप्रवाह, सिद्धान्तप्रवाह दिसून येतात. त्यांचा एकांगीपणाने विचार न करता एकात्मपणे करणे अगत्याचे आहे.

त्यामुळे वेदवेदान्तविद्येचे प्रवक्ते ऋषि, श्रीमान् शंकराचार्यांसारखे तत्त्वज्ञ आणि ज्ञानेश्वरादि संत यांना अभिप्रेत असणारी मोक्षविद्या सुस्पष्टपणे, प्रभावीपणे प्रगट होईल, मांडता येईल. तसे झाले तर भारतीय धर्मदृष्टीमध्ये मध्ययुगीन कालात निर्माण झालेली प्रदूषणे दूर होतील. ' उत्तिष्ठ । जागृत । प्राप्यवरान्निबोधत । ' अशी तेजस्वी, समर्थ, गतिमान साक्षात्कार जीवनदृष्टी उभी राहील. त्या भूमिकेतून भारतीय भक्तिशास्त्राचा विचार प्रस्तुत आहे.

१. सगुणभक्ती, २. सद्गुरुभक्ती आणि ३. पराभक्ती अशा त्रिविध स्वरूपांत भक्तीचे अंतरंग प्रगट झाले आहे.

श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् ।
अर्चनं वन्दनं दास्य सख्यं आत्मनिवेदनम् ।।

अशा नवविधाभक्तीची भूमिका सर्वज्ञात आहे. परमार्थमार्गाच्या प्रारंभावस्थेत ही भक्ती बहिर्मुख, कर्तृत्वभावयुक्त असते. तिचा उद्देश चित्तशुद्धी हा असतो. म्हणून तिला साधनभक्ती, गौणीभक्ती म्हटले जाते. शिवसूत्र परिभाषेत, भक्तीच्या संदर्भातील ही ' आणवोपाय '

अवस्था आहे.

वर्णाश्रमोचित स्वधर्मपालन, नवविधा साधनभक्ती यामुळे इष्ट ती चित्तशुद्धी आणि कर्मसाम्य स्थिती आल्यानंतर साधक जीवनात ईशकृपा घडते. सद्गुरुअनुग्रह होतो. सद्गुरुकृपा हे मोक्ष साधनेच्या वाटचालीतील महाद्वार आहे. त्यामुळे सद्गुरुभक्तीला श्रुती आणि संत यांनी अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे. मनुष्यत्व आणि मुमुक्षुत्व या दुर्लभ गोष्टींच्या प्राप्तीला महापुरुषसंश्रयाची साथ हवी. केवळ स्वप्रयत्नाने मोक्षसाधना अशक्यच ! म्हणून श्रुति, आगम, संत, भक्तिशास्त्र यांनी 'कृपायोग' महत्त्वाचा मानला आहे.

गुरुरुपायः ।। **शिवसूत्र** : द्वितीयोन्मेषः शाक्तोपायः सूत्र ६

मुख्यतस्तु महत्कृपयैव भगवत्कृपालेशाद्वा ।
महत्सङ्गस्तु दुर्लभोऽगम्योऽमोघश्च ।
तदेव साध्यताम् । तदेव साध्यताम् ।।

**नारदभक्तिसूत्र** : ३८–३९, ४२.

ही शिवसूत्र आणि नारदभक्तिसूत्र यांची एकात्म भूमिका लक्षात घेतली तर सद्गुरुभक्तीचे, मोक्षसाधनेतील गुरुभक्ती मूल्यांचे महत्त्व स्पष्ट होते.

सद्गुरु अनुग्रहाने शक्तिपात प्रक्रिया घडते. दिव्यशक्तीच्या जागृतीमुळे साधनेचे, भक्तीचे बहिर्मुख स्वरूप जाते. भक्तिसाधनेला अंतरंग परिमाण प्राप्त होते. ती 'भावसाधना' बनते. या संदर्भात श्रीसंत गुलाबरावमहाराज यांनी केलेला उपासना आणि भक्ती यांमधील फरक लक्षणीय आहे. भक्ती ही मुख्यतः अंतरंग भावसाधना आहे. ही भावयोग साधना अधिकाधिक व्यापक, सूक्ष्म होत जाऊन तिची परिसमाप्ती 'पराभक्ती' अवस्थेत होते. तिचे स्वरूप नारदभक्तिसूत्र, शाण्डिल्यभक्तिसूत्र यांनी विशद केले आहे.

नारदभक्तिसूत्र— सात्वस्मिन् परमप्रेमरुपा । २
अनिर्वचनीयं प्रेमस्वरूपम् । ५१
मूकास्वादनवत् । ५२
यल्लब्ध्वापुमान् सिद्धोभवति, अमृतोभवति,
तृप्तोभवति । ४

यात्प्राप्य न किञ्चिद्वाञ्छति न शोचति
न द्वेष्टि न रमते नोत्साही भवति । ५
यज्ज्ञात्वा मत्तोभवति स्तब्धोभवति
आत्मारामोभवति । ६

शाण्डिल्यभक्तिसूत्र— सा परानुरक्तिरीश्वरे । २

या पराभक्तीच्या अवस्थेत इष्टदेवता, सद्गुरु, अंतरात्मा, श्रीशक्ती यांच्या संदर्भात अन्यन्य शरणागतवृत्ती प्रगट होते, परमप्रेमभाव प्रगट होतो. ही भक्ति निष्काम, नि:स्वार्थ, निरहंकार वृत्तीतून प्रगट होते. भक्ताला प्राप्त होणारा आनंद त्याला शब्दरूप करता येत नाही. ब्रह्मानंदरसात त्याचे चित्त न्हाऊन निघते. तो आप्तकाम आप्ततृप्त होतो. त्याला ऐहिक वा पारलौकिक अशा अन्य कशाचीच अपेक्षा रहात नाही. शोक, मोह, द्वेष, राग आदि विकारांपासून त्याचे चित्त मुक्त होते. भगवत्प्रेमाच्या धुंदीत त्याचे चित्त स्तब्ध होते, चिन्मयानन्द स्थितीत त्याला परमपुरुषार्थ प्राप्ती घडते. नारदमहर्षींनी अशा पराभक्तीचे अंतरंगस्वरूप स्पष्ट करताना म्हटले आहे—

गुणरहितं कामनारहितं प्रतिक्षणवर्धमानं अविच्छिन्नं
सूक्ष्मतरं अनुभवरूपम् । ५४

साधकाच्या भक्तिजीवनात या अनुभवाचा प्रारंभ इष्टदेवतेची पूजा, प्रार्थना यांनी होतो. हे प्रारंभीचे स्थूल, साकार अवलंबन क्रमश: सूक्ष्म, आंतरिक बनते. ‘सगुण—निर्गुण दोन्ही विलक्षण’ अशा विश्वात्मक प्रत्ययात भक्तीची परिसमाप्ती होते. ‘स्वसंवेद्य’ असा अंतरात्मा श्रीगुरुकृपेने स्वेमहिम्नि प्रतिष्ठित होतो. ‘एकोवशी सर्वभूतान्तरात्मा’ची अनुभूती घडते. ‘विश्वात्मक देव’ प्रगट होतो, विष्णु, शिव, शक्ती, गणेश, सूर्य, सद्गुरु अशा आपल्या इष्ट देवतेच्या संदर्भात हा सर्वस्पर्शी, सर्वात्मभाव प्रगट होतो. भक्तीने प्राप्त होणारी सच्चिदानन्द स्थिती लक्षात घेऊन भक्तीला ‘पंचम पुरुषार्थ’ असे संत, भक्तीचे आचार्य यांनी म्हटले आहे. त्याची प्राप्ती घडण्यासाठी साधनभक्ती, गौणीभक्ती अवस्थेतून साध्यभक्ती, प्रेमलक्षणा पराभक्तीमध्ये परिवर्तन हे मोक्षसाधनेतील महत्त्वाचे स्थित्यंतर आहे. ईश्वराविषयी ‘अनुरक्ति’,

संसाराविषयी ' विरक्ती ' आणि फलस्वरूप ' ब्रह्मानुभूति ' हा भक्तीचा अंतरंग प्रवास आहे.

भक्ती हा व्यक्तीचे अंतर्बाह्य सर्व जीवन ढवळून टाकणारा भावविशेष आहे. वृत्तिपरिवर्तन, व्यक्तित्व परिवर्तन करण्याचे सामर्थ्य भक्तीत आहे. भक्तीमुळे शमदमादि दैवीसंपदेचे नैतिक अधिष्ठान विकसित होते. प्रारब्धजन्य सुखदुःखाविषयी उदासीनता वाढीस लागते. संचिताचे शुद्धीकरण घडते. शास्त्रनिष्ठा वाढीस लागल्याने क्रियमाणकर्म विशुद्ध भूमिकेतून घडत राहते. ईश्वरसन्मुख भूमिका, आंतरिक विवेक जागृती, तपाचरणाची आवड सतत वर्धमान राहिल्याने क्रमशः देह–देही संबंध, प्रपंच–परमार्थ संबंध यांच्या संदर्भातले अज्ञान दूर होत जाते. अनंतसुख, पूर्णतृप्ती हे जीवनाचे परमश्रेयस राहिल्याने साधकाच्या जीवनदृष्टीत आमूलाग्र परिवर्तन घडते.

कर्ममार्गामध्ये नैष्कर्म्य हे ज्ञानवैराग्यरहित असते, तर भक्तिमार्गात नैष्कर्म्यसिद्धी ही वैराग्याधिष्ठित, भाव भक्तिमय, ज्ञानोदयपोषक असते. भक्ताचे अंतःकरण ऐहिककामनारहित असल्याने ते श्रवण, मनन, निदिध्यासन प्रक्रियांना पोषक ठरते. भक्ताची भगवदर्पित भूमिका ही वेदान्तप्रणित ब्रह्मज्ञानास पोषक आणि प्रभावी ठरते. साहजिकच भक्तियोगात निष्काम कर्मयोग, आत्मसंयमाधारित योगसाधना, बुद्धियोग, ज्ञानयोग यांचा सर्वस्पर्शी अंतर्भाव घडतो. हे लक्षात घेऊन श्रीमद्भगवताने भक्तियोगाची श्रेष्ठता विशद करताना म्हटले आहे—

अकामः सर्वकामो वा मोक्षकाम उदारधीः ।
तीव्रेण भक्तियोगेन यजेत पुरुषः परम् ।। श्री. भा. २–३–१०

भक्तिदर्शनाचे महान भाष्यकार श्री. मधुसूदन सरस्वती यांनी ' भक्तिरसायन ' या विख्यात ग्रंथात साधनभक्ती आणि साध्यभक्ती यांचे अधिकार भेदानुसार दिग्दर्शन केले आहे. ग्रंथश्रवण, पूजापाठ, जप, वर्णाश्रमोचित धर्माचरण, संतसेवा, गुरुसेवा या सर्वांचा अंतर्भाव साधनभक्तीत होतो. ती सर्वांना शक्य आणि सुलभ असते.

जेव्हा अंतःकरण निष्काम भगवदर्पित, भावभक्तिसंपन्न होते त्यावेळी शुद्धभक्ती, साध्यभक्ती, प्रेमभक्ती व पराभक्तीचा उदय होतो. ईश्वराची दया, करुणा, सुहृदभाव यांच्या स्मरणाने, ईश्वरी दिव्यलीला

श्रवणाने आर्तचित्त भक्ताचे अंत:करण द्रवीत होते, डोळे भरून येतात, शरीर रोमांचित होते, ईश्वरी प्रेमातून अष्टसात्त्विक भाव प्रगट होतात. वस्तुत: तीव्र भक्तिभावांतून जागृत झालेल्या आंतरिक दिव्यशक्तीचा स्वसंवित्, कुंडलिनी महाशक्तीचा, आल्हादिनीशक्तीचा हा क्रियाविष्कार असतो. 'चिन्मयानन्दकालिका' अशा दिव्यशक्तीच्या जागृतीमुळे कंप, घूर्णा, स्तंभ, अश्रुपात, उत्स्फूर्त गायन, उत्स्फूर्त नृत्य इ. स्वरूपांत हा क्रियाविष्कार असतो. शक्तिपातविषयक शास्त्रीय ग्रंथातून 'प्रबोधानन्द संभव:' अशा शक्तिपात–प्रक्रियेची ही लक्षणे प्रगट झाली आहेत.

निशम्य कर्माणि गुणानतुल्यान् वीर्याणि लीलातनुभि: कृतानि ।
यदाति हर्षात्पुलकाश्रुगद्गदं प्रोत्कण्ठ उद्गायति रौति नृत्याति ।
तद् ब्रह्म निर्वाणसुखं बिदुर्बुधास्ततो भजध्वं हृदयेहृदीश्वरम् ॥

—श्रीमद्भागवत ७–७. ३४–३०.

या वर्णनातून भक्तीचे हे भावक्रिया वैभव व्यक्त झाले आहे. अशा जागृतीनंतर साधनभक्ती, गौणी भक्ती अवस्था संपते आणि पराभक्ती अवस्था सुरू होते. 'भावदेह'द्वारा भक्ताचा 'हृदय संवाद' इष्टदेवता, सद्गुरु, ईश्वरीशक्तीशी सुरू होतो. वात्सल्य, प्रीती, दास्य, सख्य आदि भावातून हे भाववैभव प्रगट होते. सहृदय तन्मयतेतून भक्ताचा 'अमृतानुभव' समृद्ध होतो. संत साहित्यात हा अमृतानुभव अभंग, पद, भूपाळी, आरती, धावा असा उत्स्फूर्त रचनांतून प्रगट होतो. आंतरिक रसमयतेने, आत्मसौंदर्याने हे आणि असे भक्तिसाहित्य ओथंबलेले असते. अलौकिक रमणीयतेचे परिमाण त्याला असते. अशा भक्तिसाहित्यातून 'प्रमेय रत्न भांडार' प्रगट होते.

ज्यांची भक्ति विचारनिष्ठ असते ते शास्त्रानुकूल धर्माचरण, चित्तशुद्धी, नवविधा साधनभक्ती यांद्वारा आत्मज्ञानाचा अधिकार प्राप्त करतात. क्रमश: श्राव्य, मनन, निदिध्यासनद्वारा त्यांना आत्मसाक्षात्कार घडतो.

दुर्दैवाने ज्ञान, भक्ती, कर्म या मोक्षसाधनांचे स्वरूप आणि परस्पर संबंध याविषयी वैचारिक प्रदूषण आढळते ते दूर व्हावयास हवे, भक्ती आणि ज्ञान यांमधील भेद तात्त्विक नसून अवस्थाभेद आहे. जेव्हा भक्तीपेक्षा ज्ञान श्रेष्ठ म्हटले जाते, तेव्हा भक्तीचा संदर्भ साधन-

भक्तीचा असतो. जेव्हा ज्ञानापेक्षा भक्ती श्रेष्ठ म्हटले जाते तेव्हा ज्ञानाचा संदर्भ परोक्षज्ञान हा असतो. पराभक्ती आणि परमज्ञान ही एकच अवस्था आहे. जेव्हा निर्गुण भक्तीचा संदर्भ असतो त्यावेळी संपूर्ण चित्तवृत्ती भगवदाकार या स्थितीचा निर्देश असतो. ' अखंडानुसंधान ' हे तिचे अंतरंग असते. ' नित्ययुक्त ' अशी ती स्थिती असते. परंतु जोपर्यंत विषयासक्ति दूर होत नाही, अनन्य प्रेमलक्षणा भक्तीचा उदय होत नाही तोपर्यंत सगुण–निर्गुण, साकार–निराकार आदि ईश्वरस्वरूपाची चर्चा हा केवळ शब्दच्छल असतो, ते केवळ शब्दज्ञान राहते.

साधन भक्तीमध्ये सर्व कर्माचरण ईश्वराप्रीत्यर्थ, ' ईश्वराराधनाधिया ' घडते. चित्तशुद्धी हा त्याचा हेतू असतो. पराभक्ती अवस्थेत सर्व जीवन हीच ' अखंड पूजा ' होते. श्रीमत् शंकराचार्यांनी या ' परापूजा ' अवस्थेचे मनोज्ञ वर्णन केले आहे—

आत्मात्वं गिरिजापतिः सहचराः प्राणाः शरीरं गृहम् ।
पूजा ते विविधोपभोगरचना निद्रा समाधिस्थितिः ॥
संचारस्तु पदोः प्रदक्षिणविधिः स्तोत्राणि सर्वागिरो ।
यद्यत्कर्म करोमि तत्तदखिलं शंभो तवाराधनम् ॥

—परापूजास्तोत्र:

अशा पराभक्तीच्या स्थितीत सर्व जीवन ही ' सर्वेश्वरपूजा ' होते.

तया सर्वात्मका ईश्वरा । स्वकर्मकुसुमांची वीरा
पूजा केली होय अपारा । तोषालागी । —ज्ञानेश्वरी १८.९१७

असे श्रीज्ञानदेवांनी तिचे वर्णन केले आहे. ' स्वकर्म तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दन्ति मानवाः । ' हा श्रीमद्‌भगवद्‌गीतेचा दृष्टिकोन अशा व्यापक कर्मभक्तीचा निर्देश करणारा आहे. त्यामध्ये ज्ञान, कर्म आणि भक्ती यांच्या एकात्म साधनेची भूमिका आहे. अशा एकात्म जीवनदृष्टीस अनुलक्षून श्रीमद्‌भागवत ग्रंथात भक्तियोगाचे महत्त्व विशद झाले आहे.

एतावानेव लोकेऽस्मिन् पुंसां निःश्रेयसोदयः ।
तीव्रेण भक्तियोगेन मनो मय्यर्पितं स्थिरम् ॥ श्री. भा. ३-२५-४४

' शान्तिरूपा । परमानंदरूपा ' अशी पराभक्तीची परमोच्च स्थिती प्राप्त होण्यासाठी साधक जीवनात जी वर्तनात्मक भूमिका रुजावयास हवी त्याचे सूत्रात्मक मार्गदर्शन नारदमहर्षींनी केले आहे.

१. लोकहानौ चिन्ता न कार्या । सू. ६१

२. अभिमान दम्भादिकं त्याज्यम् । सू. ६४

३. वादो नावलम्ब्य: । सू. ७४

४. अहिंसा सत्य शौच दया आस्तिक्यादि चरित्राणि
परिपालनीयानि । ७८

५. क्षणार्धमपि व्यर्थं न नेयम् सू. ७७

६. भक्तिशास्त्राणि मननीयानि । सू. ७६

श्रीमद्‌भगवद्‌गीतेने पराभक्तिप्राप्त श्रेष्ठभक्ताचे जीवन स्पष्ट केले आहे.

ब्रह्मभूत: प्रसन्नात्मा न शोचति न कांक्षति ।
समः सर्वेषु भूतेषु मद्‌भक्तिं लभतेपराम् ।। गी. १८.५४

पराभक्तीप्राप्त परमभागवतस्थिती संतांच्या जीवनातून प्रगट झाली आहे. ‘ कांदा मुळाभाजी । अवघी विठाई माझी ’ हे संत सावतामाळी यांचे उद्‌गार, ‘ वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे ’ हे श्री तुकारामांचे उद्‌गार म्हणजे व्यक्ती आणि सृष्टी यांच्या अद्वैत साक्षात्कारातून स्फुरलेले भक्तीचे सौहार्द आहे. वस्तुत: ही स्थिती म्हणजे शक्तिपात-साधनेच्या दृष्टीने चराचर सृष्टीशी घडणारे अंतरात्म्याचे तादात्म्य आहे, ती परमोच्च सामरस्य स्थिती आहे. ईश्वर आणि सद्‌गुरु यांच्या कृपेने भक्ताला ही श्रेष्ठ अवस्था प्राप्त होते. देह–देहीभेद मावळतो आणि विदेही सर्वात्मभाव प्रकट होतो. अशा स्थितीस आणि त्यासंदर्भातील कृपेस अनुलक्षून गोरक्षनाथ म्हणतात—

तस्मात् गुरुकटाक्षपातात् स्वसंवेद्यतयाच महासिद्धयोगीभि:
स्वकीयपिण्डं निरुत्थानं अनुभवेत समरसं क्रियत इति सिद्धान्त: ।
सिद्धसिद्धान्तपद्धति ५.७१

ही महासामरस्य प्रक्रिया भक्ताच्या जीवनात ‘ भावदेहा ’द्वारा घडते. म. म. श्रीगोपीनाथ कविराज यांनी या भावसाधनेचे अंतरंग ‘ भारतीय संस्कृति और साधना ’, (भा. १, २) ग्रंथात विशद केले आहे. ‘ भक्तिरहस्य ’, ‘ भक्तिसाधना ’, ‘ भावसाधनाका वैशिष्टय ’ इ. विवेचनात त्यांनी वैष्णवादि भारतीय भक्तिसाहित्य आणि संतजीवन यांचा मोक्षविद्येच्या भूमिकेतून परमार्थ मांडला आहे.

भक्तिसाधना ही महाभाव साधना आहे. त्यामध्ये जीवाचे अज्ञानावरण दूर होण्यासाठी गुरुकृपा, शक्ति जागृतीची आवश्यकता असते. म्हणून भावसाधना हा 'कृपायोग' आहे. तिचा प्रारंभ आचार्यप्रपत्तीने सद्‌गुरुशरणागतीने होतो. या साधनेत बाह्य, स्थूल, बहिर्मुख साधनभक्तीची आवश्यकता रहात नाही. जन्मजन्मांतरीच्या संस्कारानुसार सख्य, दास्य, वात्सल्य, माधुर्य आदि भावजागृती घडते, भावस्वरूपात ईश्वराशी नित्य संबंध निर्माण होतो. त्यामधून परमप्रेमरूपा पराभक्ती विकसित होते. ईश्वरीविग्रहाच्या लीलाविश्वात प्रवेश घडतो, लीला रसास्वादन घडते. ज्ञान, वरण, प्राप्ती आणि अनुभव अशा अवस्थांतून भक्ताच्या अंतर्जीवनात भक्तिरसकल्लोळ निर्माण होतो. प्रवर्तक, साधक आणि सिद्ध अशा त्रिविध स्वरूपांतही भावसाधनेचें अंतरंग समजून येते. त्यांचे साधर्म्य शिवसूत्रातील आणवोपाय, शाक्त्योपाय, शांभवोपाय यांच्याशी आहे. पहिली प्रवर्तक अवस्था कर्तृत्वभावयुक्त साधनभक्तीची असते. दुसऱ्या साधक अवस्थेत गुरुकृपा, शक्तिजागृती आणि भावदेहप्राप्ती घटते तिसरी सिद्धावस्था महाभावप्राप्तीची, सहजावस्थेची आहे.

ज्या भावदेहद्वारा ही अंतरंग भक्तिसाधना घडते त्या भावदेहाचा संबंध स्थूल, पार्थिव देहाशी नसतो; पार्थिव मनोविकाराशी नसतो. जन्म, जरा, व्याधि अशा प्राकृतिक नियमांनी, देहाचे कार्य, प्रारब्धवश, सुखदु:खात्मक चालू राहते. भक्ताची संस्कारतीव्रता, ईश्वराशी नाते, लीलासृष्टीतील भूमिका यानुसार भावदेहातील दिव्यानुभव प्रगट होतात. वात्सल्य आणि शिशुभाव असलेला भक्त बाह्यत: वृद्ध असला तरी त्याचे ईश्वराशी आंतरिक नाते मातेचे—मुलाचे असते. त्याद्वारा त्याची अंतरंगभक्ती प्रगट होते. भगवान रामकृष्ण परमहंस यांची महाभावावस्था त्याचे निदर्शक आहे. चैतन्य महाप्रभु, मीराबाई आदि संतांचे अंतरंगजीवन त्यादृष्टीने समजून घेता येते. नामदेव, जनाबाई, तुकाराम आदि संतांची भावसृष्टी आणि त्यांच्या अनुभूतीतून प्रगट झालेले भक्तिवैभवाचे रसोद्‌गार भावसाधनेची वैशिष्ट्ये प्रकट करतात. अर्वाचीन काळात प. पू. श्री वासुदेवानंद सरस्वती (टेंबे स्वामी महाराज) यांची श्रीदत्तभक्ती, श्रीविष्णुदासांची देवीउपासना, श्रीगुलाबराव महाराज यांची श्रीकृष्णभक्ति आदींचे अंतरंग भक्तिभाव वैभव त्या

दृष्टीने समजून घ्यावयास हवे. प्राकृतिक देहाची विस्मृती, भावदेह प्राप्ती, 'आनन्दम् । अमृतम्' अशा ईश्वरी स्वरूपाशी, भावराज्याशी अंत:संबंध, त्याद्वारा स्वानंदरसप्राप्ती अशा क्रमाने ही भावसाधना परिणत होते. भगवत्‌दर्शन, लीलारसप्राप्ती यांचा अन्वयार्थ समजून घेताना महाभावस्वरूपा आल्हादिनी शक्तीचे अमृतप्रवाह प्रगट झालेले दिसतात. दिव्यगंध, दिव्यरस, दिव्यस्पर्श, दिव्यदर्शन, दिव्यक्रीडा, दिव्यलीला इत्यादींचे अंतरंग रहस्य प्रगट झालेले दिसते. भक्तिसाधनेचे हे योगवैभव आहे. अशा श्रेष्ठ भक्तांच्या अंतरंग भावसाधनेत नवविधा भक्तिद्वारा नवरसात्मक योगवैभव प्रगट झाले आहे.

दुर्दैवाने अनेक वर्षे बाह्य, स्थूल, बहिर्मुख स्वरूपाची साधनभक्ति करणारे अनेक साधक किंवा सद्‌गुरुकृपाप्राप्त शक्तिपातसाधक यांना या भावसाधनेचे स्वरूप 'आकलन' होत नाही किंवा अंतरंग रहस्य, महत्त्व समजत नाही. त्यामुळे त्यांच्या मोक्षसाधनेतही कोरडेपणा, उथळपणा राहतो. ती यांत्रिक, कर्मकांडात्मक राहते. रामभक्ती करणा-रास रामपरिवारातले आपण कोण, रामाशी आपले नाते काय, याचा पत्ता नसतो. कृष्णभक्ती करणारास कृष्णपरिवारातले आपण कोण, कृष्णाशी आपले नाते कोणते, याची कल्पना नसते. श्रीगुरुचरित्र व दत्तभक्ति करणारास दत्तपरिवारातले आपण कोण, श्रीगुरूंशी आपले नाते कोणते, ते माहीत नसते. किंबहुना सद्‌गुरूंची ईश्वरभावाने उपासना करताना त्या व्यापक ईश्वरीशक्तीशी आपले नाते कोणते ते निश्चित झालेले नसते. वात्सल्य, सख्य, दास्य आदि भाव जागृत झाले, आणि अशा ईश्वरीविग्रहाच्या लीलापरिवारातले आपले नाते दृढ झाले तर आंतरिक भक्तिरसकल्लोळ उफाळून येऊ लागतो. 'जेथे जातो तेथे तू माझा सांगाती.' असे नित्यसान्निध्य जाणवू लागते. लीलाचरित्र आणि लीलारसास्वादन ही अखंडानुभूति होते.

हे घडण्यासाठी साधकाला स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाची पारमार्थिक भूमिका समजणे अगत्याचे आहे. बद्धजीव प्राप्त शरीर हे 'भोगायतन' मानीत असतो. त्यामुळे कामक्रोधादि विकार आणि प्रारब्धजन्य सुख-दु:खभोग यात तो मग्न असतो. वस्तुत: स्थूलशरीर हे ईश्वर, सद्‌गुरु-सेवेचे साधन असते. देहात्मबुद्धी, देहाहंकार, देहासक्ती दूर झाल्याशिवाय

देहसंदर्भातली साधनभक्ती प्रारंभ होत नाही. त्यासाठी शास्त्र आणि संत यांनी विवेकवैराग्यविषयक उपदेश केला आहे. व्यक्तीचा सूक्ष्मदेह हा 'देवायतन' सूक्ष्मरूपात सर्व देवता सूक्ष्म देहात निवास करतात. अंतरात्मा हा हृदयस्थ, अंतर्यामी ईश्वर आहे. सर्व जीवन ही त्याची लीला आहे, क्रीडा आहे. आपण 'निमित्तमात्र' आहोत, ही उदात्त भावभूमिका भक्तीच्या श्रेष्ठ अवस्थेत विकसित होते. 'देह ही पंढरी आत्मा हा विठ्ठल' हे संतांचे उद्गार या भूमिकेचे निदर्शक आहेत. जेव्हा मुमुक्षू साधकाचे बाह्य आणि आंतरिक सर्व जीवन भगवदर्पित होते, त्यावेळी देह आणि जीवन हे ईश्वराचे, दिव्यशक्तीचे 'क्रीडायतन' होते, 'लीलायतन' होते त्यावेळी ईश्वरविग्रह, दिव्यशक्ती यांच्या दिव्यलीलांचा अवर्णनीय आनंद प्राप्त होतो. त्यामधून परमप्रेमरूपा, शांतिरूपा, अमृतरूपा पराभाषी परिणत होत जाते. म्हणून भगवान सूत महर्षी म्हणतात—

अतश्च भोगमोक्षार्थी शरीरं देवतामयम् ।
देवतारूपतः पश्यन्मुच्यते भवबन्धनात् ।।
रहस्यं सर्वशास्त्राणां मयाप्रोक्तं समासतः ।
शरीरं देवतरूपं भजध्वं यूयमास्तिकाः ।।

— सूतगीता ७.२४.३४

ईश्वरकृपा, सद्गुरुकृपा, शक्तिजागृतीनंतर होणारी भावसाधना आल्हादिनीशक्तीचे अमृतप्रवाह निर्माण करते. या अवस्थेत श्रवण हे शास्त्राध्ययन रहात नाही. ते अनाहतनादश्रवण असते, ते नादानुसंधान असते. स्मरण हे पूर्वसंस्कारांचे नसते. तो अजपाजप असतो. अर्चन ही बाह्य, स्थूल उपचारपूजा उरत नाही. आंतरिक शक्तिस्फुरणातून सहजपणे घडणारा तो क्रियायोग होतो.

नवविधाभक्तीप्रमाणे नवरसांच्या अभिव्यक्तींचेही भावार्थ या भावसाधना अवस्थेत बदलून जातात. भक्ति भाव आणि रस यांचे मनोज्ञ वर्णन मधुसूदन सरस्वती यांच्या 'भक्तिरसायन' ग्रंथात आले आहे. स्वामी शिवोम्तीर्थ यांनी आपल्या 'आल्हादिनी सिद्धमहायोग', ग्रंथांत भक्तिसूत्रे आणि संतसाहित्य यांचा शक्तिपातसाधनेच्या दृष्टीने

यथार्थ अन्वयार्थ मांडला आहे.

संतांच्या दिव्यानुभूतीमधील भावोत्कर्ष, रसोत्कर्ष हा देहभाव-विरहित, उन्मनी स्थितीतील असतो. त्यांची वर्णने मध्ययुगीन आणि अर्वाचीन भारतीय संतसाहित्यात आली आहेत. अशा भावसाधनेचे अंतरंग समजून घेण्याच्या दृष्टीने संतांचे अभंग, पदे, आरती आणि स्तोत्रवाङमय समजून घ्यावयास हवे. काकडआरतीपासून शेजारतीपर्यंत इष्टदेवतेच्या संदर्भात, स्वगुरूच्या संदर्भात संतांनी आपल्या भावानुभूतीचे उद्‌गार प्रगट केले आहेत. या अनुभूतीचा अन्वयार्थ 'लोकवत्तु लीला कैवल्यम् ।' अशा ब्रह्मस्फूर्ती चिद्विलास भूमिकेतून समजून घेणे अगत्याचे आहे.

मैं गिरिधर आगे नाचूँगी ।।
नाच नाच पिय रसिक रिझावूँ । प्रेमी जन को नाचूँगी ।
प्रेम प्रीतिका बाँधी घुंगरू । सुरतकी कछनी काछूँगी ।
लोकलाज कुलकी मरयादा । या मैं एक न राखूँगी ।
पियका पलंगजा पौढूँगी । मीरा हरिरंग नाचूँगी ।।

या मीराबाईंच्या भावसमाधी अवस्थेतील नृत्यगायनाचा अन्वयार्थ देहशृंगाराच्या अवस्थेतून लावणे म्हणजे भावसाधनेविषयी अज्ञान प्रगट करणे होय. येथे पलंग ही समाधीवस्था आहे. सुरतही सामरस्यास्थिती आहे. नृत्यध्वनी हे अनाहत, अंतर्नाद आहेत. सर्व भजन हा एका आनंद-विभोर, तन्मय भावावस्थेचा उद्‌गार आहे.

मीरा भावसृष्टीद्वारा श्रीकृष्णाच्या बासरीचा दिव्य नाद श्रवण करते. वृंदावन लीलांशी एकरूप होते. जनाबाई विठ्ठलाशी संवाद करते. तर्कबुद्धीस अनाकलनीय ठरणारा हा देवभक्तांचा हृदयसंवाद हा दिव्य-शक्तिजागृत समाधिज प्रज्ञा, ऋतंभरा प्रज्ञा पातळीवरील असतो. पार्थिव स्थलकालाच्या मर्यादा ओलांडणारी ही नित्य समीक्षता असते, 'आंतरिक प्रत्यक्षता' असते. साधनेच्या प्रारंभ कालात ती अंतःप्रचीती अधूनमधून खंडित होते, भक्त देहभानावर येतो, व्यवहारदशेत येतो. परंतु भावसाधनेच्या परमोच्च स्थितीत ती ब्रह्माकारवृत्ती, अखंडानुसंधान, नित्यसमाधी, सकळकर्मी समाधी असते. 'स्वस्वरूपानुसंधानं भक्तिरित्यभिधीयते ।' असे श्रीमत् शंकराचार्यांनी म्हटले आहे (विवेक

चूडामणि : ३२) ती भावसाधनेची परमोच्चस्थिती आहे.

जन्मोत्सव, ग्रंथपारायण, तीर्थयात्रा, लीलास्थानभेटी ही भक्ताच्या आंतरिक पुन:प्रत्ययाची, इष्टदेवदेवतेच्या लीलाचरित्राशी एकरूप होण्याची निमित्ते असतात.

अशी पराभक्ती ही 'परापूजा' अवस्था असते. 'शिवो भूत्वा शिवं यजेत् ।' अशी ही भूमिका असते. प. पू. श्रीटेंबेस्वामी महाराजांनी त्या स्थितीचे मनोज्ञ वर्णन केले आहे –

'असे मज आता । उमजे सर्वथा ।
पूजा करू जाता । देवचि सर्व ।।
ऐक्य स्फूर्ती झाली । भक्ति दुणावली ।
आता सीमा झाली । कैवल्याची ।।

भावसाधनेत प्रगट होणारे आल्हादिनीशक्तीचे अमृतप्रवाह लक्षात घेऊन श्रीज्ञानदेवांनी त्यास 'अमृतानुभव' म्हटले आहे. श्रीसमर्थांनी त्यास 'सोलीवसुख' म्हटले आहे. 'सा काष्ठा सा परागतिः' असे उपनिषदांनी या श्रेष्ठ भक्तिसायुज्याचे वर्णन केले आहे. 'आता या परते उरले नाही काही । देहीच विदेही झालो आम्ही ।' अशी या प्राप्तीची कृतार्थता श्रीतुकारामांनी व्यक्त केली आहे. 'आनंदाचे डोही आनंद तरंग' अशी ही स्वानंदस्थिती आहे.

भक्तीच्या मोक्षसाधनेत प्रगट होणारा हा आनंद ही 'रसोवैसः' अशी स्वानंद रसानुभूती असते. 'सर्वं रसमयं जगत् ।' असा आत्मानुभव असतो. आत्मचैतन्याचे हे स्पंद. चिच्छक्तीचे हे उन्मेष स्वगत स्वरूपाची (स्वे महिम्नि प्रतिष्ठितम् ।) अशी आत्मक्रीडा असते. परावाणीतून स्फुरणारे हे आत्मानंदाचे व्याकरण वैखरी स्वरूपात संतसाहित्यातून प्रगट होते. परमात्मा रसरूप असल्याने संतभक्तांचा लोकव्यवहार समाज आणि सृष्टी यांच्याशी आंतरिक तादात्म्याने भारलेला असतो. त्यांची करुणा, भूतदया हा रसमय आत्मोपम्यवृत्तीचा आविष्कार असतो. भक्ताच्या जीवनात, जीवनातले सर्व रस प्रज्ञानघन, आनंदघन अशा ईश्वर स्वरूपात विलीन होतात. ती शांत, निर्वेद स्थिती असते.

नास्ति यत्र सुखं दुखं न द्वेषो न च मत्सरः ।
समः सर्वेषु भूतेषु स शान्तः प्रथितो रसः ।।

असे विष्णुधर्मोत्तरं पुराणग्रंथात शांतरसाचे लक्षण आले आहे. स्थितप्रज्ञा (गी. अ. २), योगयुक्त (गीः अ. ६), ज्ञानीभक्त (गी. अ. १२) यांच्या जीवनात, स्वभावात, अंतरंगस्थितीत चिच्छक्तिस्फुरित शांतरस हा स्थायीभाव असतो. तत्त्वज्ञानोदयाने येणारी निर्वेदस्थिती, स्वरूप चिंतनाचे प्राधान्य, चित्तशान्ति ही त्याची वैशिष्टचे असतात. ते परमप्रेमास्पद अमृतत्त्व असते. संतभक्ताच्या जीवनात, वर्तनात शांतरसाची अनेकविध भावरूपे प्रगट होतात. त्यांचे दिग्दर्शन मधुसूदन सरस्वती (भक्तिरसायन); स्वामी अखंडानन्द सरस्वती (श्रीमद्भागवतदर्शन : भा. १ = उपोद्‌घात) यांनी प्रभावीपणे केले आहे.

**शांतरस उद्दीपनभाव** — परमेश्वराच्या पूजेतील पुष्प, तुलसी, नैवेद्य, तीर्थप्रसादप्राप्तीने मुग्धता येणे; शंख, घंटा, आरती, स्तोत्रपाठ यांचे ध्वनी कानावर पडताच तीव्र उत्सुकता निर्माण होणे; सिद्धक्षेत्रे, पवित्र नद्या, संगम, पर्वत, तीर्थक्षेत्रे अशा ठिकाणी राहण्याची आवड निर्माण होणे; सांसारिक विषयांची क्षणभंगुरता, जीवनाची मृत्युग्रस्तता याविषयी मनात विचार सुरू राहणे.

**संचारीभाव**— संसाराविषयी वैराग्य, संकटकाली धैर्य, ईश्वराच्या स्मृतीने विषाद, भगवद्‌भक्तांच्या भेटीने हर्षोल्लास.

**साधारण अनुभाव**— वारंवार मूर्तीला नमस्कार करणे; भावावेशामुळे शरीरात स्वेद, कंप, रोमांच, सात्विकभाव यांचा उदय होणे, सत्संगप्रिय व्यक्तींना भक्तीचा उपदेश करणे, ईश्वराची पूजा, प्रार्थना यात मग्न राहणे.

**असाधारण विभाव**— संतचरित्रे, भक्तिसाहित्य, ईश्वरीलीलाचरित्र याचे श्रवण, मनन, निदिध्यासन यात सतत मग्न राहणे; शुद्ध, सत्त्वमय अंतःकरणात इष्टदेवता, सद्‌गुरु यांची वारंवार स्मरण स्फूर्ती येणे; भक्तीच्या आश्रयाने स्वतःच्या जीवनाचे नियोजन करणे, सर्व विश्व ही ईश्वराची मूर्ति वाटणे; जीव–जगत्–ईश्वर यांचे स्वरूप आणि परस्परसंबंध याविषयी विचारनिश्चिती होणे; ज्ञानी, जिज्ञासू भक्तांच्या सान्निध्यात वारंवार राहणे, ईश्वरी प्रेमाची चर्चा करणे.

**असाधारण अनुभाव**— भक्तीच्या अवस्थेत नेत्र बंद राहणे; नासाग्र भ्रूमध्य वा निरालंब स्थितीत मन सहज एकाग्र होणे; व्यवहाराचे विशेष भान नसणे; स्थिर, गंभीर भावप्राप्त होणे; कुणाविषयीही विशेष ममता नसणे, अहंभावाचे विसर्जन होणे; ईश्वरप्रेमी व्यक्तीबद्दल आत्यंतिक प्रेम, ईश्वरद्वेषी व्यक्तीबद्दल तीव्र द्वेष वाटणे, वार्तालापात रस नसणे; ईश्वरभक्तीव्यतिरिक्त अन्य कशातही मन न रमणे.

या लक्षणावरून गुरुकृपाप्राप्त, भक्तिमार्गी शक्तिपात साधकाची अंत:करणस्थिती भावसाधनेतील तीव्रता, अनन्यता आदींचे स्वरूप समजू शकते.

वस्तुत: देवात्मशक्ती, आल्हादिनी चिच्छक्ती हीच शृंगार, हास्य, शोक, क्रोध, उत्साह, भय, व विस्मय आदि सर्व वृत्तींचे अधिष्ठान आहे. म्हणून वृत्ति आणि विकार यांकडे साक्षीभावाने शक्तिस्फुरण दृष्टीने पहावयास हवे. तीच प्रक्रिया साधनेत घडते. अशा वृत्तिस्पंदनातून, शक्तिउन्मेषातून माधुर्य, करुण, रौद्र, वीर, अद्‌भुत आदि सर्व रसांचा उद्‌भव होतो. रसब्रह्माचे ते आविष्कार आहेत. संतभक्ताची नवविधा भक्ति, नवरसात्मक स्वरूपात वात्सल्य, दास्य, सख्य आदि विविध भावांतून फुलते. इष्ट देवतेच्या बाललीला मोहित करतात, सद्‌गुरु स्मृतीने कृतज्ञतेचे अश्रू निर्माण होतात; कधी शृंगारमाधुर्य फुलते, कधी देवाशी भांडण घडते, तर कधी विरहाच्या वेदना व्याकुळ करतात. कधी अद्‌भुत विश्वरूपदर्शनाने विस्मय निर्माण होतो. भक्तीच्या या रमणीय रसोत्कर्षात लौकिकाकडून अलौकिकाकडे, पार्थिवाकडून परतत्त्वाकडे घेऊन जाण्याचे सामर्थ्य असते. त्यादृष्टीने विविध ईश्वरी विग्रहांचे अनन्यभक्त, त्यांचे अनुभवात्मक भक्तिभाव वैभव समजून घेणे भक्तियोगात्मक शक्तिपात साधनेस महत्त्वाचे आहे. त्यामुळे साधकाचे अंत:करण द्रवित होण्यास हातभार लागतो. त्याचे अंतर्विश्व भावसंपन्न होते.

देव–भक्त, गुरु–शिष्य अशा हृदयसंवादातून फुलणारी ही परा-भक्ती 'सर्व सुखाचे आगर' अशा ईश्वरीकृपेतून योगवैभव प्रकट करते. दिव्यधाम, दिव्यलीला हे नित्य अंत:प्रचीतीचे विषय होतात. वृंदावन,

साकेत, दत्तस्थाने, देवी स्थाने ही भौगोलिक ठिकाणे रहात नाहीत. अंतः- प्रचीतीचे दिव्यविषय होतात. देवतेचे लीलाचरित्र हे पुराण न रहाता ती भक्तिरसास्वादाची क्रीडाभूमी होते. भक्तीचे हे भावसौंदर्य, भक्तीचा हा लीलारस जरी नेहमीच्या भाषेत प्रकट झाला तरी त्या अनुभूतींचे रहस्य समजण्यासाठी 'वाच्यार्थ' गौण असतो, 'लक्ष्यार्थ' महत्त्वाचा असतो.

भक्तिसाधनेतील या भावसौंदर्यामागे 'रसब्रह्म' संकल्पना आहे. ती पराभक्तीचे तात्त्विक अधिष्ठान आहे.

'आनंदः परमं ब्रह्म स एव हि रस स्मृतः।'

या भक्तिरसामृतात आनंदविभोर अवस्थेत ईश्वरीदर्शनात सान्निध्यात दिव्य लीलांच्या अनुभवात भक्तांची अवस्था दिङ्मूढ होऊन जाते.

'अहो निमग्नस्तव रूपसिन्धौ पश्यामि नान्तं नच मध्यमादिम्।
अवाक् च निःस्पन्दतमो विमूढः कुत्रास्ति कोऽस्मीति न वेद्य देव॥

सगुणदर्शन आणि विश्वरूपदर्शन यावेळी अर्जुनाची अशीच स्थिती झाली (गी. अ. ११) भक्तीच्या पराकाष्ठेत देव–भक्त हीही अवस्था संपते. 'देव पहावया गेलो। देव होऊनिया ठेलो।' अशी अवस्था येते त्यावेळी 'मी–तू' हे नाते आणि देव–भक्ताचा हृदयसंवाद हे एक 'स्वगत' ठरते.

'नमस्तुभ्यं नमो मह्यं तुभ्यं मह्यं नमो नमः।'

अशा भावावस्थेत देवभक्ताचे परस्पर परमप्रेम प्रगट होते. हे भक्तीचे हृद्गत समजून घेताना श्रीज्ञानदेव म्हणतात–

'हे शब्देविण संवादिजे। इंद्रिया नेणता भोगिजे।
बोला आधि झोंबिजे। प्रमेयासी'

मराठी आदिकवि श्री मुकुंदराज विवेकसिंधू ग्रंथात म्हणतात –

'तेथ ब्रह्मसुखाची गोडी। केवी बोलावी।
हे जयाचे तोचि जाणे। एरा टकमकाचि॥'

अर्थात ही भक्तिसाधना आणि त्यामधील भाववैभव हा केवळ व्यक्ति-निष्ठ स्वरूपाचा कल्पनाविलास नाही. त्यामध्ये अद्वैत दृष्टीचे अधिष्ठान आहे.

शिवमहापुराण ग्रंथाने मोक्षक्रम विशद करता भक्ती, संतसमागम

सद्गुरुकृपा आणि ज्ञानविज्ञानप्राप्ती यांचे परस्पर कारणकार्यसंबंध स्पष्ट केले आहेत–

भक्तेर्मूलं तु सत्कर्म स्वेष्टदेवादिपूजनम् ।
तन्मूलं सद्गुरुःप्रोक्तस्तन्मूलं संगतिःसताम् ॥
ज्ञानस्याऽपिच सत्मूलं भक्तिरेवाऽभिधीयते ।
विज्ञानस्यच सन्मूलं भक्तिरव्याभिचारिणी ॥
विज्ञानं जायते ज्ञानात्परब्रह्मप्रकाशकम् ।
विज्ञानं च यदा जातं तदा भेदो निवर्तते ॥
भेदे निवृत्ते सकले द्वन्द्वदुःखविहीनतः ।
द्वन्द्वदुःखविहीनस्तु शिवरूपोभवेत्यसौ ॥

शिवमहापुराणः रुद्रसंहिता : १२.७३.७७

या मोक्षक्रमामध्ये सद्गुरुकृपाप्रसाद किंवा शक्तिजागृती हा महत्वाचा टप्पा आहे. साधनभक्तीने अधिकारप्राप्त होऊन ती कृपा घडते तर या कृपाप्रसादाने पराभक्तीची प्राप्ती घडून मोक्षस्थिती येते, हे विशद करताना शिवमहापुराण ग्रंथात म्हटले आहे–

अनेकजन्म सिद्धानां श्रौतस्मार्तानुवर्तिनाम्
विरक्तानां प्रबुद्धानां प्रसीदति महेश्वरः ॥
प्रसादादेव साभक्तिः प्रसादोभक्तिसंभवः ।
प्रसादात् सर्व पापेभ्यो मुच्यते नात्रसंशयः ॥

शिवमहापुराणः वायवीयसंहितः उत्तरखंड : ७.२७.३२

दुर्दैवाने संत, सद्गुरु, कृपा, अनुभव यांचे महत्त्व बद्धजीवास समजत नाही. देह आणि इंद्रिये यांनी तयार होणारे 'हे' विश्व त्याला सार्थ वाटते, ही इहवादी दृष्टी त्याला परमार्थापासून वंचित करते. ज्ञानेंद्रिय प्रतीती ही बद्धाची विश्वदृष्टी असते, तर ज्ञानी भक्तास ऋतंभराप्रज्ञा-जागृतीने जाणवणारे ईश्वरलीलाविश्व हे 'जीवन्मुक्ताचे प्रत्यक्ष' असते. इह–परभेद अहंकेंद्री भोगवादास जन्म देतो. जीवन्मुक्ताचे प्रेम समग्रतेवर असते. शब्दज्ञान, समग्रतेविषयीचे अज्ञान आणि इंद्रिय प्रतीतीशी निगडित विज्ञान या सर्वांच्या सीमा जेव्हा ओलांडल्या जातात त्यावेळी सर्वस्पर्शी प्रज्ञान प्रकट होते. 'देह मी' या ऐवजी 'देही मी' ही स्वसंवेद्य आत्मप्रतीती हे त्याचे एक परिमाण आहे. 'जनी जनार्दन'

हे त्याचे सामाजिक परिमाण आहे; तर 'सर्वांभूती भगवद्भाव' हे त्याचे विश्वात्मक परिमाण आहे.

ज्ञानयोगदृष्टी आणि भक्तियोगदृष्टी यांचे भावार्थ सारखेच आहेत. हे गीता आणि भागवत यामधील भूमिकेतून स्पष्ट होते.

सर्वभूतस्यमात्मानं सर्वभूतानिचात्मनि ।
ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शिनः ॥ भ. गी. ६.२९ ॥
सर्वभूतेषु यः पश्येत् भगवद् भावमात्मनः ।
भूतानि भगवत्यात्मन्येष भागवतोत्तमः ॥ श्री.भा. ११.२॥

मात्र संतभक्तांची ज्ञानजिज्ञासा शब्दज्ञानातून होत नाही. सगुणभक्ती आणि सद्गुरुकृपा यांच्या अनुभवातून ती विकसित होते. अन्वय आणि व्यतिरेक अशा उभय दृष्टीतून ती प्रकट होते. भागवतामध्ये या तत्त्व जिज्ञासेचे स्वरूप स्पष्ट झाले आहे–

अहं ब्रह्म परंधाम ब्रह्माहं परमं पदम् ।
एवं समीक्षन्नात्मानं आत्मन्याधाय निष्कले ॥ श्री. भा. १२.५ ॥
एतावदेव जिज्ञास्यं तत्त्वजिज्ञासुनात्मनः ।
अन्वयव्यतिरेकाभ्यां यत् स्यात् सर्वत्र सर्वदा ॥ श्री. भा. २.९ ॥
सर्ववेदान्तसारंयत् ब्रह्मात्मैकत्व लक्षणम् ।
वस्त्वद्वितीयं तन्निष्ठं कैवल्यैक प्रयोजनम् ॥ श्री. भा. १२.१३ ॥

व्यक्तिरेक दृष्टीमध्ये इंद्रियानुभव आणि तर्क यांना ज्ञात होणाऱ्या ज्ञेय प्रपंचाचा आणि त्यास आधारभूत असणाऱ्या देहबुद्धीचा निरास अभिप्रेत आहे. देहातीत, पंचकोश विलक्षण अशी 'अहं ब्रह्मास्मि' प्रतीती स्वरूपस्थिती अभिप्रेत आहे. व्यतिरेकदृष्टी ज्ञानपूर्व अवस्थेत जीवाची देहासक्ति, प्रपंचासक्ति दूर करण्यास सहाय्यभूत ठरते. कर्मबंध-निवृत्तीशिवाय मोक्षप्राप्ती घडत नाही. त्या दृष्टीने वेदांत भूमिकेतील आत्मानात्मविवेक, संतभक्तांनी वैराग्यावर दिलेला भर महत्त्वाचा आहे. श्रीमत् शंकराचार्यांच्या 'दशश्लोकी' मध्ये व्यतिरेक भूमिकेचे प्रत्यय-कारी वर्णन आहे.

न भूमिर्न तोयं न तेजो न वायुः ।...
न जाग्रन्न मे स्वप्न को वा सुषुप्तिः ।...
जगत्तुच्छमेतत्समस्तं तदन्यत् ।...

तदेकोऽवशिष्टः शिवः केवलोऽहम्ः ॥...

अन्वय भूमिकेनुसार सर्व सृष्टी ब्रह्माच्या त्रिगुणात्मिका संकल्प-शक्तीद्वारा (सिसृक्षा) आविर्भूत होते. तो चित्–शक्ति–विलास ' आहे. ब्राह्मी स्थितीत 'सर्वं खल्विदं ब्रह्म' ही परमोच्च अनुभूती येते. ज्ञानोत्तर जीवन्मुक्त अवस्थेतील सर्वात्मभाव अन्वय दृष्टीचा निदर्शक आहे. पराभक्तीच्या परमप्रेम अवस्थेत सर्व वस्तुजात हे सच्चिदानन्दघन इष्ट-देवतेचे, परमसत्तेचे दिव्यस्वरूप जाणवते. 'सर्वं विष्णुमयं जगत् ।' ही प्रचीती येते. ज्ञानयोगप्रधान व्यतिरेकदृष्टान्त आणि भक्तियोगप्रधान अन्वयदृष्टी यांचा मनोज्ञसंगम श्रीज्ञानदेवांच्या 'ज्ञानभक्ति' संकल्पनेत आढळतो. अर्वाचीन संतांनी या समन्वयी भूमिकेचे मनोज्ञ दर्शन घडविले आहे–

अन्वय पाहता ब्रह्माविरहित काही नाही ।
आत्मा–अनात्मा हा केला व्यक्तीरेके दो ठायीं ॥

–श्री निरंजन रघुनाथ

वृत्तिसुख त्यजुनी सुखी व्हावे । त्रिपुरीते खंडावे ।
ऐशा व्यतिरेके दृढ होता । अन्वया पहावे ॥

–श्री हंसराज स्वामी.

ब्रह्माचि संसार । स्फूर्ति रूपे –श्री गुलाबराव महाराज.
विश्व सर्व हे ब्रह्माचि केवळ । चिद्विलासी रमतो दत्त

–श्रीमंत महाराज बाळेकुंद्रीकर

ज्ञान आणि भक्ति, वेदान्त आणि संतदृष्टी यांची एकात्मता श्रीस्वामी स्वरूपानंद यांनी मनोज्ञ रीतीने दाखवली आहे–

वेदान्ती तो बोले सृष्टी मिथ्या ऐसे ।
भक्ता तीची दिसे । हरिरूप ॥
दोहोंचा भावार्थ सारिखा तत्त्वता ।
एकचि हरि सत्ता । सर्वां ठायीं ॥
भक्त तोचि ज्ञानी । ज्ञानी तोचि भक्त ।
जाणावा सिद्धान्त । स्वामी म्हणे

श्रीमत् शंकराचार्यांच्या अद्वैत वेदान्त परंपरेत दोन भूमिकाप्रवाह विकसित झालेले दिसतात. श्रीवाचस्पतिमिश्रांच्या 'भामती प्रस्थान'

भूमिकेत अध्यास, विवर्त, माया आदि संज्ञांच्या आधारे अविद्याजन प्रपंचदृष्टीचा निरास आहे. सुरेश्वराचार्य, पद्मपादाचार्य आदींच्या 'विवरण प्रस्थान' भूमिकेत पराविद्या स्थितीतील ज्ञानोत्तर भक्तीची तत्त्वदृष्टी प्रभावी दिसते.

'समाधि सिद्धिः ईश्वर प्रणिधानात्' या पातंजल योगसूत्र भूमिकेनुसार (साधनपाद. ४५), भक्तियोगद्वारा वासनाक्षय, मनोनाश, तत्त्वज्ञानोदय अशी साक्षात्कारप्रक्रिया अभिप्रेत दिसते. या भक्तीची परमोच्च स्थिती म्हणजे प्रेमभक्ती, पराभक्ती ही होय. या भक्तीचे स्वरूप अहंममत्वादि विकाररहित असते. ती भक्ती सकाम नसते. अनन्य भक्ताची ती सहजावस्था असते. श्रीमधुसूदन सरस्वती म्हणतात –

जीवन्मुक्ति दशाया तु न भक्तेः फलकल्पना ।
अद्वेष्टत्वादिवत्तेषां स्वभावो भजनं हरेः ।।
तेषां ज्ञानी नित्यमुक्त एकभक्तिर्विशिष्यते ।
इत्यादि वचनात्प्रेमभक्तोऽयं मुख्य उच्चते ।।

उपनिषदे, श्रीमत् शंकराचार्य, श्रीज्ञानेश्वर यांच्या तत्त्वदृष्टीचे अंतरंग पाहता, त्यामध्ये जीवन्मुक्ताचे विश्वदर्शन, ज्ञानी भक्ताची सहजावस्था प्रगट होते. चिद्विलासवाद, स्फूर्तिवाद हे शक्तिपातसाधनेचे तात्त्विक अधिष्ठान प्रगट होते.

ब्रह्मैवेदं अमृतं पुरस्तात् । – मुण्डकोपनिषद् २.२.११
स एव अधःस्तात् स उपरिष्टात् स पश्चात् स...अहं एव इदं सर्वम् इति । – छांदोग्य उपनिषद् ७.२५.
विद्या प्रपञ्चस्य नित्यत्वं सिद्धमेव नित्यानन्द चिद्विलासात्मकत्वात् ।
शुद्ध बुद्ध मुक्त सत्य आनंद स्वरूपत्वात् च ।। – त्रिपादमहानारायणोपनिषद् जगत्त्र तु या संवित् अहं रूप विभासिनी । सा परा एव हि चिच्छक्ति. तद् भेदो न तु विद्यते । – त्रिपुरारहस्य
चिदेव देहादि अहं एतद् सर्वं चिदैव एकरसं विशुद्धम् ।

– श्रीशंकराचार्यः विवेक चूडामणिः ३९१

सोने सोनेपणाउणें । न येताचि झालें लेणे ।
तेविं न वेचितां जग होणे । अंगे जया ।

श्रीज्ञानदेवः – चांगदेव पासष्टी.

देव देऊळ परिवारी । कीजे कोरोनि डोंगरू ।
तैसा भक्तीचा व्यवहारू । कां नव्हावा ।

श्रीज्ञानदेव : अमृतानुभव

जग असिकी वस्तुप्रभा । श्रीज्ञानदेवः अमृतानुभव.

ज्ञानपूर्व अविद्यादशेमध्ये नामरूपात्मक जडविश्व हेच एकमेव सत्य अशी बद्ध जीवाची कल्पना असते. त्यामधून देहबुद्धीचा प्रभाव, आसक्ति आणि अविवेक निर्माण होतात. परंतु निष्काम स्वधर्माचरण, नवविधा साधनभक्ती यामुळे इष्ट ती चित्तशुद्धी घडते. गुरुकृपा, शक्तिजागृती घडते, त्यानंतर प्रेमरूपा, शान्तिरूपा, अमृतरूपा पराभक्तीची प्राप्ती होते. अशा साक्षात्कार साधनेची फलश्रुती म्हणजे पराविद्या, मोक्षस्थिती होय. या मोक्षस्थितीत चिद्विलासात्मक स्वानंदस्थिती, सर्वात्मभाव, सर्वभूती भगवद्भाव, प्रेममयतेचा रसोत्कर्ष घडतो. चैतन्य आणि चिच्छक्ति, शिव आणि शक्ति यांच्या दिव्य सामरस्याची स्थिती; चिद्विलासात्मक तत्त्वदृष्टी प्रगट होते. अशी तत्त्वदृष्टी वेदवेदान्त परंपरा, आगम आणि तंत्र परंपरा यांना साधणारा सेतू म्हणता येईल. अद्वैत आणि शक्तिपातसाधना यांचे एकात्म आणि समन्वयी साक्षात्कार विज्ञान म्हणता येईल.

त्याच्या प्राप्तीसाठी दृक्-दृश्य विवेक महत्त्वाचा आहे; शिवशक्ति सामरस्यदृष्टी महत्त्वाची आहे. सद्गुरुकृपाप्राप्त शक्तिसंचार साधना आणि त्यामध्ये प्रगट होणारी क्रिया योगात्मक व्यक्तिसाधना महत्त्वाची आहे. अशा सहजयोगात्मक भक्तियोगाचे मर्म विशद करताना भगवान सूतमहर्षी म्हणतात––

न शिवेन विना शक्तिर्न शक्तिरहितः शिवः ।
उमाशंकरयोरैक्यं यः पश्यति स पश्यति ॥ य. वै. खं. १३.३०
सदाकारा परानन्दा संसारोच्छेद कारिणी ।
सा शिवा परमादेवीं शिवाभिन्न शिवंकरी ॥ य. वै. खं. १३.३.
उपासते ये परमां सर्वलोकैक मातरम् ।

ते ऽ भीष्टं सकलं यान्ति विद्यां मुक्तिप्रदामपि (पूर्वोक्त १३.३३)

अद्वैतदृष्टी, शक्तिपातसाधना आणि भक्तियोग यांचा एकात्म आविष्कार गुरुमार्ग आणि गुरुभक्ति यामध्ये व्यक्त होतो.

'श्रीगुरु: सर्वसमष्टीभूता आद्याशक्ति: ।' ही भावनोपनिषदायी भूमिका लक्षात घेतली तर श्रीशक्तीची उपासना, पराभक्तिस्वरूप शक्तिपातसाधना ही खरी गुरुभक्ती आहे, आणि गुरुभक्तीचा प्रारंभ आणि फलश्रुती म्हणजे सर्वात्मक चित्‌शक्तीविलासाची, शिवशक्ति सामरस्याची, ब्रह्मचैतन्याची श्रेष्ठ अनुभूती आहे. म्हणून अद्वैतदर्शन, शक्तिपात साधना आणि भक्तियोग यांमध्ये गुरुभक्ति हे परममूल्य ठरले आहे. श्रीज्ञानदेवांनी 'ज्ञानी भक्तीचे शब्दशिल्प' आचार्योपास्ति' विवेचनात प्रत्ययकारीपणे उभे केले आहे (ज्ञानेश्वरी अ. १३. ३७०–४५३).

तैसें सबाह्य आपुलें । जेणें गुरुकुली ओपिलें ।
आपणपें केले । भक्तीचें घर ।।......
जो गुरुदास्यें कृशु । जो गुरुप्रेमें सपोषु ।
गुरुआज्ञेनिजवासु । आपणचि जो ।।
जो गुरुकुले सुकुलिनु । जो गुरुबंधुसौजन्यें सुजनु ।
जो गुरुसेवाव्यसनें सव्यसनु । निरंतर ।।
गुरुसंप्रदाय धर्म । हे जयाचें वर्णाश्रम ।
गुरुपरिचर्या नित्यकर्म । जयाचें गा ।।
गुरुक्षेत्र गुरुदेवता । गुरुमाय गुरुपिता ।
जो गुरुपूजेपरौता । मार्गु नेणे ।।
जयाचे ववत्र । वाहे गुरुनामाचे मंत्र ।
गुरुवाक्यावांचूनि शास्त्र । हातीं न शिवे ।।
तो तत्त्वज्ञानाचा ठावो । ज्ञाना तेणेंचि आवो ।
हें असो तो देवो । ज्ञानभक्तु ।।

अशा ज्ञानीभक्तांची परंपरा ही भारतीय साक्षात्कारदर्शनातील महान 'गुरुमार्ग' परंपरा आहे. 'शाब्दे परेच निष्णातं । श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम् ।' अशा मोक्षप्रदायक महान सद्‌गुरूंचे प्रज्ञान हे त्याचे अधिष्ठान आहे. श्रीदत्तसंप्रदाय, गुरुगीता, श्रीगुरुचरित्र यांमधील गुरुकृपेचे

आणि गुरुभक्तीचे प्रबोधन ही ज्ञानभक्तीची व्यापक तत्त्वदृष्टी आहे.

भारतीय व्यक्तींच्या सांस्कृतिक जीवनाचा, प्रत्येक दिवसाचा प्रारंभच पुण्यश्लोक ऋषि, संत, जीवन्मुक्त, भगवद्भक्त यांच्या परम-मंगल संस्मरणाने होतो–

'प्रल्हाद नारद पराशर पुण्डरीक । व्यासांबरीशशुकशौनकभीष्म-
दाल्भ्याम् ।
रुक्मांगदार्जुनवसिष्ठ बिभीषणादीन् । पुण्यानिमान् परमभागवतां
स्मरामि ।।

अशा महाभागवतांचे लक्षण श्रीमद्भागवत ग्रंथाने समर्पकपणे दिले आहे–

सर्वभूतेषु यःपश्येद् भगवद्भावमात्मनः ।
भूतानि भगवत्यात्मन्येष भागवतोत्तमः ।। श्री. मा. ११.२.४५.

'जनीजनार्दन' आणि 'सर्वभूतिभगवद्भाव' लाभलेले ज्ञानी. भक्तांचे जीवन म्हणजे भक्तियोगात्मक अद्वैतदृष्टीचे जीवनभाष्य आहे. श्रीमत् शंकराचार्य, ज्ञानेश्वर यांच्या जीवनकार्यात त्याच तत्त्वदृष्टीचा प्रभावी आविष्कार आहे.

प. पू. श्रीमद्वासुदेवानन्द सरस्वती (टेंबे स्वामी महाराज), प. पू. श्रीगुरुमहाराज यांचे जीवन, कार्य आणि तत्त्वदृष्टी ही अशा श्रेष्ठ ज्ञानीभक्तांचे सजीव, साकार दर्शन आहे. त्यांचे संस्मरण, अनुसरण हीच त्यांची 'अंतरंगभक्ती' आहे.

श्रीमद्भगवद्गीतेतील ज्ञानीभक्त लक्षणाप्रमाणेच (अ. १२), श्रीमद्भागवत, ग्रंथात ज्ञानी भक्त, संतलक्षणे आली आहेत–

सन्तोऽनपेक्षामस्थिताः प्रशान्तः समदर्शिनः ।
नर्ममो निरहंकारा निर्द्वन्द्वा निष्परिग्रहाः ।। श्री. भा. ११.२६.२७.

संतश्रेष्ठ एकनाथांचे या लक्षणावरील भाष्य हृदयस्पर्शी आहे.

आजच्या काळात प. पू. श्रीदत्तमहाराजांच्या रूपाने गीतोक्त ज्ञानीभक्तलक्षणे (३.१२); ज्ञानलक्षणे (३.१३), श्रीमद्भागवतोक्त संतलक्षणे यांचे मनोज्ञदर्शन घडते आहे. 'अमानित्वं अदंभित्वं' या लक्षणाप्रमाणेच त्यांचा लौकिक, प्रपंचव्यवहारही एकनाथाप्रमाणेच–

'देहीं असोनि नाही अहंकृती । गेही असोनि नाही गृहासक्ती '
(ए. भा. ३.३०६)

असा आहे. निर्लिप्त, 'कमलपत्रमिवाम्भसा' आहे. 'शाब्दे परेच निष्णातं । श्रोत्रियं 'ब्रह्मनिष्ठं' या श्रुतिप्रणित सद्गुरु लक्षणांचे दर्शन त्यांच्यात घडते. 'सरस्वति वरदपुत्र' अशी त्यांची शब्दगंगोत्री आहे. ज्ञानी भक्त संतांच्या अष्टलक्षणांत निरपेक्षता, भगवद्चिंतन, समदर्शन, निरभिमान, निर्ममता, अपरिग्रह, निर्द्वन्द्वता, प्रशान्त चित्त यांचा समावेश आहे. त्यांचे यथार्थ प्रत्यंतर श्रीदत्तमहाराजांचा स्वभाव, जीवन, कार्य यांमधून येत राहते. या अष्टलक्षणांचे वर्णन करताना नाथ म्हणतात—

चैतन्य सरोवरींचे कमळ । विकासले अष्टदल ।
तें हें संतलक्षण केवळ । स्वानंदशील साधूसी ।। (ए. भा. २६.३५०.)

श्रीमद्भागवत हा श्रीदत्तमहाराजांचा प्राणविषय आहे. ज्या प्रमाणे भारतीय साक्षात्कारदर्शनात भक्तियोग, अद्वैत आणि शक्तिपात-साधना यांचे समन्वयी भाष्य प्रगट झाले आहे; त्याचप्रमाणे श्रीदत्त महाराजांच्या जीवनकार्यात या भूमिकांचा 'त्रिवेणी प्रयागसंगम' प्रगट झाला आहे. भारतीय साक्षात्कारशास्त्रपरंपरेतील अशा संगमतीर्थांची अंतरंग सेवा ही त्यांना खरी आदरांजली आहे. यथार्थ ज्ञानभक्ती आहे. या परंपरेतील या त्रिविध महान भूमिकांचे यथार्थ अंतरंग दर्शन हीच जीवन्मुक्तीसाठी प्रयत्नशील असणाऱ्या मुमूक्षू साधकांची खरी 'आनंद-यात्रा' आहे.

* *


*With Best Compliments from*

**KISHORE INDUSTRIES**

**C–23, ADDL. MIDC, JALNA**

Maharashtra

RAMKA Ph : 3483

# पुण्याईचा सुगंध

– सौ. सविता अशोक कवीश्वर, पुणे

॥ श्रीगुरु: शरणम् ॥

जेथे निरूपणाचे बोल आणि अनुभवाची ओल
ते संस्कृता परीस खोल – अध्यात्म श्रवण –दासबोध

ज्यांच्या अध्यात्म निवेदनामध्ये अनुभवाचा ओलावा असतो ते संत सत्पुरुषच असतात. त्यांचे साधे शब्द मनावर खोल संस्कार करणारे असतात. मला प. पू. श्रीमहाराजांच्या बाबतीत हे नेहमी अनुभवास येते. आधी ते कमी बोलतील. पण बोलतील ते शब्दसुद्धा अगदी साधे, मोजके, नेमके असतात. ऐकणाऱ्याला विचार करायला लावतात. आम्ही प. पू. महाराजांना दादा म्हणतो. दादा कधीही मोठा आवाज काढून बोलल्याचे मी ऐकले नाही. त्यांचा सर्वत्र मानसन्मान होत असतो, पण घरात त्यासंबंधी कधी अक्षर काढत नाहीत. ते इतक्या साधेपणाने राहतात, की आम्हाला त्यांचा मोठेपणा कळतच नाही. त्यांच्या सहवासाने किंवा नातेसंबंधामुळे लोक म्हणजे त्यांचे भक्त आम्हालासुद्धा मोठे समजून वागतात. त्यांच्या भक्तांची भक्ती पाहिली तरी आम्हाला देवानं तशी भक्ती द्यावी असं वाटतं ! मला तर अध्यात्म–परमार्थ हे शब्दसुद्धा लग्नाआधी ठाऊक नव्हते. किती जन्माची पुण्याई साठली होती कोण जाणे ! कवीश्वरांच्या घरात सून म्हणून प्रवेश झाला. मुलीला घराणं भाग्यानं मिळत असलं तरी माझ्या भाग्याची मोजदाद मी काय करू शकणार ?

हे मला जाणवले, ते योगायोगाने अगदी पहिल्यांदा पू. महाराजांचा (दादांचा) भागवत सप्ताह आश्रमात ऐकला तेव्हा ! पू. दादा व ती. सौ. आईसाहेबांबरोबर पुष्कळ वेळा अनेक ठिकाणी जाण्याचे योग येत असत. त्यावेळी त्यांचा मोठेपणा, लौकिक दिसत असे. पण पू. महाराजांचे अलौकिक मोठेपण पहिल्या श्रीमत् भागवत सप्ताहातच

जाणवले. त्यांचे साधुत्व–संतपण त्या सप्ताहात मला फार तीव्रतेने जाणवले. पू. दादांचे निरूपण मी त्यांच्याशी समरस होऊन ऐकत होते. ते ऐकताना मी अनेकदा अक्षरश: रडले, हसले, लालबुंदही झाले. भागवतातील प्रसंग मनात ठेवीत असे आणि त्याची तंद्री मला लागत असे. त्या तंद्रीतच मी घरी जात असे. त्या सप्ताहात मला माझ्याही भाग्याची जाणीव झाली. कारण

वासुदेव म्हणे संत । संगे करिती पसंत ।।

गुरु शिष्याचा स्वीकार त्याच्या गुणदोषासहित करीत असतो. स्वीकार केल्यानंतर त्या गुरूच्या संगतीने शिष्याचा उद्धार होतो, या संतवचनाचा मी अनुभव घेत आहे.

१९ मे १९६९ ला या पुण्यनगरीत मी पू. महाराजांची सून म्हणून प्रवेश केला. तसा बघायचा कार्यक्रम वैरागला, थोरल्या वन्संकडे डॉ. भातलवंडे यांच्याकडे झाला. त्यावेळी प. पू. श्रीगुळवणी महाराज, प. पू. श्रीधुंडिराज महाराज, प. पू. दादा हे तेथे आलेले होते. पत्रिका जमली होती. पहिल्यांदा पू. श्रीगुळवणीमहाराजांनी बघितले व पसंती दिली. नंतर पू. धुंडिराजमहाराजांनी पाहिले व त्यांनीही पसंती दिली. मग पू. दादांनी बघितले त्यावेळेपासून माझा स्वत:चा गुरु-घराण्याशी जास्त संबंध आला. त्यापूर्वी मात्र मी या व्यक्तींना कुठेही पाहिले नव्हते किंवा त्यांच्याविषयी विशेषकरून काही माहिती नव्हती. एकदमच या थोर सत्पुरुषांचा परिचय झाला. यांच्याशी जवळीक साधण्याची संधी मिळाली. त्यातही विशेष असे की पू. दादांसारख्या एका थोर संताची थोरली सून म्हणून वावरण्याचे भाग्य मला लाभले. या भाग्याचे काय वर्णन करणार ?

माझा साखरपुडा श्रीवासुदेव निवासात झाला पाहिजे, हे पू. श्रीगुळवणी महाराजांनी सांगितले. मधल्या हॉलमध्ये सगळी सोय केली. स्वत: पू. श्रीगुळवणी महाराजांनी एका सुरती चांदीच्या रुपयाने माझ्या कपाळी कुंकुमतिलक चढविला. या भाग्याचे देवसुद्धा हेवा करीत असतील ! माझ्या माहितीप्रमाणे श्रीवासुदेव निवासात पूर्वी किंवा आजपर्यंत माझ्याशिवाय कोणाचाही साखरपुडा झाला नसावा. कवी-श्वरांच्या घराण्यावर पू. श्रीगुळवणीमहाराजांचे केवढे प्रेम असेल हे

नुसते असे अनेक प्रसंग ऐकून कल्पना करता येईल. मी कवीश्वरांच्या घरात येण्याचा भाग्योदय पू. श्रीगुळवणी महाराजांच्या कृपेने झाला. त्यांची पसंती इतकी महत्त्वाची होती, की प्रत्येकजण म्हणे महाराजांनी पसंत केले तेच आम्हाला पसंत आहे. यामुळे माझ्या जीवनाला वेगळंच वळण लागलं !

मी खेड्यातून एकदम शहरात आले. शहरी वातावरण वेगळे ! नव्या घरातील चालीरीती वेगळ्या, माणसं वेगळी, स्वभाव निरनिराळे– सार कसं अपरिचित होतं ! अगदी नवीन नवीन समोर उभं राहून बोलायचं धाडस होत नव्हतं. मग जवळ बसून बोलणं दूरच राहिलं. याला कारण माझ्यासारख्या सामान्य व्यक्तीपुढे असामान्य महापुरुषापुढे वागण्याचा प्रसंग, हेच माझ्यावरील मोठे मानसिक दडपण होते. पण हळूहळू हे सारे बदलले. अनुभवाने मनातील भीति दूर झाली. कधी कधी संध्याकाळच्या वेळी पू. दादा आमच्याबरोबर गप्पा मारण्याकरिता आमच्यात येऊन बसत. तेव्हा आमची सर्व कामे उरकलेली असत. त्यावेळी मी एका बाजूला उभी राहून त्यांचे बोलणे ऐकायची. मग त्यांचे लक्ष माझ्याकडे गेले म्हणजे म्हणायचे– 'या इथे बसायला हरकत नाही.' मग मी बसत असे. आणि मग पुन: गप्पा सुरू व्हायच्या. सगळ्याच विषयांवर गप्पा होत असत. बोलता बोलता त्या विषयाला धरून पू. दादा एखादी गोष्टही सांगत असत. असं बऱ्याच वेळा व्हायचं !

पूर्वी काही वर्षे पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील शेल पिंपळगांव येथे माझ्या यजमानांचा (डॉ. अशोकरावांचा) दवाखाना होता. तेव्हा आम्ही तेथे राहात होतो. त्यावेळी एका दिवाळीसाठी पू. दादा ४।५ दिवस आले होते. त्या गावी भीमा व भामा या दोन नद्यांचा संगम आहे. पू. दादा रोज सकाळी त्या संगमावर स्नानाला व संध्याकाळी संध्येला जात असत. येताना हातात पाण्याने भरलेला एक तांब्या असायचा.

त्यावेळी आमच्याकडे एक कोळी पाणी आणून घालीत होता. त्याचे पाणी दादांना चालणार नाही म्हणून आम्ही दोघी (मी व माझ्या धाकटचा वन्स) नदीवरून पाणी आणीत होतो. दादा ४।५ दिवस

राहिल्यावर त्यांचं पुण्याला जायचं नक्की झालं तेव्हा त्यांनी मला सांगितलं, "उद्या आम्ही सकाळीच निघतो. आम्ही तांदळाची खिचडी बनवू आणि ती खाऊन मग निघू." त्याप्रमाणे त्यांनी आपण स्वत: तांदूळ-मूगाची खिचडी बनवली आणि ती खाऊन मग ते पुण्याला गेले. पुण्याहून त्यांना दुसऱ्या गावाला जायचे होते. प्रपंचात छोटया छोटया अडचणी पावलापावलावर असतात. त्यांना सकाळच्या अगदी पहिल्या गाडीने पुण्याला जायचे होते. त्यासाठी ते पहाटे उठून नदीवरून स्नान करून पाणी घेऊन आले. आपली खिचडी केली. आम्ही करायला तयार होतो. पहाटे उठून सारे करणारही होतो, पण आमची धावपळ नको, लहान मुलाच्या घरात ही अडचण तर जास्तच! दादांचे प्रेम प्रसंगा-शिवाय कळून येत नाही. केवळ आम्हाला त्रास नको हा आपलेपणा त्यांचा होता. आणि त्यांची स्वत:ची आचारबंधनांची काळजी त्यांना कटाक्षाने पाळायची होती यासाठी त्यांनी स्वत: खिचडी करून घेतली. दादा आपल्या गोष्टींची तसदी कोणावरही पडू नये याची अत्यंत सावध राहून काळजी घेतात. अशा प्रसंगांची आठवण विसरणे शक्य नाही.

एका बाजूने माझे सासरे असले तरी त्यांच्या अशा अपार प्रेमळ वृत्तीमुळे त्यांचे नाते गुरुमाऊलीचे झाले आहे. त्यांनी स्वत: खिचडी केली, खाल्ली व आमच्यासाठीही ठेवली होती. म्हणाले, "पहा तुमच्या-सारखी काही जमली नसेल." हे त्यांचे शब्द ऐकताना माझे डोळे पाण्याने ओघळत होते. माझ्या भोळयाभाबडया मनाला वाटत होते, की साक्षात् पंढरपुरच्या पांडुरंगाने साक्षात् भगवान गोपाळकृष्णाने खिचडी स्वत: बनवली, खाल्ली आणि आपल्याला हा प्रसाद ठेवला आहे. असा कधीतरी त्यांच्या हातचा प्रसाद मिळाला असता का? मनात आलं, की हा खिचडीचा प्रसाद आहे. जीव–शिव एकरूप झाल्याशिवाय तृप्तता येत नाही. जीव शिव एक स्वरूप होऊन जाण्यासाठी मनुष्य-जन्म आहे. एवढा बोध त्या प्रसंगाने मनाला झाला.

त्या ४–५ दिवसांत आम्हाला एवढा आनंद होत होता की, तो शब्दाने वर्णन करणे कठीण आहे. अजूनही ती आठवण आनंदाच्या घरात नेऊन ठेवते. आम्ही मधूनमधून पुण्याला येत असू तेव्हा दादा म्हणायचे, "धान्य वगैरे लागले तर घरातून घेऊन जा. ४–८ दिवसांचे

धान्य जवळ असलेले बरे." मग सासूबाई पिशव्या बांधून तयार करायच्या. या घटनेच्या मागे असलेला प्रेमाचा ओलावा फार मोलाचा आहे. दादांचे प्रेम शब्दातून जेवढे दिसते त्यापेक्षा ते कृतीतून फार असते. शब्दांनी त्यांनी कधी कुणालाही दुखवलं नाहीच. पण प्रेम व्यक्त करण्यासाठी शब्दांपेक्षा ते प्रत्यक्ष कृतीच जास्त पसंत करतात. त्यामुळे त्यांच्या प्रेमाचा निर्मळ अथांगपणा स्पष्ट होतो.

या घरात आल्यावर म्हणजे सुरुवातीच्या काळात त्यांनी हळुवारपणे सांगितले, " रोज संध्याकाळी हातपाय धुऊन देवाजवळ बसून उदबत्ती लावून नित्योपासनामधील देवीची आरती, देवींचे स्तोत्र व करुणात्रिपदी म्हणत जावी. उदबत्तीचा अंगारा मुलांना लावावा." त्यांचा आचार व वागणे मनाला नेहमी वळण लावते. काही वर्षांपूर्वी आमच्याकडून संकल्प करवून मंत्रजपही दिला आहे. आमच्या सवडी-कुवतीप्रमाणे तो चालू आहे. पण हे सगळं पाहिलं म्हणजे वाटतं, दादांचं लक्ष सर्व भक्तांवर जसे आहे तसे आम्हा घरातल्या सर्वांवर आहे. यामुळेच आम्ही त्यांच्या कृपादृष्टीमुळे निर्धास्त आहोत.

१९८३ मध्ये आम्ही उभयता दादांबरोबर काशीयात्रेस गेलो होतो. आमच्याबरोबर घरातील व इतरही बरीच मंडळी होती. आमचा मुक्काम काशीत त्यावेळी तेरा दिवस होता. या यात्रेच्या सर्वच आठवणी लिहिण्यासारख्या आहेत. पण आज मला दादांची वात्सल्यवृत्ती लिहिण्याची इच्छा होते.

काशीहून आम्ही सर्वजण सकाळच्या ११ च्या गाडीने निघालो. भुसावळजवळ गाडीला मोठा ॲक्सिडेंट झाला. सुदैवाने आमच्यापैकी कोणालाही त्रास झाला नाही, पण आमची गाडी तेथे खूप वेळ थांबली. त्यावेळी मी मात्र तापाने ग्लानीतच होते. मला काही सुचत नव्हते. सौः सासूबाई जवळ होत्या. खरंतर त्याही आजारी होत्या. परतीचा प्रवास होता. सर्व प्रवासाचा शीण सुरू झाला होता. तशा स्थितीत त्या उठून शेजारच्या कंपार्टमेंटमध्ये गेल्या. – तेथे महाराज होते – त्यांना सांगितले, " अहो, सविताला खूप ताप आला आहे. तुम्ही एकदा इकडे येऊन जा म्हणजे तिला बरे वाटेल. " असे म्हटल्यावर दादा स्वतः उठून माझ्याजवळ आले. जवळ बसून त्यांनी माझ्या डोक्यावरून हात फिरवला

व म्हणाले, "ऊन खूप आहे. बरे वाटेल थोडया वेळात, घाबरू नकोस." सौ. आईसाहेबांना म्हणाले, "तिला औषध वगैरे, बरोबर आणलेल्या गोळया वगैरे असतील तर द्या म्हणजे थोडयाच वेळात बरे वाटेल." आणि आश्चर्य असे की थोडया वेळातच माझा ताप नाहीसा झाला. घाम आला आणि मला एकदम मोकळे मोकळे वाटायला लागले. याला दादांची कृपा म्हणायची नाही तर काय म्हणायचे ?

असेच एकदा आळंदीची एकादशी होती. त्या दिवशी दरवर्षी पुण्यात ह. भ. प. धुंडामहाराजांचे कीर्तन असे. ते ऐकण्यासाठी आम्ही दोघेही गेलो होतो. जाताना आम्ही सांगून गेलो होतो.

कीर्तन खूप छान झाले. त्या आनंदात आम्ही घरी आलो. झोपलो. सकाळी कॉफी करून मी दादांना नेऊन दिली आणि सांगितले की, रात्रीचे कीर्तन खूपच छान झाले. तेव्हा दादा म्हणाले, "चांगलं सांगतात. त्यांचा अभ्यास चांगला आहे." कॉफी घेऊन झाल्यावर कपबशी ठेवायला घरात आले तेव्हा त्यांनी मला विचारले, "पूर्वरंगासाठी कुठला अभंग घेतला होता ?" क्षणभर मी गोंधळले. काहीच सुचले नाही. पण दुसऱ्याच क्षणी त्यांच्या कृपेने तो अभंग आठवला. मी त्यांना सांगितला, "अवघाचि संसार सुखाचा करीन." त्यावर ते काहीच बोलले नाहीत. पण मला तो अभंग सांगता आला याचे हायसे वाटले. त्यांच्या प्रश्नाने मला विचार करायला लावलं. असे साध्या साध्या प्रसंगांतून त्यांचे मार्गदर्शन होत असते.

* * *

*With Best Compliments from*

M/s. B. V. PUND - CONTRACTOR

" Geetanjali " – Indrayany Colony
18/2A Varje Jakat Naka; Poona 411 029
Specialists in Lift Irrigation Schemes
Pipe laying, Water supply scheme etc.

# श्रीगुरुकृपेने सर्व काही होते

लेखक – डॉ. शं. वे. दीक्षित
D.S.A.C. M.F.A.M. (Bom), कल्याण

।। प्रभावे सर्व विद्यानां शांभवे गुरवे नमः ।।
।। चतुर्वर्ग फल प्रदाय नमः ।। ॐ तत् सत् ।।

माझे पूर्वजन्मीचे अध्यात्म वाढविण्यासाठी परमेश्वराने मला कर्नाटकातील पवित्र ब्राह्मणकुळात जन्मास घातले; कारण आमच्या कुटुंबातील ( २/३ पिढ्यांमागे ) पू. बापू दीक्षित हे वेदशास्त्रसंपन्न–पवित्र आचरणशील– अग्निहोत्री होते. पू. श्रीटेंबेस्वामींचे व त्यांचे संबंध भावासारखे होते. पू. श्रीटेंबेस्वामींनी आमच्या घरी येऊन माझ्या वडिलांना स्पर्शदीक्षा दिली होती असे ऐकले आहे.

मी वयाच्या १७ वर्षापर्यंत गावी होतो. तोपर्यंत ते पवित्र संस्कार या देहावर झाले. पुढे शिक्षणासाठी बाहेर गावी जावे लागले. वयाच्या २१ व्या वर्षी गाणगापूरला पहिले सात दिवसाचे श्रीगुरुचरित्र पारायण झाले. तेथे कर्नाटक सोडून महाराष्ट्रात येण्याची प्रेरणा मिळाली.

वयाच्या ४५ पर्यंत २१ सिद्धपुरुषांची दर्शने व काहींचा सहवासही मिळाला. परंतु अध्यात्ममार्गाची शांतता मिळाली नाही. आजपर्यंत या सिद्धपुरुषांचे मिळालेले अनुभव लिहिले तर एक मोठा ग्रंथ होईल. प. पू. श्रीदत्तमहाराजांचे दर्शन झाले तेव्हापासूनच उद्विग्न मन शांत झाले. शंकाकुशंका दूर झाल्या, उत्तम साधनमार्ग मिळाला. विशेष म्हणजे साधनमार्गात प्रगती होत चालली आहे.

डोंबिवलीत आम्ही श्रीआद्यशंकराचार्य सेवा समिती चालवीत होतो. मी त्या संस्थेचा अध्यक्ष होतो. या संस्थेत प्रवचनासाठी पू. श्री दत्तमहाराजांना निमंत्रण देण्यासाठी आम्ही पुण्यास गेलो. महाराजांचे दर्शन झाले. तेव्हाच त्यांच्या अत्यंत सात्त्विक सोज्वळ–शांत–प्रसन्न

दर्शनाने माझे मनाला फार समाधान झाले. आम्ही कल्याणला परत आलो. मी कल्याणला रहातो. कार्यक्रम डोंबिवलीला होतात.

कल्याणला आल्यावर स्कूटरवरून गावाबाहेरच्या मार्गावरून चाललो की तोंडातून आपोआप 'दिगंबरा'चा जप सुरू होऊ लागला. व्यवसायानिमित्त मला रोज कल्याण पूर्व-पश्चिम यावे लागे. एकांत मिळताच आपोआप जप सुरू होतो. या अनुभवाने मीच आश्चर्यचकित झालो. पू. श्रीदत्तमहाराजांना या संदर्भाने पत्र लिहिले. दीक्षेची प्रार्थना केली. दीपावलीचा शुभमुहूर्त पत्राने कळविला. दीक्षा झाली.

साधनेत एकदा पू. महाराजांचे संपूर्ण कपडे घातलेल्या पोषाखात दर्शन झाले. तसेच महाराज एकदा स्वप्नात येऊन देवघरात गेले. तेथे देवाची पूजा केली व निघून गेले. दुसरे दिवशी त्या जागेवर कुंकू पडले होते.

मी शंकराचार्यपंथी शैव ब्राह्मण. वैष्णव पंथाचा श्रीकृष्णाचा खूप अभ्यास केला असूनही मला श्रीकृष्णमार्गाचे प्रेम नव्हते. आदरही नव्हता. पू. दत्तमहाराजांना माझी ही स्थिती पत्राने कळविली. त्यांनी पत्रात लिहिले होते, " प्रवृत्ती आणि निवृत्ती हे दोन्ही मार्ग श्रेष्ठ आहेत. श्रीशंकराचार्य आणि श्रीकृष्ण हे दोन्हीही श्रेष्ठ आहेत. " हे वाक्य वाचून खूप वर्षांचे अज्ञान, असमाधान त्या क्षणी दूर झाले. जीवनात पहिल्यांदा आदरपूर्वक श्रीकृष्णाचा फोटो लावला.

मंत्रदीक्षा घेण्याची इच्छा झाली. आमच्या पत्नीला, कन्येला व मला पू. महाराजांनी गाणगापूरहून पत्र पाठवून सर्वांना मंत्रदीक्षाही दिली.

आता आर्थिक परिस्थितीबद्दल लिहितो. पू. महाराजांना पत्र लिहून कळविले, " आमच्या घराण्यात सरस्वतीची उपासना आहे. तीन पिढ्यांपासून लक्ष्मी क्रोधित आहे. म्हणून लक्ष्मी प्रसन्न करण्याचे साधन सांगा. " उत्तरात महाराजांनी श्रीसूक्ताचे सहस्र पाठ करण्यास सांगितले. काही वर्षांपूर्वी कणकवलीचे श्रीभालचंद्र महाराजांचे दर्शन झाल्यावर त्याच रात्री स्वप्नात त्यांच्या मुखातून श्रीसूक्त ऐकले होते–पण स्वप्नाचा अर्थ कळला नाही. पू. महाराजांनी श्रीसूक्ताचे पाठ सांगितले तेव्हा तो स्वप्नदृष्टांत आठवला.

सहस्रपाठ पूर्ण झाले. आर्थिक परिस्थितीत चांगलाच फरक पड चालला आहे. अशक्य असलेले घर बांधणेही चालू आहे.

आता पुत्रसंततीबद्दल लिहितो. मला दोन मुली आहेत. तिसऱ्या वेळेस पू. श्रीदत्तमहाराजांना भेटून मुलासाठी प्रार्थना केली. एक अनुष्ठान आणि प्रार्थना सुरू ठेवण्यास सांगितले. खडीसाखरेचा प्रसाद दिला. योग्य वेळेवर मुलगा झाला. तो आता आठ वर्षांचा आहे. सात्त्विक-श्रद्धावान आहे. हा गुरुप्रसाद आहे.

श्रीगुरुकृपेचे अनुभव नित्य येत असतात. लिहावे तेवढे थोडेच. म्हणून काही विशेष लिहिले. श्रीगुरुमहाराजांना दीर्घ आयुरारोग्य लाभावे, ही श्रीदत्तप्रभूंचे चरणी प्रार्थना करून ही अल्प सेवा त्यांच्या चरणी समर्पण करतो.

* * *

*With best compliments from*

**The Laxmi Vishnu Textile Mills Ltd.**

**199, Churchgate Reclamation**
**Bombay 400 020**

Phone – 220887 / 220912 Grams : SPINSTER

Manufacturers Of Quality Products In Synthetic Suitings, Shirtings, Sarees, Superfine Two × Two Hightwist Rubia Cambrics, Fine Poplins, Cambrics Mulls, Longcloths Etc

# स्वानंद साम्राज्याचे सम्राट–श्रीदत्त महाराज

लेखिका : **श्रीमती सुशीला मोडक**, M. A. B. Ed. पुणे.

**संदर्भ :** सुशीलाताई मोडक या लहानपणापासून श्रीगुळवणी महाराजांचा सहवास लाभलेल्या गुरुभगिनी आहेत. त्यांचे मातापिता अनुगृहीत असल्याने हा योग आला. सुशीलाताईही अनुगृहीत आहेत. त्यांना पू. श्री. श्रीधरस्वामी यांच्या सहवासाचे व मार्गदर्शनाचे भाग्य लाभले आहे. समर्थांच्या दासबोधाचा अभ्यासही उत्तम आहे. विशुद्ध भक्तीमुळे सर्व संतांची कृपा आहे. पू. श्रीदत्त महाराजांवरही अनन्य श्रद्धा आहे. अशा अनन्य श्रद्धाभक्तीतून साकारलेला लेख सर्वांना विमल आनंद देणारा आहे.

—संपादक

" साच आणि मवाळ । मितले आणि रसाळ ।
शब्द जैसे कल्लोळ । अमृताचे ।। १ ।। "

या श्रीज्ञानेश्वर माउलींच्या शब्दांप्रमाणे अमृताचे पाझर ज्यांच्या वाणीतून जगाच्या कल्याणार्थ अखंड पाझरत आहेत ते म्हणजे श्रीदत्त-महाराज.

कुरवपूरक्षेत्रामध्ये झालेल्या भागवत सप्ताहाचा अपूर्व थाट आजही दृष्टीसमोरून हलत नाही. श्री श्रीपादवल्लभ यांच्या साक्षीने व जगत् कल्याणार्थ सतत वाहणाऱ्या कृष्णामाईच्या प्रेममय दृष्टीने अपूर्व तेजस्विता ज्या स्थानाला प्राप्त झाली आहे, त्या कुरवपूरक्षेत्री ब्रह्मश्री श्रीदत्तमहाराजांच्या वाणीतून म्हणजेच साक्षात् ब्रह्माच्या वाणीतून श्रीभागवत सांगितले जात होते. श्री श्रीपादश्रीवल्लभ प्रत्यक्ष ऐकायला येत होते, असे सांगितल्याशिवाय राहवत नाही. सप्ताह संपवून श्रीमहाराज जेव्हा परत निघाले तेव्हा कृष्णामाईचा रमणीय व वळणावळणाने वहाणारा प्रवाह महाराजांना जणू काही ठिकठिकाणी अडवून म्हणत होता, " महाराज, पुन्हा केव्हा, भागवत ऐकायला

मिळणार ? महाराज लवकर परत या बरंका ! आपल्यासाठी मी पावित्र्याच्या पायघड्या घालीन." असा मातृस्वरूप कृष्णेचा साश्रुपूर्ण नेत्रांनी निरोप घेऊन श्रीमहाराज निघाले.

## मर्यादापुरुषोत्तम श्रीदत्तमहाराज–

एकदा श्रीदत्तमहाराज व त्यांचे परम पूजनीय पिताजी श्री धुंडिराजमहाराज आमच्या घरी आले होते. बसण्यासाठी बैठक घालून ठेवलेली होती. परंतु श्रीमहाराज आपल्या वडिलांच्या शेजारी बैठकीवर न बसता एका बाजूला साध्या सतरंजीवर अत्यंत विनीतभावाने बसले होते. वडिलांची मर्यादा कशी सांभाळावी याचा आदर्श वस्तुपाठच त्या दिवशी मला शिकायला मिळाला.

श्रीदत्तमहाराज म्हणजे अपार सामर्थ्य व क्षमाशीलवृत्ती, प्रखर ज्ञानतेज; पण त्याच्या जोडीला मनाचे मार्दव, कठोर कर्तव्यनिष्ठा पण तिच्याबरोबर हळुवार आणि कोमल अंतःकरण, निरपवाद सत्यनिष्ठा पण तितकीच सर्वांशी सौख्यदायक वागणूक, ऐश्वर्यसंपन्नता पण कोणत्याही त्यागाची तयारी, अत्यंत बुद्धिमान, ज्ञानी परंतु तितकेच निगर्वी, सर्व विद्यांमध्ये पारंगत पण अत्यंत विनयशील. अशा परस्परविरोधी अनंत सद्गुणांचा पुतळा असलेले श्रीदत्तमहाराज मर्यादापुरुषोत्तमच आहेत. धन्य ते महाभाग्यवान श्रीसद्गुरुस्वरूप पिताजी श्रीमत् प. पू. धुंडिराजमहाराज व जगत् कल्याणार्थ अवतीर्ण झालेले परम भाग्यशाली पुत्र श्रीदत्तमहाराज !

## साक्षात्–दत्तावतार–श्रीदत्तमहाराज

परम पूजनीय श्रीसद्गुरु योगिराज श्रीगुळवणी महाराज श्रीदत्तमहाराजांना बरोबर घेऊन एकदा आमच्या घरी आले होते. श्रीगुरुमहाराज येणार होते हे माहीत होते, परंतु श्रीदत्तमहाराज येणार हे माहीत नव्हते. मी त्यादिवशी का कोणास ठाऊक एक फुलाचा व एक तुळशीचा हार आणला होता. श्रीदत्तमहाराज आले म्हणून इतका परमानंद झाला, परंतु श्रीदत्तमहाराजांना घालण्यास दुसरा फुलांचा हार नाही म्हणून वाईट वाटले. पूजा केल्यावर जेव्हा हार घालण्याची वेळ

आली तेव्हा श्रीगुरुदेव श्रीगुळवणीमहाराजांना हार घालून मी एवढेच म्हटले की, "महाराज, श्रीदत्तमहाराजांना मी आता तुळशीचा हार घालते." तेव्हा श्रीसद्गुरुमहाराज–योगिराज–म्हणाले, "अग, दत्ताला तुळशीचाच हार पाहिजे. तू जरूर घाल." आजही हे श्रीसद्गुरूंचे वाक्य अंत:करणात भरून आहे.

जणू काही त्यावेळी श्रीयोगिराज गुळवणी महाराजांनी असे सूचित केले की, अगं, श्रीदत्तमहाराज म्हणजे, आत्मज्ञानी असूनही प्रेमळ भक्त (शिष्य) आहेत, अत्यंत कनवाळू असूनही स्वमनाचे स्वामी आहेत, योगसामर्थ्यसंपन्न परंतु लोकांमध्ये वागताना क्षमाशील, शास्त्रवेत्ते विद्वान असूनही प्रसंगानुसार विनम्रभावाने वागण्याचे चातुर्य जाणणारे असे सद्गुरुस्वरूप श्रीदत्तमहाराज श्रीदत्तावतार आहेत बरंका! आणखीही एक गोष्ट श्रीगुरुदेव सहजगत्या बोलून गेले, "अगं, श्रीदत्तमहाराज आमच्यापेक्षा मोठे आहेत हं! कारण प्रपंचात असूनही कमलपत्रवत श्रीदत्तमहाराज अलिप्तच आहेत." आणि हे बोलत असताना श्रीगुरुमहाराजांचा आनंदमय प्रेमभाव नुसता ओसंडून वाहात होता. मला तर असे वाटते, श्रीनिवृत्तिनाथ म्हणजे श्रीसद्गुरुराज योगिराज व श्रीनिवृत्तिनाथांच्या म्हणजेच (श्रीगुरुदेव महाराजांच्या) कृपाप्रसादाने भागवत सांगणारे श्रीज्ञानदेव म्हणजे श्रीदत्तमहाराज! अंतरी शुद्ध ब्रह्मज्ञान असलेले आदिनाथ श्रीशिवशंकर श्रीसद्गुरुराज योगिराज गुळवणी महाराज धन्य होत! व श्रीसद्गुरुवचनावर पूर्ण विश्वास ठेवून अनन्यभावाने शरण जाणारे सच्छिष्य श्रीदत्तमहाराज धन्य होत!

**श्रीदत्तमहाराज–मुक्तीवरील भक्ती**

अस्सल सुवर्णासारखे निखळ साधुत्व म्हणजे श्रीदत्तमहाराजांचे जीवन. सोन्याला जसा सुगंध असावा त्याप्रमाणे अद्वैत व भक्ती यांचा सुवर्ण संगम श्रीदत्तमहाराजांच्या जीवनामध्ये दिसून येतो.

भगवद्गीतेने सांगितल्याप्रमाणे,

"ब्रह्मभूत: प्रसन्नात्मा न शोचति न काङ्क्षति।
समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम्॥"

अशा पराभक्तीला प्राप्त झालेले, सच्चिदानंदघन ब्रह्मामध्ये ऐक्यभावाने स्थित असलेले श्रीदत्तमहाराज सर्वसामान्य जीवांना म्हणत आहेत,

'सेवितो हा रस, वाटितो आणिका।
घ्या रे, रानभरी शोधू नका॥"

भगवद्गीतेने जो संन्यास सांगितला आहे तो कर्माचा नव्हे तर हे कर्म व ते मी करतो या बुद्धीचा. अशा निष्काम वृत्तीवर आरूढ होऊन श्रीमहाराजांचे प्रत्येक कर्म होत आहे. जगाच्या धकाधकीच्या मामल्यात ज्यांच्या मनाचा समतोल ढळत नाही ती 'समाधि' अवस्था. आणि 'खरी समाधि कर्मातूनच होत असते.' असे त्यांच्या कृतिशीलतेतूनच प्रकट होत असते.

श्रीसमर्थ दासबोधाच्या अखेरीस सांगतात,

"आवाहन विसर्जन। हे चि भजनाचे लक्षण।
सकळ जाणती सज्जन। मी काये सांगो॥"

आवाहन आणि विसर्जन हेच भजनाचे लक्षण आहे. संत सज्जन हे जाणतात. पूजेसाठी देवाला बोलावणे हे आवाहन आणि पूजा झाल्यावर देवाला स्वस्थानी पोहोचवणे हे विसर्जन. हे आपल्या सर्वांना माहीतच आहे. परंतु श्रीसमर्थांचा गर्भितार्थ असा–साधकावस्थेत दृश्य विश्वाच्या प्रत्येक घटनेच्या अंतर्यामी अंतरात्म्याचे अस्तित्व बघणे हे आवाहन होय. परंतु निरंजन परब्रह्म त्या अंतरात्म्याचे स्वस्थान आहे. म्हणून दृश्य विश्वामध्ये सर्व ठिकाणी अंतरात्म्याचा महिमा पाहता आल्यानंतर, तेथून निर्विकार निरंजन केवल दृश्यरहित परब्रह्मापर्यंत पोचणे हे अंतरात्म्याचे विसर्जन होय. जे स्वानुभवी संत असतात तेच फक्त हे विलक्षण आवाहन आणि विसर्जन जाणतात." असे आवाहन आणि विसर्जन जाणणारे श्रीदत्तमहाराज आहेत.

अशा श्रीसद्गुरुस्वरूप असलेल्या श्रीदत्तमहाराजांचे वर्णन करण्यास माझ्याजवळ शब्द नाहीत किंवा शेवटी शब्दसुद्धा मौन धारण करतात. परमेश्वराने विश्वमंदिरात रवी, शशी, तारे निर्माण केले; त्याला आपण निरांजनाने ओवाळतो; ज्याने अनेक प्रकारची फुले पृथ्वीवरती उत्पन्न केली त्याला उदबत्ती ओवाळतो. फळ, कंदमुळे, धन-

धान्य, दूधदुभते दिले त्या देवाला भांडभर दुधाचा नैवेद्य दाखवतो. का ? तर ही कृतज्ञतेची खूण आहे. त्याप्रमाणे आत्मज्ञानाच्या स्वानंद-साम्राज्याचे राजे असलेल्या श्रीदत्तमहाराजांच्या चरणी ही वाक्-पुष्पांजली अर्पण करून कृतज्ञता व्यक्त करते व शेवटी एवढेच म्हणते,

"श्रीदत्तमहाराजांच्या चरणी लोटांगण,
घालत जावेसे वाटते ।
कारण तेथे परम "शान्ति" प्रसन्नतेने
विसाव्याला आली आहे असे दिसते ।।"

।। श्रीसद्‌गुरुचरणार्पणमस्तु ।।

* * *


प. पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर शतायु होवोत !

**श्रीशुक्ल यजुःशाखीय माध्यंदिन महाराष्ट्रीय ब्राह्मणसभा, पुणे**

**याज्ञवल्क्य आश्रम, १२१ कसबा पेठ, पुणे ४११०११**

**संस्थेचे समाजोपयोगी कार्यक्रम–**

१. स्वशाखीय विद्यार्थ्यांना पारितोषिके व शिष्यवृत्त्या.
२. शैक्षणिक व सामाजिक व्याख्यानमाला.
३. सामुदायिक व्रतबंध.
४. आरोग्य शिबिर.
५. लघुउद्योजकांना अल्प सहाय्य.
६. अतिथी गृह.
७. सर्वतोपरी सुसज्ज मंगल कार्यालय.



वेणीदान, प्रयाग

# पू. श्री दत्तमहाराजांची देहातीत अवस्था

## एक प्रत्यक्ष अनुभव

लेखक : वे. शा. सं.
**ग. स. पित्रे**, प्रयाग.

माझे गुरुवर्य प. पू. गुळवणी महाराज यांचे कृपेने जीवनात अनेक दिव्य अनुभव आले व अनेक दिव्य व्यक्तींचे दर्शन घडले. एवढेच नव्हे तर अनेक थोर पुरुषांचे सान्निध्य लाभले व घरोब्याचे संबंध निर्माण झाले. केवढे थोर भाग्य आमचे. पुराण व धार्मिक ग्रंथांतले चमत्कारिक वर्णन वाचतो तेव्हा असे वाटायचे की खरंच असे चमत्कार घडतात का ? प्रत्यक्ष दर्शन घडते का ? कधी कधी अविश्वास निर्माण व्हायचा व भ्रम पडायचा. पण १९६१ साली अनुग्रह झाला व प्रत्यक्ष अनुभव येऊ लागले आणि सत्य पटले. पू. महाराजांचे आज्ञेने पू. दत्त-महाराज कवीश्वर यांना नमस्कार करू लागलो. पू. महाराजांच्या निर्वाणानंतरच पू. दत्तमहाराजांबरोबर बोलण्याचा प्रसंग आला. तसे ते कमीच बोलतात.

श्री वासुदेव निवासाचे पीठाधीश्वर झाल्यावर आश्रमात आल्या-वर भेटीचे प्रसंग येऊ लागले व आपुलकी वाढू लागली. त्यांची नम्रता, सात्त्विकता व त्यांचे उदात्त जीवन जवळून बघू लागलो व अनेक चांगले अनुभव येऊ लागले. त्यांच्या देहातीत अवस्थेचा एक अनुभव प्रयागक्षेत्री व गयाक्षेत्री अनुभवास आला. तो प्रसंग येथे देत आहे.

१९८३ साली पू. दत्तमहाराच त्रिस्थळी यात्रेनिमित्त ३०-४० भक्तांसह प्रयागला येणार असे पत्र आले व मला खूप आनंद झाला. पू. दत्तमहाराजांची सेवा करण्याची अमोल संधी. त्यांच्या पत्राप्रमाणे सर्व व्यवस्था करून ठेवली. ठरल्याप्रमाणे पू. दत्त महाराज आले. त्यांचे स्वागत प्रयाग महाराष्ट्र भवनतर्फे झाले. सुवासिनींनी ओवाळले. चहा-कॉफीनंतर यात्राविधीस प्रारंभ झाला. गंगामातेच्या तीरावर प्रायश्चित्त



**गंगापूजन प्रयाग**

क्षौर, वेनिदान स्नान करून घरी परतलो. गोपाळ मंदिरात तीर्थ श्राद्धास सुरुवात झाली. पू. दत्तमहाराज श्राद्ध संकल्पास बसले. उत्तम स्वयंपाकाची तयारी होती. मध्यान्ह काळी आचमनास सुरुवात झाली. वातावरण अतिपवित्र व प्रसन्न होते. ब्राह्मणपूजन झाले. तुपाचा अभिषार झाला: शास्त्रपद्धतीने अन्न वाढून झाले. पात्रप्रोक्षण करवून कुलदेवतेचा नैवेद्य करण्यासाठी पू. दत्तमहाराज नैवेद्य वाढून ठेवलेल्या जागी गेले. खाली बसून नैवेद्य झाला. नैवेद्याच्या जागी वर लाकडी कपाट होते. त्या कपाटाचे दार आपोआपच उघडले गेले, ते आमच्या कोणाच्याच लक्षात आले नाही. आम्ही मंत्र म्हणत होतो. नैवेद्य करवून महाराज संकल्पासाठी उठले तर ते जाड लाकडी दार क्षौर झालेल्या गुळगुळीत डोक्यावर ताडकन लागले. केवढा आवाज झाला ! आम्ही स्तंभितच झालो. माझ्या अंगावर काटे उभे राहिले व मी घाबरून गेलो. पू.

महाराजांच्या काय यातना असतील, पण लागलेल्या जागी त्यांनी हात पण फिरविला नाही व लगेच म्हणाले, "पुढं चालू द्या." दुर्दैव असे की पुन्हा त्याच जागी तेच दार ताडकन् लागले. केवढे अघटित झाले. मला काहीच सुचेना. आश्चर्य की डोक्यावर हातही फिरविला नाही. लागलेल्या जागी चोळले नाही. राग नाही. दुःख नाही. हंसतमुखाने "मंत्र चालू द्या" म्हणून श्राद्धविधीत मग्न झाले. केवढी तितीक्षा. तो प्रसंग आठवला की अजून रोमांचित होतो.

असेच गयाक्षेत्री घडले. मे महिना. विस्तव पडावा असे प्रखर ऊन. त्या उन्हात गदाधराच्या देवळात दुपारी १ वाजता आम्ही गेलो. देवळाच्या पटांगणात विस्तवासारखे गरम दगड. ते पटांगण जोडे घालून-सुद्धा ओलांडणे कठीण; पण पू. दत्तमहाराज यांना त्रास होऊ नये म्हणून आम्ही ओल्या पायघडया त्यांच्यापुढे टाकायच्या; पण महाराज त्यावर पाय न ठेवता दगडावरून मंद स्मित करीत करीत श्राद्धाच्या जागी पोचले. आम्ही सर्व थक्कच झालो. आमच्या अंगातून वाफा निघत होत्या. आम्ही सर्व पाण्यासाठी व्याकुळ; पण महाराज २ तास श्राद्धविधी करीत होते.

हीच देहातीत अवस्था. आत्मसंयम व नम्रता बघून आम्ही प्रत्यक्ष परमेश्वरस्वरूप पहात होतो.

केवढे आम्ही भाग्यवान !

* * *


*With best compliments from :*

**TIRUPATI – ROADWAYS**

**Govt. Transport Contractor &**
**Commission Agents**

**Regular & Reliable R. C. C. & P. S. C. Pipes**
**Transporter**

Add : Indira Gandhi Minimarket, Shop No. 12
Parvati Darshan, Near Mitramandal Post
office, POONA – 9

Prop. Sham Kale

# प्रश्न काव्यातून ! आणि उत्तरही काव्यातून !!

**संदर्भ** – हा एक आगळावेगळा प्रसंग आहे. पू. श्रीदत्तमहाराजांचे कनिष्ठ चिरंजीव श्री. अजित हे पुण्याहून मुंबईला रेल्वेने जात होते. मुंबईला त्यांच्या भगिनी सौ. सुलभा माधवराव तांबोळी यांच्याकडे काही दिवस मुक्कामासाठी जात होते. रेल्वेमध्ये त्यांना अचानक काव्यपंक्ती स्फुरू लागल्या. त्यांच्या मानसिक चिंतनाने काव्याचा आधार घेतला आणि त्या मनःस्थितीचे प्रतिबिंब काव्यात प्रगटले. हा काव्य स्फुरण्याचा अजितचा पहिलाच अनुभव. स्फुरलेले काव्य रेल्वेतच टिपून ठेवले आणि मुंबईला आल्यावर सौ. सुलभाताईला दाखविले. त्यांनी ते पू. श्रीदादांना पाठवून दिले.

या काव्याला पू. श्रीदत्तमहाराजांनी काव्यातूनच उत्तर दिले. ते काव्य 'लीला समस्त अजित प्रभुराजयाची' या शीर्षकाने आपल्या विजयादशमी १९८९ च्या अंकात प्रसिद्ध झाले आहे. परंतु ते पू. दत्तममहाराजांचे आहे. याची कल्पना नसल्यामुळे संकलनकर्ती सौ. सुलभा माधवराव तांबोळी या नावावर प्रकाशित केले. आता सर्व उलगडा झाल्यामुळे त्या काव्याकडे पहाण्याची दृष्टीच बदलून गेली. आणि म्हणून दोन्ही काव्ये या विशेषांकात देण्याची इच्छा झाली. श्रीदत्त-महाराजांच्या गुणांचा पार लागणे कठीण आहे, त्याची ही अल्प झलक! या दोन्ही कविता इ. स. १९८६ मधील आहेत.

### सं भ्र म !

आक्रंदतो मी का असा
उमजेना माझेच मला.
या तरुभूमीचा भार जणू
माझ्याच एकट्या शिरी आला ॥ १ ॥

मळलेली वाट जपताना
कुणी दिसे कंटाळलेला
परी या वाटेवरीच असे
सुखदुःखांच्या शृंखला ॥ २ ॥

हीच वाट पुसायची
असा निर्बंध आलेला
परी तो नसेची आलेला
तो तर लादलेला ।। ३ ।।

अतिक्रमण करण्याने
वाव मिळतो विवंचनेला
ह्यातून मग कुणी मुक्ती
चैतन्यशील आनंदाला ।। ४ ।।

मानतो मी चौकटी
आवश्यक जीवनाला
तरी का बरे त्यांनी जखडावे
मनुष्य स्वभावाला ।। ५ ।।

चैतन्य मी, सृजन मी
हा योग मला गवसला
परी जन्मसिद्ध हक्क हा
कुणी माझा हिरावला ।। ६ ।।

निर्मम चैतन्य निसर्गातील
सळसळवी माणसाला
परी तो अभागी नसे
तितुकाच तृषार्तलेला ।। ७ ।।

हे असेच चालायचे समजून
तडजोडीचा प्रोत आला
परंतु तिथे मात्र मी
असे उगाच गमलेला ।। ८ ।।

मज काय हवे वदताना
मी बराच अडलेला

हांच असे का योग्य
हा संभ्रम पडलेला ॥ ९ ॥

खरंच सांगतो मी, काहीच
कसे कळेना मला
दाखविल का कुणी वाट
नेणती या पांथस्थाला ॥ १० ॥

* * *

अजितच्या विमनस्क मन:स्थितीला पू. श्रीदत्तमहाराजांनी काव्यातून चैतन्याचे स्फुल्लिग फुलवून—जबरदस्त वैचारिक आवाका निर्माण केला आहे. हे काव्य अजितप्रमाणेच विमनस्क असलेल्या आम्हा गुरुबंधूंनाही मार्गदर्शक ठरणार आहे.

## लीला समस्त अजित प्रभुराजयाची

कोणी सुयत्नरत सज्जन देवभक्त ।
सौख्यात जीवन सदोदित कंठतात ॥
कोणीही कांस धरि संभ्रममालिकेची
लीला समस्त अजित प्रभुराजयाची ॥ १ ॥

कोठे सदैव विपुलान्न जले प्रशान्ति ।
कोठे सदैव तदलाभभरे अशान्ति ॥
ऐशी दशा जगि दिसे नियतिक्रमाची ।
लीला समस्त अजित प्रभुराजयाची ॥ २ ॥

की धर्ममार्ग बरवा जगदीशमान्य ।
कीं अर्थमार्ग बरवा व्यवहारमान्य ॥
ऐसी अभागि जनपद्धति संशयाची ।
लीला समस्त अजित प्रभुराजयाची ॥ ३ ॥

कां हें सुधर्मनिरतास हि दृश्यदुःख ।
कां हें अधर्मनिरतासचि दृश्यसौख्य ॥
सिद्धान्तरीति विलसे जनसंभ्रमाची ।
लीला समस्त अजित प्रभुराजयाची ॥ ४ ॥

मातापित्यास चिरपुत्रवियोगदुःख ।
बालास अल्पवयि मातृवियोगदुःख ॥
कोणास शक्ति जगि दुःख निवारणाची ।
लीला समस्त अजित प्रभुराजयाची ॥ ५ ॥

कोणी नियामक म्हणोनि जगात मान्य ।
कोणी नियम्य म्हणुनी अति हीन दीन ॥
ऐसी नियम्यनियति कधी जावयाची ।
लीला समस्त अजित प्रभुराजयाची ॥ ६ ॥

गुण तेचि दोष दिसती जगि ती असूया ।
नाहीं जिला म्हणुनि तीच त्रिमूर्तिमाता ॥
झाली जगी सततकीर्तीमयी हि साची ।
लीला समस्त अजित प्रभुराजयाची ॥ ७ ॥

सत्कर्मशील दमशील सुदानशील ।
ईशानुरक्त गुरुभक्त परोपकारी ॥
पांथस्थ धर्मरत संभ्रममुक्त तोचि ।
लीला समस्त अजित प्रभुराजयाची ॥ ८ ॥

लीला समस्त अजित प्रभुराजयाची ।
लीला अमोघचि तया जगदीश्वराची ॥
लीला सुमंगल हितैषि जनार्दनाची ।
लीलानुचिंतन करी सुखि नित्य तोचि ॥ ९ ॥

* * *

# प. पू. श्रीगुरु महाराजांच्या शीतल छायेत !

लेखिका – **सौ. नीलाताई जोशी**, बोरिवली–मुंबई

सामान्य माणसाचे सांसारिक जीवन प्रवाहपतिताप्रमाणे चाललेले असते. कधी धन, मान, कीर्ती, विद्या, यामुळे त्याच्या जीवनात आनंदाच्या छटा निर्माण होत असतात तर कधी संकटांना तोंड देण्यात त्याचे सामर्थ्य खर्ची पडते. गृहस्थाश्रमाच्या वाटचालीत कष्ट करून आपुली मुले बाळे सन्मार्गाला लागली की मनुष्य कृतार्थतेचा सुस्कारा सोडतो. नोकरीतून निवृत्त होतो. परंतु खरी निवृत्ती किंवा स्वतंत्रतेने जीवनाचा उपभोग घेण्यापूर्वी त्याची प्रकृती कमकुवत होते. किंवा वृद्धावस्थेचे प्रश्न उभे रहातात. जीवनभर धावपळ करून आता श्वास टाकावा असे म्हणावे तर तसे स्वास्थ्य मिळत नाही. स्वतःच्या मनोविकासाचा मार्ग या अखंड धावपळीत कोठेच केलेला नसतो. भौतिक सुख कितीही लाभले तरी त्याचे अपुरेपण कळलेले असते. फक्त संतांची संगत ज्याला लाभली असा मनुष्य संताच्या जीवनातून मनोविकासाचे प्रत्यक्ष धडे घेत असतो.

वृक्षाखाली बसले की सावलीचे सुख मिळते. निसर्गाचे ऊन सुखावह होते. पानांची सळसळ मनाला साद घालते. पक्ष्यांचे कूजन संगीताचा गोड अनुभव देते. याप्रमाणे संताच्या संगतीत शीतल वाटते. त्यांचे शब्द संगीताहून कोमल असतात. मनावर परिणाम करतात. संसाराचे ताप संत सह्य करतात व सतत निष्काम कर्म करीत असतात. संत आपुल्याला कार्यप्रवण करतात अशा या संतांच्या सहवासाचे भाग्य पूर्वपूण्याईने व वाडवडिलांच्या आशीर्वादाने आम्हाला लाभले.

प. पू. योगीराज गुळवणी महाराज ह्यांचा आमच्या जीवनात प्रवेश झाला आणि जीवनाला आध्यात्मिक दिशा मिळाली. त्यांच्या निर्हेतुक कल्याणकारी मायेने आम्हाला एक वेगळा आनंद वाटू लागला. गुरुमहाराजांनी कृपा केली व साऱ्या कुटुंबाला आपल्या शीतल छायेखाली घेतले. प. पू. गुळवणीमहाराजांनी ज्ञान, भक्ती, कर्म ह्या तिन्ही

मार्गाकरिता शक्ती दिली आणि त्या बरोबरच प. पू. दत्तमहाराजांसारखे आत्मानुभवी, विद्वान पण नम्र असे थोर मार्गदर्शक आश्रमाची धुरा सांभाळण्यासाठी लाभले हे थोर भाग्यच आहे.

## आठवण होते त्या दिवसाची

प. पू. गुळवणीमहाराज वैकुंठवासी झाले. सर्वांनाच अतोनात दु:ख झाले. भावनेचे आवेग आवरत नव्हते. १० व्या दिवशी ओंकारेश्वरावर तिलांजलीसाठी खूप गर्दी झाली होती. सर्व विधी होईपर्यंत 'दिगंबराची' धून चालू होती. सर्वत्र शांतता होती. गुरुमहाराजांच्या आठवणीने सर्वांची मने व्याकुळ व सद्‌गदित झाली होती. पिंडाला काकस्पर्श करण्यापूर्वी तर विलक्षण शांतता पसरली होती. अव्यक्त असलेल्या गुरुमहाराजांच्या चरणी अश्रुपूर्ण नयनाने, विनम्रभावाने श्रद्धांजली मनोमन वाहिली जात होती. प. पू. दत्तमहाराज हात जोडून उभे होते. त्यांच्या मनाची अवस्था कळणे आपल्या आटोक्याबाहेरचे होते. पण ते अतिशय एकरूप झालेले दिसत होते. पिंडाला कावळ्याने स्पर्श करताच काय झाले कुणास ठाऊक ! भावपूर्ण झालेल्या मनाला जाणवले, पटले, प. पू. दत्तमहाराज महाराजांच्या रूपातच आहेत. द्वैत संपले, मन नि:शंक झाले. सगुणाची सवय जडलेल्या मनाला पोकळी निर्माण होऊ नये म्हणून तितक्याच अधिकारी व्यक्तीची निवड करून गुरुमहाराजांनी सर्वांना अमोल असा आधार दिला.

## प. पू. दत्तमहाराजांची थोरवी काय वर्णावी !

कवीश्वरांच्या थोर कुलामध्ये सात पिढ्या साधुसंतच झाले, अशा परंपरेतील प. पू. दत्तमहाराज एक थोर पंडित, दयाळू संत, विनयशीलता मूर्तिमंत, शारदेच्या दरबारात कृपापात्र, भागवताच्या अखंड चिंतनाने कृष्णमय अंत:करण, कृष्णमय वाणी झालेले भगवत्‌भक्त, परमेश्वराशी जोडले गेलेले योगयुक्त चित्त, अशा या पावन जीवनाच्या सहस्रचंद्रदर्शन शांती सोहळ्याचा शुभक्षण अशा या दत्तमहाराजांच्या चरणी मन:पूर्वक वंदन.

प. पू. गुळवणीमहाराज असतापासून गुरुपौर्णिमेचा उत्सव

गिरगावात महाराजांच्या आदेशावरून होत असतो. हा एक भक्तीचा सण आहे. महाराजांच्या भावभक्तीला खरोखरीच पौर्णिमेची भरती येते. सगळे सुहृद जमा होतात व एक भावनिक गोड सोहळा पार पडतो. या उत्सवाच्या माध्यमातून महाराजांनी अनेक गोष्टी शिकविल्या. या उत्सवाला प. पू. कै. आत्मारामशास्त्री जेरे यांचीही जोड मिळाली. व त्याला महापर्वणीचे रूप प्राप्त झाले. पौर्णिमेच्या दिवशी पहाटे जो काकडा आत्मारामशास्त्री करत असत तेव्हा आपण नरसोबावाडीतच आहोत असा भास प्रत्येकाला होई. समईच्या शांत प्रकाशात, शांत वेळी आत्मारामशास्त्रींचा तो शुद्ध, स्पष्ट आवाज आजही कानात घुमत आहे असे वाटते. या उत्सवातून गुरुमहाराजांनी सामाजिक दृष्टी दिली, निरपेक्षता दिली. महाराजांच्या नंतरही प. पू. दत्तमहाराज या उत्सवाला येऊ लागले हे आमचे भाग्यच. त्यामुळे उत्सवाची उंची खूप वाढली. आषाढी एकादशीला प. पू. दत्तमहाराज आमच्या घरी येतात व घराला पंढरपूरचे रूप येते व साक्षात विठ्ठलाचे दर्शन झाल्यासारखे वाटते. त्यांचे प्रवचन म्हणजे एकादशीच्या दिवशी मेजवानीच असते. त्रयोदशीला गुरुमहाराजांची जन्मतिथी येते. त्यादिवशी उदकशांत करण्याची पद्धत प. पू. दत्तमहाराजांनी सुरू केली, त्यामुळे गुरुपौर्णिमेचे पावित्र्य अधिकाधिक वाढत गेले. त्यांच्या येण्याने सर्व काही मिळाल्यासारखे वाटते.

## भक्तिगंगेला पूर आला

प. पू. महाराज असताना भागवतसप्ताहाचा योग आला नव्हता पण संकल्प झाला होता. महाराजांनी देह ठेवल्यावर वर्षाच्या आत प. पू. दत्तमहाराजांनी हा संकल्प पुरा केला व बोरिवली येथे भागवत सप्ताह झाला. हा सोहोळा अपूर्व झाला. परांजपे नगरातील रहिवासी आजही त्या आठवणीने आनंदित होतात. प. पू. दत्तमहाराज भागवत शांतपणे सांगत असतात. श्रोते ऐकत असतात. प. पू. दत्तमहाराजांची अनाग्रही वृत्ती, सांगण्याचा मोजकेपणा व नेटकेपणा, सरळ सहज अलगद व हळू येणारी शब्दमालिका ह्यातून श्रोत्यांचे मन केव्हाच त्यांच्या सांगण्याला चिकटून जाते. एकनाथी भागवताच्या दहाव्या

अध्यायात आत्मानुभवानंतर येणाऱ्या स्थितीचे वर्णन नाथमहाराजांनी केले आहे. ते असे–

तेथे देहीचे गेले देहपण । जन्ममरणा झाले मरण
विश्वाचे न दिसे भान । आनंद घन कोंदला ।।
तेणे सुखरूप झाली दृष्टी । आनंदमय झाली सृष्टी ।
परमानंदी चढली पुष्टी । स्वानंदे मिठी घातली ।।

या अवस्थेतच प. पू. दत्तमहाराजांचे निरूपण होत असे. व त्यांच्या अमृतवाणीचा आपल्यावर वर्षाव होत असे. अशा तऱ्हेने भागवत-सप्ताहाचा भरपूर आनंद आमच्या घराला व परिसराला लाभला.

दुसऱ्याच्या दुःखाने कळवळणारा त्यांचा स्वभाव आहे. त्यामुळे त्यांच्या विश्वमनातील सद्‌भावना माणसाला रोगमुक्त व दुःखमुक्त करण्याला कशा सहाय्यभूत होतात ह्याचा अनुभव प्रत्येकाला विविध स्वरूपात येत असतो. त्यांचा गृहस्थाश्रम एकनाथाप्रमाणेच आहे. नाथांच्या शब्दांत सांगायचे तर–

गृहाश्रमु न सांडिता ।
कर्मरेखा नोलांडिता ।
निज व्यापारी वर्तता ।
आत्मबोधु सर्वथा न मैळे ।।

अगदी सामान्यपणे संथ चालणाऱ्या प. पू. दत्तमहाराजांच्या अंतरंगाची विशाळता, त्यांची भक्तिपरिपूर्ण अशी जीवनगंगा, कशाची कल्पना आपल्याला येऊ शकत नाही. त्यामुळे आपला त्यांच्याशी बोलण्याचा व्यवहार सामान्यपणे चालतो. परंतु प. पू. दत्तमहाराज मात्र कशात कोठेही न गुंतता स्वतः 'मी'ला टाळून बोलत असतात. सर्वत्र अलिप्तता संभाळीत असतात व तेही कळू न देता. आम्ही उत्साहाच्या भरात काही गोष्टी करीत असतो परंतु त्यांच्या परिणामाची दूरदृष्टी किंवा पोच रहात नाही. परंतु तेही सारे परिणाम त्यांनाच सहन करावे लागतात. इतकी विद्वत्ता असूनही इतकी विनम्रता ह्यांचा संगम आपल्याला प. पू. दत्तमहाराजांच्या जीवनात पहायला सापडतो. बोलण्यात संयम एवढा असतो की आपण बोलताना कसे बोलावे या विचारात पडतो. कोठलाही मनोवेग बोलण्यात चालण्यात दिसत नाही. खळखळाट

अध्यायात आत्मानुभवानंतर येणाऱ्या स्थितीचे वर्णन नाथमहाराजांनी केले आहे. ते असे–

तेथे देहीचे गेले देहपण । जन्ममरणा झाले मरण
विश्वाचे न दिसे भान । आनंद घन कोंदला ।।
तेणे सुखरूप झाली दृष्टी । आनंदमय झाली सृष्टी ।
परमानंदी चढली पुष्टी । स्वानंदे मिठी घातली ।।

या अवस्थेतच प. पू. दत्तमहाराजांचे निरूपण होत असे. व त्यांच्या अमृतवाणीचा आपल्यावर वर्षाव होत असे. अशा तऱ्हेने भागवत-सप्ताहाचा भरपूर आनंद आमच्या घराला व परिसराला लाभला.

दुसऱ्याच्या दुःखाने कळवळणारा त्यांचा स्वभाव आहे. त्यामुळे त्यांच्या विश्वमनातील सद्भावना माणसाला रोगमुक्त व दुःखमुक्त करण्याला कशा सहाय्यभूत होतात ह्याचा अनुभव प्रत्येकाला विविध स्वरूपात येत असतो. त्यांचा गृहस्थाश्रम एकनाथाप्रमाणेच आहे. नाथांच्या शब्दांत सांगायचे तर–

गृहाश्रमु न सांडिता ।
कर्मरेखा नोलांडिता ।
निज व्यापारी वर्तता ।
आतमबोधु सर्वथा न मैळे ।।

अगदी सामान्यपणे संथ चालणाऱ्या प. पू. दत्तमहाराजांच्या अंतरंगाची विशाळता, त्यांची भक्तिपरिपूर्ण अशी जीवनगंगा, कशाची कल्पना आपल्याला येऊ शकत नाही. त्यामुळे आपला त्यांच्याशी बोलण्याचा व्यवहार सामान्यपणे चालतो. परंतु प. पू. दत्तमहाराज मात्र कशात कोठेही न गुंतता स्वतः 'मी'ला टाळून बोलत असतात. सर्वत्र अलिप्तता संभाळीत असतात व तेही कळू न देता. आम्ही उत्साहाच्या भरात काही गोष्टी करीत असतो परंतु त्यांच्या परिणामाची दूरदृष्टी किंवा पोच रहात नाही. परंतु तेही सारे परिणाम त्यांनाच सहन करावे लागतात. इतकी विद्वत्ता असूनही इतकी विनम्रता ह्यांचा संगम आपल्याला प. पू. दत्तमहाराजांच्या जीवनात पहायला सापडतो. बोलण्यात संयम एवढा असतो की आपण बोलताना कसे बोलावे या विचारात पडतो. कोठलाही मनोवेग बोलण्यात चालण्यात दिसत नाही. खळखळाट

नाही, लखलखाट नाही. जीवन कसे शांत तर समईच्या ज्योतीप्रमाणे सतत प्रकाश देणारे, आल्हाद देणारे. अशा दिव्य जीवनाला शरण जावे हे तरी खऱ्या अर्थाने जमावे असे वाटते.

समबुद्धीने चालणारे त्यांचे जीवन, ईश्वरार्पण बुद्धीने केलेली कर्मे, गुरुमहाराजांकरिता तळमळणारे अंतःकरण, त्यातून निर्माण होणारा वामननिवास, वासुदेव निवासातील सतत चालू असणारे, गुरुमहाराजांच्या इच्छेने होत असलेले कार्य, सतत लोककल्याणासाठी होत असणारा प्रवास, त्यांचा अकर्तृत्व भाव, हे सारे पहाताना मन त्यांच्या महानतेची कल्पनाच करू शकत नाही. सर्वांचे उणेपण समजून घेण्याची त्यांची सहनशक्ती, त्याचे मोजमाप करताच येणार नाही.

आज सहस्रचंद्रदर्शन शांतीच्या निमित्ताने काय देणार आम्ही आपल्याला ? शब्दाच्या माध्यमाशिवाय आपले थोर मन समजून घेता येत नाही. शब्द तर आपल्याला जाणण्याला अपुरे आहेत, असमर्थ आहेत. शब्द जेव्हा व जेथे नाहीसा होईल तेव्हाच आपले खरे थोरपण कळणार आहे. आजच्या या परममंगलदिवशी आपल्या पदी सर्वांकरिता एकच प्रसाद मागते की निवांतपणे, मौनातून आपल्या चरणी नतमस्तक होणे खऱ्या अर्थाने साधावे.

❋ ❋ ❋


परमपूज्य ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर यांच्या
— आशीर्वादाचे सदैव अभिलाषी —

**विद्युत् विकास, पूना**

**६६० सदाशिव पेठ, पुणे ४११०३०**

फोन – ४४०९२२

इलेक्ट्रिकल कॉण्ट्रक्टर

# लेकराचे हित । वाहे माऊलीचे चित्त ॥

सौ. अनिता अनिल कवीश्वर, पुणे

लेकराचे हित । वाहे माउलीचे चित्त ॥ १ ॥
ऐसी कळवळ्याची जाती । करी लाभाविण प्रीती ॥ २ ॥
पोटी भार वाहे । त्याचे सर्वस्वही साहे ॥ ३ ॥
तुका म्हणे माझे । तैसे तुम्हां संतां ओझे ॥ ४ ॥

मी पू. श्रीदत्तमहाराजांची मधली सून. एका अज्ञानी, अडाणी आणि खेडचातून आलेल्या मुलीला त्यांनी सून म्हणून मला स्वीकारले या माझ्या भाग्याचे मी शब्दांत वर्णन करू शकणार नाही. 'पुरुषस्य भाग्यं' म्हणतात पण स्त्रियांच्या वाटेलाही भाग्य येते, त्याची देवालाही कल्पना नसावी. वाडीतल्या घराण्यात मुलगी गेली म्हणजे तिच्या मुलांना देवाला पाणी घालता येते, हे भाग्य आहे. माझ्या वाट्याला तर या दोन्ही भाग्याच्या गोष्टी आल्या आहेत. कवीश्वर घराणे वाडीचे आहे. आणि पू. श्रीदत्तमहाराजांसारख्या सत्पुरुषांच्या घरात मला प्रवेश मिळाला. सर्व दृष्टीने विचार केला तर केवळ पूर्वपुण्याईच म्हटले पाहिजे.

माझे भाग्य तर आहेच, पण माझ्या माहेरच्यांना सुद्धा पू. दादांच्या कृपेने ऋणी करून ठेवले आहे. १२ मे १९७४ ला माझे लग्न झाले आणि पाच वर्षांनीच माझे पितृछत्र नाहीसे झाले (१५ फेब्रु. ७९). मी मोठी. माझ्याखाली तीन भाऊ. त्यावेळी हायस्कूलमध्ये शिकत होते. त्यांतला सोलापूरला अ. वि. गृहात F. Y. B. Com. करीत होता. धाकटे दोघे एक १० वीत आणि दुसरा ८ वीत शिकत होते. पितृछत्र कोसळल्यामुळे सर्वच घडी विस्कटली. थोरल्याने शिक्षण सोडून सोलापूरला नोकरी धरली. आई Z. P. मध्ये शिक्षिका होती. सगळी वाताहत झाल्यासारखी होती. मला माहेरच्या या स्थितीने काही सुचत नव्हते. पू. दादांना हे सर्व माहीत असले तरी मी

त्यांच्याशी बोलू शकत नव्हते.

पण योग असा आला की जालन्याच्या पू. सौ. ताईमहाराज घरी आल्या होत्या. त्यांना मी माझ्या मनाला बोचणारी गोष्ट सांगितली– 'ताई, माझ्या माहेरी वडिलांचे छत्र गेल्यामुळे सर्व संसाराची वाताहत झाली आहे. भावांचे शिक्षण अर्धवट. माझ्या आईला काही सुचत नाही. आपण यातून काही तरी मार्ग सुचवा.' त्यावर पू. सौ. ताईमहाराज फक्त एकच वाक्य बोलल्या, 'तुझ्या आईला सांग की, महाराजांकडे पहा.' मी आईला त्याप्रमाणे पत्राने कळविले. आश्चर्य असे की तीनही भाऊ आणि आई यांना पू. दादांनी शक्तिपात दीक्षा दिली. त्यांचे पुण्यात येणे सुरू झाले. सर्वांच्या मनाला हुरूप आला. हळूहळू फरक पडू लागला. बँकेतून एकाने कर्ज घेतले. बार्शीत 'दत्त झेरॉक्स' दुकान घातले. दुसऱ्याने कॅसेटची लायब्ररी सुरू केली. दोघांची लग्ने झाली. सुना चांगल्या मिळाल्या. परिस्थितीत फरक पडला पण दीक्षा दिल्याने पू. दादांनी त्यांना आपले केले. त्यांची सर्वांची जबाबदारी कायमची घेतली.

राजू थोरला, विवेक मधला, या दोघांची लग्ने झाली. विकास धाकटा, त्याच्या लग्नाच्यावेळी लग्न करण्याची जबाबदारी या दोघांवर पडली. दोघांची लग्ने सासुरवाडीच्या मंडळींनी करून देण्याचे ठरले होते. यावेळी दोन्ही अंगाने लग्न आपण करून घ्यायचे ठरले. तुळजापूरला जाऊन लग्न लावून यावे म्हणजे कमी खर्चात आणि कमी व्यापात होईल असे घरात काहींना वाटत होते. पण विवेकला वाटत होते बार्शीलाच भगवंताच्या मंदिरात करावं. कुठे करावं? कसं करावं? काही माहीत नाही. अशा अवस्थेत विवेक महाराजांच्या दर्शनाला आला. सर्व हकीगत सांगितली. तेव्हा विवेकने सांगण्याआधी महाराज म्हणाले– 'भगवंताचे दरबारात चांगले आहे. धार्मिक संस्कार व थोडा अन्नखर्च करावा.' बार्शीला जाऊन तसं ठरवलं. तरी कसं करावं हे काही उमजत नव्हतं. त्याने महाराजांना पत्र पाठवलं 'आपणच आमचेकडून लग्न निर्विघ्नपणे पार पडून घेणार आहात.' एवढा भार देवाच्या माथी घातल्याबरोबर सर्व कार्याला गती आली. पैसे मिळाले. सर्व जे जे सुचले ते ते तसे घडत गेले. रोज प्रत्येकाला आश्चर्य आणि समाधान वाटत होते आणि

महाराजांचे स्मरण होऊन डोळे भरून येत होते. सर्व कामे पटापट होत गेली आणि लग्न निर्विघ्नपणे पार पडले. हा अनुभव माझ्या माहेरच्या मंडळींना आला.

यातही एक घटना अशी घडली की, भगवंत मंदिराचे दिवस एक एक वर्षाआधी बुकिंग होते. ३१ डिसेंबर तारीख धरली. भगवंत मंदिर मिळणार नाही याची खात्री. बार्शीतली कार्यालये शोधली, कोणतेही त्या तारखेला रिकामे नव्हते. शेवटी तुळजापूरला जाऊन चौकशी केली तेथेही जमले नाही. उत्तरेश्वराचे बार्शीचे मंदिरही मोकळे नाही. तेव्हा मोठा प्रश्न पडला, विवेकला महाराजांचे शब्द सारखे आठवत होते. 'भगवंताचा दरबार चांगला आहे' त्याने विचार केला आपण भगवंतमंदिरात चौकशी करून तर येऊ. म्हणून तो गेला तर आश्चर्य असे की भगवंतमंदिरात फक्त ३१ डिसेंबर रिकामा दिवस होता. त्याला तर आनंद झालाच पण आम्हालाही ते ऐकून महाराजांच्या कृपेची प्रचीती आली.

छोटा विकास पुण्यात आमचेकडे चार महिने होता. त्या काळात कुठे नोकरीचे जमले तर पहावे म्हणून आला होता. येथे एक छोटी नोकरी करत होता. एका गाडीवर ड्रायव्हरचेही काम करीत होता. त्यावेळी महाराजांचे त्याचेवर खूप लक्ष होते. तो येथे होता पण बहिणीकडे म्हणून रहात नव्हता तर गुरुमहाराजांकडे म्हणून रहात होता. निरपेक्ष-पणे रहात होता, मन लावून बाहेरची साफसफाईची कामे करीत होता. महाराजांना, सौ. आईंना भावभक्तीने नमस्कार करीत होता. कोणतेही काम आनंदाने व भक्तीने करीत होता. या चार महिन्यांत त्याच्या वृत्तीत फार बदल झाला. रागीट होता तो एकदम शांत झाला, विचारी झाला, त्याच्याच लग्नाची हकीगत वर दिली. त्याला पत्नीही चांगली मिळाली. आता तो बार्शीत मेटॅडोर चालवतो. नोकरीला आहे. आता अॅबेसीडर घेण्याच्या विचारात आहे. महाराजांच्या आशीर्वादाने तेही घडेल.

वरील माहितीवरून लक्षात येईल की मला हे घर मिळाले यामध्ये माझे काय आहे ! केवळ पुण्याईचे भाग्य आणि संतांचे औदार्य यांची अचानक गाठ पडली आणि हे जमून आले, दुसरे काय म्हणता

येईल ?

आता माझ्यासंबंधी थोडेसे लिहिले म्हणजे आपलीही पू. दादांच्यावर श्रद्धा बसेल. काही देवघरातले भक्त असतात, काही बाहेरचे भक्त असतात म्हणून काही फरक का असतो ? भक्ती असली म्हणजे भक्त होतो. देवघरात वावरताना तर भक्तीला फार जपावे लागते. देवाचे महत्त्व, सत्ता, उदारता, शक्ती समजली तर खरी भक्ती मनापासून होते. आम्हाला त्यांचे मोठेपण कुठे कळते आहे ? सर्व त्यांना मोठे म्हणतात. त्यांच्यावर सेवेचा वर्षाव करतात म्हणून आम्ही त्यांना मोठे म्हणतो. हे कळून घडत नाही. पण नकळत घडलेल्या भक्तीलाही देव पावत असतो. तसे आमचे आहे.

मला ७८ साली खूप वाटायचे की महाराजांनी आपल्याला दीक्षा द्यावी. पण पुढे जायची व सांगायची भीती वाटायची. मला आठवते, त्यावेळी एका गुरुवारी पहाटेच स्वप्नात येऊन दीक्षा दिली. तेव्हा पहाटेचे ६ वाजले होते. यानंतर महाराजांपुढे काही दिवसांनी दिक्षेचा विषय काढला. स्वप्नही सांगितले. तेव्हा एका मंगळवारी पहाटे ६ ला दीक्षा झाली.

सहा वर्षांपूर्वी औदुंबराला प्रदक्षिणा घालताना मनात विचार आला की आपण महाराजांसाठी काही तरी करावे, पण नेमके काय करावे ते मला समजेना. पण तेवढ्यात विजेसारखा एक विचार मनात आला की आपण कांदा लसूण सोडला तर....!

" शुद्ध चर्या हेचि संतांचे पूजन
लागतचि धन नाही वित्त " तुकाराम

जमून गेले. पहिले काही दिवस सत्त्वपरीक्षा होत होती. पण महाराजांच्या आशीर्वादाने जमले.

हळू हळू घरातील कामात ती. पू. सौ. आईसाहेबांनी प्रवीण केले. आपण काही करावं–शिकावं असे वाटत होते. त्याप्रमाणे टायपिंग सुरू केलं. महाराजांच्या कृपेने १०० पैकी ९५ मार्क मिळवून देऊन पुण्यात पहिले आणले.

डी. एड् होऊन बरेच दिवस झाले पण नोकरी मिळत नव्हती. महाराजांना एकदा सांगितलं की मला नोकरी करण्याची इच्छा आहे.

महाराजांचे स्मरण होऊन डोळे भरून येत होते. सर्व कामे पटापट होत गेली आणि लग्न निर्विघ्नपणे पार पडले. हा अनुभव माझ्या माहेरच्या मंडळींना आला.

यातही एक घटना अशी घडली की, भगवंत मंदिराचे दिवस एक एक वर्षाआधी बुकिंग होते. ३१ डिसेंबर तारीख धरली. भगवंत मंदिर मिळणार नाही याची खात्री. बार्शीतली कार्यालये शोधली, कोणतेही त्या तारखेला रिकामे नव्हते. शेवटी तुळजापूरला जाऊन चौकशी केली तेथेही जमले नाही. उत्तरेश्वराचे बार्शीचे मंदिरही मोकळे नाही. तेव्हा मोठा प्रश्न पडला, विवेकला महाराजांचे शब्द सारखे आठवत होते. 'भगवंताचा दरबार चांगला आहे' त्याने विचार केला आपण भगवंतमंदिरात चौकशी करून तर येऊ. म्हणून तो गेला तर आश्चर्य असे की भगवंतमंदिरात फक्त ३१ डिसबर रिकामा दिवस होता. त्याला तर आनंद झालाच पण आम्हालाही ते ऐकून महाराजांच्या कृपेची प्रचीती आली.

छोटा विकास पुण्यात आमचेकडे चार महिने होता. त्या काळात कुठे नोकरीचे जमले तर पहावे म्हणून आला होता. येथे एक छोटी नोकरी करत होता. एका गाडीवर ड्रायव्हरचेही काम करीत होता. त्यावेळी महाराजांचे त्याचेवर खूप लक्ष होते. तो येथे होता पण बहिणीकडे म्हणून रहात नव्हता तर गुरुमहाराजांकडे म्हणून रहात होता. निरपेक्ष-पणे रहात होता, मन लावून बाहेरची साफसफाईची कामे करीत होता. महाराजांना, सौ. आईंना भावभक्तीने नमस्कार करीत होता. कोणतेही काम आनंदाने व भक्तीने करीत होता. या चार महिन्यांत त्याच्या वृत्तीत फार बदल झाला. रागीट होता तो एकदम शांत झाला, विचारी झाला, त्याच्याच लग्नाची हकीगत वर दिली. त्याला पत्नीही चांगली मिळाली. आता तो बार्शीत मेटॅडोर चालवतो. नोकरीला आहे. आता अॅबेसीडर घेण्याच्या विचारात आहे. महाराजांच्या आशीर्वादाने तेही घडेल.

वरील माहितीवरून लक्षात येईल की मला हे घर मिळाले यामध्ये माझे काय आहे ! केवळ पुण्याईचे भाग्य आणि संतांचे औदार्य यांची अचानक गाठ पडली आणि हे जमून आले, दुसरे काय म्हणता

येईल ?

आता माझ्यासंबंधी थोडेसे लिहिले म्हणजे आपलीही पू. दादांच्यावर श्रद्धा बसेल. काही देवघरातले भक्त असतात, काही बाहेरचे भक्त असतात म्हणून काही फरक का असतो ? भक्ती असली म्हणजे भक्त होतो. देवघरात वावरताना तर भक्तीला फार जपावे लागते. देवाचे महत्त्व, सत्ता, उदारता, शक्ती समजली तर खरी भक्ती मनापासून होते. आम्हाला त्यांचे मोठेपण कुठे कळते आहे ? सर्व त्यांना मोठे म्हणतात. त्यांच्यावर सेवेचा वर्षाव करतात म्हणून आम्ही त्यांना मोठे म्हणतो. हे कळून घडत नाही. पण नकळत घडलेल्या भक्तीलाही देव पावत असतो. तसे आमचे आहे.

मला ७८ साली खूप वाटायचे की महाराजांनी आपल्याला दीक्षा द्यावी. पण पुढे जायची व सांगायची भीती वाटायची. मला आठवते, त्यावेळी एका गुरुवारी पहाटेच स्वप्नात येऊन दीक्षा दिली. तेव्हा पहाटेचे ६ वाजले होते. यानंतर महाराजांपुढे काही दिवसांनी दिक्षेचा विषय काढला. स्वप्नही सांगितले. तेव्हा एका मंगळवारी पहाटे ६ ला दीक्षा झाली.

सहा वर्षांपूर्वी औदुंबराला प्रदक्षिणा घालताना मनात विचार आला की आपण महाराजांसाठी काही तरी करावे, पण नेमके काय करावे ते मला समजेना. पण तेवढ्यात विजेसारखा एक विचार मनात आला की आपण कांदा लसूण सोडला तर....!

" शुद्ध चर्या हेचि संतांचे पूजन
लागतचि धन नाही वित्त " तुकाराम

जमून गेले. पहिले काही दिवस सत्त्वपरीक्षा होत होती. पण महाराजांच्या आशीर्वादाने जमले.

हळू हळू घरातील कामात ती. पू. सौ. आईसाहेबांनी प्रवीण केले. आपण काही करावं–शिकावं असे वाटत होते. त्याप्रमाणे टायपिंग सुरू केलं. महाराजांच्या कृपेने १०० पैकी ९५ मार्क मिळवून देऊन पुण्यात पहिले आणले.

डी. एड् होऊन बरेच दिवस झाले पण नोकरी मिळत नव्हती. महाराजांना एकदा सांगितलं की मला नोकरी करण्याची इच्छा आहे.

पण मिळत नाही. यावर महाराज काही बोलले नाहीत पण लगेच त्या आठवड्यात नोकरी लागली. आता तेथे लवकरच कायम होईन.

मी कॉलेज शिकून पदवीधर होईन असे मला कधीच वाटले नाही. पण ही चमत्कार घडला आहे. एस. एन. डी. टी. च्या कॉलेजात बाहेरून परीक्षेला बसण्याची सोय आहे. माझ्या मैत्रिणीच्या आग्रहाने प्रवेश-परीक्षेसाठी बसले व सेकंडक्लासमध्ये पास झाले. मनात आशा निर्माण झाली. पण घर–आणि–शाळा संभाळून शिकणे खरं तर कठीणच. महाराजांची कृपा म्हणून जमते, एवढाच त्याचा अर्थ. F. Y. चा फॉर्म भरला. अभ्यास अजिबात नाही, परीक्षेला बसू नये असंच वाटत होतं! पैसे तर भरले आहेत. महाराजांना नमस्कार करून परिस्थिती सांगितली. ते म्हणाले ' नामस्मरण करा. ' ' ज्या विषयाचा पेपर आहे त्याचे एकदा वाचन करा. महाराजांचे स्मरण करा. ' झालं–एका वाचनावर पेपर्स लिहिले. तीन तीन तास पेपर लिहिता आले. खरं म्हणजे तेच माझ्याकडून लिहून घेत होते याची सारखी जाणीव होत असे. एका पेपराला मला वाटले आता या पेपराचा खूप अभ्यास झाला आहे म्हणून स्वतःच्या तोऱ्यात गेले. हा पेपर सोपा जाणार आपल्याला. या विषयाची काळजी नाही. या नकळत उत्पन्न झालेल्या अहंकाराला चांगलाच फटका बसला. तो पेपर नेमका अवघड गेला. नंतर मला माझ्या तोऱ्याचे वाईट वाटले. मनातून महाराजांची क्षमा मागितली. आपल्या कृपाशक्तीमुळे हे घडते हे मी विसरले म्हणून पेपर अवघड गेला हे मनाने कबूल केले, तरी प्रश्न निर्माण झाला की आता पास का नापास ? पण महाराज दयाळू म्हणून त्या पेपरात काठावर ओढून घेतले. सेकंड क्लास दिला. पुढे B. A लाही सेकंड क्लासने पास झाले. आता M. A. पार्ट 1 ला सोशॉलॉजी घेऊन बसले आहे.

बी. ए. चा निकाल लागण्यापूर्वी एक महिना आधी महाराज म्हणाले होते "आता बी. ए. झालात की बी. एड. करून टाका. शिक्षणाला महत्त्व आहे." या वाक्याने मला माझा बी. ए. चा निकाल समजल्यासारखे झाले होते. त्यांचे शब्द खरे होतात. बी. ए. झाले. बी. एडसुद्धा तेच करवून घेतील. मध्ये एम. ए. चा विचार आहे.

माझ्याच नव्हे तर ज्यांच्या जीवनात सत्पुरुषांचा सहवास व

त्यांच्या कृपेचा लाभ झाला त्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल होत असतो. मी इतकं कधी त्यांचेशी बोलू शकले नाही. आता कधी तरी हा लेख ते वाचतील व माझ्या अंतःकरणातील कृतज्ञतेची–भावभक्तीची भोळी भाबडी–वेडीवाकडी पुष्पांजली ते स्वीकारतील. त्यावेळी मलाही पूजेचे समाधान मिळेल.

* * *


हार्दिक शुभेच्छा

*

**श्री सुवर्ण सहकारी बँक लि.**

*

मुख्य कार्यालय व पाच शाखांद्वारे
ग्राहकांच्या तत्पर सेवेसाठी कार्यरत

*

**मुख्य कार्यालय – ७५९/५१ डे. जि. फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे ४११००४**

फोन – ३३४५२८, ३३८१५४, ३३५९२५

श्री. मुकुंद जोशी
सरव्यवस्थापक

डॉ. नी. स. भिडे
अध्यक्ष

# श्रीगुरुकृपेचा अनुभव सामान्य भक्तांनाही येतो

मनोज माधव तांबोळी, माटुंगा-मुंबई

श्रीगुरुकृपेने अनुभव येतात. असे अनुभव फक्त मुमुक्षू साधकांना येतात असे नाही. माझ्यासारख्या सामान्य मुलालाही श्रीगुरुकृपेचे अनुभव येतात. तसा मी अजून विशीचा तरुण आहे. मुमुक्षुत्व हा विषय मला समजणे व त्याची इच्छा मला होणे, इतका स्वस्त मोक्ष नसावा. म्हणून मी स्वतःला प्रामाणिकपणे सामान्य मुलगा म्हणतो. माझे भाग्य विशेष आहे हेही मला जाणवते. कारण मी पू. श्रीदत्तमहाराजांच्या मुलीचा मुलगा आहे. म्हणजे पू. श्रीदत्तमहाराजांचा नातू. आई-वडील-मावशा-मामा-सर्व नातेवाईक पू. श्रीदत्तमहाराजांशी किती आदराने, नम्रतेने, भावभक्तीने वागतात हे मी लहानपणापासून पहात आलो आहे. तसेच पू. महाराज कसे वागतात-बोलतात हे ही पहातो आहे. त्यामुळे एवढा अलौकिक सहवास-सत्संग मला ईश्वर कृपेने लाभत आहे. माझ्या आयुष्याला या संस्काराने सुरवातीपासून चांगल्या वर्तनाचे विचाराचे वळण लावले आहे. तरी म्हणावेसे वाटते की प्रत्येकाची कुवत वेगवेगळीच असते. आमच्या कुवतीच्या मर्यादेप्रमाणेच आम्ही घेऊ शकणार ! ‘देणाऱ्याचे हात हजारो ! दुबळी माझी झोळी’ असे मी निराशेने म्हणत नाही- विचार करून म्हणतो. मोठाली माणसे कर्माची गती म्हणतात ती मला सांगता येणार नाही. पण प्रत्येकाला या गतीमुळे मर्यादा पडल्या आहेत असे मला वाटते. तरी गुरुकृपेने अनुभव येतात आणि या मर्यादा विस्तारित होतात.

(१) मध्यंतरी (गेल्या वर्षी) मी मनाच्या विचित्र आवर्तात सापडलो होतो. भगवंत-जीव-आपण स्वतः सर्व जग यासंबंधी अस्थायी म्हणून जेवढे काही विचार असतील ते सर्वही मला सतावीत होते. त्यात पुनः पूर्व संचितानुसार असेल, वृत्तीही होत होती. एकूण काय सर्व प्रकार हाताबाहेर गेला होता. अगदी जीव सुद्धा नकोसा झाला

होता. भगवंतावरील-गुरूवरील सर्व विश्वासच संपुष्टात येण्याची भीती वाटू लागली.

अशा एक काळात मला स्वप्न पडले. केवळ स्वप्नाच्या प्रभावाने मी चांगलाच सावध झालो आणि सावरलो. माझ्याकडे भगवंताचे, गुरूंचे लक्ष आहे, इतकेच नव्हे तर, मला त्यांनी त्यांच्या शक्तीने त्यांच्याच जवळ खिळवून ठेवले आहे, अन्यत्र कुठेही भरकटू देणार नाहीत, एवढा विश्वास त्या एका स्वप्नाने माझ्यामध्ये निर्माण केला. ते स्वप्न असे की पू. श्रीदत्तमहाराज घरी आले आहेत. मी त्यांना वाकून नमस्कार करीत आहे. नमस्कारानंतर मी साहजिकच उठू लागलो. तेव्हा असे लक्षात आले की मी नमस्कार सोडूच शकत नाही. वाकलेला मी सरळ उठू शकत नव्हतो. असे का होते म्हणून आतूनच लक्ष दिले तर असे जाणवले की पू. श्रीदत्तमहाराजांचा हात पाठीवर आहे. तो त्यांनी तसाच धरूनही ठेवला आहे. त्यामुळे मी कितीही उठायचा प्रयत्न केला तरी तो दाब डावलून उठू शकत नव्हतो.

स्वप्न इथेच संपले. कारण, स्वप्नात पाठीवर ठेवलेला हात सतत पाठीवर आहे याची ती सूचना असावी. मनाची अस्वस्थता कल्पनेने निर्माण झालेली होती. ती कल्पना सुटत नव्हती. अस्वस्थता वाढत होती. स्वप्नाने ती कल्पना निघून गेली. अस्वस्थताही आपोआप नाहीशी झाली. जे मनी ते स्वप्नी या उक्तीप्रमाणे स्वप्न वेगळे पडायला हवे होते- परंतु स्वप्न मनाच्या बिचारचक्राच्या विरुद्ध पडले आणि जागृत अवस्थेतील अस्वस्थता नाहीशी केली. हा अनुभव माझ्या श्रद्धेच्या दृढतेच्या दृष्टीने फार मोलाचा आहे.

(२) आणखी एक स्वप्न मला चांगलीच जागृती देऊन गेले. या स्वप्नाचा संबंध एका छोटया घटनेशी आहे. एकदा महाराज घरी आले होते. त्या काळात एकदा भोजन प्रसंगी असे घडले की मी त्यांच्यापासून दूर बसलो होतो मध्येच आमच्या तांब्यातील पाणी संपले. त्यावेळी पू. दत्तमहाराज त्यांच्या तांब्यातील पाणी त्यांच्याजवळ बसलेल्या माझ्या भावाला, रघुनाथरावांना देत होते. मला असे वाटले की त्यांनी आपल्यालाही पाणी द्यावं ! पण तसे घडले नाही. मी त्यांच्यापासून लांब होतो हे खरे असले तरी मला त्यांचे हातून पाणी मिळावे असे मनातून सारखे

वाटत होते खरं ! खरं म्हणजे मी त्यांचा नातू. ते माझे आजोबा, नेहमी जाणं येणं, भेटी अगदी घरच्या घरी होणाऱ्या असल्या तरी त्यांचे हातचे पाणी मिळालं नाही म्हणून मनात राहून गेलं !

त्या रात्री स्वप्न पडलं, मी व माझा भाऊ एकाच खोलीत वेगवेगळ्या पलंगांवर झोपलो होतो. भावाला बरं नव्हतं. महाराज त्याचेकडे गेले व त्याला पाणी पाजले. त्यावेळी (झोपेतच) मी जागा होऊन जागेवरूनच त्यांचेकडे बघत होतो. वास्तविक मला तहान लागली नव्हती. पण महाराजांनी त्याला येऊन पाणी पाजले आणि आपल्याला त्या दिवशी एका पंक्तीत असून पाणी दिलं नाही असे स्मरण होते न होते तेवढ्यात महाराजांनी माझ्याकडे बघितले आणि माझ्याजवळ येऊन मला पाणी पाजले.

कल्पना माणसाला फार त्रास देते. मनात शंका निर्माण झाली की कल्पना सुरू होतात, मग मात्र त्या कल्पनाच मनात घर करून बसतात. ही अंतरंग गोष्ट श्रीगुरुमहाराज नाहीशी करीत असतात. किती बारीक लक्ष असते सद्‌गुरूंचे सर्व शिष्यांवर, अगदी माझ्यासारख्या सामान्य शिष्यावरसुद्धा.

* * *

*With Best Compliments From :*

**S. N. Panse**
**Painters**
**and**
**Decorators**

Res–424958
Off : Bizzy Land Complex
776 A, Sadashiv Peth
Pune–411030

# आई बाप हे दैवत माझे !

लेखिका – सौ. सुमन यशवंतराव भातलवंडे वैराग–बार्शी

**संदर्भ** – पू. श्रीदत्तमहाराजांची थोरली सुकन्या सौ. सुमनताईंच्या या आठवणी आहेत. स्वाभाविकता आणि सत्य सहजपणे आपल्याला सुमनताईंच्या भावपूर्ण आठवणीतून वाचावयास मिळणार आहेत.

॥ श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः ॥

आईबाप हे दैवत माझे । असता माझ्या घरी ।
कशाला जाऊ मी पंढरपुरी ॥

या उक्तीप्रमाणे मलाच काय आमच्या सर्व परिवाराला–कुठेही जाण्याची गरज नाही असे मला वाटते. मला तर कुठे जाण्याचा विचार मनात डोकावतो तेव्हा प्रथम आठवण होते ती पू. दादांची ! म्हणजे माझ्या पू. पितृदेवांची ! ! म्हणजे पू. श्रीदत्तमहाराजांची ! ! !

पू. दादांच्या जवळ विनम्रतेचा सर्वोच्च ठेवा आहे. त्यांच्या नम्रतेमुळे मोठेपणासुद्धा त्यांच्यासमोर वाकलेला असतो. पू. दादांना दुसऱ्यांना मोठेपणा देण्यात समाधान वाटते. त्यांचा तो स्वभाव आहे. कोणीही, अगदी छोटया माणसा–मुलाने एखादे छोटे काम केले तरी पू. दादा त्याची प्रशंसा करून शाबासकी देणार ! लोकांच्या गुणांची कदर करण्याची त्यांची वृत्ती आहे. गुणी माणसांच्या गुणांचे कौतुक केले म्हणजे त्याला गुणविकासाचे प्रोत्साहन मिळत असते, तो समाधान पावतो. तसेच आपला मोठेपणा झाकून ठेवण्याची दादांची नम्रता, ज्यांना त्यांच्या मोठेपणाची जाणीव आहे त्यांना कासावीस करून सोडते. सहिष्णुता कशी असावी हे दादांच्या गुणांचा अनुभव घेऊन चांगले लक्षात येईल.

पू. दादा व्यवहारात फार अलिप्त वाटतात, अबोल वाटतात. गंभीर वाटतात. पण याचे खरे कारण ते सर्वव्यापी आहेत. त्यांचे सर्वांवर लक्ष आहे. आमचा परिवार फार मोठा आहे. पण पू. दादांचे या परिवारातील

सर्वांवर लक्ष आहे. सर्वांचे कल्याण कशाने होणार आहे हे त्यांना समजते म्हणून ते सांगण्यासाठी निरीक्षण करीत वाट पहात असतात. याचा अर्थ ते अलिप्त वाटतात. त्यांना गप्पा गोष्टीत रस नसतो, कारण तो निरर्थक वेळ घालविणे आहे असे त्यांचे मत आहे. विचारल्याशिवाय-महत्त्वाच्या गोष्टीशिवाय ते स्वत:हून कधी बोलत नाहीत, पण त्यांना कधीही कोणताही प्रश्न विचारा, त्यावर त्यांचे बोलणे म्हणजे हृदयात जपून ठेवावे असे असते. त्यांच्या ज्ञानाची खोली अथांग सागरासारखी आहे म्हणून ते नेहमीच गंभीर वाटतात. घरी आलेल्या प्रत्येकाकडे बारकाईने बघण्याची त्यांची कला न्यारीच आहे. हे त्यांचे बारीक निरीक्षण कधी कोणाला मोठचांदा बोलून किंवा कोणी दुखावला जाईल यासाठी नसते. निरीक्षणातून आढळलेले गुणच ते व्यक्त करतील. दोषांचा उल्लेख सुद्धा करणार नाहीत. बोलण्यात फार संयम व दूरदृष्टी असते.

घरामध्ये वागताना-बोलताना ते कधीही स्वत:कडे सर्वांनी लक्ष दिलेच पाहिजे असे जाणवूनही देत नाहीत. त्यांची वृत्तीच स्वभावत: स्वावलंबी आहे म्हणून ते सारखे अलिप्त वाटतात. त्यांच्या या गुणाकडे पाहिले म्हणजे ममत्व-आसक्ती कशी सोडावी हे शिकावे वाटते.

प्रपंचात राहून परमार्थ कसा करावा याचे मूर्तिमंत जागते उदाहरण म्हणजे माझे पू. दादाच ! एकनाथांचा आदर्श पूर्णपणे सर्वथैव पाळणारे पू. दादाच ! आपल्या अंगावर १०८ वेळा थुंकल्यानंतरही काही न म्हणता उलट त्यांच्यामुळेच मला गंगेचे तितक्याच वेळा स्नान घडले असे म्हणणारे एकनाथ व पुष्कळ लोकांनी भरपूर त्रास दिल्यावरही त्यांच्याशी तितक्याच प्रेमाने बोलणारे पू. दत्तमहाराज यांत फरक कोणता ? यावरून आपल्याशी वैराने कुणी वागले तरी आपण त्याच्याशी प्रेमानेच वागावे हीच शिकवण मिळत नाही का ?

त्यांच्या प्रत्येक वागण्याबोलण्यावरून आपल्याला अनेक शिकवणी मिळून जातात. पण या सर्व गोष्टींची आठवण झाली की वाईट एवढेच वाटते की आपण आजपर्यंत या मूर्तीला अजिबात ओळखलेच नाही. माझी तेवढी योग्यताच नाही. 'तुझे आहे तुजपाशी परि जागा चुकलासी' अशी आमची अवस्था आहे.

त्यांच्या पोटी जन्म घेणे ही खरं तर किती जन्मांची पुण्याईच !

पण या प्रत्यक्ष देवाची मात्र व्हावी एवढी सेवा घडतच नाही. याचा खेद मनाला झाल्याशिवाय रहात नाही.

श्रीक्षेत्र नृसिंहवाडी आणि अमरापूर (औरवाड) या दोन वास्तूंबद्दल पू. दादांना नितांत ओढा आहे. एक आहे जन्मभूमी आणि दुसरे आहे गुरुस्थान ! त्यामुळे आम्हालाही लहानपणापासून त्या स्थानांचा ओढा लागला आहे.

पू. दादांची पितृभक्ती आणि मातृभक्ती अगदी अवर्णनीय आहे. ते वडिलांचे समोर कधीही खालीसुद्धा बसत नव्हते. उभे राहून त्यांचेशी बोलत असत. त्या दोघांच्या मुखातून आलेले शब्द नेंहमी प्रमाणच होते. तशी मी कवीश्वरांच्या घरी मोठी मुलगी व त्यांच्या घरात पहिले नातवंड ! पण मुलगी होते तरी माझे लहानपणी खूपच लाड झाले. माझ्या लग्नाच्या आधी विशेष वळण व संस्कार मला लागावे म्हणून वाडीला थोरले महाराज पू. धुंडिमहाराज व पू. सौ. थोरल्या आईसाहेब (आजोबा व आजी) यांच्या सेवेसाठी ठेवले होते.

त्यावेळी माझा दिनक्रम पहाटे चारपासून सुरू व्हायचा. कारण पू. सौ. आईसाहेब (आजी) पहाटे चार वाजताच नदीवर घेऊन जायच्या. त्यांच्याबरोबर स्नान करायचे. मग देवाला प्रदक्षिणा घालीत असू. नंतर वरती आल्यावर अश्वत्थाला १ माळ प्रदक्षिणा घालायच्या. घरी आल्यावर श्रीगुरुचरित्र मध्ये ठेवून त्याला १ माळ प्रदक्षिणा घालायच्या. मग माधुकरीसाठी भात शिजवून मुदी करावयाच्या. मग स्वैपाक सोवळ्यात करायचा. असा दिनक्रम चालला होता. थोरले महाराज (आजोबा) म्हणत 'मुलगी मोठी झाली आता शाळा कशाला?' यामध्ये त्यांचा उद्देश काय होता हे मला नंतर पटले. १९४८ मध्ये मला आजोबांचा मंत्रानुग्रह झाला. वाडीचा वर लिहिल्याप्रमाणे दिनक्रम ! म्हणजे लहानपणापासून माझेकडून काही सेवा–काही नित्यक्रम घडावे–हे उदात्त वळण लागावे या संस्कारासाठी बाकी सर्व गोष्टी गौण आहेत. माझे वय अवघे १२ होते. या संस्कारांचे–उद्देशाचे महत्त्व त्यावेळी मला कळत नव्हते. या अज्ञानातून मी पू. दादांना एकदा पत्र लिहिले होते 'दादा ! वडील मंडळींच्या आज्ञेमुळे तुम्हाला अपत्याचे मन सुद्धा कळले नाही ना ?' कारण माझी शाळा बंद करण्याची आज्ञा

आजोबांची होती. पुढे मग आमच्या दिगंबरकाकांची बायको जेव्हा सोलापूर येथे 'स्टाफ नर्स' म्हणून काम करू लागली तेव्हा मी पुण्याला आल्यावर माझी शाळा सुरू झाली.

पुण्याला आल्यावर दिनक्रमात परिस्थितीप्रमाणे बदल झाला, पण देवधर्म सुटला नाही. सायंकाळची नैमित्तिक स्तोत्रे-करुणात्रिपदी आम्ही सर्वजण म्हणत असू. सकाळी जप असायचा.

माझे लग्न तसे खूप लवकर झाले. माझ्या सासूबाईंना पू. दादांनी बहीणच मानलेले होते. माझे व डॉक्टरांचे (माझे यजमान) आजोळ बार्शीच, ही दोन्ही घरे जवळ एका गल्लीतच. त्यामुळे माझ्या सासूबाई व सौ. आई या बालमैत्रिणी. त्यामुळे मला कधी सासरी आल्यासारखे वाटलेच नाही. माझ्या सासूबाई फार प्रेमळ होत्या.

प. पू. गुळवणी दादांनासुद्धा मी लहानपणी हट्ट करून त्रास दिला आहे. नातवंडांनी आजोबांजवळ करावा तसा ! मला ते म्हणायचे, 'सुमन तुझे दादा खूप मोठे आहेत.' एकदा लग्नापूर्वी पू. गुळवणीदादा आमचे घरी आले व म्हणाले 'आज मी तुमच्या घरी जेवायला येणार आहे.' २।३ पाहुणे पण त्यांच्याबरोबर येणार होते. भालेरावांचेकडे काही अडचण आली होती. पुण्यात ते कधी कुणाकडे जेवायला गेले नाहीत. पण आमच्याकडे स्वतः सांगून आले होते. त्यावेळी मी सोवळ्यात नऊवारी नेसून स्वैंपाकाला आईला मदत करून वाढले. त्यावेळी सगळ्यांनी माझे कौतुक केले होते.

आजारी असल्यामुळे पू. गुळवणीदादा माझ्या लग्नाला येऊ शकले नाहीत. तेव्हा मी पुण्याला आल्यावर त्यांना म्हटले, 'दादा, माझे घर बघायला कधी येता ?' त्यावर ते हसून म्हणाले 'हो येईन हं बेटा, पण एकटा नाही, आम्ही सगळेच येऊ.' आणि तो योग १९६८ मध्ये आला. त्यावेळी पू. धुंडीराज महाराज, पू. गुळवणी महाराज पू. दादा आणि बरीच मंडळी वैरागला आमच्याकडे आली होती. आम्ही दोघांनी तिघांची पाद्यपूजा केली. ते दृश्य आयुष्यात विसरणार नाही. फारच भव्य कार्यक्रम तो झाला. यावेळीच माझा भाऊ डॉ. अशोकसाठी मुलगी पसंत करण्याचा कार्यक्रम तेथे झाला. आलेल्या सर्व मंडळींसह भोजनाचा कार्यक्रमही मोठाच झाला.

संसारात कोणत्याही सुखदुःख, अडीअडचण, संकट, चिंता इ. प्रसंगी आम्ही पू. दादांचे– दत्तमहाराजांचे स्मरण करतो आणि त्यातून पार पडतो. पू. गुळवणी दादांनी 'तुझे दादा खूपच मोठे आहेत' असे म्हटल्याची प्रचीती येते.

नुसत्या स्मरणाने काय होते याचे अगदी ताजे उदाहरण म्हणजे माझा मोठा मुलगा–बायको मुलासह सौदी अरेबियात 'तैफ' येथे असतो. तो गाडी घेऊन बायको-मुलासह बाहेर चालला होता. अचानक गाडी एका मोठ्या खड्ड्यात कलंडली. गाडीचा तोल जाण्यासाठी काहीही अवधी व जागा नव्हती. मुलगा क्षणभर घाबरला. पण त्या स्थितीत त्याने पू. दादा आजोबांचे (म्हणजे पू. दत्तमहाराजांचे) स्मरण केले व त्याच वेगात गाडी वर घेतली. गाडी वर आल्यावर थांबून कठीण काळाचे भयंकर चित्र पाहून आला, गाडी वर आली कशी हेच त्याला कळले नाही. वर आली नसती तर त्या मोठ्या खड्ड्यात गाडी पडण्याशिवाय गत्यंतरच नव्हते. देवाचे नित्य स्मरण असले म्हणजे सतत रक्षण होत असते.

माझ्या मोठ्या मुलीच्या लग्नाची एक आठवण आहे. मुलगी कोल्हापूरला दिली. लग्नही कोल्हापुरात झाले. लग्नास येणाऱ्या प्रत्येक सुवासिनीची नारळाने ओटी भरण्याचा प्रघात कोल्हापुरात आहे असे आम्हाला ऐनवेळी सांगितले. आम्ही त्या तयारीने गेलो नव्हतो. त्यावेळी पू. दादा मला म्हणाले, 'तुम्ही आता कोल्हापूरला महालक्ष्मीच्या ओटीत मुलगी दिली आहे ना, तिचीच (महालक्ष्मीची) इच्छा आहे की तुम्ही सर्व सुवासिनींची ओटी भरावी.' त्याप्रमाणे जवळ जवळ ३०० सुवासिनींची नारळाने ओटी भरली. कसे कार्य करून घेतले हे कळत नाही.

आमच्या दोघांची बरेच दिवसांपासून एक इच्छा होती की पू. दादांचा एक भागवत सप्ताह आपल्या वास्तूत व्हावा, परंतु प्रत्येकवेळी काहीतरी अडचण यायची. त्यातून मी एकदा पू. दादांना विचारले तेव्हा ते म्हणाले, 'मुलांची लग्ने झाल्यावर बघू या.' १९८२ मध्ये मुलांची लग्ने झाली व १९८३ मध्ये भागवत सप्ताहाचा योग आला. वास्तविक इतकी वर्षे थांबण्यामागे त्यांच्या दूरदृष्टीची कल्पना आली ती

ही की हा सप्ताह तुमच्या सुनामुलांना ऐकायला मिळावा– इतरही नातेवाईकांना याचा लाभ मिळावा. या पुण्यकर्माची फळे तुमच्या परंपरेला मिळावीत. तुमच्या घरात येणाऱ्या मुलींच्यावर याचे संस्कार व्हावेत: तुम्ही–मुले तर यातले आहातच. पू. दादांचे नेहमी सांगणे असते की प्रत्येक गोष्ट घडण्यास ठराविक वेळ यावी लागते. त्याचे धागेदोरे भूत आणि भविष्यात अडकलेले असतात. म्हणून 'प्राप्तकाल घडीची' वाट पहावी लागते.

माझा दोन नंबरचा मुलगा डॉ. शिरीष हा लहान होता त्यावेळेस त्याने एकदा श्रीगुरुचरित्र सप्ताह करण्यास सुरुवात केली. पण शाळेच्या अडचणीमुळे त्याला तो सप्ताह अर्धवट सोडावा लागला होता. ही घरातली गोष्ट कुणालाही माहीत नव्हती. पू. दादांनाही सांगितली नव्हती. या गोष्टीला बरीच वर्षे झाली. शिरीष डॉक्टर झाल्यावर पुण्यास गेला तेव्हा पू. दादा त्याला म्हणाले "आता तुम्ही एकदा गाणगापूरला जाऊन राहिलेला सप्ताह पूर्ण करून या." पू. दादांनी हे कसे ओळखले ? इतकी वर्षे लक्षात कसे ठेवले आणि योग्य वेळ पाहून आठवण देऊन उत्तम मार्गदर्शन केले. तो गाणगापूरला काही मित्रांबरोबर गेला. श्रीभीमभट यांना पू. दत्तमहाराजांनी पत्र पाठवून कळविले होते, "यांची व्यवस्था व्हावी." किती बारीक लक्ष ठेवून काळजी घेतात– जपतात.

संसारातही दादांना मनस्ताप देणाऱ्या घटना घडतात, पण ते त्या घटनांचा उल्लेख करणार नाहीत. स्वतः सर्व सहन करतात. सौ. आईने जरी काही पवित्रा घेतला तरी उपदेश करून शांत करतात. पू. दादांच्या जागतिक प्रपंचात सौ. आईचा खूप मोठा वाटा आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही. आम्ही लहान असताना खरोखर पू. दादांची ओढाताण होत होती. १००/२०० रुपयांत संसार चालला होता. घरात माणसे ८/१० आणि येणारे जाणारे असत. रेशनिंगचे दिवस. कापडसुद्धा रेशनवर मिळायचे. सतत दोन दोन वर्षे एकाच रंगाचे कापड व त्याचे परकर व पोलके घालत होते. तेव्हा मला कुणी चिडवलं. मी त्यासाठी रडत असता पू. दादा माझेजवळ आले. पाठीवरून हात फिरवला व म्हणाले, "लहानपणी असे वापरले ना म्हणजे मोठेपणी खूप रंगाच्या

साडचा मिळतात." माझी समजूत काढताना त्यांच्या हळव्या हृदयाला किती वेदना झाल्या असतील याचा विचार आता मनात येतो आणि त्यांच्या सहनशक्तीबद्दल मन श्रद्धेने आणि भक्तीने भारावून जाते. कारण त्यावेळचे त्यांचे शब्द सत्य झाल्याचे मी अनुभवते. सौ. आईने तर चि. अशोकचे लग्न होईपर्यंत सर्व कामे घरीच केली. आम्ही मदतीला म्हणजे किती असणार ?

या दोघांच्या पुण्याईनेच आज आम्ही त्यांची मुले, मुली, नातवंडे अगदी आनंदात व समाधानात आहोत. मला एक प्रसंग आठवतो तो चि. सौ. शैलाच्या (सर्वांत धाकटी बहीण) मंगळागौरीचा ! मुली सांगून लक्ष्मी क्रीडामंदिर भाड्याने घेतले होते. दोन दिवस उरले तरी पैशाची काही व्यवस्था नव्हती. पण त्या दिवशी सकाळी कुणालातरी उसने दिलेले पैसे रु. ८०० ची म. ऑ. आली. तेव्हा पू. दादा म्हणाले की "परमेश्वराची आमच्यावर एवढी कृपा आहे की तो आम्हाला कुणाचे ऋणी ठेवीत नाही. तो सर्व व्यवस्था करतो. कुणी देणेकरी आपल्या दारात येत नाही ही त्या प्रभूची केवढी माया आहे." असे किती प्रसंग सांगावेत तेवढे थोडेच आहेत.

आमच्या घरी परंपरेने ईश्वरोपासना करणारे पूर्वज असल्याने घरात भरपूर देव आहेत. घरात डॉक्टरीच्या व्यवसायामुळे पुरुषमंडळींना पूजाअर्चा व्यवस्थित करण्याइतपत वेळ नसतो. मी एकदा पंढरपूरला गेले असता तेथे एके ठिकाणी खूप देव दिसले. चौकशी करता समजले ज्यांना पूजा करायला सवड नसते, ते आपले घरचे देव येथे आणून ठेवतात. येथे सर्व देवांची पूजा होते. ते पाहिल्यापासून माझ्या मनात येऊ लागले की आपण आपले देव येथे आणून ठेवावे. तेव्हा मी पू. दादांना विचारले, "दादा, घरातील पूजा मी करते. पण मला पूजेतले काय येते ? कधी प्रसंगाने बाहेर गावी जाणे झाले तर काहीच घडत नाही. तेव्हा मोठे देव कुठेतरी क्षेत्राच्या गावी ठेवावेत का ?" ते हसले आणि म्हणाले, "जी स्त्री पुत्रवती व सौभाग्यवती आहे तिने फार सोवळे करू नये. स्नानानंतर लगेच पूजा केली तर तेवढीच शुचिर्भूतता असते. अगदी वेळ नसेल तर नुसते गंधफूल, निरांजन, नैवेद्य एवढे तरी करावे. फारच घाईच्या वेळी हळदकुंकू वाहून नमस्कार तरी करावा, पण

शरीराला काही तरी वळण असावे यासाठी पूर्वजांनी काही धर्मनियम घालून दिले आहेत ते पाळावेत."

पू. दादा मनाने फार हळवे आहेत. त्यांचा लहान भाऊ गजानन गेला तेव्हा त्यांना खूपच वाईट वाटले. तो त्यांना अगदी ज्येष्ठ पुत्राप्रमाणे होता, तसेच परवा त्यांचे नं. ३ चे बंधू वासुदेवकाका गेल्यावरही फार वाईट वाटले. त्यांच्या मातोश्री गेल्या तेव्हा तर त्यांच्या मुखातून शब्द बाहेर पडले, "आता आम्ही भिकारी झालो." स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी—ही ओळ आठवली.

आता पू. दादांचा शिष्यपरिवार व धर्मकार्याचा व्याप पाहिल्यावर एखादे वेळी वाटते आपण त्यांच्या सहवासाला मुकतो आहोत. पण त्यांना सर्वांचीच मने सांभाळावी लागतात. त्यांना जर कधी म्हटले की "दादा चार दिवस निवांत राहायला या. कुठेही जाऊ नका." तेव्हा ते हसत म्हणतात "आमच्या पत्रिकेतच सदा फिरण्याचा योग आहे. लोक प्रेमाने बोलावतात. गेलं पाहिजे ना?"

आता जगन्नियंत्या परमेश्वराजळ एकच प्रार्थना आहे की अशा जगन्मान्य, स्वप्नातही कधीही कोणाचेही वाईट न चिंतणाऱ्या, सोशीक व प्रातःस्मरणीय माझ्या पितृदेवांना उदंड आयुरारोग्य लाभावे व आम्हाला त्यांचे मार्गदर्शन घडावे ही सदिच्छा.

॥ श्रीगुरुदेव दत्त ॥

* * *


प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज शतायु होवोत !

**अखिल भारतीय तीर्थ पुरोहित संघ**

**प्रयाग महाराष्ट्र भवन**

११२ मीरागली, गोपाळ मंदिर, दारागंज

प्रयाग २११००६

कार्यवाह — गजानन स. चित्रे


श्री वासुदेव निवास (पंथराज सह)

# कृतज्ञतेचे चार शब्द !

लेखक – डॉ. य. गु. भातलवंडे वैराग–बार्शी

**संदर्भ** – डॉ. यशवंतराव हे पू. दत्तमहाराजांचे थोरले जावई. सौ. सुमनताईंचे यजमान. गेल्या सात पिढ्या परंपरेने वैद्यकीय व्यवसाय चालत आलेला आहे. डॉ. यशवंतराव हे पू. गुळवणी महाराजांचे अनुगृहीत. अत्यंत सात्त्विक प्रकृतीचे–समाजसेवावृत्तीचे डॉक्टर आहेत. धर्म–संस्कृति–ईश्वर व गुरुनिष्ठ आहेत. त्यांचा कवीश्वर घराण्याशी संबंध आईकडून दोन – तीन पिढ्यापासूनचा आहे. त्यांनी आपली कृतज्ञता खालील शब्दात व्यक्त केली आहे.

–संपादक

ॐ श्रीगणेशाय नमः । ॐ श्रीसरस्वत्यै नमः । ॐश्रीगुरुभ्योनमः ।
ॐ श्रीकुलदेवताय नमः । ॐ श्रीजोगेश्वर्यै नमः ।
ॐ श्रीग्रामदेवताय नमः । ॐ श्रीसंतनाथाय नमः ।
ॐ श्रीमातापितराभ्यां नमः ।।

आज मला धन्यता यासाठी वाटते की परमपूज्य श्रीदत्तमहाराजांचे सहस्रचंद्रदर्शन शांति समारोहात प्रकाशित होत असलेल्या ‘विशेष अंका’ मध्ये अनेक साधक व आप्तेष्ट श्रीदत्तमहाराजांचेबद्दल स्वतःचे काही अनुभव आणि त्यांची कृपादृष्टी लाभल्यापासून जाणीव झालेल्या विशेष घटना कळवीत आहेत. त्यात मलाही संधी मिळाली आहे.

माझे आजोबा बार्शीचे. पू. श्री. धुंडीराजमहाराजही बार्शीचे. या उभयतांचे घनिष्ट संबंध होते. तेव्हापासून ही दोन घरे परस्परांना प्रेमाच्या नात्याने जोडली गेली आहेत. मी माझ्या लहानपणासून पू. श्रीधुंडीराज महाराज व पू. श्रीदत्तमहाराज पहात आहे. मला माझ्या अज्ञानाने त्यांची अलौकिकता जाणता आली नाही. विश्वरूप दर्शनासाठी दिव्य दृष्टी लागते. त्याप्रमाणे थोर महान विभूतींच्या असामान्य-

त्वाची, कुशाग्र बुद्धिमत्तेची, कमालीच्या नम्रतेची, विशाल अंत:करणाची, प्रचंड प्रज्ञा आणि असामान्य मेधा इ. गुणांची समन्वयाने जाण येण्यासाठी परमेश्वरस्वरूपी श्रीसद्गुरूंची कृपादृष्टी व्हावी लागते आणि त्यांनी काही विशेष प्रसंगांनी समजून देण्याचा योग यावा लागतो. अन्यथा सामान्यदृष्टीला जवळ असूनही विश्वरूप दर्शन घडणे असंभव आहे, आणि महान विभूतीच्या सान्निध्यात राहूनही त्याची महानतेची जाणीव होणे ही कठीण आहे.

माझे हायस्कुलातील शिक्षण बार्शीला मामांच्याकडे झाले. तेथे पू. दत्तमहाराज मधून मधून येत असत. चातुर्मासात तर चार महिने मुक्काम असे. माझे मामा श्री. कि. क. शेटे त्या काळातील B. Sc. LL. B. होते. श्रीदत्तमहाराज आले म्हणजे श्री. मामा व सौ. मामी यांची बराच वेळ चर्चा चालत असे. मामा–मामी यांचे रोज ज्ञानेश्वरी वाचन चालत असे त्यातील शंका ते विचारीत असत, आणि श्रीदत्तमहाराज उत्तर देत असत. मामा मामींना समाधान वाटत असे. हे मी लहानपणी अनेकदा पाहिले आहे. श्रीदत्तमहाराजांच्या प्रेमळ व रसाळ वाणीत काय जादू होती की आम्ही मुलं लहान असून– त्या विषयातील काहीही कळत नसून, ते बोलणे लक्ष लावून ऐकत असू.

त्या वेळचा एक प्रसंग माझ्या चांगलाच लक्षात राहिला आहे. मामींनी श्रीदत्तमहाराजांना कॉफी दिली. ती घेऊन ते भगवंत मंदिरात गेले. उरलेली कॉफी मामींनी घेतली– तेव्हा तिच्या लक्षात आले की कॉफीला साखरच घातली नव्हती. सायंकाळी श्रीदत्तमहाराज आल्यावर मामींनी त्यांची क्षमा मागितली. झाला प्रकार सांगितला. त्यावर श्रीदत्तमहाराज म्हणाले 'कॉफीत साखर घातली नव्हती काय?' म्हणजे कॉफी घेऊन चवीकडे लक्ष नव्हते, असे या प्रसंगातून स्पष्ट झाले. ही विदेही अवस्था असते असे आता ऐकून, वाचून लक्षात येते. ही माझ्या लहानपणची श्रीदत्तमहाराजांची स्थिती होती.

माझे लग्न माझ्या आईने ठरविले. बालमैत्रिणींनी विहिणी–विहिणी व्हायचे ठरविले. मातोश्रींनी मलाही बजावून ठेवले की, दत्तमहाराजांना वाईट वाटेल असे कधीही बोलायचे नाही की वागायचे नाही. मला हे सर्व मान्य होणारेच होत होते. पण मातोश्रींनी पुढाकार

घेतला होता. एवढ्या मोठ्या चांगल्या घरातली मुलगी आपल्या घरात यावी ही मातोश्रींची तळमळ. आमचे स्थळही कोणत्याही कारणाने नाकारण्यासारखे नव्हते. पण हा चांगलाच योग घालवू नये म्हणून मातोश्रींची धडपड. यातली मेख अशी असावी की पू. दत्तमहाराजांचे अलौकिकत्व त्या जाणून होत्या, पण मला त्याची काहीही कल्पना नव्हती. ही गोष्ट तोंडी सांगून समजणारी नव्हती. आमच्या मातोश्रींच्या पुण्याईने अशा महात्म्याचा दुहेरी ऋणानुबंध आला. हे खरे कारण माझ्या विवाहानंतर घडलेल्या अनेक प्रसंगांतून पू. श्रीदत्तमहाराजांचे व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडल्यावर लक्षात आले.

पू. श्रीदत्तमहाराजांच्या आचरणाचा, बोलण्याचा, वागण्याचा प्रत्येक सहवास– प्रसंगातून मनावर उत्तम परिणाम होत होता. पण योगायोग असा की पू. श्रीगुळवणी महाराज यांचाही बार्शीमुळे संबंध आला. हा संबंधही असा होता की त्यातून पू. श्रीदत्तमहाराज पू. श्रीधुंडिराजमहाराज यांच्या संबंधीची श्रद्धा–भक्ती वाढतच रहावी.

एकदा देऊळगाव राजा येथे झालेल्या दत्तयागासाठी आम्ही उभयता गेलो होतो. तेथे दोन दिवसांनंतर सायंकाळी मी महाराजांचे दर्शन घेतले व माझी अडचण त्यांच्यापुढे ठेवून मार्गदर्शनाची प्रार्थना केली. यागाचे तिसरे दिवशी माझ्या मामाच्या नातवाचे लग्न पुण्यास होते. माझे हायस्कूलचे शिक्षण मामांकडे झालेले. मी सहा महिन्यांचा असताना दुर्दैवाने पितृछायेस पारखा झालो होतो. तेव्हापासून मामांनी पालकत्व स्वीकारलेले. हे सर्व संबंध महाराजांना ज्ञात होतेच. तेव्हा त्या लग्नाला जाण्याचा निर्णय घ्यावा की हा तितकाच महत्त्वाचा दत्तयागाचा कार्यक्रम पाहून येथील प्रसाद घ्यावा? प्रश्न माझा एकटचाचा नव्हता, लग्नाला आम्ही उभयतांनीच जाणे योग्य ठरणारे होते. आता एक दिवस म्हणजे चोवीस तास राहिलेले होते. या अडचणीत पू. श्रीदत्तमहाराजांनी केलेले मार्गदर्शन म्हणजे त्यांच्या समतोल न्यायदृष्टीचे उत्तम उदाहरण म्हणता येईल. ते म्हणाले–

"तुम्ही आज रात्रीच्या एस. टी. च्या गाडीने पुण्यास जावे. म्हणजे मामांनाही आनंद होईल. शिवाय आपण येथेच राहिलात तर मामांना दुःख होईल व तुम्ही केवळ शरीरानेच देऊळगावी राहून मनाने

पुण्यासच असाल. त्यापेक्षा आपण उभयतांनी पुण्यास शरीराने जावे व इकडचे परमेश्वर–उपासना–दत्तयाग याचे मन:पूर्वक स्मरण करावे हेच उचित." अत्यंत मोलाचे मार्गदर्शन करून त्यांनी आम्हाला प्रपंच आणि परमार्थ यामध्ये कशी दृष्टी ठेवावी, कसा संबंध ठेवावा हे स्पष्ट करून सांगितले. प्रपंच–व्यवहारासाठी शरीर वापरा आणि परमार्थासाठी मनाची योजना ठेवा, हे अनुसंधान आहे.

पू. महाराजांचे तात्त्विक मार्गदर्शनाने हा भाग संपला नाही. तो महत्त्वाचा तर आहेच पण त्यांची शक्तीही त्यांनी आमचे पाठीशी ठेवून दिली. त्याचे असे झाले–

लग्नसराईचे दिवस, ऐनवेळी ठरल्यामुळे तिकिटे रिझर्व्ह करू शकलो नव्हतो. गर्दी तुफान, रात्रीतून पुण्यास गेले तरच मुहूर्त मिळणार. देऊळगावराजाहून आम्ही जालन्यास आलो. तेथील एस. टी. स्टँडवर गेलो. पुण्यासाठी १५० लोकांची रांग लागलेली. यात आपला नंबर कसा लागणार ? रिझर्व्हेशन केलेले लोक रांगेत उभे राहात नाहीत. मी अस्वस्थ झालो व एका बाकावर बसलो. इतक्यात एक गृहस्थ माझेजवळ आला व म्हणाला, आपण दोघे पुण्यास जाणार आहात काय ? माझेजवळ तीन रिझर्व्हेशन्स आहेत. पैकी दोघांचे जाणे आकस्मितपणे रहित झाले आहे. ही तीनही तिकिटे तुमच्याजवळ ठेवा, गाडीत बसल्यावर पैसे द्या. या योगायोगाच्या मागे श्रीमहाराजांची शक्ती आहे याची मनोमन जाणीव झाली आणि मनातील श्रद्धा दृढ झाली. असा हा दयासिंधू सदैव आमचे समीप आहे, आम्ही या कल्पवृक्षाचे छायेखाली आहोत, त्यामानाने आमचे हातून उपासना व सेवा घडत नाही याचे मनाला वैषम्य वाटते.

माझ्या पत्नीनेही बरेच अनुभव दिलेले आहेत, मी केवळ कृतज्ञताबुद्धीने चार शब्द लिहिले आहेत. नित्य अनुभवांचे भांडार भरलेले आहे. श्रीचरणी प्रार्थना एवढीच आहे की पू, श्रीदत्तमहाराजांना संतोष होईल असे आमचे हातून कर्म व उपासना घडावी आणि हे पाहण्यासाठी परमेश्वराने त्यांना निरामय आयुरारोग्य व उदंड आयुष्य द्यावे.

॥ श्रीगुरुदेव दत्त ॥

* * *

# श्रीसद्गुरु सेवामृताचे आचमन !

लेखक – **बालमुकुंद पंडित**, अहमदाबाद

**संदर्भ** – श्रीबालमुकुंद पंडित हे पू. श्रीगुळवणीमहाराजांचे अनुगृहीत. अत्यंत श्रद्धावान, स्व. प्रा. भाईजी चौहान यांचा उत्तम सहवास लाभलेले, मागील पिढीतील, चिंतनशील गुरुबंधू. अशा ज्येष्ठ गुरुबंधूंनी पू. श्रीदत्तमहाराजांचे विविध प्रसंगातून घडलेले दर्शन श्रद्धाभक्तीने शब्दांकित केलेले या लेखात वाचू या.

—संपादक

**ती. प. पू. ब्रह्मश्री योगीराज श्रीदत्तमहाराज**

गेल्या वर्षी मे महिन्यात पू. श्रीरंग तपोभूमी नारेश्वर येथे पू. दत्तमहाराजांचा श्रीभागवत् सप्ताह आनंदोल्हासाने संपन्न झाला होता. २।३ वर्षांच्या सततच्या अवर्षणाने रखरखीत उन्हाची प्रखरता वाढली होती. भरदुपारी श्रीदत्तमहाराज आपल्या मधुर, रसाळ, देववाणीने, मोठ्या तन्मयतेने एकेका प्रसंगाचे रहस्योद्घाटन करीत. निरूपणाचे वेळी जी आसनस्थिती सुरवातीला घेत तीच शेवटपर्यंत असे. मांडीसुद्धा हालवीत नसत सबंध सप्ताहभर अस्खलितपणे निरूपण चालत असे. आम्ही श्रोते उन्हाने त्रस्त होत होतो. माझ्यासारखे अधून मधून पाणी पिण्यासाठी स्थान आणि श्रवण सोडून जात येत होतो. परंतु पू. योगिराजांच्या सप्ताहभरच्या माध्यान्हीच्या समापनाच्या कार्यक्रमात कोणताही खंड होत नव्हता. पू. श्रीदत्तमहाराजांच्या या योगवैभव दर्शनाचा लाभ घडत होता. अमृत श्रवण आणि योग–दर्शन असा दुहेरी लाभ घडत होता. सारेच विलोभनीय !

**भक्तवत्सल ती. पू. श्रीदत्तमहाराज**

पू. श्रीदत्तमहाराजांची 'कर्णावती' (अहमदाबाद) भेट म्हणजे आनंद–उल्हास–उत्साह–भावभक्तीची मंगल पर्वणी ! आल्या दिवसापासून, परत जाण्याच्या प्रवासाला निघेपर्यंत दर्शन पूजनाचे भरगच्च

कार्यक्रम होत असत. या वयोमानातसुद्धा अविश्रांतपणे, प्रसन्न चित्ताने, सर्वांच्या घरी जाणे–येणे, समाधान होईपर्यंत आपुलकीने साऱ्यांची विचारपूस करणे, मार्गदर्शन करणे चालू असे, या सौजन्याधिकारी साक्षात श्रीगुरुमूर्तीकडून ! "प्रपंचाकडे हळूहळू लक्ष कमी करून परमार्थाकडे अधिकाधिक वळायचे लक्षात ठेवले म्हणजे झाले. साधनेने सारे होईल. काळजी करू नका. साधना चालू ठेवायची. रोजचं ठीक चाललं आहे. उत्तम आहे." अशा मोजक्या शब्दांत स्मरण–चालना देऊन निरोप घ्यायचा ! पितृतुल्याहून श्रेष्ठ–विशेष जिव्हाळ्याचा मिळालेला श्रेयार्थी परिपाठ विसरवत नाही.

साधक परिवारात स्वयंसिद्ध साधनाशक्तीने आणि "श्रीवासुदेव-निवास" या त्रैमासिकाच्या पोषक–प्रेरक–बलदायी स्तन्याने बाळसे वाढून नित्यनेमाने ज्ञानजागरण, मार्गदर्शन, डोळसपणाने प्राप्त झाल्याने जाणते–अजाणतेपणाने आपल्यात समृद्धपणे परिवर्तन होत असल्याचे बघून 'श्री' ना मोठा आनंद होतो.

रेल्वेत प्रथम वर्गात स्थानापन्न झाल्यावर गाडी सुटायला अवकाश असल्याचे कळले की गाडीबाहेर उभ्या असलेल्या भक्त परिवाराच्या मंडळींशी बोलण्यासाठी गाडीच्या खिडकीजवळ उभे राहून "घरी पोचायला रात्रीचा उशीर होईल ना ! बस उशिरा रात्रीची मिळेल का ?" अशा जिव्हाळ्याचे प्रश्न करीत. देह–विभिन्नतेचे विस्मरण करून भावुकतेने निरोप द्यायला आलेल्या मंडळीच्या अडचणी–भावना याचे सहृदयी स्मरण ठेवून विचारपूस करीत असताना मला एकदा गहिवरून आले होते. पण ! हो, मी ते कळू न देण्याची दक्षता घेतली होती.

पू. 'श्री' दुसऱ्या दिवशी प्रातःकाळी बोरीवलीला पोहोचले होते, व तेथून स्मरणपूर्वक– 'येथे आम्ही सुखरूप पोचलो आहोत. या वेळी पण आपल्या बिऱ्हाडी येऊन आपणा सर्वांना भेटून संतोष झाला, येथील कार्यक्रमानंतर उद्याला पुण्याला जात आहोत,' असे प्रेमार्द्रतेचे अनपेक्षित पत्र आम्ही सर्वांनी वाचल्यावर सर्वांचे डोळे पाणावले होते. भक्तवात्सल्याची करुणामूर्ती भक्तांच्या भावना किती हळुवारपणे पोसत असते ! या सर्व घटना प्रसंगाने पू. श्री. दत्तमहाराजांची सहृदयी,

भक्तवत्सल, करुणामयी गुरुमूर्ती नजरेआड होऊ शकत नाही, त्यांचेबद्दलची भावभक्ती टळत नाही. ते सतत अंतर्यामी आहेत त्याची ही अमृतानुभूती !

दोन वर्षापूर्वीच्या रामनवमीला बोईसरला नातेवाईकांकडे अचानक जाणे झाले. कुळाचाराच्या माझ्या उपवासाच्या दिवशी, तसेच श्रीरामप्रभूंच्या जन्मसोहळचाचे कीर्तन–दर्शनाचा लाभ हुकला ! जाणे अनिवार्यही होते. परंतु भगवंताची कृपालीला वेगळीच होती. मी गेलो होतो तेथील टी. ए. पी. एस्‌ कॉलनीच्या दक्षिण भारतीय मंदिर संकुलात श्रीप्रभुराया रामचंद्राच्या नावाने बांधल्या गेलेल्या मंदिरात त्याच पुण्यदिवशी श्रीरामचंद्रजींच्या मनोरम मूर्तीची प्राणप्रतिष्ठा विधिपूर्वक होऊन श्रीरामजन्माचा सोहळा पण संपन्न झाला असल्याने श्रीदर्शन झाले. सुंदर सुगंधित तीर्थजल, व उत्तमोत्तम प्रसादप्राप्ती झाल्याने मन प्रसन्न झाले होते.

दुसरे दिवशी मी ती. पू. श्रीदत्तमहाराजांच्या दर्शनास–पुण्यास श्रीवासुदेव निवासात आलो. त्यावेळी पू. श्रीदत्तमहाराजांची रिक्षा आश्रमासमोर उभी राहिली. मागोमाग मीही रिक्षाने तेथे जाऊन पोचलो. केवढा आनंद झाला. त्यावेळी हैद्राबादचे श्री. आजेगांवकर गुरुबंधू व गु. बं. श्री साबळे शेठजी आश्रमात आले होते. मी श्रीचरणी साष्टांग नमस्कार घातला. वंदन केले, महाराजांनी निरुपम आनंद व्यक्त केला. ज्येष्ठ गुरुबंधू श्रीमान गोविंदशेठ साबळे यांचे माझेकडे लक्ष गेले आणि माझ्यापेक्षाही उत्तम गुजराथी भाषिकाने बोलावे तसे उत्कृष्ट गुजराथीमधून बोलायला सुरुवात केली. तेव्हा मला मनापासून आनंद झाला होता. सायंकाळ होत आली होती. मी तेथे नसल्याचे समजून पू. श्रीदत्तमहाराज तेथील आश्रमवासीय विद्यार्थ्यांना व व्यवस्थापकांना सांगत होते– ‘आता आलेले पंडित आपलेच आहेत बरं का ! ते येथेच राहतील. त्यांची सारी व्यवस्था बघा. दोन्ही सांज भोजनाचे वेळी त्यांना बरोबर घेऊन बसत जा.’ अशा अपूर्व प्रेम–जिव्हाळचाच्या कुटुंबातील वडीलकीच्या व्यावहारिक दक्षतेच्या सूचना देत होते. मी विलक्षण आश्चर्यमुग्ध होऊन गेलो होतो. तेवढचात तेथील एका विद्यार्थ्याने ‘महाराज, हे काय पंडितजी तर येथे उभे आहेत.’

'हो का?' म्हणून माझेकडे पाहून म्हणाले, 'येथेच सारी व्यवस्था झाली आहे. आश्रमात चहापाणी-भोजनाची तुमची व्यवस्था राहील. उद्या पुन: भेटूच. मी आता घरी चलतो.' हे आत्यंतिक अनौपचारिक निर्व्याज प्रेमाचे हे आपलेपण अनुभवताना मनात आले- बहुमोल मानवी जीवनमूल्यांची कोटी कोटी संपदा येथे एकवटली आहे.

श्रीवामननिवास या श्रीस्मृती पवित्र वास्तूच्या व श्रीजन्मशताब्दी उत्सव प्रसंगीही-एवढ्या मोठ्या घाईगर्दीत माझ्या मुलाला चि. श्रीकांतला त्याचेजवळ जाऊन, 'जेवलास का? जेवायला बसून घे' सांगितले. दूरच्या, अपरिचित, संकोची भक्तांकडे लक्ष पुरवणारी माउली किती दक्ष आहे हेच जाणवते.

**मध्यवर्ती श्रीयोगीपीठाचे अनुसंधान सातत्य**

पू. श्रीदत्तमहाराज बहुधा सतत प्रवासात असतात. त्यामुळे त्यांचे ठिकाणांचा पत्ता समजणे शक्य नसते. म्हणून आम्ही परगावची भक्तमंडळी पुण्याच्या पत्त्यावरच मध्यवर्ती श्रीयोगपीठाचे केंद्रस्थानी पत्रे पाठवितो. तर माझा अनुभव असा की मी पुण्याला पाठविलेले पत्र श्रींना गाणगापूरला पोचले व मला उत्तर गाणगापूराहून आले. त्यानंतर काही तपशील कळवायचा राहिला म्हणून परत पुण्यालाच पत्र पाठविले. अद्याप श्रींचा प्रवास चालूच होता. तेव्हा मला नाशिकहून पत्रोत्तर आले. त्या दोन्ही पत्रांतील संदर्भसूत्र पूर्ण सांभाळलेले होते. म्हणजे महाराज प्रवासात असले तरी त्यांना मध्यवर्ती श्रीयोगपीठाचे अनुसंधान सतत असते. मला पत्रोत्तराने फार समाधान झाले.

**श्रीगुरुचरित्राच्या १४ व्या अध्यायाची फलानुभूती**

गांधीनगर येथील श्रीदत्तमंदिरात प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांच्या मूर्तिप्रतिमेचे प्राणप्रतिष्ठा पूजन श्रीदत्तमहाराजांच्या पुण्यहस्ते झाले. त्यावेळी तेथील सामाजिक परिस्थिती अत्यंत भयानकपणे स्फोटक झाली होती. बस व्यवहार थांबले होते. गेल्या ६/७ वर्षांपासून कर्णावती ही राक्षसभूमी झाली असल्याचे भारतभर प्रसिद्ध होऊन चुकले आहे. निर्दोष व्यक्तींच्या निर्घृण हत्त्या, वाहन चालकांना घेराव घालून जाळून टाकणे, ब्लेड मारणे, सुराबाजी करणे, हे जणू दैनंदिन व्यवहार होऊन गेले आहेत. आसुरी तत्त्वांना ऊत येऊन

महाभयंकर विनाशक जीवघेण्या घटना आठवल्या म्हणज अंगावर शहारे येतात.

माझ्या ऑफिस इमारतीच्या परिसरात-येथील कुप्रसिद्ध भागात परवाच पाच निर्दोष व्यक्तींचे निर्घृण हत्या-प्रसंग घडले. शेकडो लोक प्रसंगोप्रसंगी मारले गेले आहेत.

तीन वर्षापूर्वी श्रीक्षेत्र गरुडेश्वराला गुरुपौर्णिमा पूजनाला प. प. श्रीवासुदेवानंद स्वामी महाराजांचा परिवार थेट माणगावहून मुद्दाम श्रीसमाधी मंदिराच्या दर्शनाला आला होता. त्यांनी बरोबर श्रीगुरुचरित्राच्या १४ व्या अध्यायाच्या प्रती वितरणासाठी आणल्या होत्या. त्या श्रीकृपेने श्रीरक्षाकवचाच्या भावनेने मलाही मिळाल्यात. नित्य पठणासाठी ठेवून घेऊन बाकीच्या वाटून दिल्या.

श्रीकृपेने माझा सांभाळ होत आहे. अशा भयंकर प्रसंगी, आतंकवाद्यांपासून, गुंडांपासून, संरक्षण मिळावे म्हणून माझ्या कार्यालयाच्या इमारतीत मिलिटरी ठाणे योजले गेले आहे. त्यामुळे आमचे संरक्षण झाले आहे. पोलिस चौकीसुद्धा पक्क्या बांधकामाची उभारली जाऊन तेथेही बंदुकधारी सशस्त्र पोलीस रात्रंदिवस पहारा करीत असतात. बाह्य संरक्षण योजना ही व्यवहारदृष्टीने सर्वांसाठी झाली आहे हे खरे असले तरी या सुविधेबरोबरच १४ व्या अध्यायाचे नित्यपठणाने आम्हालाही असा विश्वास वाटू लागला आहे की दत्तप्रभू हे भक्तांचे रक्षकही आहेत.

सारे अनुभव येथे प्रस्तुत करणे अशक्य आहे. पू. दत्तमहाराजांची उंची-व्याप्ती-अक्षरश: आकाशाएवढी आहे. आत्माभिमान, गौरव, साधना, भक्ती, या विवेक चूडामणीची, वैराग्यशील, समर्थ श्रीसद्‌गुरु योगाचार्यांच्या श्रीकृपेने आमच्या वाढीला गती देणारी, प्रेरणा देणारी, चिरंतन ठरली आहे. श्रींच्या नित्याध्यासी असलेल्या चिंतन-मननात आम्हा सर्वांची उत्तरोत्तर श्रद्धा वाढत राहो. आमच्या दुरितांचा, दुर्मतीचा, दैन्याचा क्षय होवो ही सश्रद्ध प्रार्थना श्रीचरणी समर्पण करीत आहोत.

प. प. श्रीवासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांच्या मांडीवर खेळविलेल्या या बालकापासूनच धीर-गंभीर-वैराग्यशील-दत्तबाळाला

कपोलस्पर्शाने प. प. श्रीटेंबे स्वामींनी प्रसन्नचित्त करवून, प्रेषित करून, ‘धन्य धन्य हा नरदेहाचा’ साक्षात्कार घडविण्यासाठी, आम्हा साऱ्यांचे मंगल, कल्याणाचे द्वार–श्रीचित्शक्ती उद्दीपित करविली आहे. श्रीदर्शन शांतीचा हा पुण्योत्सव आम्ही समाधानानंदाने पुण्यनगरीत उजवीत आहोत. आणिकही यासाठी पू. श्रीदत्तमहाराजांना सुस्वास्थ्य लाभून उदंड आयुष्य प्राप्ती व्हावी अशी सर्वेश्वरचरणी आम्हा सर्वांची उत्कट भावपूर्ण प्रार्थना करून, आमचे कोटी कोटी वंदन करीत करीत ‘धन्योऽहम् धन्योऽहम्’च्या कृतज्ञतेच्या जाणिवा व्यक्त करीत आहोत. श्रींच्या आकाशा एवढ्या उत्तुंग उंचीच्या श्रीगुरुतत्त्वाला रसेश्वर सर्वेश्वरला बहुमोल आर्षपरंपरेच्या, बहुमोल जीवनमूल्यांच्या धर्मनिष्ठाला आमचे अनेकानेक सहस्रशः प्रणाम !

* * *


# पैनगंगा प्रकल्प मंडळ सेवकांची सहकारी पतसंस्था, नांदेड

**कार्यालय : रीजनल वर्कशॉप, नांदेड ४३१६०२ ( महाराष्ट्र )**

**संस्थेची सांपत्तिक परिस्थिती – २८–२–१९९० अखेर**

(१) सभासद संख्या–१०२०. (२) भाग भांडवल–१८,७२,८३०

(३) क्लीन कॅशक्रेडिट–५०,००,००० (४) क्लीन कॅशक्रेडिट उचल–३५,०६,८५५

(५) सभासद ठेव–५५७७४८ (६) गुंतवणूक–३०६८३०

(७) कर्जवाटप येणे–५९,२४,९६७ (८) खेळते भाग भांडवल६२,४७८२८

(९) स. ठेवीवर व्याज १२ % (१०) सभासदांना लाभांश वाटप–९%

तपासणी वर्ग–‘अ’

**अध्यक्ष**– सरदार परमेश्वर सिंग. **कार्याध्यक्ष**– धर्मराज दि. सरोदे.

**संचालक**–(१) एन्. एस्. रामचंद्रराव. (२) एन्. एम्. डावकरे. (३) पी. एम्. शेळके. (४) डी. पी. बोरसे. (५) पी. एस्. नरवाडे. (६) आर. एम्. मुखेडकर (निमंत्रित). (७) डी. जी. हणमंते निमंत्रित

**सचिव**– जी. एम्. पोटपेलवार **सहसचिव**– ई. आर. ठाकूर

# संतांचिये पायी हा माझा विश्वास

लेखक – **अजित कुलकर्णी**
B. A., M. A. (Philosophy) पुणे

**संदर्भ** – श्री. अजित कुलकर्णी हे अनेक संतांच्या कृपाशीर्वादाने–सत्संगतीने धन्य झालेले गुरुबंधू आहेत. प. पू. भगवान श्रीधरस्वामींचा सहवास व मार्गदर्शन लाभलेले भाग्यवान साधक आहेत. पू. श्रीदत्त-महाराजांचा आणि त्यांचा ऋणानुबंधही अपत्यप्रेमाइतका घनिष्ठ आहे. आनंदाश्रमात (पुणे) गेली ३५ वर्षे चाललेली वार्षिक 'श्रीगुरु-चरित्र अखंड पारायण' संस्थेचे पू. श्रीदत्तमहाराज अध्यक्ष आहेत आणि श्री. अजित कुलकर्णी हे कार्यवाह आहेत. वारकरी संप्रदायातील वै. पू. देशमुख महाराजांच्या दिंडीचे ते मान्यवर पदाधिकारी आहेत. पू. श्रीदत्त महाराजांसंबंधीचे आपले भाव त्यांनी या लेखात शब्दांकित केले आहेत.

संपादक



॥ श्री ॥

संताचिये पायी हा माझा विश्वास
सर्वभावे दास झालो त्यांचा ॥ १ ॥

तेचि माझे हित करिती सकळ
जेणे हा गोपाळ कृपा करी ॥ २ ॥

भागलिया मज वाहातील कडिये
त्यांचियाने जोडे सर्व सुख ॥ ३ ॥

तुका म्हणे शेष सेवीन आवडी
वचन न मोडी बोलिले ते ॥ ४ ॥

हा अभंग संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांचा आहे. ब्रह्मश्री दत्त-महाराज कवीश्वर यांच्या सहस्रचंद्रदर्शन शांति महोत्सवाच्या प्रसंगी, श्री पं. पू. प. श्रीधरस्वामी महाराजांच्या प्रेरणेने ही अल्पशी वाङ्मयीन-सेवा लिहीत आहे.

कवीश्वर महाराजांचे जीवन अनेकविध पैलूंनी नटलेले आहे. प्रत्येक पैलूची किनारही महात्म्यांच्या कृपाआशीर्वादाने सजलेली आहे. महाराजांचे जीवन मंगलमय दिसते. 'प्रपंचात भाग्य व परमार्थात वैराग्य' याचा सुरेख संगम झाला आहे.

संत महात्म्यांची जीवन चरित्रे ही आमच्यासारख्या प्रापंचिकांना दीपस्तंभासारखी मार्गदर्शक ठरत असतात. असे महाराजांचे चरित्र-दर्शन व अनुभव कसे कथन करावेत हे अतिशय आनंदामुळे सहज शक्य नाही. म्हणून मी संतवाणीच्या आधाराने कवीश्वर महाराजांच्या जीवनगंगेचे दर्शन घेत आहे. त्यात न्हात आहे.

या इथे– संतशिरोमणी तुकाराम महाराज संताचे वर्णन आपल्या अभंगवाणीत करीत आहेत. त्या वाणीच्या आधारे मी माझे विचार प्रकट करीत आहे.

पहिल्या कडव्याचा भावार्थ :

संताच्या ठिकाणी माझा विश्वास आहे. म्हणजे विश्वासाचे स्थान निश्चित झाले. व त्यामुळे मी त्यांचे दास्यत्व स्वीकारले आहे. त्यांना निश्चित असे वाटते की, संतावाचून जीवाचा उद्धार होणार नाही. आणि म्हणूनच ते म्हणतात की सर्वस्वपणे मी त्यांचा दास झालो आहे.

कवीश्वर महाराजांची माझी भेट, श्रीमंत सरदार ग. या. तथा दादासाहेब नातू यांचेमार्फत २० वर्षापूर्वी पडली. लहानपणापासून आनंदाश्रमात जात असल्याने तेथे महाराजांचे दर्शन निश्चित होत असे परंतु जवळीक साधली नाही, ती साधली कै. नातूंमुळे! अत्यंत शांत, गंभीर मुद्रा अशा व्यक्तिमत्त्वाची ही भेट! योगायोग असा की, श्री प. पू. श्रीधरस्वामी महाराजांनी देह ठेवला आणि कै. नातू यांचेमार्फत महाराजांची समक्ष भेट झाली हा धागा, या ऋणानुबंधास प्राप्त झाला! श्रीस्वामी महाराजांचे ठिकाणी महाराजांचे स्थान दृढ झाले.

ही ईश्वरी कृपा होय !

"यो वै ज्येष्ठश्च श्रेष्ठश्च !" हे वचन अत्यंत श्रेष्ठ अशा शक्तीच्या योगे अत्यंत सामर्थ्य प्राप्त करून देणारा व ज्याच्यापेक्षा अधिक सामर्थ्यवान कोणीही नाही अशा महापुरुषास समर्थ म्हटले जाते. कवीश्वर महाराजांच्या, या श्रेष्ठ व्यक्तिमत्त्वाच्या विभूतीलाच ' समर्थ ' म्हणून संबोधणे योग्य ठरते आणि म्हणूनच संतवचनात असे म्हणावेसे वाटते की त्यांचा दास म्हणवून घेण्यात अतिशय आनंद वाटतो. अशी भेट होणे हे निश्चित दुर्लभ आहे. ब्रह्म एक आहे. जीव अनंत आहेत. संत एक असतात म्हणूनच जीवाची भेट दुर्लभ आहे. म्हणूनच तुम्ही आम्ही– आपण सर्वजण महाराजांचे कृपाछत्राखाली निःसंकोचपणे वावरत आहोत. म्हणूनच त्यांचे दास्यत्व पत्करण्यात आनंद आहे.

तुकाराम महाराजांचे वैशिष्टच आहे. ते असे, की त्यांना जे अभंगवाणीतून प्रकट करावयाचे असते ते ते तिसऱ्या चरणात विदित करीत असतात; ते असे.

"तेचि माझे हित करिती सकळ । जेणे हा गोपाळ कृपा करी ।। "

संतांचा महिमा, त्यांचे माहात्म्य कळावयाला दुर्गम असते. अत्यंत कठीण असते.

"संताचा महिमा तो बहु दुर्गम । शाब्दिकांचे काम नाही तेथे ।"

महाराजांचे जीवनचरित्र गंगेप्रमाणे निर्मळ निरतिशय शांत, आनंदमय आहे. शब्दही ते काम परिपूर्ण रीतीने करू शकतील असे वाटत नाही.

म्हणूनच श्रुती म्हणते, ' तस्य नेती नेती इति आदेश । ' महाराजांचे सर्वश्रेष्ठ व प्रगंड ज्ञानाची कल्पनाच करता येत नाही. आणि म्हणूनच संतवाणी– (भावार्थ ढोबळपणे)

संतांचे ठिकाणी विश्वास ठेवला व सर्व भावाने त्यांचा दास झालो म्हणजे तेच माझे हित करू शकतील व त्यामुळे त्या गोपाळाची, त्या परमेश्वराची कृपा मजवर होईल.

संतांची सेवा करावी. ते जे सांगतील ते श्रवण करावे. बोध घ्यावा व त्यामुळे जीव कृतार्थ होतो. जगात जीवाचे हित करणारे दोन आहेत. एक श्रुती व दुसरे संत. श्रुती जीवाचे हित करीत असली तरी

ती दुर्बोध आहे व संत सुबोध आहेत. श्रुति ही हिताची ज्ञापक आहे व संत हे हित प्रापक आहेत. आणि संतांनी आपले हित केले म्हणजे काय होते ? " जेणे हा गोपाळ कृपा करी " महाराजांचा भागवत सप्ताह अनेकांनी ऐकला असेल. त्यावेळच्या भक्तिरसपूर्ण विवेचनामुळे या ज्ञानामृत गंगेत आपण सर्वजण डुंबून जात असतो. कारण त्यावेळी साक्षात गोपाळ कृपा आपल्या भोवती नव्हे तर महाराजांचे समोर उभे असतात. आणि असे हे हित आपणा सर्वांचे साधून गोपाळाची कृपा प्राप्त करण्यास आपण भाग्यवान ठरतो. याला एकमेव कारण ते म्हणजे–

श्रीदत्तमहाराजांची अखंड भागवत सेवा ! त्यात ते आपणा सर्वास परममंगल स्थानी नेतात. हेच गोपाळाच्या कृपेस पात्र होते.

महाराजांचे बाबतीत हा झाला पारमार्थिक अनुभव. पण सामान्य माणूस व महाराज यांच्यात एक जिव्हाळ्याचे नाते आहे. त्यांचेकडे येणारा प्रत्येक माणूस आपल्या मनातील भाव निःसंकोचपणे मांडत असतो. हे प्रत्यक्ष भेटीत असेल अथवा पत्रव्यवहाराद्वारा असेल. पण हे सर्व कशामुळे आहे तर ही जीवास खात्री आहे की, हाच आपला विसावा ! सर्वांना एकच अनुभव व तृप्तीची जाणीव ! ती म्हणजेच " भाग गेला क्षीण गेला ! आवघा झाला आनंद ! " सर्वांस एकच आधार आहे.

भागलीया मज वाहतील कडिये । त्यांचेयेनि जोडे सर्व सुख ।।

सुख सापेक्ष आहे. आपण सर्वजण परमार्थ मार्गाची वाटचाल करणारे आहोत ना ? मग या वाटचालीत परमार्थ सुखाच्या शिवाय दुसरी अभिलाषा असणे शक्य नाही.

(भावार्थ–ढोबळपणे)

या वाटचालीत जर साधक थकला भागला तर ते संत साधकाला कडेवरून नेतात. त्यामुळे सर्व सुख प्राप्त होते. जीवन कृतार्थ होते. महाराज–

साधना करताना दमल्यावर ते आपणांस समाधान प्राप्तीचा मार्ग सांगतात. उपासनेचा मार्ग सांगतात. सर्वांनाच सुखाची इच्छा असते. पण आनंदस्वरूप म्हणजेच परमसुख हे मोक्ष आणि श्रीगुरूंच्या हातीच ही

मोक्षश्री आहे. त्यांचे वर्णन तरी कसे करावयाचे व किती करावयाचे ! त्यांच्या कृपाप्रसादानेच जन्ममरण नाहीसे होऊन, जन्ममरणाच्या कारणीभूत असलेल्या वासना नष्ट होतात. असे गुरु सर्वतोपरी श्रेष्ठ होत.

तुका म्हणे शेष घेईन आवडी । वचन न मोडी बोलिले जे ।।

(ढोबळ भावार्थ) – तुकाराम महाराज म्हणतात, अशा संतांचे मी आवडीने उच्छिष्ट सेवन करतो; कारण त्यांनी दिलेला शब्द–त्यांची वाणी कधीही खोटी होत नाही.

एकदा का संतांनी आपल्याला आपलं म्हटलं की जीवनाचे सार्थक होईल. महात्मे जे सांगतात, त्यांच्या मार्गदर्शनाने चालण्यानेच आनंदाची वाटचाल होते. जीवन कृतार्थ होते.

भक्ताबाबत परमात्मा दयाळू आहे. कृपाळूपणे अल्प धारिष्ट पाहे.

याप्रमाणे परमेश्वर भक्ताविषयी परीक्षा घेतो, पण संताच्या कृपेने ईश्वराचा अनुग्रह प्राप्त होतो. आणि म्हणूनच सद्गुरु सर्वश्रेष्ठ आहेत.

" मच्चितः सर्व दुर्गानि मत्प्रसादातरिष्यासि ।। " (भ. गी.)

माझ्या ठिकाणी चित्त एकरूप करून एकाग्रतेने माझी आराधना केलीस तर तुझी सर्व दुःखे नष्ट होतील, असे भगवंताचे सांगणे आहे. याप्रमाणे आराधना करणाऱ्या भक्ताला कोणत्याही बंधनाची किंवा विघ्नांची बाधा न होता ते दिव्यपद प्राप्त होऊन आनंदित होतात. अशाप्रकारे काया वाचा मनाने आपले जीवन व्यतीत करता यावे.

आईका यशश्री औदार्य । ज्ञान वैराग्यऐश्वर्य ।
हे साही गुणवर्य वसती । तेथे म्हणौनि तो भगवन्तुः ।।

ज्ञा. अ. ६–३७.

निर्गुण परमात्मा हा व्यापक व पूर्ण आहे निर्गुण परमात्मा सगुण होऊन त्या देवाचे रूप धारण केले आहे. म्हणून त्यांना भगवंत असे म्हणतात. कवीश्वर महाराजांचे बाबतीत अशी अनुभूती अनेकांना आली आहे.

आणि असा हा भगवंत–
नाहं वसामि वैकुंठे, योगिना हृदयै रवो ।
मत्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद ।।

असा हा परमेश्वर वैकुंठात नाही तर, या थोर विभूती भोवती बद्ध झाला आहे. आम्हांसही या थोर विभूती कवीश्वर महाराजांचे इथे दास्यत्व स्वीकारून त्यांचे वचनाचे ठिकाणी मन, चित्त, वृत्ती लीन राहून–

"आनंदाचे डोही आनंद तरंग
आनंदाचे अंग आनंदाते ॥"

ही अनुभूती प्राप्त होऊ दे हीच या मंगल प्रसंगी प्रार्थना.

* * *

## कोसंब्याचे पू. 'पंडितजी' यांना श्रद्धांजली

प. पू. श्रीरंगावधूतमहाराजांचे शिष्य–श्रीगुळवणीमहाराजांचे अनुगृहीत पू. श्रीपंडितजी (कुलकर्णी) हे नर्मदा प्रदक्षिणा करून सुरत



जवळ कोसंबे येथे नर्मदाकाठी झोपडीवजा आश्रम बांधून राहिले होते. त्यांना भजनाची फार आवड होती. ते स्वतः उत्तम आवाजात भजने म्हणत. नामस्मरणाच्या धूनमध्ये तासन् तास ते रंगून जात असत. त्यांच्या आश्रमात पू. गुळवणी महाराज जाऊन आले होते. पू. श्रीदत्त महाराजही त्यांच्या भेटीसाठी गेले होते. पू. पंडितजींनी गरुडेश्वरला नुकतीच जागा खरेदी केली. तेथील बांधकामाचा विचारविनिमय करण्यासाठी ते एका भक्ताच्या मारुतीकारने गरुडेश्वरला गेले होते. दर्शन घेऊन परतल्यावर वाटेत मोटारगाडीला अपघात होऊन पंडितजींना खूप मार बसला. गेले सात आठ महिने ते प्लॅस्टरमध्येच होते. चैत्र महिन्याचा मध्यात (हनुमान जयंतीचे दिवशी) ते दत्तचरणी लीन झाले. सर्व दत्तभक्तांची त्यांना श्रद्धांजली समर्पित.

* * *

॥ श्री गुरुदेव दत्त ॥

# गुरुकृपा

लेखक – शामकुमार साधनकर
शिवाजीनगर धामणगाव रेल्वे
[जि. अमरावती] ४४४७०९

गुरु हरि हर विरंची जाण, स्वरूपे तोचि नारायण।

विद्वत्ता, कला, चातुर्य, कवित्व, भक्ती, ज्ञान, वैराग्य, बोलण्याची माधुरी इत्यादी दैवी संपत्ती तर नाहीच पण आसुरी संपत्तीने मात्र आम्ही भरपूर श्रीमंत आहो. अहंकार, अवगुण, अज्ञानादी विषयांतच आयुष्याचा बराच काळ लोटला गेला.

प्रपंचात सुख नव्हतेच, कारण पूर्व प्रारब्धानुसार शारीरिक, मानसिक स्वास्थ्य पूर्णपणे ढासळले होते. अशावेळी दैवीकृपेने आशेचा किरण उगवला. पुलगावला चाळीस वर्षांच्या नोकरीत शेवटीशेवटी एकदा प्रवासभत्तेचा योगायोग आला. त्यावेळी चाफळ येथे मे १९८२ साली 'दासबोध वर्ग' शिबिरास हजर राहण्याचा योग आला. तेथे दासबोधावरील प्रवचने ऐकावयास मिळाली, आणि दासबोधाचा अभ्यास सुरू झाला. पेन्शनर झाल्यामुळे घरापासून अडचणी निर्माण झाल्या. मानसिक व शारीरिक दोन्ही प्रकारचे स्वास्थ्य आम्ही उभयता गमावून बसलो. ज्या गावात पुन्हा यायचे नाही त्याच गावात घर घेण्याचा योग १९८६ त आला. हा प्रारब्ध योगच! शारीरिक व्याधींनी आम्ही उभयता त्रस्त झालो. सौभाग्यवतीला कोणत्याही पँथीचे औषध आज मानवत नाही अशी तिची परिस्थिती आहे. मी पण त्याला अपवाद नाही. मी व ताप यांचे समीकरण! अशातच जवळ असलेल्या 'श्रीदत्त मंदिरात' दर्शनास अधूनमधून जाऊ लागलो. त्यावेळी गुरुबंधू श्री. वासुदेवराव कुलकर्णी यांच्या गाठीभेटी व्हायला लागल्या. त्यांच्या सहवासात 'श्रीवासुदेव निवास व पंथराज' त्रैमासिक

व इतर धार्मिक साहित्य वाचण्याचा व ऐकण्याचा योग आला. ती. प. पू. ब्रह्मश्री कवीश्वर महाराजांकडून त्यांना 'मंत्र व दीक्षा' यांचा लाभ झाला. मी विषमज्वराने चांगलाच आजारी झालो. त्यावेळी बाचेन किंवा आयुष्याचा शेवट होईल अशी भीती मनात असताना 'श्रीसद्‌गुरुनाथ' माझ्यासारख्या पामराला मंत्र देतील किंवा नाही याची चर्चा होई. कारण आजारी असताना स्नान नव्हते. प्रकृती अस्वस्थ होती. त्यामुळे 'श्रीगुरुमहाराजांजवळ कोणत्या मुखाने प्रार्थना करावी? तरी पण पत्र लिहायला काय हरकत?' म्हणून पत्र-जोडकार्ड दिले. श्रीसद्‌गुरु ब्रह्मश्रींचे उत्तर–

दि. २३।८।१९८६

'सप्रेम नमस्कार, वि. क्षेम. आपले पत्र मिळाले. आपणास मंत्रदीक्षा पाहिजे असल्यास आपली इष्ट देवता कळवावी म्हणजे त्या देवतेचा मंत्र पत्राने आपणास कळविता येईल. तो तेथेच आपण प्रार्थनापूर्वक जपण्यास आरंभ केला तरी चालेल. कळावे.'

श्रीसद्‌गुरुनाथांचे दि. २।९।८६ ला लिहिलेले अन्तर्देशीय पत्र कार्ड दि. ४।९।८६ गुरुवारी दुपारी ३ वाजता मिळाले. त्यात

"सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम.

आपले पत्र मिळाले. आपणाजवळ श्रद्धा, भक्ती, धर्मनिष्ठा आहे हीच ईश्वराची मोठी कृपा आहे. '.... ....' या मंत्राचा जप रोज शुचितेने आपण चालू करावा. भोजनापूर्वी १२ माळा तरी करावा. इतर वेळीही जमेल त्याप्रमाणे करण्यास हरकत नाही. कळावे." यानंतर दीक्षेबद्दल प्रार्थना केली याकरिता जोडकार्ड पाठविले होते त्याचे उत्तर श्रीसद्‌गुरुनाथांचे दि. २।१२।८६ रोजी लिहिलेले कृपाकार्ड दि. ९।१२।८६ रोजी मिळाले.

'सप्रेम सादर निवेदन, वि. क्षेम आपले पत्र मिळाले. प्रवासामुळे उत्तरास विलंब झाला.

आपण दि. १५ डिसेंबर सोमवारी पहाटे ५–५॥ ला स्नान करून, देवापुढे नारळ ठेवून, अनुग्रह करणेबद्दल प्रार्थना करून, ठीक ६ वाजता डोळे झाकून शांत चित्ताने बसावे. श्री गुरुमहाराज कृपा करतील. काळजी नसावी. यापुढेही रोज सकाळी संध्याकाळी सवडी-

प्रमाणे बसण्याचा अभ्यास चालू ठेवावा. प्रसादाचा नारळ दुसरे दिवशी फोडून सर्वांनी प्रसाद घ्यावा. कळावे. श्री आज्ञेवरून– '

यानंतर श्रीसद्‌गुरुनाथांनी पत्र–संकल्प–द्वारे सौ. सुशीला यांनाही 'योगदीक्षा' दिली.

दि. २४।२।८७

'मंगल आशीर्वाद, वि. क्षेम. श्री शामरावांचे पत्राप्रमाणे हे उत्तर लिहीत आहे– आपण दि. ७ मार्च शनिवारी पहाटे ५–५॥ ला स्नान करून, देवापुढे नारळ ठेवून अनुग्रह करणेबद्दल प्रार्थना करून, ठीक ६ वाजता डोळे झाकून शांत चित्ताने बसावे. श्रीगुरुमहाराज कृपा करतील. काळजी नसावी. यापुढेही रोज सवडीप्रमाणे बसण्याचा अभ्यास चालू ठेवावा. तो प्रसादाचा नारळ, दुसरे दिवशी फोडून सर्वांनी प्रसाद घ्यावा. कळावे. श्री आज्ञेवरून– '

वरील माहिती जी दिली ती मंत्र व दीक्षासंबंधी या दरम्यान श्री प. पू. ब्रह्मश्री सद्‌गुरुनाथांशी अधूनमधून पत्रव्यवहार झाला आहे. तसेच यापुढेही तो होणार आहेच, यात तिळमात्र शंका नाही. श्री. महाराजांची पत्रास उत्तरे येतात, पण बरेच वेळा ते श्रीमद् भागवतासारख्या धार्मिक कर्तव्यात व्यस्त असल्यामुळे उत्तरास विलंब होतो हे जरी खरे असले, तरी महाराज प्रामाणिकपणे विलंबाचे कारण लिहितात व पुढे आपल्या पत्रास उत्तरे देतात.

माझ्यासारखी अशिक्षित व्यक्ती ती. प. पू. ब्रह्मश्री 'श्रीं'चे विषयी काय लिहू शकणार ? श्रीगुरुमहाराजांनी माझ्यासारख्या अनेक व्यक्तींवर कृपा केलेली असणार. त्या संदर्भात मला आलेले अनुभव शब्दांच्या पलीकडले असणार व ते सुद्धा बरोबर लिहिता येणार नाहीत. म्हणून त्यांच्याच पत्रांच्या आधारे लिहिण्याचा मी प्रयत्न केला आहे. 'श्रीं'नी लिहिलेली पत्रे खाली देत आहे. यात सारांश देत आहे.

'सप्रेम नमस्कार.' प्रत्येक पत्रात नमस्कार लिहिलेले आहे. त्यामुळे मला "श्री" महाराज 'आशीर्वाद' का लिहीत नाहीत म्हणून आपली पात्रता–शुद्धी नसल्यामुळे तर असे लिहीत असतील असे वाटायचे. पण आमचे गुरुबंधू श्री. कुलकर्णी दत्त मंदिर धामणगाव रेल्वे यांनाही सप्रेम नमस्कारच लिहिलेले बघितले म्हणजे 'श्री' महाराज सर्वभूती

परमेश्वर पहातात. ‘श्रीदत्त वाक्‌सुधा’ मधील प्रवचनारंभी–

जे पुरुषार्थ सिद्धी चौथी । घेऊनी आपुले हाती ।।
रिगाला भक्तिपंथी । जगा दे तु ।।
म्हणोनिया नमस्कारु । तयाते आम्ही माथा मुकुट करू ।
तयाची टाच धरू । हृदयी आम्ही ।।
अर्जुना गा तो भक्तु । तोचि योगी तोचि मुक्तु ।
तो वल्लभा मी कांतु । ऐसा पढीये ।। ज्ञा. अ. १२
दोवरी दोनी । भुजा आलो घेऊनी ।
आलिंगावया लागूनी । तयाचे अंग ।।
तया लागी मजरूपा येणे । तयाचेनि मज येथे असणे ।
तया लोण किजे जी प्राणे । ऐसा पढिये ।।
पूज्यता डोळा न देखावी । स्वकीर्ती कानी नायकावी ।
हा अमुक ऐसा नोहावी । सेचि लोका ।। ज्ञा. अ. १३
किंबहुना स्वधर्मी थोरू । अवसरी उदारू ।
आत्मचर्चे चतुरू । एरव्ही वेडा ।। २१३ इत्यादी

अशी कितीतरी ओव्यांची संख्या दिलेली आहे. श्रीसंत श्रीनामदेवराय म्हणतात–ज्ञानेश्वरीची एक तरी ओवी अनुभवावी ।। असो.

“ईश्वर प्रसादाने सुरू झालेला साधनाभ्यास नित्यश्रद्धेने चालू ठेवावा. कल्याणाचा मार्ग आहे. आपण तूर्त इकडे दीर्घ प्रवास करून येण्याचे ठरवू नये. शक्ती चांगली आल्यावर पाहता येईल.”

२२–१०–८६ चे पत्रात–आपली प्रकृती आता सुधारली असेलच. प्रकृतिमानाप्रमाणे नामस्मरण, संत–ग्रंथ वाचन यथाशक्ती चालू ठेवावे.

दि. ११–८–८७ “आपल्या इच्छेप्रमाणे, प्रकृती स्वास्थ्य पाहून आपण इकडे श्री भागवत सप्ताहास येणेस हरकत नाही.”

दि. २२-९-८७ “आपल्या दोघांच्या प्रकृतीकरिता चांगले औषध विश्रांती चालू ठेवावी. ईशकृपेने बरे वाटेल. आपण दोघेही इतक्या लांबून येथे श्री भागवतसप्ताह श्रवणाकरिता आलात, प्रकृतीची साथ नसताही, येथील न्यूनाधिक सर्व मान्य करून राहिलात ही आपली ईशगुरुनिष्ठा प्रशंसनीय आहे. प्रभुकृपेचे अधिकारी आपण आहात. असो. आपल्या सौ. स मंगल आशीर्वाद इतर सर्वांना यथोचित न. व आ.”

दि. १७-७-८८ "श्रद्धेने सवडीप्रमाणे साधनाभ्यास चालू ठेवावा. ईश्वर प्रार्शना, नामस्मरण करीत राहून योग्य औषधोपचार करावा म्हणजे भोग संपून जाईल. काळजीचे कारण नाही. प्रारब्ध भोग सर्वांनाच अपरिहार्य आहे पण ते ईशकृपेने संपते." दि. २९-११-८८ च्या पत्रात ईश्वर प्रार्थना, नामस्मरण, दिगंबरा मंत्राचा जप सवडी-प्रमाणे नित्य चालू असावे. ईशकृपेने परमार्थ सर्व अनुकूल होईल."

दि. ३१।५।८९ आमच्या येणेचा नियम नसतो. तरी मनाला लावून घेऊ नये. ईश्वरस्मरण नित्य ठेवून प्राप्त कर्तव्य करीत असावे.

दि. १४।१०।८९ श्रीदत्त देउळगाव राजा- आम्ही तूर्त इकडे प्रवासात आहोत. श्रीगुरुमहाराजांचे कृपेने आपला साधनाभ्यास व्यवस्थित सुरू झाला आहे. तो नित्य श्रद्धेने प्रार्थनापूर्वक चालू ठेवावा. हळू हळू ईश कृपेने प्रगतीचा अनुभव येत राहील. कल्याणाचा मार्ग आहे. सर्वांस यथोचित नमस्कार आशीर्वाद. कळावे.

वरील मजकूर देण्याचे तात्पर्य. श्रीगुरुमहाराजांनी वेळोवेळी अहेतुक कृपा, त्यांच्याच कृपेमुळे औषधांनी गुण आणण्यास मदत केली. त्यांच्याच कृपाप्रसादाने 'श्रीगुरुवामन त्रिपदी' रोज वाचावीशी वाटते. तसेच जप, नामस्मरण, ईशस्मरण व संतसंगतीत काळ जावा असे वाटते. एवढेच नव्हे तर श्रीदत्त सप्रदायातील थोर पुरुषांची चरित्रे वाचावीत, ऐकावीत असे तर वाटतेच पण संप्रदायातील हयातीत असणाऱ्या व्यक्तींचा परिचय व्हावा व त्याचेही आशीर्वाद घ्यावेत असे वाटते आहे. त्याप्रमाणे ती. प. पू. ब्रह्मश्री नारायण काकासाहेब ढेकणे महाराज यांचा परिचय व प्रत्यक्ष मार्गदर्शनाचा लाभ झाला आहे, होत आहे, होणार आहे. त्यांचा पत्रव्यवहार श्रीगुरुस्थानी मानूनच होत आहे. त्यांचेकडून नेहमीच मार्गदर्शन तर मिळतेच पण प्रथम 'कल्याणभाजन' यासारखे शुभाशीर्वाद व 'कल्याणमस्तु' शेवटी आशीर्वाद प्राप्त होत आहेत. त्यामुळे आम्हास अधिक हुरूप वाटतो. धैर्य येते व व्याधीची भीती कमी होऊन अपमृत्यूची भीती वाटेनाशी होते. कधीकधी असे वाटते की जे व्हायचे असेल ते होवो. पण महाराजांचे आशीर्वाद मात्र नेहमी पाठीशी असोत. त्यांच्या आशीर्वादाने अमंगलत्व दूर होते. पवित्रता येते. प. पू. श्री. मामा देशपांडे यांचा अमृतमहोत्सव वर्धा येथे १९८९

साली झाला. त्यावेळी त्यांच्याही दर्शनाचा लाभ झाला. दसऱ्याला पत्ररूपी सोने अर्पण केले. त्यावर आशीर्वादरूपी प्रसाद प्राप्त झाला. आज ते आमच्यात शरीराने नाहीत ही फार मोठी संप्रदायाची हानी झाली. मी वारकरी संप्रदायाचा आहे. विठ्ठलाच्या भक्तांचा दास तसाच मी श्रीदत्तभक्तांचाही दास आहे. माझ्या दृष्टीत श्रीविठ्ठल म्हणजे दत्त व श्रीदत्त म्हणजे विठ्ठल ही भावना रुजत आहे. प. पू. श्रीरामकवींचा प्रत्यक्ष दर्शनाचा योग आला नाही तरी त्यांनी 'श्रीगुरु–वामन–त्रिपदी'मध्ये अध्यात्माचे सारज्ञान कथन केले आहे. एवढेच नव्हे तर माझ्यासारख्या अज्ञ, अशिक्षित व्यक्तीस त्यात सर्व काही आहे असे वाटते आहे. शेवटी तात्पर्य हेच की ही सर्व गुरुकृपाच !

ज्या ज्या ठिकाणी मन जाय माझे । त्या त्या ठिकाणी निजरूप तुझे ।
मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी । तेथे तुझे सद्गुरु पाय दोन्ही ॥
उपासनेला दृढ चालवावे । श्रीगुरुदेव संतांसी सदा नमावे ।
सत्कर्म योगे वय घालवावे । 'कल्याणमस्तु' आशिर्वाद द्यावे ॥

* * *

## तेजस्वी

अजित कुलकर्णी

प रम महाराज मी करीतसे तुम्हा वंदन
पू जनीय ज्ञानाचा पसरे सुगंध जगती चंदन
द त्ताचेकृपे जगती या विभुती पृथ्वीवरी जन्मल्या
त्त हाती शिदोरी देत भक्ता भागवत निःसंकोचल्या
म हान तेजस्वी तनुही गहिरी कांती मुखश्रीवरी
हा भाल विशाल बुद्धिही बरवी दावीत मुद्रेवरी
रा हुन सान्निध मज तरी गुरु अज्ञान लागो थिजे
ज मती एकांती साधना गुलाबकलिका तेजस्वी जे
क धी ही उठावदार व्यक्तिमत्व शोभते शालीनता
वी रक्ती विराजे गळचात प्रसन्नवदनी गंभीरता
श्व रा आशीर्वाद शिरावरी मज द्या मानस प्रेरणा
र मावे हरीनाम घेऊनी सदा ध्येयास ही प्रेरणा

# पू. सौ. आईसाहेब ( लक्ष्मीबाई कवीश्वर ) यांची मुलाखत

संदर्भ – या मुलाखतीला प्रश्नोत्तराचे स्वरूप होते परंतु त्यातूनच माहितीवजा लेख तयार केला आहे. —संपादक

आम्ही १९३५ मध्ये पुण्यात आलो. सुरुवातीची सहा वर्षे शनिवारात नातूंच्या वाड्यात राहिलो. नंतर १।१।। वर्षे सदाशिव पेठेत राहिलो आणि इ. स. १९४२ मध्ये कन्याशाळेसमोर अण्णासाहेब वर्तकांच्या वाड्यात आलो. प्रथम तळमजल्यावर होतो, पण इमारतीच्या नव्या बांधकामानंतर तिसऱ्या मजल्यावरची जागा मिळाली. तेथे पाण्याचा फार त्रास काढावा लागला. तळमजल्यावर धुणे–भांड्यासाठी सार्वजनिक नळावर जावे लागे. वाड्यात १२ बिऱ्हाडे होती. पाण्यावरून कटकटी व्हायच्या. यासाठी मुलांना ३/३ पोषाख केले होते. रात्रीच दुसरे दिवशीच्या धुण्याची बादली नळाच्या कोपऱ्यात ठेवीत असे. यामुळे पहाटे नंबर लागायचा. या जागेत मुलामुलींची लग्ने झाली, बाळंतपणे झाली, आजारपण झाले, सणवार झाले, पाहुणे आले गेले. अशोकच्या लग्नापर्यंत मी घरातले काम घरीच केले.

अशोकचे जावळ, माहूरला जाऊन कुलस्वामिनीपुढे काढले. त्यावेळी गुळवणी महाराज, मामंजी, सासूबाई, परचुरे संन्यासी स्वामी, देऊळगाव राजांची मंडळी अशी बरीच मंडळी आमच्याबरोबर माहूरला आली होती.

थोरली सुमन. तिचे लग्न १४ व्या वर्षी झाले. १९५० साली वैरागला डॉ. भातलवंडे यांना दिली. तिचे लग्न वैरागलाच झाले. त्यांची माणसे पुष्कळ होती. डॉक्टरांच्या आई होत्या. लग्न फारच छान झाले.

श्रीगुळवणी महाराजांचा अमृतमहोत्सव झाला त्यातील धार्मिक जबाबदारी ' यांचे 'वर होती. त्यावेळी कुमारी पूजनासाठी कुमारींची

निवड यांनीच केली. आपल्या दोन लहान मुलींची नावे दिली नाहीत. आपल्याला कोणी नावे ठेवू नयेत म्हणून फक्त शैलाचे नाव कुमारी पूजनाच्या यादीत दिले. शोभाला फार वाईट वाटले. रडली. ह्यांनासुद्धा फार वाईट वाटले. त्यांनी बाजारातून तसेच कापड आणले आणि शोभाला परकर झंपर शिवून आणले. गुळवणी महाराजांना हे समजल्यावर त्यांनी तिला बोलावून घेऊन तिची पूजा करून तिला दक्षिणा–कापड दिले.

ते कन्यागताचे दिवस होते. हे वाडीला गेले. त्यावेळी घरात कोणी आजारी नव्हते. पण ते गावाला गेल्यावर घरातील एकेकाने अंथरूण धरायला सुरवात केली. अशोक आजारी पडला, सुलभा, अनिल आणि मी पण तापाने अंथरूण धरले. एकटया शोभावर सगळं काम पडलं. त्याचा ताण आला आणि शोभा आजारी पडली. तिला उलटया सुरू झाल्या. आता मात्र सहनशक्तीच्या बाहेर गेले. शेजारच्या माणसाकडून गुळवणी महाराजांना इकडे येऊन जा म्हणून निरोप पाठविला. महाराज लगेच आले. आम्ही सर्वजण अंथरुणावर पडलो होतो. शोभाला फणफणून ताप भरला होता. सकाळपासून २० उलटया झाल्या होत्या तिला. महाराजांनी एकूण दृश्य पाहिले. म्हणाले, " शोभाला डॉक्टराकडे घेऊन जातो. बरे वाटले म्हणजे घेऊन येतो. " त्यांनी माझ्या अंथरुणाखाली नोटांचे पुडके ठेवले. म्हणाले, " असू दे, लागतात. " गोपाळराव खेरांची मोटार आणली. बरोबर नाना भालेराव, नारायणराव देशपांडे होते. गेले शोभाला घेऊन. माझा भाचा आणि सुमनचा दीर बरोबर दिले. नायडू हॉस्पिटलमध्ये नेले. ती बेशुद्धच होती. डॉक्टरांना भेटून तिची सर्व व्यवस्था केली. रात्री दोघांना तिच्याजवळ ठेवले. त्यांची पण व्यवस्था केली. मग महाराज घरी आले. रात्री २॥ ला ती गेली. भाचा रात्री महाराजांकडे आला व हे वृत्त सांगितले. महाराजांनी नीट विचारपूस करून सांगितले, तू परत हॉस्पिटलमध्येच जाऊन थांब. घरी जाऊन सांगू नकोस. मी सकाळी तिकडे जाईन. त्याप्रमाणे सहाला घरी महाराज मोटार घेऊन आले. मला हाक मारली. " लक्ष्मीबाई! " मी त्यांना ' या ' म्हणाले. जवळ येऊन म्हणाले " आपण आता बाहेर जाऊन येऊ. तोंड धुवून पाणी पी. " मला त्यांनीच पाणी दिले. पाणी

पिऊन निघाले. घरात सर्वजण आजारी. मी कसा तरी धीर धरून गेले. शोभाला भेटायला निघालो एवढाच अंदाज आला. तिथं गेल्यावर काय दिसलं ? शोभा शांत झोपलेली. मला समजले. त्यावेळी मला काय झालं हे कसं सांगता येणार ? महाराजांनी खूप शांत करण्याचा प्रयत्न केला. आणि त्याच स्थितीत मला घरी आणून सोडले. तिकडे महाराज परत गेले. तिकडेच तिची क्रिया केली. यांना तार पाठविली.

'हे' दुसरे दिवशी पहाटे आले. सर्वांनी दुःखाचे आवेग मोकळे केले. सर्व हकीगत सांगितली. महाराजांनी फारच कष्ट घेतले. पैशांनी धीर दिला. शब्दांनी धीर दिला. स्वतः येऊन सर्व करीत होते. दोन दिवसांत सासूबाई आल्या. इतरही मंडळी आली.

या दुःखातच यांना शंकराचार्यांकडून सुवर्णकंकण आले. मानपत्र आले. त्यावेळी हे म्हणाले, "आनंदही तितकाच मानायचा आणि दुःखही तितकेच मानायचे. हे सर्व ईश्वराच्या हातात आहे." कोणत्याही स्थितीत 'हे' इतके शांत कसे राहतात हे कोडे मला उलगडत नाही. यांना भेटायला विद्यार्थी यायचे– मोठाले लोक यायचे. त्यांच्यापुढे ते 'कंकण' ठेवून म्हणायचे– सुख दुःख सारखे मानण्याचा अभ्यास करण्यासाठी ही परिस्थिती देवाने पुढे ठेवली आहे.

अनिलचे आजारपण हा विषय तसाच मोठा. दोन वर्षांचा असताना तापाने आजारी पडला. नवरात्राच्या आदले दिवशी तर फारच झाले. सर्व अंग गार पडत चालले. नुसती धुगधुगी राहिली होती. मला काही सुचत नव्हते. यांना मी म्हणाले– "बघा हो हा कसा करतो?" त्यावर ते म्हणाले "हे चक्र जसे फिरेल तसे आपण फिरत राहायचे. काळजी करून काही उपयोग नाही." मला तर काही सुचत नव्हते. अनिलजवळ बसून होते. मी त्यांना काही म्हटले तर त्यांचे उत्तर ठरलेले. "उद्या नवरात्र बसले की त्याला बरे वाटेल. तोपर्यंत काही उपयोग नाही. तुम्ही लक्ष देऊ नका." आणि अक्षरशः तसेच झाले. यांनी पहाटे नवरात्र बसवले आणि अनिलला ऊब आली.

अनिलला दुसऱ्या वर्षापासून पोलिओ झाला. नऊ वर्षांपर्यंत त्याला नीट उभं रहाता येत नव्हतं की चालता येत नव्हतं. खूप उपचार केले या सात वर्षांत. तेलाने चोळले, गरम पाण्याचे वाफारे दिले, वाळूच्या

पिशव्या लावल्या, आयुर्वेदाची औषधे झाली. शेवटी देऊळगावराजाला जाऊन राहिले, बालाजीसाहेबांना नवस केला, "चांगले वाटलं म्हणजे चांदीचे पाय वाहीन" तेव्हा तो चालू लागला. पुढे चांदीचे पाय बालाजीला वाहिले. आता अनिलमध्ये पोलिओचे काही लक्षण राहिलेले नाही. त्याच्या कानाचेही दुखणे होऊन गेले, त्यावेळी हे सुद्धा हॉस्पिटलमध्ये जाऊन बसत असत. त्यामुळे अनिलचे शिक्षण उशीरा झाले. त्याला नोकरी मिळणे कठीण झाले होते. तोपर्यंत तो वर्तमानपत्रे टाकणे, दूध घालणे यांसारखी कामे करीत होता. पण आमच्या माधवरावांनी त्याला चांगली नोकरी लावून दिली.

वैरागला, सुमनकडे एकदा पाद्यपूजेचा मोठा कार्यक्रम झाला. त्यावेळी गुळवणी महाराज–मामंजी (धुंडिराज महाराज) आणि आम्ही होतो. तेव्हा तिघांची पाद्यपूजा डॉक्टरांनी आणि सुमनने केली. तिघांना उत्तम सोवळी दिली. आंगठ्या दिल्या, दोनशे पान तर जेवायला होते. बासुंदी–पुरीचा बेत होता. लक्षात राहण्यासारखा तो कार्यक्रम झाला.

यावेळी वैरागलाच अशोकसाठी मुलगी पाहिली. महाराजांनी पसंत केली. मामंजींनी पसंत केली. सर्वांना पसंत पडली.

अजितचा जन्म गुळवणीमहाराजांच्या जन्मदिवशी झाला आहे. मार्गशीर्ष व।। १३ त्याची मुंज महाराजांनी आश्रमात लावण्यास सांगितले. त्याप्रमाणे मुंज आश्रमात झाली. (सर्वात धाकटा मुलगा)

अशोकचा साखरपुडा महाराजांनी आश्रमात केला. व्याही भोजन आश्रमात झाले. मुलीला (सविताला) चांदीच्या रुपयाने कुंकू महाराजांनी लावले.

यांची एकसष्टी तर महाराजांनी केवढ्या मोठ्या प्रमाणात साजरी केली. पुष्कळ आठवणी आहेत, थोडक्यात किती सांगता येणार !

अशोकचा थोरला मुलगा आमोद म्हणजे मामंजींचा पणतू. तेव्हा १९७३ मध्ये महाराजांची प्रकृती ठीक नव्हती. म्हणून महाराजांच्या इच्छेप्रमाणे 'प्रपौत्रदर्शन' कार्यक्रम आश्रमात केला. त्यावेळी (मामंजी) धुंडिराज महाराज, सौ. आईसाहेब, सर्व नातेवाईक मंडळी आली होती. पुण्याहवाचन वगैरे सर्व यथासांग झाले. महाराजांच्या खोलीत आम्ही सर्व बसलो. अशोकने आमोदला मांडीवर घेतले. महाराजांनी १२



— श्रीगुरुदेवांना देवांचे वंदन —

एवढे जिये महिमेचे करणे ।
ते वाचाबळे वानावे कवणे ।
काइ सूर्याचिया अंगा उटणे
लागतसे ॥ १ ॥

तैसे श्रीगुरुचे महिमान ।
अकळते के असे साधन ।
हे जाणोनिया नमन ।
निवांता चि केले ॥ २ ॥



पू. आत्माराम शास्त्री  पू. गुळवणी महाराज  पू. दत्तमहाराज
त्रिगुणात्मक त्रयमूर्ति दत्त हा जाणा !



पू. मामा देशपांडे आणि पू. दत्तमहाराज

सुवर्णाची फुले आणि मामजींनी १२ सुवर्णाची फुले आमोदच्या मस्तकावर वाहिली. हे एक एक फूल वाहिले म्हणजे एक एक यज्ञ केल्याचे पुण्य मिळते. आणि ज्यांनी हा कार्यक्रम पाहिला त्यांना काशीयात्रेचे फळ मिळते.

श्रीगुरुदेव दत्त

* * *


*With best compliments from :*

# Akshay Urja
# Pvt. Ltd.

**Manufacturers of Solar Water Systems for Domestic / Industrial Hotels & Hospital uses.**

**'Girija' 5, Sitabag Colony**
**Vitthalwadi road,**
**Poona 411030**

Phones – 424859, 334973

# पितृचरणी वाक्सुमने

लेखक – दत्तात्रेय कृपाकांक्षी, अशोक कवीश्वर

पूज्य महाराजांचा ज्येष्ठ पुत्र होण्याचे भाग्य लाभले असताना ते मला दीक्षागुरु आणि मंत्रगुरु म्हणूनही प्राप्त झाले, त्यामुळे कल्पवृक्षच मिळाल्याचा आनंद होत आहे. आमची वाणी पूज्य महाराजांचे गुण-वर्णन करण्यास असमर्थ आहे. तथापि शिष्यभाव म्हणून काही लिहिल्या-वाचून राहवत नाही. श्रीमद् भागवतांत वर्णन केल्याप्रमाणे ते पूर्णपुरुष आहेत. भगवद्गीतेत श्रीभगवंतांनी केलेली दैवीसंपत्तीची सर्व लक्षणे त्यांचे ठिकाणी उत्कटतेने आढळतात.

कर्माचे ठायी कर्तेपणाचा अभिमान न ठेवता प्रत्येक प्राणिमात्राचे ठिकाणी ईश्वरभावच कसा ठेवता येतो तो प्रत्यक्ष पू. महाराजांचे चरित्रावरून पहाण्यासारखे आहे. प्रसंग १९६६–६७ च्या वर्षातला! महाराजांचे आशीर्वादाने मी वैद्यकीय पदवी घेतली. त्यावेळी माझे सर्व शिक्षण थोरल्या मेव्हण्यांनी केले. ही जाणीव पू. महाराजांचे मनात सदैव होती. मी शेवटची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर मला लिहिलेल्या पत्रात ते लिहितात, 'श्री. डॉ. यशवंतराव व सौ. सुमनताई शिवपार्वती आहेत. ती दोघे उभयता आणि त्यांची अपत्ये ह्या सर्वांना शिवस्वरूप समजून त्यांना आपण काही सहस्र (अर्थ) बिल्वदले अर्पण करून त्यांचे पूजन करूंया! आपण संकल्पिलेले हे शिवपूजन यथावकाश पार पडण्या-साठी भगवान श्री आशुतोषाजवळ प्रार्थना करूंया।' आणि अल्पावधी-तच हे शिवपूजन पार पडले ते केवळ प्रत्येक प्राणीमात्रात ईश्वरभाव पाहाण्याच्या पूज्य महाराजांच्या दूरदृष्टीमुळेच ! !

"कोणाही जीवाचा न घडो मत्सर" ही भावना सदैव अंतः-करणात ठेवून कोणाचीही काया–वाचा–मनाने निंदा किंवा मत्सर पू. महाराजांचेकडून झालेली नाही. इ. स. १९७५ मध्ये पू. महाराजांचे मोतींबिंदूचे ऑपरेशन झाले. शस्त्रक्रिया करणारे गृहस्थ निवृत्त झालेले

नेत्रशल्य विशारद होते. त्यांनी पूज्य दत्तमहाराजांना जवळ जवळ सक्ती करूनच ऑपरेशन करून घेण्यास भाग पाडले. त्या डॉक्टरमहाशयांच्या उत्कट दत्तभक्तीमुळे पूज्य दत्तमहाराजांनी ऑपरेशन करून घेण्यास अनुमती दिली. "कर्मणो गहना गतिः" या न्यायाप्रमाणे ऑपरेशननंतर १॥ ते २ महिने सतत डोळ्यांतून रक्तस्राव होत होता. पुढे दुसऱ्या डॉक्टरांकडून तो डोळा दुरुस्त करावा लागला. झालेल्या प्रकाराबद्दल घरामध्ये असंतोष होता. परंतु पू. दत्तमहाराज मात्र शांत होते. ते म्हणाले, "परमेश्वराने आपल्याला कसलीही पीडा न देता ६७ वर्षे विनासायास दृष्टी दिली असता, असा एखादा प्रसंग प्रारब्ध वशात आला तर खेद का करायचा ? कोणाबद्दलही असूया (मत्सर, तिरस्कार) असता कामा नये. प्रारब्धाने जे होणार आहे ते टळणार नाही."

अशाप्रकारे अनेक तऱ्हेने त्यांचे गुणवर्णन करता येईल. स्वतःच्या घरीसुद्धा अतिथीप्रमाणे वागणारे, बालकभाव सदैव जपणारे, भयाचा सर्वथा अभाव असणारे, अपकार करणाऱ्यांवरसुद्धा सदैव उपकारच करणारे, उत्तमप्रकारे अंत:करणाची संशुद्धी असणारे आणि क्रोधाला जरा देखील थारा न देणारे, 'काया-वाचा-मनाने' कोणालाही कसलेही दुःख न देणारे, तत्त्वज्ञान व सात्विक दानांत निरंतर अग्रेसर असणारे, असे पूज्य दत्तमहाराज माझे पिता आहेत याचा मला अतीव अभिमान आहे. अशा ऋषितुल्य आणि गुरुस्वरूप आणि 'आचारो प्रभवो धर्मः' अशा वृत्तीने राहाणाऱ्या पित्याला आणि आपल्या पूज्य महाराजांना त्या जगन्नियंत्या परमेश्वराने पूर्ण शतायुषी आणि आरोग्यसंपन्न करावे हीच दत्तचरणी आणि कुलदेवी श्रीरेणुकामातेच्या चरणी अनन्य प्रार्थना ! !

* * *

"अज्ञानाचा पडदा म्हणजे अविवेक. अविवेक म्हणजे मोह. गुणग्राहकतेपेक्षा दोषैक दृष्टीचा मोह जास्त असतो. मोहामुळेच संतांच्या गुणांचे अवस्थांचे ज्ञान होत नाही."—

दत्तमहाराज कवीश्वर

# पू. श्रीपादराव उर्फ मामासाहेब देशपांडे यांना

## – श्रद्धांजली –

हजारो श्रोत्यांना मंत्रमुग्ध करून जागच्या जागी खिळवून ठेवणारी ज्ञानेश्वरीवरील रसाळ प्रवचने करणारे प्रख्यात पू. मामासाहेब देशपांडे हे बुधवार दि. २१–३–९० ला पहाटे ३ वाजता नश्वर देहाचा त्याग करून शाश्वत श्रीपदी स्थिरावले.

"देव मस्तकी धरावा। अवघा हल्लोळ करावा" ही प्रचीती पू. मामासाहेबांनी घेतली आणि दिली. मध्यप्रदेशातील भिलाई पासून कर्नाटकातल्या बेळगावपर्यंत मामांचे हजारो शिष्य पसरले आहेत. मामांच्या शब्दांत जादूचे सामर्थ्य होते. समाजातील सर्व थरातील व्यक्ती मामांच्या शिष्य परिवारात आहेत. मामा नित्य आषाढी वारी करणारे वारकरी होते. नित्य गुरुद्वादशीला वाडीला जाणारे दत्तभक्त होते.

मामांना इ. स. १९५३ मध्ये गुरुपौर्णिमेचे दिवशी, सोलापूर येथे, श्री वैद्यमास्तर यांचे माडीवर, पू. श्रीगुळवणीमहाराजांनी शक्तिपातदीक्षा दिली. त्यानंतर कुरगड्डीला काही काळ साधना आणि उपासना यासाठी जाऊन राहिले होते. या काळात मामा लोणावळा येथील 'कैवल्यधाम'मध्ये योगाभ्यासासाठी जाऊन राहिले होते. या संस्थेने त्यांना योगप्रचारासाठी राजकोटला पाठविले होते. इ. स. १९५९ मध्ये पू. श्रीगुळवणी महाराज गुजराथेत गेले होते. त्यावेळी त्यांनी मामांना मुद्दाम अहमदाबादेस बोलावून घेऊन गुजराथमधील दौऱ्यात आपल्याबरोबर घेतले होते. या यात्रेत गिरनार, सोमनाथ, प्रभासपट्टम, द्वारका इत्यादी सर्व स्थाने होती.

मामा परदेशी जाणार म्हणून रहाळकर मंदिरात झालेला निरोप समारंभ पू. गुळवणी महाराजांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला होता. माऊलीच्या उद्‌घाटनाचे वेळी पू. महाराज उपस्थित होते.

मामांनी गेल्या तीन तपे केवळ श्रीगुरुमहाराजांनी दिलेल्या शक्तिपात साधनेचा भरपूर प्रचार केला. यासाठी ज्ञानेश्वरीचे रहस्योद्-

घाटक, योगसंप्रदाय, भक्तिसंप्रदाय यांचे परस्पर सहाय्यक स्वरूप ते प्रवचनातून मार्मिकपणे सांगत असत. त्यांच्या साधकाश्रमाच्या भव्य योजनांचे स्वप्न सत्य स्थितीत पहाण्यापूर्वीच त्यांनी जगाचा निरोप घेतला. गेली कित्येक वर्षे ते प्रकृतीवरील आघातांनी त्रस्त होते. पण त्यावर मात करून ते सर्व कार्यक्रम, प्रवास करीत होते. त्यांनी आपले जीवनपुष्प सद्‌गुरुकार्याला समर्पित केले. त्यांच्या स्मृतीला ही श्रद्धांजली समर्पित.

* * *

# पू. श्री. वासुदेवशास्त्री कवीश्वर यांना श्रद्धांजली

प. पू. श्रीदत्तमहाराजांचे नं. ३ चे बंधू पू. श्रीवासुदेवशास्त्री हे दासनवमीचे दिवशी जालना येथे त्यांचे चिरंजीव श्री. अनंतराव यांचे घरी अचानक, हृदयविकाराने, श्रीचरणी लीन झाले. श्रीवासुदेवशास्त्री हे अत्यंत सात्त्विक, निरंहकारी–निर्लोभी–सरळ स्वभावाचे धार्मिक वृत्तीचे होते. पू. श्रीदत्तमहाराजांचे 'ज्येष्ठ भ्राता पिता समान' या न्यायाने पितृवत् वात्सल्यप्रेम श्री. वासुदेवशास्त्रींचेवर होते. या दुःखद वार्तेने पू. श्रीदत्तमहाराजांनासुद्धा हे दुःखावेग आवरणे कठीण गेले. सर्व कवीश्वर घराण्यातील आप्तेष्टांना या वार्तेने अतीव दुःख झाले यात शंकाच नाही. परंतु या वृद्धावस्थेत मागे राहिलेल्या त्यांच्या पत्नींना–चि. अनंतरावांच्या मातोश्रींना– हा कोसळलेला दुःखाचा कडा सहन होणे फार अवघड आहे. या सर्व परिवाराची पू. श्रीदत्तमहाराजांचेवर पितृतुल्य श्रद्धा आहे. त्यांच्या आधारावर सर्वजण दुःख सहन करीत आहेत. आम्ही सर्व गुरुबंधू या दुःखाचा अनुभव घेत आहोतच. आमची श्रद्धांजली पू. श्रीवासुदेवकाकांचे स्मृतीला सादर समर्पित आहे. एवढया महान पवित्र कुळात जन्मलेल्या या पवित्र देहाला उत्तम गती देण्यास श्री बालाजी महाराज समर्थ आहेतच, पण आम्हीही श्रीचरणी प्रार्थना करीत आहोत.

* * *